# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र

**बी. ए. भाग–१ राज्यशास्त्र**

**सत्र–१ : Skill Enhancement Course SE 01**

# ग्रामीण स्थानिक स्वराज्य शासन संस्था

**(Rural Local Self Government)**

**सत्र–२ : Skill Enhancement Course SE 02**

# नागरी स्थानिक स्वराज्य शासन संस्था

**(Urban Local Self Government)**

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार सुधारित अभ्यासक्रम
शैक्षणिक वर्ष २०२४–२५ पासून

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०२५
बी. ए. (राज्यशास्त्र) भाग-१ करिता
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती :**

■

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. एन. शिंदे**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

ISBN- 978-93-49570-85-6

★ दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
## शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

### ■ सल्लागार समिती ■

**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) प्रकाश पवार**
राज्यशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. विद्याशंकर**
कुलगुरू, केएसओयू,
मुक्तगंगोत्री, म्हैसूर, कर्नाटक-५७० ००६

**डॉ. राजेंद्र कांकरिया**
जी-२/१२१, इंदिरा पार्क,
चिंचवडगांव, पुणे-४११ ०३३

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**डॉ. संजय रत्नपारखी**
डी-१६, शिक्षक वसाहत, विद्यानगरी, मुंबई विद्यापीठ,
सांताक्रुझ (पु.) मुंबई-४०० ०९८

**प्रा. (डॉ.) कविता ओझा**
संगणकशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) चेतन आवटी**
तंत्रज्ञान अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. एस. महाजन**
अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एस. देशमुख**
अधिष्ठाता, मानव्य विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) श्रीमती एस. एच. ठकार**
प्रभारी अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्या (डॉ.) श्रीमती एम. व्ही. गुळवणी**
प्रभारी अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. एन. शिंदे**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. ए. एन. जाधव**
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्रीमती सुहासिनी सरदार पाटील**
वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. के. बी. पाटील** (सदस्य सचिव)
प्र.संचालक, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


■ **अभ्यासमंडळ : राज्यशास्त्र** ■

अध्यक्ष - **डॉ. रविंद्र पांडुरंग भणगे**
राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **डॉ. प्रकाश रामचंद्र पवार**
  राज्यशास्त्र अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. अरुण मारुतीराव चव्हाण**
  भोगावती महाविद्यालय, कुरुकली, जि. कोल्हापूर
- **डॉ. शिरीषकुमार धोंडिराम पवार**
  बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण, ता. कराड,
  जि. सातारा
- **डॉ. सचिन महादेव पाटील**
  श्रीमती कुसुमताई राजारामबापू पाटील कन्या महाविद्यालय,
  उरूण-इस्लामपूर, जि. सांगली
- **डॉ. विक्रमराव एन. पाटील**
  शंकरराव जगताप जगताप आर्टस कॉलेज, वाघोली,
  जि. सातारा
- **डॉ. श्रीमती मेघा संजय पाटील**
  कै. मालती व. पाटील कन्या महाविद्यालय,
  उरूण-इस्लामपूर, जि. सांगली
- **डॉ. संतोष केशव खडसे**
  कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरूण-इस्लामपूर,
  ता. वाळवा, जि. सांगली
- **डॉ. श्रद्धा विनोद कोठावळे**
  सहकारभूषण मा. एस. के. पाटील कॉलेज, कुरुंदवाड,
  ता. शिरोळ, जि. कोल्हापूर
- **डॉ. राहुल दत्ता मांडणीकर**
  श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, २९६८, 'सी',
  दसरा चौक, कोल्हापूर
- **प्राचार्य डॉ. बाळ अनंत कांबळे**
  धनंजयराव गाडगीळ कॉलेज ऑफ कॉमर्स, सातारा
- **डॉ. वासंती प्रतापचंद्र रासम**
  घरोंदा ३८४/३८५ आर. के. नगर सोसायटी नं. ५,
  मोरेवाडी, कोल्हापूर
- **डॉ. अनिल देवगौडा पाटील**
  आर्टस, कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेज, गडहिंग्लज,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. सिकंदर आप्पासाहेब जमादार**
  राजहंस हौसिंग कार्पोरेशन प्लॉट नं. ०९, विजय नगर,
  इस्ट सांगली मिरज रोड, सांगली
- **प्रा. रमेश दिनकर डुबल**
  किसन वीर महाविद्यालय वाई, जि. सातारा

# प्रस्तावना

शिवाजी विद्यापीठाने दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या माध्यमातून शिक्षणापासून वंचित राहिलेल्या अनेकांना पुन्हा शिक्षण प्रवाहात आणण्याची सुवर्णसंधी उपलब्ध करून दिली याचे संपूर्ण श्रेय विद्यापीठाला जाते. 'ज्ञानमेवामृतम्' या शिवाजी विद्यापीठाच्या ब्रीद वाक्याप्रमाणे ज्ञानरूपी अमृत प्राप्त करण्याची संधी सर्वांसाठी उपलब्ध करून दिली. याच दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राद्वारे नोंद झालेल्या बहिःस्थ विद्यार्थ्यांना स्वयंअध्ययन साहित्य उपलब्ध करून दिले आहे.

बी. ए. भाग १ च्या राज्यशास्त्र विषयाच्या पेपर क्रमांक **SE 01** सत्र-१ ''ग्रामीण स्थानिक स्वराज्य शासन संस्था'' व पेपर **SE 02** सत्र २ ''नागरी स्थानिक स्वराज्य शासन संस्था'' हे पुस्तक विद्यार्थ्यांच्या हाती देताना आम्हाला विशेष आनंद होत आहे.

**ग्रामीण स्थानिक स्वराज्य शासन संस्था** या स्वयं अध्ययन साहित्यामध्ये ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या वैधानिक तरतुदी, ग्रामीण स्थानिक स्वराज्य शासन संस्थांच्या योजना आणि **नागरी स्थानिक स्वराज्य शासन संस्था** या स्वयं अध्ययन साहित्यामध्ये नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या घटनात्मक तरतुदी, नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या योजना इ. घटकांचा समावेश करण्यात आलेला आहे.

या पुस्तक निर्मितीमध्ये शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू यांची प्रेरणा व प्रोत्साहन आम्हाला मिळाले त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार. मानव्यविद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. एम. एस. देशमुख, राज्यशास्त्र अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. रविंद्र भणगे, राज्यशास्त्र विभागाचे विभागप्रमुख डॉ. प्रकाश पवार, शिवाजी विद्यापीठ राज्यशास्त्र अभ्यास मंडळाचे सर्व सन्माननीय सदस्य व सर्व लेखक यांचे सहकार्य लाभल्याबद्दल त्या सर्वांचे आम्ही आभार मानतो.

वरील सर्वांइतकेच महत्त्वाचे म्हणजे दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे संचालक व सर्व सहकारी विद्यापीठाचे सर्व पदाधिकारी यांच्या सहकार्याबद्दल व तत्परतेबद्दल सर्वांचे मनःपूर्वक आभार.

■ **संपादक** ■

**डॉ. सुखदेव उंदरे**
राज्यशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखक | घटक क्रमांक |
|---|---|
| **सत्र–१ : ग्रामीण स्थानिक स्वराज्य शासन संस्था** | |
| **डॉ. शरद पाटील**<br>न्यू कॉलेज, शिवाजी पेठ, कोल्हापूर, जि. कोल्हापूर | १ |
| **डॉ. रविंद्र भणगे**<br>प्राध्यापक, राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर<br>**श्री. मोहसिन पठाण**<br>संशोधक विद्यार्थी, राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | २ |
| **सत्र–२ : नागरी स्थानिक स्वराज्य शासन संस्था** | |
| **डॉ. सचिन पाटील**<br>के. आर. पी. कन्या महाविद्यालय, इस्लामपूर,<br>ता. वाळवा, जि. सांगली | १ |
| **डॉ. झाकीर सनदे**<br>क्रांतीअग्रणी जी. डी. बापू लाड कला महाविद्यालय, कंडल,<br>ता. जि. सांगली. | २ |

**■ संपादक ■**

**डॉ. सुखदेव उंदरे**
राज्यशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| | **सत्र–१ : ग्रामीण स्थानिक स्वराज्य शासन संस्था** | |
| १. | ग्रामीण स्थानिक स्वराज्य शासन संस्थांच्या कायदेशीर तरतुदी | १ |
| २. | ग्रामीण स्थानिक स्वराज्य शासन संस्थांच्या योजना | ५७ |
| | **सत्र–२ : नागरी स्थानिक स्वराज्य शासन संस्था** | |
| १. | नागरी स्थानिक स्वराज्य शासन संस्थांच्या कायदेशीर तरतुदी | ८५ |
| २. | नागरी स्थानिक स्वराज्य शासन संस्थांच्या योजना | ११० |

## ■ विद्यार्थ्यांना सूचना

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. विद्यार्थ्यांकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांना काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०२४-२५ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

# घटक १
# ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कायदेशीर तरतुदी
## (Legal Provisions of Rural Local Self Government)

अनुक्रमणिका


१.० उद्दिष्टे

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय - विवेचन

१.२.१ पंचायत राजव्यवस्थेपूर्वीची पार्श्वभूमी -

७३ वी घटना दुरुस्ती कायदा १९९३.

१.२.२ ग्रामपंचायत, पंचायतसमिती आणि जिल्हा परिषदांची रचना.

१.२.३ ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थाचे अधिकार आणि कार्ये.

१.३ सारांश

१.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

१.५ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न

१.६ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.७ सरावासाठी स्वाध्याय

१.८ अधिक वाचनासाठी पुस्तके


## १.० उद्दिष्टे

ह्या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला -

- पंचायत राज्यापूर्वीची पार्श्वभूमी स्पष्ट करता येईल.
- ७३ व्या घटनादुरुस्तीने झालेले बदल नोंदविता येतील.
- जिल्हापरिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत व ग्रामसभा यांची रचना व कार्य स्पष्ट करता येतील.
- स्थानिक स्वराज्य संस्थेचे अधिकार आणि कार्य स्पष्ट करता येतील.

## १.१ प्रस्तावना

'स्थानिक स्वराज्य संस्था' या अभ्यासक्रमात आपण महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्था (ग्रामीण) यांची माहिती पाहणार आहोत. महाराष्ट्रातील पंचायत राज व्यवस्थेचे महाराष्ट्राच्या राजकारणात एक आगळे वेगळे वैशिष्ट्य आहे. लोकशाहीने दिलेल्या अधिकाराची प्रक्रिया राबविण्यासाठी हा प्रयोग देशात जन्माला

आला. महाराष्ट्राच्या गेल्या ६४ वर्षाच्या राजकीय जीवनावर याचा मोठा ठसा उमठवला आहे. या घटकात प्रारंभी आपण ७३ वी घटना दुरूस्ती येण्यापूर्वी आणि घटनादुरुस्तीनंतर त्याची कशी अंमलबजावणी झाली. तसेच जिल्हापरिषदा, पंचायत समिती आणि ग्रामपंचायत यांची माहिती व स्थानिक स्वराज्य संस्थेचे अधिकार आणि कार्य पाहणार आहोत. भारत स्थानिक स्वराज्य संस्था हा भारतीय संस्कृतीचा एक अविभाज्य घटक आहे. येथे अनेक राजकीय स्थित्यंतरे होऊनही त्यांचे अस्तित्व हजारो वर्षे टिकून आहे. खेडी आत्मनिर्भर व समृद्ध बनविण्यात स्थानिक स्वराज्य संस्थांची भूमिका महत्त्वपूर्ण ठरली आहे. या संस्थांनी राजकीय शिक्षणाद्वारे लोकांच्या राजकीय जाणिवा, जागृती व सहभाग यांतून नव-नेतृत्वनिर्मितीची प्रक्रिया गतिमान केली आहे. पायाभूत सुविधांच्या विकासापासून लोककल्याणकारी कार्ये पार पाडून लोकशाहीच्या यशस्वी संवर्धनाची महत्त्वाची कामगिरी त्या बजावत आहेत. गावातील जनतेने आपला गावचा कारभार स्वतः चालवणे ही कल्पना भारतात वेदकालापासून आढळते. ग्रामपंचायत ही संस्था फार पुरातन काळापासून भारताच्या सामाजिक व राष्ट्रीय जीवनाचा एक अविभाज्य घटक बनला आहे. गावातील वयोवृद्ध व चारित्र्य संपन्न अशा पुरुषांच्या हातात पंचायतीची त्याकाळी सूत्रे असत. त्यामुळे अर्थातच आजच्या निर्वाचित लोकशाही संस्थेचे स्वरूप त्यांना कधीच नव्हते तरी पण भारतात संस्कृती संरक्षणाचे व स्वयंपूर्ण शासित समाज उभा करण्याचे कार्य या संस्थानी निश्चित केले होते.

## १.२ विषय – विवेचन

### १.२.१ पंचायत राजव्यवस्थेपूर्वीची पार्श्वभूमी

**ऐतिहासिक दृष्ट्या स्थानिक स्वराज्य संस्थाचे स्थूलमानाने तीन कालखंड पडतात :**

१) प्राचीन अथवा ब्रिटिश अंमलपूर्व काळ

२) अव्वल इंग्रजी अंमल काळ

३) स्वातंत्र्योत्तर काळ.

**ब्रिटिश अंमलपूर्व काळ**

भारतात प्राचीन काळापासून स्थानिक स्वराज्य संस्था अस्तित्वात व कार्यरत आहेत. ग्रामीण भागातील लोक एकत्र येऊन गावातील समस्यांवर विचारविनिमय करीत असत. त्यासाठी गावातील प्रौढ नागरिकांची सभा बोलविली जात असे. तिला ग्रामसभा म्हणत. वैदिक काळातील ग्रामसभेचा उल्लेख ऋग्वेदात आढळतो ही ग्रामसभा मर्यादित लोकांच्या समित्या नेमत असे. या समित्यांच्या माध्यमातून पुढे गावातील पाच लोकांची पंचायत अस्तित्वात आली. पुढे पंचायतीचे रूपांतर ग्रामपंचायतीमध्ये झाले. तिची संरचना गावातील ग्रामस्थांच्या गरजेतून झाली होती. महाभारतातील सभापर्व, जातक कथा, कौटिल्यचे अर्थशास्त्र, मेगॅस्थिनीझच्या 'इंडिका' अशा ग्रंथांमध्ये ग्रामपंचायतीचा उल्लेख आढळतो. यावरून ग्रामस्तरावर स्थानिक संस्था अस्तित्वात होत्या असे दिसते. मराठी अंमलात विशेषतः शिवकाळात राजसत्तेच्या खालोखाल देशक सत्ता म्हणजे देशमुख, देशकुळकर्णी, पाटील, कुळकर्णी इ. वतनदार मंडळी प्रांतांतून असत. गोत म्हणजे

ग्रामसंस्था. या ग्रामसंस्थेला फार महत्त्व होते. शिवकालीन ग्रामसंस्था कुटुंब तत्त्वावर आधारित होती. गावातील वतनाचे भांडण-तंटे ग्रामसंस्थेमार्फत निकालात काढण्याचा प्रघात होता. तत्कालीन ग्रामसंस्थेकडे मोठे अधिकार असत. वतनदार पाटील हा गावाचा प्रमुख असे त्याच्यावर गावाच्या संरक्षणाची पूर्ण जबाबदारी असे. हीच व्यवस्था पेशवाईच्या अस्तापर्यंत (१८१८) अस्तित्वात असल्याचे लिखित दाखले मिळतात.

**ब्रिटिश अंमलाचा काळ**

या काळात स्थानिक स्वराज्य संस्थेत आमूलाग्र बदल झाला आणि इंग्रजी राजवटीत (१८५८-१९४७) विद्यमान लोकनियुक्त स्थानिक स्वराज्य संस्थेचा उगम झाला. त्यामुळे ग्रामीण व शहरी जीवनात लक्षणीय बदल झाले. तत्कालीन ब्रिटिश शासनाने प्रथम १८५० च्या कायद्याने ग्रामपंचायतींपेक्षा मोठ्या शहरांतून नगरपालिका स्थापन करण्याचा निर्णय घेतला, त्यानुसार स्थानिक संस्थांची निर्मिती झाली. पुढे व्हाइसरॉय लॉर्ड रिपन (१८८०-८४) याने १८८२ मध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांना मर्यादित स्वरूपात स्वायत्तता दिली. जिल्हा लोकल बोर्ड सुरू करून खेड्यांपर्यंत स्थानिक स्वराज्याची कल्पना प्रसृत केली. त्यानंतर भारत सरकारने १८८६-८७ दरम्यान ठराव केले; पण त्यांची अंमलबजावणी झाली नाही; मात्र १९०७ मध्ये रॉयल कमिशन ऑन डिसेंट्रलायझेशन नेमण्यात आले. या आयोगाने ग्रामपंचायती मजबूत करण्याची शिफारस केली. त्यानुसार पाच पंच असावेत व त्यांची अनौपचारिक पद्धतीने निवड करावी आणि गावाचा पाटील हा सरपंच असावा, अशी शिफारस केली. या शिफारशींना अनुसरून भारत सरकारने १९१५ व १९१८ मध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांविषयक एक ठराव संमत केला. यांशिवाय मॉंटेग्यू-चेम्सफर्ड अहवालानुसार काही सूचना या संदर्भात देण्यात आल्या. त्याला अनुसरून काही प्रांतांतून व संस्थानांतून स्थानिक संस्थांच्या बाबतीत कायदे झाले. १९१९ च्या भारत सरकारच्या कायद्याने स्थानिक स्वराज्य संस्थांचा टप्प्याटप्प्याने विकास घडवून आणण्याचे धोरण जाहीर झाले. त्यानुसार सर्व प्रांतांमध्ये ग्रामपंचायत, जिल्हा बोर्ड, नगरपालिका यांसारख्या स्थानिक संस्था स्थापन झाल्या. लोकनिर्वाचित मंत्र्याकडे हा विषय सोपविल्यामुळे प्रौढ मताद्वारे सभासद संस्थांचे सभासद निवडले गेले. तसेच मुंबई ग्रामपंचायत १९२० कायद्याने मुंबई इलाख्यात ग्रामपंचायतीची स्थापना झाली. प्रांतनिहाय पुढीलप्रमाणे ग्रामपंचायती १९२६ मध्ये अस्तित्वात होत्या : बंगाल २,४१९, मुंबई ६१८, मद्रास १,४१७, पंजाब ३२३, मध्य प्रांत ९०, संयुक्त प्रांत ४,७७२, बिहार/ओडिशा २७०. द्विदल शासनपद्धती नष्ट करणाऱ्या १९३५ च्या कायद्याने प्रांतांना स्वायत्तता दिली. त्यामुळे काँग्रेसची प्रांतनिहाय मंत्रिमंडळे स्थापन झाली. ग्रामपंचायतीच्या अधिकारांत वाढ होऊन सर्व जागा प्रौढ निर्वाचन पद्धतीने भरण्याची तरतूद झाली व स्थानिक नागरिकांवर घरपट्टी सक्तीची केली. पुढे दुसऱ्या महायुद्धकाळात (१९३९-४५) या संदर्भात कोणतेही पाऊल उचलण्यात आले नाही.

**स्वातंत्र्योत्तर काळ :**

भारतातील लोकशाही शासन प्रणाली सुदृढ, सक्षम व विकसित करण्याच्या उद्देशाने सरकारने कल्याणकारी शासन व्यवस्थेचा स्वीकार केला. या संकल्पनेत केंद्रशासन, राज्यशासन आणि ग्रामपंचायती

पासून महानगरापर्यंतच्या स्थानिक शासन संस्था अशी त्रिस्तरीय राज्य-कारभाराची व्यवस्था अभिप्रेत होती. त्या दृष्टिकोणातून तळागाळातील स्थानिक संस्थांना स्वायत्तता व स्वातंत्र्य देण्यात आले. त्याला अनुसरून १९४७ मध्ये ग्रामपंचायतींचे पुनरुज्जीवन करण्यात आले. महात्मा गांधीजींच्या 'ग्रामस्वराज्य' संकल्पनेचा पुरस्कार करण्यात आला. यासाठी 'गाव तिथे ग्रामपंचायत' या तत्त्वाचा स्वीकार करण्यात आला. संविधानाच्या चौथ्या भागातील चाळीसाव्या अनुच्छेदात तद्विषयी मार्गदर्शक तत्त्वे अंतर्भूत करण्यात आली. काटजू समितीने १९५४ मध्ये या बाबतीत अनेक शिफारशी केल्या. विकास कार्यक्रमात स्थानिक स्वराज्य संस्थांना कोणते स्थान असावे, याचा विचार करण्यासाठी नॅशनल डेव्हलमेंट कॉउन्सिलची स्थापना बळवंतराव मेहतांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आली (१९५५). मेहता समितीने तीन स्तरांच्या स्थानिक स्वराज्याची कल्पना मांडली आणि ग्रामपंचायत, तालुका पंचायत व जिल्हा परिषद यांकडे अधिकारविषयक अनेक शिफारशी केल्या. त्यानुसार लोकशाही विकेंद्रीकरणाच्या तत्त्वानुसार पंचायत राज्य संस्थांची १९५७ मध्ये स्थापना झाली. 'पंचायत राज' हा विषय राज्यसूचीत समाविष्ट करण्यात आला आणि घटक राज्यांनी आपल्या सोयीनुसार पंचायत राज्याची निर्मिती केली.

महाराष्ट्रात ब्रिटिश काळापासून वेगवेगळे कायदे होते. 'बॉम्बे व्हिलेज पंचायत ॲक्ट' १९३३ हा पश्चिम महाराष्ट्रात लागू होता, तर विदर्भात जनपद कायदा आणि मराठवाड्यात १९४९ नंतरचा ग्राम-पंचायत कायदा लागू होता. या सर्वांचा विचार वसंतराव नाईक यांच्या अध्यक्षतेखालील समितीने करून जिल्हा परिषदांच्या निर्मितीस मान्यता दिली १९५८ तेपुढे १९६५ च्या कायद्याने यातील काही तांत्रिक बदलांना अनुमती दिली व ते सुधारले. निवडून आलेल्या सदस्यांतून सरपंच, उपसरपंच, अध्यक्ष, उपाध्यक्ष, महापौर, उपमहापौर इत्यादींची निवड करण्याची पद्धत रूढ झाली. पुढे पंचायत राज व्यवस्थेत एकसूत्रीपणा निर्माण करून पंचायत संस्थांचे पुनरुज्जीवन करण्याच्या उद्देशाने केंद्र-शासनाने १९८६ मध्ये डॉ. एल. एम. सिंघवी यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन केली. या समितीने या संस्थांना घटनात्मक संरक्षण देण्याची शिफारस केली. या समितीच्या शिफारशीवरून चौसष्टावे पंचायत-राज्य घटना दुरुस्ती विधेयक चर्चेस येऊन संसदेने ते १० ऑगस्ट १९८९ रोजी संमत केले; पण राज्यसभेने ते फेटाळले. अखेर पी. व्ही. नरसिंह-रावांच्या कारकिर्दीत २३ डिसेंबर १९९२ रोजी त्यास अंतिम स्वरूप मिळाले आणि ते विधेयक संमत झाले. त्यानंतर ७३ व्या घटना दुरुस्तीने यात घटक राज्यांची संमती घेण्यात येऊन २४ एप्रिल १९९३ रोजी या कायद्याची अंमलबजावणी झाली.

**पंचायतराज्याची पार्श्वभूमी**

**स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विकासाची वाटचाल**

नुकतीच ७३ व ७४ व्या घटनादुरुस्तीला ३१ वर्षे पूर्ण झाली आहेत. स्वावलंबी-स्वयंशासित अशा सक्षम स्थानिक संस्था म. गांधींचे स्वप्न होते. भारतासारख्या विशाल आणि अनेकार्थांनी विविधता असणाऱ्या देशात केंद्रित आणि लोकांपासून दूर असणारी कोणतीही शासनपद्धती हितावह असणार नाही याची जाणीव गांधीजींना होती. स्वातंत्र्यानंतर भारतात समुदाय विकास कार्यक्रम व राष्ट्रीय विस्तार सेवा या कार्यक्रमांच्या माध्यमातून विकासाचा नवीन अध्याय सुरु होणार होता. परंतु स्थानिक लोकांचा प्रतिसाद,

पाठिंबा अन् सहभागाच्या अभावी मोठ्या अपेक्षांनी राबवण्यात आलेल्या या कार्यक्रमांना अपयश आले. या योजनांचा पुनर्विचार करण्यासाठी, त्यांची मीमांसा करण्यासाठी केंद्रीय पातळीवर १९५७ साली बळवंतराय मेहता यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नियुक्त करण्यात आली. समितीने आपल्या शिफारशींमध्ये त्रिस्तरीय पंचायतराज आणि लोकशाही विकेंद्रीकरणाचा आग्रह धरत स्पष्टपणे नमूद केले की, सत्तेचे विकेंद्रीकरण तळापर्यंत पोचवणे गरजेचे आहे. राज्य सरकारने केवळ नियोजन, मार्गदर्शन व नियंत्रणाचे कार्य करावे कारण स्थानिक हितसंबंधांकडे लक्ष पुरवणारी, तसेच स्थानिक लोकांच्या अपेक्षा व आवश्यकताप्रमाणे पैसा खर्च होतो की नाही हे आवर्जून पाहणारी लोकांची प्रातिनिधिक अशी एक लोकशाही संस्था जोपर्यंत निर्माण होणार नाही व त्या संस्थेला पर्याप्त अधिकार व आर्थिक पाठबळ उपलब्ध करून दिले जात नाही, तोपर्यंत विकास कार्यक्रमांमध्ये सहभागी होण्यात लोकांना उत्साह वाटणे अशक्य आहे. परंतु या समितीच्या शिफारशी राज्यांना बंधनकारक न करता स्थानिक गरजा व परिस्थितीला अनुरूप आपापल्या राज्यातील स्थानिक स्वशासनाचे स्वरूप व संरचना ठरवण्याचे स्वातंत्र्य राज्यांना देण्यात आले. महाराष्ट्रात देखील तत्कालीन महसूलमंत्री वसंतराव नाईक यांच्या अध्यक्षतेखाली मेहता समितीच्या शिफारशींचा अभ्यास करून महाराष्ट्रातील पंचायतीराजबाबत सुधारणा सुचवण्यासाठी एक समिती नेमण्यात आली. या समितीच्या शिफारशींच्या आधारावर मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ नुसार महाराष्ट्रात ०१ मे १९६२ रोजी पंचायतराज अस्तित्वात आले. ०२ ऑक्टोबर १९५९ रोजी राजस्थान व ०१ नोव्हेंबर १९५९ रोजी आंध्र प्रदेशात आधीच पंचायत राज व्यवस्थेची सुरवात करण्यात आली होती. मात्र, ज्या उत्साहात पंचायतराजची सुरवात झाली होती तो उत्साह फार काळ टिकला नाही. याला अनेक कारणे होती. देशभरातील पंचायत राज व्यवस्थेत एकसूत्रीपणाचा अभाव होता. उदा. गोवा, केरळ येथे एकस्तरीय, आसाम, हरियाणा, तामिळनाडू, ओरिसा येथे द्विस्तरीय, महाराष्ट्र, पंजाब, राजस्थान येथे त्रिस्तरीय तर मध्य प्रदेश, गुजरात येथे चार स्तरीय पंचायत राज व्यवस्था अस्तित्वात होती. या पंचायतींच्या कार्यकाळात, अविश्वास ठरावात, निवडणूक पद्धतीत, राजकीय पक्षांच्या निवडणूक सहभाग, अधिकार-कार्यांत व इतर अनेक बाबतीत मोठी असमानता होती. शिवाय संघराज्य रचनेतच असणारी केंद्रीकरणाची प्रवृत्ती राज्यपातळीपर्यंत पोचली होती. स्थानिक सरकारांना कोणतेही राज्य शासन गांभीर्याने घेत नव्हते. परिणामी अधिकार-कार्ये-निधी-मनुष्यबळ यांचे हस्तांतरण करणे, स्थानिक पातळीवर आर्थिक उत्पन्नाच्या साधनांना प्रोत्साहन देणे, सहयोगी व्यवस्थांचे सक्षमीकरण करणे याबाबत मोठी उदासीनता निर्माण झाली. महाराष्ट्रासारख्या तुलनेने स्थानिक संस्था विकासात अग्रपंक्तीत असणाऱ्या राज्यात देखील १९७९ ते १९८९ असे दहा वर्ष पंचायत राज संस्थांच्या निवडणुकाच झाल्या नाहीत. थोडक्यात, या काळात पंचायती राज्याची स्थापना तर झाली होती मात्र यात 'स्वराज्य' संकल्पनेचा लवलेशही नव्हता.

भारतीय राज्यघटनेच्या चौथ्या विभागात स्थानिक स्वराज्य संस्था विषयी तरतूद करण्यात आलेली आहे. त्यानुसार घटक राज्यांना तिच्या निर्मिती बाबत कायदे निर्माण करण्याचा अधिकार देण्यात आलेला आहे. या कायद्यानुसार बहुसंख्य घटक राज्यात पंचायतीची स्थापना करण्यात आल्या काँग्रेस पक्षांनी पुढाकार

घेऊन स्थानिक स्वराज्य संस्था स्थापन करण्याचे धोरण संपूर्ण भारतभर अवलंबित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कार्य आर्थिक बाबी संबंधीचे अधिकार स्थानिक संस्थांना देण्यात आले.

**१९५४ साली कॉंग्रेस पक्षाच्या कार्यकारणीच्या बैठकीत स्थानिक शासनासंबंधी पुढील गोष्टी ठरविण्यात आल्या.**

१) स्थानिक शासन शक्यतो पक्षी राजकारणापासून अलिप्त ठेवावे.

२) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकीसाठी प्रौढ मतदान पद्धती स्वीकारण्यात यावी.

३) २००० लोकसंख्या ही पंचायत स्थापन करण्यासाठी मर्यादा असावी.

४) स्थानिक शासनातील कार्यकर्त्यासाठी प्रशिक्षणाची सोय करावी.

१९५४ च्या जून महिन्यात तत्कालीन केंद्रीय आरोग्य मंत्री श्रीमंती राजकुमारी अमृता कौर यांनी भारतीय सर्व घटक राज्यांच्या स्थानिक शासनाच्या मंत्र्यांची शिमला येथे परिषद बोलवली होती. पंडीत जवालाल नेहरूंनी या परिषदेच्या उद्घाटनपर भाषणात लोकशाहीच्या यशाविषयी खंत व्यक्त करून स्थानिक शासनाची आवश्यकता प्रतिपादन केली.

**स्थानिक स्वराज्य संस्थांची शिफारस करणाऱ्या काही महत्त्वाच्या समित्या खालील प्रमाणे**

**सामूहिक विकास योजना**

१९५७ साली सामूहिक विकास आणि राष्ट्रीय प्रसार सेवा यांच्या अभ्यासासाठी बलवंतराव मेहता यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नियुक्त करण्यात आली या समितीने त्रिस्तरीय व्यवस्था (Three Tier System) निर्माण करण्याची शिफारस केली. ग्रामपंचायत- पंचायत समिती, जिल्हा परिषद अशी स्तररचना निर्माण करण्यात येऊन पंचायत राज्य स्थापन करण्यात यावे असे सुचविण्यात आले. बळवंतराव मेहता समितीत ठाकूर फुलसिंग, डी.पी.सिंग व बी. जी. राव हे सदस्य होते. १९५८ साली मेहता समितीने आपला अहवाल केंद्र सरकारला सादर केला. केंद्र सरकारने मेहता समितीच्या अहवालाला मान्यता दिल्यानंतर सर्वप्रथम राज्यस्थान या राज्यात पंचायत राज्याचा प्रयोग सुरू झाला त्यांनंतर आंध्र प्रदेश, तामिळनाडू, आसाम, कर्नाटक, ओरिसा, पंजाब, उत्तर प्रदेश, महाराष्ट्र या राज्यात पंचायत राज्य सुरू झाले.

बलवंतराव मेहता समिती इ.स. १९६९ हे वर्ष देशातील स्थानिक शासनाच्या विकासातील एक क्रांतिकारक वर्ष म्हणून ओळखले जाते. कारण या वर्षी संपूर्ण देशात पंचायत राज्य चळवळ सुरु करण्यात आली. ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास होण्यासाठी लोकशाही विकेंद्रीकरणाचे तत्व स्वीकारण्यात आले. लोकशाही शासनपद्धतीत ग्राम, खेडे, तालुका, जिल्हा पातळीवर जनतेला राजकारणात सहभागी करून घेण्यासाठी सत्तेचे विकेंद्रीकरण आवश्यक ठरले. भारत हा ८० टक्के ग्रामीण जनतेचे देश आहे. तेंव्हा ग्रामीण लोकांचा सर्वांगीण विकास झाला तरच देशाचा सर्वांगीण विकास होईल अशी येथील राज्यकर्त्यांची धरणा झाली. यामुळे भारत सरकारने पंचवार्षिक योजनांचा कार्यक्रम हाती घेऊन सामुहिक योजनाची मोहीम सुरू

केली. सामुहिक विकास योजना च्या अनुषंगाने १९५७ मध्ये सामुहिक विकास कार्यक्रमातील काटकसर आणि कार्यक्षमता याविषयी चौकशी करण्यासाठी आणि या विकास कार्यक्रमाची पुनर्रचना करण्यासाठी मध्यवर्ती शासनाने एक समिती गुजरातचे मुख्यमंत्री श्री बलवंतराव मेहता यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केली. या समितीत ठाकूर फुलसिंग, डी.पी. सिंग आणिबी.जी.राव हे इतर सभासद होते. समितीने १९५८ साली आपला अहवाल शासनाच्या हाती दिला. मेहता समितीने त्रिस्तरीय रचनापद्धती सांगून ग्रामीण स्थानिक शासनसस्थांची पुनर्रचना सुचवली. पहिला स्तर जिल्हा परिषद, दुसऱ्या स्तर पंचायत समिती आणि तिसरा स्तर ग्रामपंचायती अशी पंचायत राज्याची पद्धती सांगितली.

**लोकशाही विकेंद्रीकरणासंबंधी बळवंतराव मेहता समितीने पुढील प्रमाणे शिफारशी केल्या**

१) लोकशाही विकेंद्रीकरणाचा प्रयोग यशस्वी करण्यासाठी आवश्यक स्थानिक ग्रामीण लोकांना राज्यकारभारात सहभागी करून घेणे आवश्यक आहे. त्यासाठीच स्थानिक संस्थांना कार्याची सर्व जबाबदारी आणि अधिकार दिले जावेत.

२) विकास कार्यसाठी तालुका हा गट (BLOCK) मानावा.

३) विकास गटाच्या पातळीवर एक स्थानिक समिती निर्माण करण्यात यावी.

४) ग्रामपंचायत स्थापन करून खेडे किंवा लहान खेड्यांचा समुह यासाठी विकास कार्यक्रम राबवावा.

५) ग्रामपंचायत सदस्यांची निवड प्रत्यक्षप्रौढ मतदान पद्धतीने करण्यात यावी.

६) स्थानिक संस्थांना कार्याच्या अंदाजपत्रकाची आर्थिक तपासणी करण्यात यावी.

वरील प्रमाणे विविध शिफारशी करून मेहता समितीने ग्रामीण स्थानिक प्रशासनाची पुनर्रचना सुचवली ग्रामीण स्थानिक प्रशासनात त्रिस्तरीय योजना (जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत) सांगून त्याचे अधिकारविषयक व कार्यक्षेत्र याबाबत विवेचन केले आहे.

**वसंतराव नाईक समिती**

महाराष्ट्र राज्यात पंचायत राज्याची पद्धती स्वीकारण्यापूर्वी इ.स. १९६० मध्ये त्या वेळेचे महाराष्ट्रचे महसूलमंत्री श्री वसंतराव नाईक यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करण्यात आली. या समितीने मेहता समितीच्या अहवालावर विचारविनिमय करून आणि महाराष्ट्रातील परिस्थितीचा विचार करून आपला २२६ शिफारशींचा अहवाल १९६१ मध्ये शासनाला सादर केला. महाराष्ट्र शासनाने हा अहवाल मान्य करून त्यानुसार 'महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१' हा कायदा संमत केला. १ मे, १९६२ रोजी महाराष्ट्रात पंचायत राज्याची स्थापना झाली. त्रिस्तरीय पद्धतीचा अवलंब करून जिल्हा पातळीवर जिल्हा परिषद, तालुका पंचायत समिती आणि ग्रामपंचायत अशी स्थापना करण्यात आली. पंचायत नाईक समितीने जिल्हा हा कार्याचा घटक असावा असे सुचवले होते; परंतु मेहता समितीने शक्यतो जिल्हा कार्याचा घटक करू नये, पंचायत समिती हाच कार्याचा घटक मानावा असे सुचविले होते. महाराष्ट्र शासनाने कार्याचा जिल्हा हा घटक मानून काहीशी मिश्रपद्धती स्वीकारून जिल्हा परिषद या घटकाला अधिक

महत्व दिले. महाराष्ट्रात ३५ जिल्हे असून त्यापैकी ३३ जिल्हात जिल्हापरिषदा स्थापन करण्यात आल्या आहेत. महाराष्ट्र २४३ पंचायत समिती आणि ग्रामपंचायत २७,५९८ ग्रामपंचायत निर्माण करण्यात आलेल्या आहेत. महाराष्ट्र पंचायत राज्याचा प्रयोग सुरू झाल्यामुळे ग्रामीण भागाच्या सर्वागीण विकासाची गती वाढली आहे. ग्रामपंचायत स्थरावर आर्थिक, राजकीय, शैक्षणिक अशा स्वरूपाचा विकास कार्यक्रम राबवला जात आहे.

**वसंतराव नाईक समितीच्या शिफारशी खालीलप्रमाणे**

१) महाराष्ट्रात राज्यशासन व ग्रामपंचायत यांच्यात सहयोग संस्था म्हणून जिल्हा परिषद व पंचायत समिती स्थापन केल्या असून त्या कार्यरत आहेत.

२) प्रत्येक ग्रामपंचायतीच्या क्षेत्रात किमान लोकसंख्या एक हजार असावी

३) प्रत्येक ग्रामपंचायतीला एक ग्रामसेवक असावा. महसुलीचे कार्य ग्रामपंचायतीकडून केली जावीत.

४) जिल्हा पातळीवर एक जिल्हा परिषद ही संस्था आणि तालुका पातळीवर पंचायत समिती अशा सहयोगी संस्थेत किमान एक स्त्री सदस्य असावी.

५) जिल्हाधिकाऱ्यास जिल्हा परिषदेच्या राज्यकारभारात हस्तक्षेप करण्याचा अधिकार दिला जाणार नाही

६) सरपंच व इतरपंच ग्रामपंचायतीच्या सर्व कारभारास जबाबदार असतील.

७) गटविकास अधिकारी (बी.डी.ओ) पंचायत समितीचा प्रशासकीय प्रमुख अधिकारी असेल.

८) जिल्हा परिषदेवर अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांचा सदस्य नसेल तर किमान एक एक सदस्य स्वीकृत केलेला असावा.

९) विभागीय आयुक्तांना त्यांच्या अधिकार क्षेत्रातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थावर नियंत्रण देखरेख करण्यासाठी अधिकार देण्यात यावेत.

१०) महाराष्ट्रात एकच महाराष्ट्र जिल्हापरिषद पंचायत समिती अधिनियम स्वीकृत केलेला जाईल.

**एल. एन बोंगीरवार समिती**

महाराष्ट्र शासनाने एल. एन बोंगीरवार यांच्या अध्यक्षतेखाली २ एप्रिल, १९७० एक समिती स्थापन केली. महाराष्ट्रात पंचायत राज्याचे चिकित्सक पद्धतीने मूल्यमापन करून या समितीने पंचायत राज्याच्या कारभार अधिक जबाबदारी व कार्यक्षमतेने यशस्वी होण्यासाठी काही महत्त्वाच्या शिफारशी केल्या.

१) पंचायत राज्य संस्थेकडून पंचायत राज व्यवस्था अधिक स्थिर करण्यासाठी आणि सामुहिक विकास योजना यशस्वी करण्यासाठी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती यांना सध्या असलेल्या अधिकारापेक्षा जास्त अधिकार दिले जावेत.

२) जिल्हा परिषद व पंचायत समिती यांना अधिक प्रमाणात आर्थिक सहाय्य देण्यात यावे.

३) सध्याची पंचायत राज्याची रचना आणि कार्यपद्धती समाधानकारक आहे. त्यांच्या रचनेत बदल करू नये.

४) प्रत्येक वर्षात ग्रामसभेच्या किमान दोन बैठक झाल्या पाहिजेत.

५) पंचायत संस्थाच्या कार्यावर नियंत्रण व देखरेख ठेवण्यासाठी एक अतिरिक्त विभागीय आयुक्ताचे पद निर्माण करण्यात यावे.

६) प्रत्येक पाच वर्षांनी पंचायत राज्य संस्थांच्या आर्थिक व प्रशासकी कार्याच्या आढावा घेण्यासाठी शासनाकडून एक समिती नियुक्ती केली जावी.

या समितीने आपल्या अहवालात २०२ शिफारशी करून महाराष्ट्र शासनाला सादर केला परंतु महाराष्ट्र शासनाने यातील एक ही शिफारस स्वीकारली नाही.

**प्राचार्य पी. बी. पाटील समिती**

१८ जून १९८४ रोजी प्राचार्य पी.बी. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करून पंचायत संस्थांचे पुनर्विलोकन करण्याचे निश्चित करण्यात आले. या समितीने १९८६ साली आपला अहवाल शासनाकडे सादर केला. पी.बी. पाटील समितीने पंचायत राज्याच्या कारभार सुधारण्यासाठी आणि त्याची कार्यक्षमता वाढवण्यासाठी पुढीलप्रमाणे महत्त्वाच्या शिफारशी केल्या.

**अ) पंचायतराजची रचना, पुनर्रचना, अधिकारविषयक शिफारसी**

१) पंचायत राजची पुनर्रचना करताना २००० लोकसंख्या एक ग्रामपंचायत, एक लाख लोकसंख्या साठी पंचायत समिती आणि १५ ते २० लाख लोकसंख्या एक जिल्हा परिषद स्थापन करावी.

२) स्थानिक स्वराज्य संस्थांचा कारभार स्वतंत्रपणे चालविण्यासाठी स्वतंत्र स्थानिक स्वराज्य सेवा स्थापन करावी.

३) ग्रामपंचायतीच्या सरपंचांची निवड ग्रामपंचायतीच्या सदस्या कडून न होता ग्रामसभेकडूनच व्हावी.

४) राज्यपातळीवर राज्यविकास मंडळ स्थापन करावे.

५) अनुसूचित जाती, जमातीच्या लोकांना जिल्हा परिषदेवर प्रतिनिधित्व देण्यासाठी आरक्षणाची तरतूद करण्यात यावी.

**स्थानिक स्वराज्य संस्थांतील आर्थिक सुधारणाविषयक शिफारशी**

१) ग्रामपंचायत पंचायत समिती आणि जिल्हापरिषद यांच्या कार्यासाठी जास्तीतजास्त आर्थिक साहाय्य केले पाहिजे.

२) ग्रामपंचायतिकडे महसूल संबंधी कार्य सोपविली जावीत.

३) शेतीला पूरक असणाऱ्या उद्योगधंदे यांना प्रोत्साहन द्यावे ज्यामुळे स्थानिक संस्थामध्ये आर्थिक विकेंद्रीकरण होऊ शकेल.

४) पंचायत राजमार्फात महसुली विभागातून एक प्रतिनिधी विधानपरिषदेवर निवडून देण्याची तरतूद करावी.

### अ) ७३ वी घटना दुरुस्ती कायदा १९९३

भारतीय राज्यघटनेच्या चौथ्या भागात राज्याच्या धोरणासंबंधी मार्गदर्शक तत्वे देण्यात आलेली आहेत. त्यापैकी राज्यघटनेच्या ४० व्या कलमात असे स्पष्टपणे म्हटले आहे कि, या तत्वाच्या अनुषंगाने पंचायतराजची स्थापना केली आहे. तरीपण स्थानिक स्वराज्य संस्थांना वैधानिक घटनात्मक दर्जा प्राप्त झालेला नव्हता. त्यांना घटनात्मक दर्जा प्राप्त करून देणे गरजेचे होते त्या अनुषंगाने १९९३ मध्ये ७३ वी घटना दुरुस्ती करण्यात आली. १९९३ पंतप्रधान पी. व्ही. नरसिंहराव यांच्या कारकीर्दीत सप्टेंबर, १९९१ मध्ये लोकसभेत पंचायतराजसंबंधीचे घटनादुरुस्ती विधेयक मांडले. त्या विधेयकाला लोकसभेने २२ डिसेंबर, १९९२ रोजी, तर राज्यसभेने त्यास २३ डिसेंबर, १९९२ रोजी मान्यता दिली. २० एप्रिल, १९९३ रोजी राष्ट्रपतींनी मंजूरी मिळाल्यानंतर पंचायत राज्यव्यवस्थेला घटनात्मक दर्जा प्राप्त झाला. २४ एप्रिल, १९९३ पासून या महत्वपूर्ण 'पंचायत राज' कायद्याची अंमलबजावणी सुरु झाली. भारतीय संविधानाच्या २४३ व्या कलमात पंचायत राज्यव्यवस्थेची तरतूद (अनुच्छेद (कलम) २४३ ते अनुच्छेद २४३ (ओ) परिशिष्टात करण्यात आली आहे. या कायद्यानुसार भारतीय घटनेत ११ वे परिशिष्ट जोडण्यात आले. ११ व्या अनुसूचित पंचायतिकडे सोपविण्यात २९ विषयांची यादी देण्यात आली.

**७३ व्या घटना दुरुस्ती मधील तरतुदी**

२४ एप्रिल १९९३ रोजी ७३ वी घटनादुरुस्ती मंजूर होऊन पंचायतराज यासंबंधीचा जो कायदा अंमलात आला त्यामधील महत्त्वाच्या तरतुदी पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**१) भारतीय राज्यघटनेच्या २४३** व्या कलमात पंचायतराजशी संबंधित असलेल्या विविध संज्ञाचा अर्थ स्पष्ट करण्यात आलेला आहे. जिल्हा, ग्रामसभा, मध्यम-स्तर, पंचायत, पंचायत क्षेत्र, लोकसंख्या इत्यादी व्याख्या स्पष्ट करण्यात आलेला आहे. त्यामुळे त्यांच्या अर्थसंबंधी कोणतीही संदिग्धता राहू शकत नाही.

**२) त्रिस्तरीय पंचायतराज:** ७३ व्या घटनादुरुस्तीनुसार प्रत्येक घटक राज्यात गाव, तालुका व जिल्हा पातळीवर पंचायतराज संस्थांची स्थापना करण्यात येईल. परंतु ज्या घटक राज्याची लोकसंख्या २००० पेक्षा कमी असेल अशा घटक राज्यांना हा नियम लागू राहणार नाही. पंचायत राज निर्माण करण्याची घटनात्मक जबाबदारी प्रत्येक घटक राज्यावर असल्यामुळे घटक राज्यांना पंचायत राज्य निर्मितीचा स्वातंत्र्य कायदा करण्यात करण्याचा अधिकार प्राप्त झालेला आहे.

**३) ग्रामसभा :** कलम २४३ (अ) मध्ये ग्रामसभेच्या निर्मितीची आणि तिच्या अधिकाराची तरतूद केलेली आहे गावातील ज्या नागरिकांचे नाव मतदार यादीत असतील अशा नागरिकांचा समावेश ग्रामसभेत केला जातो. प्रत्येक घटक राज्याचे कायदेमंडळ व ग्रामसभेचे अधिकार व कार्य निश्चित करतात.

**४) पंचायती रचना :** कलम ४३ (क) मध्ये पंचायतीची रचना स्पष्ट करण्यात आलेली आहे. राज्य विधिमंडळ कायद्याद्वारे घटक सर्व पंचायती संस्थांच्या सदस्यांची निवड नागरिकाकडून प्रत्यक्ष निवडणुकीद्वारे

केली जाते. तसेच पंचायतराजच्या कायद्यानुसार पंचायतराजच्या सभापतीच्या निवडीसंबंधित तरतूद करण्यात आलेल्या आहे.

**५) आरक्षणाची व्यवस्था :** भारतीय राज्यघटनेच्या २४३ (ड) नुसार पंचायतराजमधील संस्थांमध्ये आरक्षण पुढीलप्रमाणे निश्चित केले जाते.

अ) पंचायतराजच्या संस्थात अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीच्या लोकांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात राखीव जागा ठेवण्यात आलेल्या आहेत. तसेच त्यांच्या पैकी १/३ जागा याच प्रवर्गातील महिलांसाठी राखीव ठेवल्या जातील.

ब) नागरिकांच्या मागास वर्गातील प्रवर्गाच्या लोकांना २७% जागा पंचायतराजच्या संस्थात आरक्षित केल्या जातील तसेच त्यांच्या पैकी १/३ जागा याच प्रवर्गातील महिलासाठी राखीव ठेवल्या जातील.

क) पंचायतराजच्या संस्थात महिलांना एकूण सदस्य संख्येच्या १/२ जागा (अनुसूचित जाती अनुसूचित जमातीच्या महिलांसाठी राखून ठेवलेल्या जागा धरून) राखीव ठेवल्या जातात.

**६) पंचायतराज संस्थांचा कार्यकाल:** कलम २१३ (इ) नुसार प्रत्येक पंचायत संस्था तिच्या पहिल्या बैठकीच्या दिनांकापासून पाच वर्षापर्यंत त्याकाळी अंमलात आलेल्या कोणत्याही कायद्याखाली ती त्यापूर्वी विसर्जित झाली नसेल तर अस्तित्वात राहील. पंचायतराज संस्थांचा कार्यकाल पाच वर्षाचा ठेवलेला होता.

**७) सभासदांची अपात्रता :** संविधानाच्या अनुच्छेद २४३ (फ) प्रमाणे संबंधित राज्यात निवडणुकीच्या पात्रतेसंबंधी कायद्याद्वारे एखाद्या व्यक्तीस अपात्र म्हणून घोषित करण्यात येईल.

**८) पंचायतराजचे अधिकार व कार्य :** ७३ व्या घटना दुरुस्तीनुसार कलम २४३ (ग) मध्ये पंचायतराज संस्थांचे अधिकार जबाबदारी कार्य स्पष्ट करण्यात आलेली आहेत. यामध्ये २९ विषयांची यादी संविधानाच्या अकराव्या अनुसूचित दिलेली आहे.

**९) आर्थिक अधिकार :** ७३ व्या घटना दुरुस्तीच्या अधिनियमानुसार २४३ (ह) कलमात पंचायत संस्थांना आपल्या कार्यक्षेत्रातील लोकांवर कर बसवण्याचे ते वसूल करण्याचे व त्यांचा विनियोगकरण्याचे अधिकार देण्यात आलेले आहेत.

**१०) वित्त आयोगाची स्थापना :** ७३ व्या घटनादुरुस्तीच्या अधिनियमानुसार घटक राज्याचा राज्यपाल पंचायत राज्य संस्थांच्या आर्थिक स्थितीचे समीक्षण करण्यासाठी एका वित्त आयोगाची स्थापना करेल. राज्यपाल दर पाच वर्षांनी वित्त आयोगाची स्थापना करू शकतो.

**११) पंचायतराज संस्थेचे लेखा व लेखापरीक्षण :** कलम २४३ (जे) नुसार पंचायत राज संस्थांचे हिशेष लेखा व लेखा हिशेबतपासणी (लेखापरीक्षण) यासंबंधीच्या तरतुदी करण्याचा अधिकार राज्यविधिमंडळ देण्यात आलेला आहे.

**१२) पंचायत राज संस्थेच्या निवडणूका :** कलम ४३ (के) नुसार राज्यातील पंचायत राज्य संस्थांच्या निवडणुका घेण्यासाठी राज्य निर्वाचन आयोगाची स्थापना करण्यात येईल. या निर्वाचन आयुक्ताची राज्यपालाकडून नियुक्ती करण्यात येईल.

**१३) केंद्रशासित प्रदेशात प्रयुक्ती :** अनुच्छेद २४३ (एल) नुसार ७३ व्या घटनादुरुस्तीनुसार करण्यात आलेल्या तरतुदी केंद्रशासित प्रदेशात लागू होतील.

**१४) पंचायती व विद्यमान कायदे अस्तित्वात राहणे :** कलम ४३ (एन) ७३ व्या घटनादुरुस्ती अधिनियम, १९९२ च्या प्रारंभीच्या लगतपूर्वी राज्यांमध्ये पंचायत कशी संबंधित असलेल्या कोणत्याही कायद्यात या भागातील उपनियमाशी विसंगत असलेले कोणती उपनियम हे समक्ष विधिमंडळाकडून तो अन्य प्राधिककरणाद्वारे दुरुस्ती केले जाईपर्यंत किंवा अशा प्रारंभीच्या तारखेपासून एक वर्ष पूर्ण होईपर्यंत अमलात आणण्याचे चालू राहील.

**१५) निवडणुकासंबंधीच्या बाबीमध्ये न्यायालयांनी हस्तक्षेप करण्यास विरोध :** या संविधानामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी कलम २४३ (ओ) नुसार केलेल्या किंवा केल्याचे अभिप्रेत असलेल्या, मतदारसंघांच्या सीमा निश्चीत करणे किंवा आशा मतदारसंघामध्ये जागांची वाटणी यांच्याशी संबंधित कोणत्याही कायद्याची विधीग्राह्यता (Validity) कोणत्याही न्यायालयात प्रश्नास्पद करता येणार नाही.

कोणत्याही पंचायतीची कोणतेही निवडणूक राज्य विधिमंडळाने केलेल्या कोणत्याही कार्याद्वारे किंवा त्यानुसार तरतूद केलेल्या प्राधिकरणाकडे आणि अशा रीतीने निवडणूक विनंती अर्ज सादर केल्याशिवाय अन्य रीतीने प्रश्नास्पद करता येणार नाही.

**विषय सूची (११ वे परिशिष्ट) (अनुच्छेद २४३, छ)**

२० एप्रिल, १९९३ रोजी ७३ व्या घटनादुरुस्तीने भारतीय संविधानात अकरावी अनुसूची समाविष्ट केलेली आहे. या परिशिष्टात पंचायत राजसंस्थांच्या अखत्यारीत येणारे २९ विषयांचा समावेश केलेला आहे. ते विषय खालील प्रमाणे.

१) कृषी – कृषीविषयक विस्तार

२) जमीनसुधारणा, जमीन सुधारणांची अंमलबजावणी जमीन एकत्रिकरण वृद्ध संवर्धन

३) लहान पाटबंधारे पाण्याची व्यवस्थापन व पाणलोट क्षेत्र विकास

४) पशुसंवर्धन दुग्ध व्यवसाय व कुक्कुटपालन

५) मत्स्यव्यवसाय

६) सामाजिक वनीकरण व वनीकरण क्षेत्र

७) किरकोळ वनउत्पादन

८) लघुउद्योग व अन्नप्रक्रिया उद्योग

९) खाद्य उद्योग

१०) ग्रामउद्योग कुढीर उद्योग

११) ग्रामीण गृहनिर्माण

१२) पिण्याचे पाणी

१३) इंधन व चारा

१४) रस्ते, नाली फुले, तळी, जलमार्ग आणि दळणवळणाची तर साधने

१५) ग्रामीण विद्युतीकरण विजेचे वाटप

१६) अपारंपारिक ऊर्जा साधने

१७) दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रम

१८) प्राथमिक उद्योग शाळा सहशिक्षण

१९) तांत्रिक प्रशिक्षण आणि व्यावसायिक शिक्षण

२०) प्रशिक्षण आणि अनौपचारिक शिक्षण

२१) ग्रंथालय

२२) सांस्कृतिक कार्यक्रम

२३) बाजार व जत्रा

२४) रुग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्र व दवाखाने याबरोबर आरोग्य व स्वच्छता

२५) कुटुंबकल्याण, महिला व बालविकास

२६) अपंग मतिमंद यांच्या कल्याणासह समाज कल्याण

२७) दुर्बल घटकांचे विशेष अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांचे कल्याण

२८) सार्वजनिक वितरण व्यवस्था

२९) सामाजिक मौल्यवान ठेव्यांचे रक्षण

अशा प्रकारे वरील २९ विषयांमध्ये पंचायतराज संस्थेचे अधिकार प्राधिकार व जबाबदाऱ्या स्पष्ट करण्यात आलेल्या आहेत.

**७३ व्या घटना दुरुस्तीची वैशिष्ट्ये**

१९९३ रोजी ७३ वी घटनात्मक दुरुस्ती झाल्यामुळे पंचायतराज संस्थाना घटनात्मक दर्जा मिळाला यातून सत्तेचे विकेंद्रीकरण झाले.ग्रामीण समाजव्यवस्था बदल असून या ७३ व्या घटनादुरुस्तीची वैशिष्टे खालील प्रमाणे स्पष्ट करता येतील.

१) पंचायतराज व्यवस्थेमुळे सत्तेचे विकेंद्रीकरण झालेले आहे.

२) संविधानातील ४३ (आय) कलमानुसार पंचायतराज संस्थेच्या आर्थिक स्थितीचे पुनर्विलोकन करण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

३) ७३ व्या घटनादुरुस्तीमुळे ग्रामसभा पंचायतराज व्यवस्थेचा अविभाज्य व महत्त्वाचा पायाभूत घटक बनलेला आहे. त्यामुळे ग्रामसभेमुळे लोकांचा राजकीय सहभाग वाढलेला आहे.

४) ७३ व्या घटनादुरुस्तीमुळे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, मागास वर्गाचा प्रर्वग आणि महिला यांना पंचायतराज व्यवस्थेमध्ये प्रतिनिधित्व मिळालेले आहे.

५) लोकशाही बळकट व स्थिर करण्यामध्ये पंचायतराज व्यवस्था महत्त्वाची भूमिका पार पाडत आहे.

६) ७३ व्या घटनादुरुस्तीमुळे महिला सबलीकरण व सशक्तीकरण झालेले आहे.

७) ७३ व्या घटना दुरुस्ती मुळे प्रशासकीय कार्यासंबंधी ग्रामपंचायत पंचायत समिती व जिल्हा परिषद मधील सदस्य आपापली कर्तव्य आणि अधिकार व जबाबदाऱ्या योग्य रीतीने पार पाडत आहेत.

८) ७३ व्या घटनादुरुस्तीने आर्थिक धैर्य पंचायतराज व्यवस्थेला लाभली आहे.

९) पंचायतराज व्यवस्थामुळे किंवा त्याला घटनादुरुस्तीमुळे राजकीय सामाजिक वितरण होत आहे.

१०) ७३ व्या घटनादुरुस्तीमुळे सर्वस्तरातील केंद्र शासनाच्या योजना गाव पातळीपर्यंत पोचू लागले आहेत.

११) पंचायतराज व्यवस्थेतील नागरिकांना आपल्या हक्क आणि कर्तव्याची जाणीव आणि जागृती निर्माण झालेली आहे.

**७३ व्या घटना दुरुस्तीचे महत्व**

७३ व्या घटना दुरुस्तीमुळे पंचायतराज संस्थांना घटनात्मक दर्जा प्राप्त झाला असला तरी केवळ राज्य शासनाने आपल्या इच्छेनुसार स्थापन केलेल्या व चालवलेल्या दुय्यम स्वरूपाच्या संस्था ही पंचायत राजचे स्वरूप होते ते ७३ व्या घटनादुरुस्तीमुळे बदलून गेले. सत्तेचे विकेंद्रीकरण होऊन सत्ता समाजाच्या तळागाळापर्यंत पोहोचली राज्यातील अनुसूचित जाती, जमाती, मागासप्रवर्ग, महिला यांना राज्याकारभरात स्थान मिळाले त्यांच्यासाठी आरक्षणाची व्यवस्था करण्यात आली. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, मागासवर्ग आणि महिला यांना दिलेले आरक्षण ही ७३ व्या घटना दुरुस्तीची महत्त्वाची अशी जमेची बाजूच म्हणावी लागेल. समाजातील सर्व स्तरातील नागरिकांना राज्यकारभारत सहभागी करून घेण्यासाठी ७३ व्या घटनादुरुस्ती ही आवश्यकता महत्वपूर्ण ठरलेली आहे. आज याच घटनादुरुस्तीने गावातील सर्व जाती-धर्मातील लोकांच्या मध्ये लोकशाहीच्या बद्दल जाणीव जागृती निर्माण झालेली आहे. सर्व स्तरातीलच नागरिकास अधिकार पदी मिळत आहेत. ७३ व्या घटनादुरुस्तीने निर्वाचन आयोग वित्त आयोग लेखा व लेखापरीक्षण अशा महत्त्वाच्या तरतुदी करण्यात आल्या. पंचायत राज्याच्या विविध संस्थांच्या निवडणुका निवडणूक आयोगाच्या निर्मितीमुळे निकोप व स्वच्छ वातावरणात आणि वेळेवर होत आहेत. पंचायतराज संस्थांना या ७३ व्या घटनादुरुस्तीने आर्थिक दृष्ट्या सक्षम बनलेले आहे. त्याचबरोबर त्यांचे हिशेब लेखा लेखापरीक्षण या संबंधित तरतूद केली असल्यामुळे याबाबत मिळणाऱ्या उत्पन्नाचे योग्य वितरण होत आहे. कराच्या उत्पन्नाची विभागणी, कर आकारणी, कर वसुली, संचित निधीतून मिळणारे उत्पन्न प्रत्यक्ष होणारा खर्च यांचा हिशोब आणि परीक्षण या दृष्टीने ७३ घटना दुरुस्ती ही अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. तसेच ७३ व्या घटनादुरुस्तीमुळे पंचायतराज संस्थांना संविधानात्मक दर्जा व विशेष प्रतिष्ठा लाभलेले आहेत. अर्थात

पंचायतराजचा घटनात्मक दर्जा व प्रतिष्ठा वाढवताना राज्याच्या अधिकारावर कोणत्याही मर्यादा येणार नाही याविषयी दक्षता घेण्यात आलेली आहे, तसेच पंचायत राज व्यवस्था अधिक सक्षम सदृढ करण्यासाठी राज्य विधिमंडळास किंबहुना कायदे करण्याचा अधिकार दिलेला आहे. ७३ व्या घटनादुरुस्तीने 'पंचायती' हा नववा भाग समाविष्ट केलेला असून २४३ (अ) या कलमात ग्रामसभेचा उल्लेख करून त्यासंबंधी असे स्पष्ट म्हटले आहे की, राज्याची विधिमंडळ कायद्यानुसार निश्चित करून देईल त्याप्रमाणे ग्रामसभा स्थानिक पातळीवर अधिकाराचा वापर करून आपली कर्तव्य पाडेल. या ग्रामसभेमुळे प्रत्यक्ष लोकशाहीचे अविष्कारणच आज ग्रामीण समाज जीवनामध्ये दिसून येत आहे. तसेच या सर्व संस्थांना घटनात्मक दर्जा या घटना दुरुस्ती मुळे प्राप्त झालेला आहे त्यामुळे या तरतुदींचे पालन किती प्रमाणात आणि कोणत्या प्रकारे होत आहे हे पाहणे महत्त्वाचे ठरेल तसेच आज महिला सक्षमीकरणाच्या बाबतीत जर आपण म्हटलं तरी पंचायत राज व्यवस्थेमध्ये महिलांना ५०% स्थान जरी मिळत असले तरी मात्र आज प्रत्यक्षात महिलांना या व्यवस्थेमध्ये किती आणि कसे काम करण्याच्या काही अडचणी निर्माण होत आहेत हे पाहणे आवश्यक आहे. असं असे असले तरी ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेच्या माध्यमातून लोकशाहीचे विकेंद्रीकरण होत आहेत. तसेच समाजातील स्तर सर्व स्तरातील नागरिकांना राजकीय व्यवस्थेमध्ये स्थान प्राप्त होत आहे. हे ७३ व्या घटनादुरुस्तीचे महत्वच मानावे लागेल.अशाप्रकारे ७३ व्या घटनादुरुस्तीची चिकित्सा, तरतुदी, महत्त्व आणि वैशिष्ट्ये पाहिली असता कोणताही कायदा केला तर तो परिपूर्ण असूच शकत नाही तो कायदा निर्माण झाल्यानंतर त्याची कार्यवाही होताना ज्या समस्या त्रुटी निर्माण होतात त्यासाठी पुन्हा उपाययोजना नियम व कायदे दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

### १.२.२ ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषदांची रचना

#### अ) ग्रामपंचायत व ग्रामसभा

बलवंतराव मेहता समितीच्या शिफारशीनुसार देशातील विविध घटक राज्यांनी पंचायतराज व्यवस्थेचा स्वीकार केला. वसंतराव नाईक समितीने केलेल्या शिफारशीनुसार महाराष्ट्र शासनाने त्रिस्तरीय पंचायतराज व्यवस्था स्थापन केली. जिल्हा पातळीवर जिल्हा परिषद, तालुका पातळीवर पंचायत समिती आणि ग्रामपातळीवर ग्रामपंचायत अशा तीन संस्था स्थापन करण्यात आल्या. यामध्ये ग्रामपंचायत हा घटक महत्त्वाचा मानला गेला. 'मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८' च्या ५ कलमात ग्रामपंचायतीच्या स्थापने संबंधित तरतूद करण्यात आली आहे. 'प्रत्येक गावात एक पंचायत असेल' अशी वैधानिक तरतूद करण्यात आली. भारतीय राज्यघटनेच्या कलम ४० प्रमाणे ग्रामपंचायती स्थापन करण्याचा अधिकार राज्य सरकारला असेल. महाराष्ट्रात मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चा कायदा सध्या अमलात असून त्यामध्ये वेळोवेळी परिस्थितीनुसार दुरुस्ती करण्यात आल्या आहेत. १९९३ साली ७३ व्या घटनादुरुस्ती होऊन १९५८ च्या ग्रामपंचायतीच्या कायद्यात काही सुधारणा करण्यात आलेले आहेत त्यानुसार महाराष्ट्रात सध्या ग्रामपंचायतीचा कारभार चालवला जातो.

**ग्रामपंचायतीची रचना**

मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ अन्वये राज्य सरकार प्रत्येक गावासाठी ग्रामपंचायत स्थापन करू शकते. अर्थात सपाट प्रदेशातील गावात ग्रामपंचायत स्थापन करण्यासाठी ६०० लोकसंख्या व डोंगरी प्रदेशात ग्रामपंचायत निर्मितीसाठी ३०० लोकसंख्या आवश्यक मानली जाते. ज्या गावची लोकसंख्या ६०० पेक्षा विषय कमी असेल अशा दोन किंवा तीन खेड्यांची मिळून एक गट ग्रामपंचायत स्थापन करता येते.

**सभासद संख्या**

ग्रामपंचायतीची सदस्या संख्या लोकसंख्येच्या प्रमाणात ठरवली जाते. सामान्यता पुढील प्रमाणे सदस्य संख्या ठरवण्याचे प्रमाण निश्चित केले आहे.

| अ.क्र. | गावाची लोकसंख्या | निवडून द्यावयाची सदस्य संख्या |
|---|---|---|
| १. | ६०० ते १५०० | ७ |
| २. | १५०१ ते ३००० | ९ |
| ३. | ३००१ ते ४५०० | ११ |
| ४. | ४५०१ ते ६००० | १३ |
| ५. | ६००१ ते ७५०० | १५ |
| ६. | ७५०१ किंवा त्यापेक्षा अधिक | १७ |

**प्रभागांची निर्मिती (निर्वाचन क्षेत्र)**

ग्रामपंचायत मधील सदस्य संख्या निश्चित झाल्यानंतर समान लोकसंख्येच्या आधारावर त्या गावचे विविध प्रभागात विभाजन केले जाते. एका प्रभागातून जास्तीत जास्त तीन व कमीत कमी दोन सदस्य निवडून दिले जातात. प्रभागांची निर्मिती करीत असताना ज्या वस्त्यांमध्ये अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती लोकसंख्या केंद्रित झाली असेल अशा वस्त्यांचे शक्यतो विभागणी केली जात नाही. आरक्षित पदे संबंधित जाती-जमातीच्या लोकसंख्या असलेल्या वार्डातून ठेवली जातात.

**ग्रामपंचायतीमधील राखीव जागांची तरतूद**

अ) अनुसूचित जाती अनुसूचित जमातीसाठी लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व राखून ठेवले जाते अशा राखीव जागापैकी १/३ जागा अनुसूचित जाती जमातीच्या स्त्रियांसाठी राखून ठेवल्या जातात.

ब) नागरिकांच्या इतर मागास वर्गाच्या-प्रवर्गासाठी ग्रामपंचायतीच्या २७ टक्के जागा राखीव असतात.

क) स्त्रियांसाठी राखीव जागा : २००१ पासून ग्रामपंचायत क्षेत्रात राहणाऱ्या सर्व स्त्रियांसाठी ग्रामपंचायतीच्या सदस्यांच्या एकूण जागापैकी १/२ (५०) टक्के जागा स्त्रियांना राखून ठेवल्या जातात,

निवडणूक यंत्रणा १९९३ साली झालेल्या ७३ व्या घटनादुरुस्तीनंतर राज्यघटनेच्या कलम ४३ (ट) च्या तरतुदीनुसार १९९४ साली मुंबई ग्रामपंचायत अधिनियमांमध्ये काही सुधारणा करण्यात आल्या. त्यानुसार राज्य निर्वाचन आयोगाची स्थापना करण्यात आली. ग्रामपंचायतच्या सर्व निवडणुकीच्या मतदारांचे अद्यावत सुधारित याद्या या निवडणूक आयोगामार्फत तयार केला जातात. ग्रामपंचायत सर्व निवडणुकीसाठी ग्रामपंचायत क्षेत्रात राहणाऱ्या १८ वर्ष पूर्ण झालेल्या स्त्री-पुरुषांना मतदार यादीत नाव नोंदवले जाते.

**ग्रामपंचायत सदस्यांची पात्रता**

१) ती व्यक्ती भारताची नागरिक असावी लागते.

२) ग्रामपंचायत निवडणूक लढवणाऱ्या उमेदवाराची वय २१ वर्षे पूर्ण असावे लागते.

३) गावच्या मतदार यादी त्या व्यक्तीचा मतदार म्हणून समावेश असावा, ती कोणत्याही प्रभागातून निवडणूक लढवू शकते.

४) राखीव जागेसाठी त्याच प्रवर्गातील उमेदवार व्यक्ती असावी.

५) ती व्यक्ती सरकारी किंवा कोणते स्थानिक प्राधिकरणाची कर्मचारी असू नये.

**ग्रामपंचायत सदसत्त्वाच्या अपात्रतेचे निकष**

पुढील कारणावरून एखादी व्यक्ती ग्रामपंचायत निवडणुकीत उमेदवार म्हणून अपात्र होऊ शकते.

१) मतदार यादीत नाव नसणे, २१ पूर्ण नसणे, ती भारताचा नागरिक नसणे.

२) कोर्टाने नादान, दुर्बल मनाची वेडसर व्यक्ती ठरवलेली असणे.

३) अधिकार नसताना आरक्षित जागेसाठी निवडणुकीचा अर्ज भरणे.

४) ग्रामपंचायतीच्या किंवा जिल्हा परिषदेच्या करांचा थकबाकीदार असणे.

५) निवडणूक लढवणाऱ्या व्यक्तीस दोन पेक्षा जास्त अपत्य असणे. (१९९५ नंतर च्या काळातील)

**निवडणूक**

राज्य निर्वाचन आयुक्तांनी नियुक्त केलेला निवडणूक अधिकारी (तहसीलदारापेक्षा कमी दर्जा नसलेला) ग्रामपंचायतीच्या निवडणूका ठरलेल्या वेळी घेतो. तो निवडणूक अधिकारी म्हणून ग्रामपंचायतीच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करतो. ७३ व्या घटनादुरुस्तीनंतर पंचायत राज व्यवस्थेच्या निवडणुका वेळेवर घेण्यात येत आहेत.

**ग्रामपंचायतीचा कार्यकाल**

ग्रामपंचायतचा कार्यकाल पाच वर्षाच्या असतो. ग्रामपंचायत निवडणुकीनंतर ग्रामपंचायतची पहिली सभा ज्या तारखेला होती त्या तारखेपासून ग्रामपंचायतीचा कार्यकाल सुरू होतो. ग्रामपंचायतीची मुदत पाच वर्षे असली तरी त्या मदतीपूर्वी राज्य सरकार ग्रामपंचायतचे विसर्जन करू शकते. परंतु विसर्जन केल्यापासून सहा महिन्याच्या आत ग्रामपंचायतीची पुन्हा निवडणूक घ्यावी लागते.

**ग्रामपंचायतीचे विसर्जन**

मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ च्या कलम १४५ मध्ये ग्रामपंचायत विसर्जनाची तरतूद स्पष्ट केलेली आहे. पुढील परिस्थितीत राज्यशासन ग्रामपंचायतीचे विसर्जन करू शकते.

अ) एखादी ग्रामपंचायत आपल्या अधिकार मर्यादेचे उल्लंघन किंवा दुरुपयोग करीत असेल तर.

ब) मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ नुसार तिला घालून दिलेली कर्तव्य पार पाडण्यास सक्षम नसेल.

क) मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ कलम १२४ मध्ये सांगितलेले कर बसविण्यास कसूर करत असेल.

ड) पंचायत समिती किंवा आयुक्त यांनी दिलेल्या आदेशांचे पालन होत नसेल.

इ) एखाद्या ग्रामपंचायतीमधील एकूण सदस्य संख्येच्या निम्म्याहून अधिक जागा रिक्त असतील तर.

वरीलपैकी कोणत्याही कारणास्तव ग्रामपंचायत सक्षम नसेल किंवा दोषी असेल तर राज्य सरकार संबंधित जिल्हा परिषदेशी विचारविनिमय करून अशा ग्रामपंचायतीचे विसर्जन करून शकते असे विसर्जन करण्यापूर्वी त्या ग्रामपंचायतला आपली बाजू मांडण्याची संधी दिली जाते.

**सरपंच व उपसरपंच (ग्रामपंचायतीचे पदाधिकारी)**

प्रत्येक ग्रामपंचायतीस एक सरपंच व एक उपसरपंच असतो. ग्रामपंचायतीचा राजकीय प्रमुख म्हणून सरपंच काम पाहतो. त्याच्या अनुपस्थित उपसरपंच त्याचे काम पाहतो. १९९४ च्या महाराष्ट्र अधिनियम २१ नुसार सरपंच व उपसरपंच यांची निवड सार्वत्रिक निवडणुकीनंतर ग्रामसभेच्या पहिल्या सभेत ग्रामपंचायतच्या सदस्यातून होते.

**सरपंच पदाचे आरक्षण**

मुंबई ग्रामपंचायत अधिनियमानुसार, कलम ३० अन्वये (महाराष्ट्र अधिनियम क्रमांक- २१, सन १९९४ नुसार) अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्यासाठी, तसेच नागरिकांच्या मागास वर्गातील प्रवर्गाच्या लोकांसाठी आणि स्त्रियांसाठी सरपंचाच्या जागेसाठी पुढील प्रमाणे आरक्षण राखून ठेवले जाते.

१) अनुसूचित जातीच्या किंवा अनुसूचित जमातीच्या लोकसंख्येचे जेवढे प्रमाण असेल तेवढ्या प्रमाणात सरपंचांच्या अशा पदाच्या एकूण संख्येपैकी

२) राज्यातील सरपंचाच्या एकूण संख्या किती २७% सरपंचांची पदे नागरिकांच्या मागास वर्गातील प्रवर्गाच्या लोकांच्यासाठी तसेच त्यापैकी १/३ पदे स्त्रियांसाठी राखीव असतात.

३) राज्यातील ग्रामपंचायतीच्या एकूण सरपंचाच्या पदांपैकी १/२ पदे स्त्रियांसाठी राखून ठेवण्यात येतील यामध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्गाच्या प्रवर्गातील स्त्रियांच्यासाठी त्याप्रमाणात पदे आरक्षित ठेवली जातात.

**राखीव जागांची मुदत**

राखीव जागेची मुदत ही अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती आणि नागरिकांच्या मागास वर्ग यांच्यासाठी भारतीय घटनेच्या कलम १३४ मध्ये जी मुदत नमूद केली आहे त्या प्रमाणात असेल.

**सरपंच व उपसरपंच यांचा कार्यकाल**

मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ च्या कलम ३१ प्रमाणे सरपंच व उपसरपंच यांचा कार्यकाल पाच वर्षे एवढा निश्चित केलेला आहे. हा कार्यकाल संपण्यापूर्वी ते आपल्या पदाचा राजीनामा पंचायत समितीच्या सभापती कडे व उपसरपंच आपल्या पदाचा राजीनामा सरपंचाकडे देऊ शकतो.

**विश्वासाचा ठराव**

सरपंच किंवा उपसरपंच आपल्या अधिकाराचा गैरवापर करीत असतील किंवा कर्तव्य पुरतीत कसूर करीत असतील किंवा पंचायतीच्या ठरावांची योग्य रीतीने अंमलबजावणी करीत नसतील किंवा अन्य कारणासाठी सभासदांचा त्यांच्यावर विश्वास राहिला नसेल तर अशावेळी त्यांच्याविरुद्ध अविश्वासाचा ठराव पास करून त्यांना त्यांच्या पदावरून काढून टाकता येते. सरपंच किंवा उपसरपंच यांनी त्या पदावर निवड झाल्याच्या तारखेपासून सहा महिन्याच्या आत त्यांच्या विरुद्ध विश्वासचा ठराव मांडता येणार नाही. तसेच अविश्वासाचा ठराव फेटाळला गेल्यास त्यांच्यावर एक वर्षाच्या काळात अविश्वासाचा नवा ठराव मांडता येणार नाही अशी तरतूद करण्यात आलेली आहे.

**सरपंच व उपसरपंच यांची पदच्युती**

जिल्हा परिषदेची स्थायी समिती ग्रामपंचायतीच्या सरपंच किंवा उपसरपंच किंवा इतर सदस्य यांना पुढील कारणास्तव त्यांच्या पदावरून काढू शकते. गैरवर्तणुकीबद्दल किंवा आपल्या कर्तव्यात कसूर केली असेल कर्तव्य पार पाडण्यास असमर्थ असेल तर जिल्हा परिषदेची स्थायी समिती त्यास कमी करू शकते.

**आतिथ्य भत्ता, प्रवास भत्ता व दैनिक भत्ता**

सरपंच उपसरपंच व इतर सदस्य यांना पंचायतीच्या कामासाठी केलेल्या प्रवासासाठी प्रवास भत्ता व दैनिक भत्ता दिला जातो. सरपंचाला वार्षिक उत्पन्नाच्या दोन टक्के किंवा सहा हजार रुपये यापैकी जी रक्कम कमी असेल ती आतिथ्य भत्ता म्हणून दिली जाते.

**सरपंच उपसरपंच यांचे अधिकार व कामे**

मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ च्या कायद्यातील ३८ व्या कलमानुसार सरपंचाला ग्रामपंचायतीचे कार्यकारी अधिकार देण्यात आलेले आहेत. ग्रामपंचायतीने मंजूर केलेले ठराव आणि या अधिनियमाद्वारे पंचायतीकडे सोपवली कर्तव्य पार पाडण्याची जबाबदारी सरपंचावर असते. सरपंचाच्या अनुपस्थित उपसरपंच हा सरपंचाच्या अधिकाराचा वापर करून त्याची कर्तव्य पार पाडत असतो. सामान्यता सरपंचाला पुढील अधिकार दिले आहेत.

१) ग्रामपंचायत सदस्यांची सभा बोलावणे.

२) ग्रामपंचायत सभेचे अध्यक्षस्थान स्वीकारणे व त्या सभेचे नियंत्रण करणे.

३) ग्रामपंचायतीच्या सर्व अधिकाराच्या व कर्मचाऱ्यांच्या कार्यावर देखील नियंत्रण ठेवणे.

४) ग्रामपंचायतीने सहमत केले ठरावाची आणि घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करणे ग्रामपंचायत या ठरावांना सदस्यांची स्वीकृती मिळवणे.

५) एका आर्थिक वर्षात ग्रामसभेची किमान एक बैठक बोलावणे व तिचे अध्यक्ष स्थान स्वीकारणे.

६) करांची वसुली करणे त्यावर देखील नियंत्रण ठेवणे.

**ग्रामपंचायतीची सभा**

ग्रामपंचायतीची सभा प्रत्येक महिन्याला किमान एक वेळा घेतली जावी. सरपंचांनी व त्यांच्या अनुउपस्थित उपसरपंचांनी आपल्या सहीने सभेची नोटीस कार्यक्रमासह काढली पाहिजे. ग्रामपंचायतचा कार्यालय किंवा गाव चावडीत या ठिकाणी ही सभा घेण्यात यावी. सरपंच उपसरपंच धरून एकूण सदस्य संख्येच्या १/२ सदस्य उपस्थित राहिल्यास गणसंख्या पूर्ती झाली असे मानण्यात येईल. ग्रामपंचायतीच्या मासिक सभेशिवाय पंचायतीची खास विशेष सभा बोलवता येते. ग्रामसभेच्या कामकाजात एखाद्या प्रस्तावावर मतदान होऊन समान मते पडली तर निर्णय मत देण्याचा अधिकार सरपंचाला दिलेला असतो.

**ग्रामसेवक (ग्रामपंचायत सचिव)**

ग्रामपंचायतच्या प्रशासकाला ग्रामसेवक किंवा ग्रामसचिव असे संबोधले जाते. ग्रामपंचायतीच्या दैनंदिन प्रशासनाची जबाबदारी ग्रामसेवकावर असते जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याकडून ग्रामसेवकाची नियुक्ती केली जाते. तो जिल्हा परिषदेचा कर्मचारी म्हणून कार्य करतो त्याचे वेतन 'जिल्हानिधी' तून दिले जाते. ग्रामपंचायतचे कार्यालयीन कामकाज आणि प्रशासकीय दैनंदिन व्यवहार यासंबंधीची जबाबदारी ग्रामसेवकावर असते.

**ग्रामसेवकाची कामे**

१) ग्रामपंचायतीचा सचिव या नात्याने ग्रामसेवक ग्रामपंचायतच्या नोकरवर्गावर नियंत्रण देखरेख ठेवतो.

२) ग्रामपंचायतीने मंजूर केलेल्या ठरावांची आणि निर्णयाची अंमलबजावणी करणे.

३) ग्रामपंचायतीचे अंदाजपत्रक तयार करणे ते ग्रामपंचायती पुढे ठेवून पंचायत समिती व जिल्हा परिषदेकडे पाठवणे. आणि ग्रामपंचायतीच्या आर्थिक प्रशासनाची जबाबदारी सांभाळणे.

४) ग्रामपंचायतच्या सरपंचाच्या, उपसरपंचाच्या किंवा एखाद्या सदस्य सदस्याच्या राजीनाम्याची माहिती ग्रामपंचायतीस देणे.

५) ग्रामपंचायतच्या सभांची बैठकाची नोंद ठेवणे, प्रशासकीय दप्तर सांभाळणे.

६) ग्रामपंचायतीच्या सभा बोलविणे, मासिक मीटिंगांच्या नोटिसा सदस्यांना पाठवणे.

७) गावचा विकासाच्या योजना आखणे, तयार करणे, नवीन करविषयक धोरण ठरवणे.

८) ग्रामपंचायतच्या ग्रामसभेचा सचिव या नात्याने ग्रामसभेची विषय पत्रिका तयार करणे ग्रामसभेची कागदपत्रे तयार करणे. ग्रामसभेचा वृत्तांत मुख्य कार्यकारी अधिकारी व गटविकास अधिकारी यांना पाठवणे.

ग्रामपंचायतच्या योजना राबवताना जनतेचा सहभाग आणि पाठिंबा असणे महत्त्वाचे असते त्या दृष्टीने जनतेचा विश्वास संपादन करून घेण्यासाठी ग्रामसेवकाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. आर्थिक व्यवहारासंबंधी ग्रामसेवकाची कर्तव्य आणि जबाबदाऱ्या अत्यंत महत्त्वाच्या असतात. ग्रामनिधी, पाणीपुरवठा निधी किंवा जवाहर योजना निधी यांच्या खर्चाची जबाबदारी ग्रामसेवकावर असते. त्यामुळे तो निस्वार्थी असणे महत्त्वाचे आहे. त्याच्या कामकाजाच्या आधारावर ग्रामपंचायती आणि ग्रामसभा यांचे यश अवलंबून आसते.

**ग्रामपंचायतीच्या उत्पन्नाची साधने**

ग्रामपंचायतीला ग्रामविकासाच्या दृष्टीने विविध योजना राबवाव्या लागतात. ग्रामपंचायतीच्या क्षेत्रातील लोकांच्या स्थानिक समस्या सोडवाव्या लागतात. त्यासाठी ग्रामपंचायतीकडे पुरेसा पैसा असणे आवश्यक आहे. प्रामुख्याने ग्रामपंचायतीला पुढील तीन मार्गाने उत्पन्न प्राप्त होते.

अ) ग्रामनिधी ब) शासकीय अनुदाने क) कराद्वारे मिळणारे उत्पन्न.

**अ) ग्रामनिधी**

मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ च्या कायद्यानुसार कलम ५७ मधील तरतुदीनुसार प्रत्येक गावासाठी एक ग्रामनिधी असतो. ग्रामनिधीचा वापर ग्रामपंचायतच्या कामासाठीच केला जातो. ग्रामनिधीचा पैसा खर्च करण्याचा अधिकार ग्रामपंचायतला असतो ग्रामनिधीत पुढील रकमांचा समावेश केला जातो.

१) काही कारणास्तव नगरपालिकेच्या क्षेत्रातील काही भाग ग्रामपंचायतीच्या क्षेत्रामध्ये सामील केला असेल किंवा त्या ठिकाणी नवीन ग्रामपंचायत निर्माण केली असेल अशावेळी ग्रामपंचायतीला पूर्वीच्या नगरपालिकेकडून निधी किंवा पैसा मिळतो.

२) कर आणि फी पासून मिळणारे उत्पन्न; मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ च्या कलम १२४ अन्वये ग्रामपंचायतीला निरनिराळे कर व फी आकारता येते सदर करायचे व फीचे उत्पन्न ग्रामनिधीत जमा होते.

३) वित्त आयोगाच्या शिफारशी प्रमाणे मिळणारे उत्पन्न : आयोगाच्या शिफारशीनुसार राज्याने बसवलेले कर, शुल्क यांच्या निव्वळ उत्पादनातील ग्रामपंचायतीच्या हिश्यातील रक्कम मिळते.

४) न्यायालयाच्या आदेशाने मिळणारी रक्कम : काही खटल्यात निकाल देताना न्यायालयाने काही रक्कम ग्रामपंचायतला द्यावी असा निर्णय दिला तर ती रक्कम ग्रामपंचायतला मिळते, केरकचरा विक्रीतून ग्रामपंचायतला निधी मिळतो.

५) देणग्या आणि वर्गण्या यातून ग्रामपंचायतीला उत्पन्न मिळते, ग्रामीण समुह जीवन विमा एजंट म्हणून ग्रामपंचायतला काही रक्कम विमा कमिशन म्हणून मिळते.

**ब) शासकीय अनुदाने**

ग्रामपंचायतींना अनुदान व कर्जाच्या स्वरूपात आर्थिक मदत मिळण्याची तरतूद पुढील प्रमाणे करण्यात आलेली आहे.

१) ग्रामपंचायतीच्या क्षेत्रातील गोळा होणाऱ्या जमीन महसूलाच्या पाच वर्षाच्या सरासरी एवढी रक्कम शासकीय अनुदान म्हणून ग्रामपंचायतला मिळते.

२) जिल्हा परिषदेच्या आपल्या कार्यक्षेत्रातील ग्रामपंचायतींना विकास योजनांच्या पूर्ततेसाठी जिल्हा परिषदेकडून कर्ज मिळते.

३) ग्रामपंचायतला राज्य शासनाकडून जे जमीन महसुलाचे अनुदान मिळते ते कमीत कमी गावच्या लोकसंख्ये एवढे म्हणजे दरडोई एक रुपया असावे असा नियम आहे. जर गावची लोकसंख्या जास्त आणि जमीन महसुली अनुदान कमी असेल तर कमी पडणारी रक्कम ग्रामपंचायतला देण्यात येते यालाच समानीकरन अनुदान असे म्हणतात.

४) प्रत्येक ग्रामपंचायतीसाठी ग्राम पाणीपुरवठा निधी या नावाचा स्वातंत्र्य निधी असतो. या निधीत ग्रामसेवायोजना निधीतील रक्कम व ग्रामपंचायतला मिळणाऱ्या अनुदानापैकी ३५ टक्के रक्कमजमा करण्यात येते.

५) प्रत्येक जिल्ह्यासाठी जो 'जिल्हा ग्रामविकास निधी' असतो त्यातून जिल्ह्यातील ग्रामपंचायतींना कर्ज दिले जाते.

**क) कराद्वारे मिळणारे उत्पन्न**

ग्रामपंचायत आपल्या कार्यक्षेत्रातील लोकांना विविध प्रकारच्या सेवा उपलब्ध करून देते त्या मोबदल्यात ग्रामपंचायत लोकांकडून विविध प्रकारचे कर वसूल करीत असते.

१) ग्रामपंचायतीच्या क्षेत्रातील सर्व इमारती व जमिनीवरील कर

२) कृषी उत्पन्न वाढ व्हावी या हेतूने ग्रामनिधीत काही योजना राबवल्या जातात.

३) यात्राकर, उत्सव यावरील कर  करमणूक कर ग्रामपंचायत मिळत असतो.

४) सायकल बैलगाडी घोडा गाडी यावरील कर, जमिनीवरील सुधार कर.

५) व्यवसाय धंदा व नोकरी यावरील कर तसेच ग्रामपंचायतीच्या क्षेत्रात शौचकूप बांधणे त्याची सुव्यवस्था ठेवणेयाबद्दल ग्रामपंचायत आरोग्य रक्षण कर लावते.

६) पाणीपट्टी दिवाबत्ती कर आठवड्यातील बाजारांवरील कर स्वच्छता उपकर.

**ग्रामपंचायतीचे अधिकार व कामे**

ग्रामपंचायत ही संस्था पंचायत राजव्यवस्थेतील अतिशय महत्त्वाची पायाभूत संस्था आहे. मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ च्या पहिल्या अनुसूचित ७८ विषयांची यादी दिलेली आहे. त्याची विभागणी पुढील १२ विभागांत दिलेली आहे. सामान्यतः ग्रामपंचायतीला खालील विषयासंबंधी पुढील अधिकार प्राप्त झालेले आहेत.

**१) कृषी विषयक ग्रामपंचायतची कार्य :** गावातील जमीन व इतर साधन संपत्ती यांचे सहकारी तत्त्वावर व्यवस्थापन करणे सामुदायिक सहकारी शेतीची संघटना स्थापन करणे. अवजारे, भंडारे, सुधारित बी बियाण्याची उत्पादन, पीक संरक्षण यासंबंधी नवनवीन प्रयोग व व्यवस्थापन करणे. कृषी उत्पन्न वाढवणे.

**२) पशुसंवर्धनाचे कार्य :** गुरांची आणि त्यांच्या पैदासाची सुधारणा करणे. लसीकरण करणे.

**३) वने जंगले यांचे रक्षण :** गायरान, ग्रामवणे यांची जोपासना करणे, त्यांचे रक्षण करणे, वनसंपत्ती वाढविणे, वृक्षतोड थांबविणे.

**४) समाजकल्याणविषयक कार्य :** गावातील अपंग निराधार आजारी लोकांना मदत करणे गावाचे नैतिक व सामाजिक हित लक्षात घेऊन अस्पृश्यता निवारण, दारूबंदी व इतर अन्य अवैद्य उपक्रमांना बंदी घालणे, महिलांच्या व बालकांच्या संघटना स्थापन करून त्याचे कल्याण साधने.

**५) शिक्षणविषयक कार्य :** गावातील प्राथमिक शाळांच्या इमारतींची डागडुजी करून त्या व्यवस्थित ठेवणे. शैक्षणिक व सांस्कृतिक उद्देश लक्षात घेऊन शिक्षण प्रसार करणे, वाचनालय प्रौढ साक्षरता केंद्रे यांची व्यवस्था करणे.

**६) वैद्यकीय व आरोग्य विषयक कार्य :** गावातील लोकांचे आरोग्य रक्षण करण्यासाठी वैद्यकीय मदतीची व्यवस्था करणे साथीच्या रोगाचा प्रसार होऊ नये यासाठी प्रतिबंध लस टोचणे. गावातील घानकचरा, सांडपाणी व्यवस्थापन व इतर कचऱ्याची विल्हेवाट लावणे. मृत जनावरांचे विल्हेवाट लावणे, पिण्याचे पाणी, गुरांसाठी पाणी, यांची वेगळी व्यवस्था ठेवणे.

**७) इमारती व दळणवळण यांची व्यवस्था :** गावातील सार्वजनिक विभागातील सार्वजनिक रस्ते, गटारे, पूल बांधणे ते सुव्यवस्थित ठेवणे व दुरुस्त करणे सार्वजनिक जागेत रस्त्याच्या दुतर्फा, बाजाराच्या जागेत झाडे लावणे त्याची जोपासना करणे.

**८) पाटबंधारे :** लहान पाटबंधारे गावतळी बांधणे.

**९) उद्योगधंदे व कुटीरउद्योग :** ग्रामपंचायतच्या क्षेत्रात कुटीउद्योग व ग्रामोउद्योग सुरू करणे, त्यामध्ये सुधारणा करून त्यांना प्रोत्साहन देणे.

**१०) सहकार :** ग्रामपंचायतीच्या क्षेत्रातील पतसंस्था आणि बहुउद्देशीय सहकारी संस्था संघटना स्थापन करून सहकारी शेतीला उत्तेजन देऊन त्या दृष्टीने प्रयत्न करणे.

**११) स्वसंरक्षण व ग्राम संरक्षण :** गावच्या रक्षणासाठी ग्राम स्वयंसेवक दल आणि संरक्षण कामगार बँक स्थापन करणे.

**१२) सामान्य प्रशासनविषयक कार्य :** ग्रामपंचायत कागदपत्रे अभिलेख तयार करून सुस्थितीत ठेवणे त्याची देखभाल करणे गावातील बाजार व इतर व्यवस्था सुस्थितीत ठेवणे नैसर्गिक आपत्तीच्या वेळी लोकांना सहकार्य करणे गावच्या विकासाच्या दृष्टिकोनातून येणारी सर्व कामे व कार्य ग्रामपंचायत करीत असते.

**ग्रामपंचायतीच्या समित्या**

मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ च्या कलम ४९ प्रमाणे प्रशासकीय अधिकार व कर्तव्य पार पाडण्यासाठी ग्रामपंचायतला जी विविध स्वरूपाची कामे करावी लागतात ती कामे योग्य प्रकारे होण्यासाठी ग्रामपंचायतला विषय समित्या स्थापन करण्याचा अधिकार देण्यात आला आहे. सदर समित्या पंचायतीच्या ठरावाने स्थापन केल्या जातात. ग्रामपंचायतीला ठराव करून कोणतीही समिती बरखास्त करण्याचा अधिकार आहे. ग्रामपंचायती आपल्या कामासाठी पुढील समित्यांची स्थापना करू शकते.

१) शिक्षण समिती २) आरोग्य समिती ३) बांधकाम समिती ४) दिवाबत्ती समिती ५) शेती समिती ६) छोटे पाटबंधारे समिती ७) समाजकल्याण समिती ८) जवाहर रोजगार समिती ९) कचऱ्यांची फेर आकारणी समिती १०) बाजार समिती ११) पाणीपुरवठा समिती १२) ग्राम संरक्षण समिती १३) पशुसंवर्धन समिती १४) महिला व बालकल्याण समिती १५) भुजल सर्व्हीं समिती १६) संयुक्त समिती

प्रत्येक समितीत सामान्यतः ग्रामपंचायतीचे तीन ते पाच सदस्य निवडले जातात. कामाच्या स्वरूपानुसार समितीकडे एक किंवा दोन विषय दिले जातात. प्रत्येक ग्रामपंचायत आपल्या गरजेनुसार समितीची निवड करीत असते. ग्रामपंचायतीच्या समित्या म्हणजे केंद्र सरकार किंवा राज्य सरकारचे मिनी मंत्रिमंडळ म्हणावे लागेल.

## ग्रामसभा

**प्रस्ताविक**

पंचायतराज व्यवस्थेत ग्रामसभेला महत्त्वपूर्ण स्थान आहे. मेहता समितीने जी त्रिस्तरीय पंचायतराज व्यवस्था सांगितलेली आहे त्यामध्ये ग्रामसभेची कोणतीही तरतूद सुचवलेली नाही. परंतु भारतातील ज्या घटक राज्यांनी पंचायतराज व्यवस्था स्वीकारलेली आहे त्यांनी 'ग्रामसभा' या संस्थेला प्राधान्य दिलेले आहे. अर्थात, सर्व राज्यातील ग्रामसभेची रचना भिन्न स्वरूपाची असलेली दिसते. महाराष्ट्रात मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ च्या कलम ६ मध्ये ग्रामसभेची तरतूद करण्यात आलेली आहे. त्यानुसार ग्रामपंचायत क्षेत्रातील सर्व प्रौढ नागरिकांना ग्रामसभेत समाविष्ट केलेले आहे. १९९३ साली ७३ वी घटना दुरुस्ती होऊन भारतीय राज्यघटनेत पंचायतीराज सुधारणा हा नववा भाग समाविष्ट केलेला आहे. या भागातील कलम २४३ (अ) नुसार प्रत्येक गावासाठी एक ग्रामसभा असेल आणि ही ग्रामसभा गाव पातळीवर अधिकाराचा वापर करून कार्य पार पाडील असा स्पष्ट उल्लेख केलेला आढळतो.

**ग्रामसभेची रचना**

ग्रामपंचायतच्या कार्यक्षेत्रातील सर्व १८ वर्षावरील नागरिक मतदार हे ग्रामसभेचे घटक असतात. त्यांच्याकडून ग्रामपंचायतच्या सदस्यांची निवड होते त्यामुळे ग्रामसभा म्हणजे गावातील सर्व मतदारांची सर्वसाधारण सभा आणि ग्रामपंचायत म्हणजे ग्रामसभेची कार्यकारी समिती होय. एकंदरीत त लोकसभेतील किंवा विधानसभेतील अधिवेशने ज्या पद्धतीने होतात आणि या अधिवेशनामध्ये मंत्रिमंडळ सदस्यांच्या प्रश्नांना उत्तर देऊन केलेल्या कार्याचा लेखाजोखा सभागृहापुढे मांडतात त्याचप्रमाणे ग्रामसभेचे स्वरूप आहे असे म्हणावे लागेल. ग्रामसभेच्या माध्यमाद्वारे गावातील सर्व नागरिक गावच्या विकास कार्यात सहभागी होऊ शकतात. पंचायतराज व्यवस्थेतील समता प्रस्थापित करण्यासाठी सर्वांना न्याय वागणूक देण्यासाठी ग्रामसभा आवश्यक व उपयुक्त आहे. ग्रामसभेमुळे लोकांचा राजकीय सहभाग वाढवून सहभागी लोकशाही प्रस्थापित करता येते गावातील महिला तरुण आणि सर्व प्रौढ नागरिक यांना राजकारणात प्रत्यक्ष सहभागी होता येते त्यामुळे पंचायतराज अधिक मजबूत व स्थिर होते ७३ व्या घटनादुरुस्तीमुळे ग्रामसभेला मोठ्या प्रमाणात अधिकार प्राप्त झालेले आहेत. गावात समता न्याय प्रस्थापित करणारी ग्रामपंचायतीला नैतिक अधिष्ठान मिळवून देणारी एक जबाबदार कार्यक्षम संस्था म्हणून ग्रामसभेला अन्य साधारण महत्त्व प्राप्त झालेले आहे. त्यामुळे ग्रामसभा म्हणजे गावची लोकसभा असे ज्येष्ठ समाजवादी नेते स्वर्गीय एस. एम. जोशी यांनी म्हटलेले आहे.

**ग्रामसभेच्या बैठका**

प्रत्येक आर्थिक वर्षात (१ एप्रिल ते ३१ मार्च) ग्राम सभेच्या किमान तीन सभा (बैठका) घेतल्यास पाहिजेत अशी तरतूद करण्यात आली आहे. ग्रामसभेच्या इतर तीन सभा १५ ऑगस्ट (स्वातंत्र्य दिनी), २ ऑक्टोबर (गांधी जयंती) व २६ जानेवारी (प्रजासत्ताक दिनी) घेतल्या जातात. ग्रामसभेची बैठक बोलवण्याची जबाबदारी सरपंच व त्यांच्या अनुपस्थित उपसरपंचावर असते. ग्रामसभेच्या बैठकीचे ठिकाण, नियम, वेळ, पद्धती इत्यादी विषय स्पष्ट उल्लेख करून सभेची नोटीस काढली जाते. सभेची नोटीस किमान सात दिवस अगोदर व जादा बैठकीची नोटीस किमान चार दिवस अगोदर काढली जाणे बंधनकारक आहे. योग्य कारणाशिवाय ग्रामसभेच्या बैठकीस सरपंच किंवा उपसरपंच अनुउपस्थित राहिल्यास सरपंच किंवा उपसरपंच यांना त्या पदावरून अपात्र ठरता येते. जिल्हा परिषदेची स्थायी समिती, पंचायत समिती आणि मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या सर्वसाधारण किंवा खास हुकुमाने अधिकार प्राप्त असलेल्या अधिकाऱ्याला ग्रामसभेच्या बैठकीत भाषण करण्याचा भाग घेण्याचा अधिकार आहे. परंतु त्याला कोणत्याही ठरावावर मतदान करण्याचा अधिकार नाही. गावच्या विकासाच्या दृष्टिकोनातून ग्रामसभेच्या बैठका योग्य वेळी आणि पूर्व सूचना देऊन घेतली जाणे गरजेचे आहे. तरच गावच्या कारभाराची माहिती व निर्णय ठरावांची माहिती नागरिकांना होईल. ग्रामसभेच्या गणपूर्ती (कोरम) ग्रामसभेच्या गणपूर्तीसाठी मतदारांच्या यादीत समाविष्ट असलेल्यापैकी १५ टक्के किंवा १०० मतदार यापैकी जी संख्या कमी असेल तितकी उपस्थिती आवश्यक मानली जाते. गणसंख्या पूर्तीच्या अभावी तहकूब झाल्यास ग्रामसभेस पुन्हा गणसंख्या पूर्तीची आवश्यकता नसते.

**ग्रामसभेच्या अध्यक्षाचे अधिकार व कामे**

१) ग्रामसभेच्या कामकाजाचे नियमन करणे. बैठकीस पुरेसे सदस्य उपस्थित नसतील तर अध्यक्षांनी गणपूर्ती अभावी बैठक तहकूब करणे.

२) मागील सभेचा वृत्तांत वाचून दाखवणे व त्यास ग्रामसभेची मंजुरी घेणे.

३) ग्रामपंचायतीच्या कार्याचा आढावा घेऊन सभासदांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देणे.

४) आयत्या वेळी सभेसमोर येणारे विषय चर्चेस घेणे किंवा ते नाकारणे.

५) सभासदांना बैठकीत बोलवण्यास परवानगी व वेळ ठरवून देणे.

६) आवश्यक वाटल्यास ग्रामसभेच्या बैठकीत ठरावावर मतदान घेणे. समान मते पडल्यास अध्यक्षाला निर्णय मत देण्याचा अधिकार आहे.

७) अध्यक्षांनी नाकारलेल्या सर्व सूचनावर ग्रामसभेच्या बैठकीत चर्चा करणे.

**ग्रामसभेची कर्तव्य**

मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ च्या कलम आठ मध्ये ग्रामसभेची कर्तव्य पुढील प्रमाणे स्पष्ट केलेली आहेत.

१) हिशोबांचे वार्षिक विवरणपत्रक ग्रामसभेपुढे ठेवणे. हिशोबांचे प्रतिवृत्त ग्रामसभेपुढे पहिल्या बैठकीत ठेवावे लागते.

२) मागील आर्थिक वर्षाचा प्रशासकीय अहवाल ग्रामसभेकडे ठेवावा लागतो.

३) चालू आर्थिक वर्षात करावयाची कामे आणि विकास योजना व कार्यक्रम ग्रामसभेत ठेवावे लागतात.

४) मागील वर्षाचे लेखा परीक्षणाचे टिपण व त्यावर पंचायतने दिलेले उत्तरे ग्रामसभेच्या पहिल्या बैठकीत मांडावी लागतात.

५) ग्रामसभेच्या बैठकीत झालेल्या कामाची नोंद नोंदबुकात करून ठेवली जाते.

६) राज्य शासनाने सर्व साधारण किंवा विशेष आदेशाद्वारे सांगितलेली कामे ग्रामसभेला पार पाडावी लागतात.

**ग्रामसभेचे मूल्यमापन**

पंचायतराजमध्ये ग्रामसभेला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झालेले आहे. ग्रामसभेच्या तरतुदीमुळे प्रत्यक्ष लोकशाहीचे प्रकटीकरण होते. ग्रामपंचायतीच्या कार्यक्षेत्रातील प्रौढ स्त्री-पुरुष नागरिक राज्यकारभारात प्रत्यक्ष सहभागी होत आहेत. त्यामुळे स्थानिक प्रश्न स्थानिक लोकांमार्फत सोडवले जातात  भारतात बहुतेक सर्व राज्याच्या पंचायती व्यवस्थेत ग्रामसभेला प्राधान्य दिलेले आहे. ७३ व्या घटनादुरुस्तीमुळे ग्रामसभांना वैधानिक अधिकार मिळाल्यामुळे त्याचे महत्त्व वाढलेले आहे. मुंबई ग्रामपंचायत सुधारणा अध्यादेश २००२ अन्वये ग्रामसभेला राज्य शासन किंवा केंद्रशासनाच्या व्यक्तिगत लाभधारक योजनेकरिता लाभार्थींची निवड करण्याचे अधिकार मिळाले आहेत. याशिवाय एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम, महिला व बालकल्याण

यांचा विकास कार्यक्रम, इंदिरा आवास योजनाअंतर्गत ग्रामसभेला लाभार्थी निवडीचे पूर्ण अधिकार दिले आहेत. अशा प्रकारे महाराष्ट्राच्या पंचायत राजव्यवस्थेत ग्रामसभेला या अधिकार प्राप्तीमुळे महत्त्व प्राप्त झालेले आहे. तरीपण ग्रामसभेला जनतेचे सहकार्य व प्रतिसाद पाहिजे तेवढ्या प्रमाणात मिळत नाही.

**सामान्यत: पुढील कारणामुळे ग्रामसभेचे कार्य प्रभावीपणे व परिणामकारक झालेले नाही.**

१) ग्रामीण भागातील सामान्य जनता राजकारणाविषयी उदासीन असते. अज्ञान, निरीक्षता यामुळे सामान्य जनतेला ग्रामसभा ग्रामपंचायत त्यांच्या कारभार याविषयी अज्ञान असते. त्यामुळे त्यांचा राजकीय सहभाग कमी राहतो.

२) गावातील राजकारणावर विशिष्ट श्रीमंत, धनदांडग्या लोकांचा प्रभाव अधिक असतो. राजकारणातील गट- तट असतात. सर्वसामान्य मतदार नागरिक ग्रामसभेसमोर आपली मते मांडत नाहीत.

३) शेतकरी, शेतमजूर नागरिक ग्रामसभेच्या बैठकींना उपस्थित राहू शकत नाहीत.

४) गावातील स्त्रिया ग्रामसभेला उपस्थित राहत नाहीत. स्त्रियांच्या अनुपस्थितीमुळे ग्रामसभेचे स्वरूप पुरुषप्रधान झालेले आहे.

५) ग्रामसभेच्या बैठकींना सरपंच, उपसरपंच अनुपस्थित राहतात. त्यांच्या या राजकीय उदासीनतेचा आणि निष्क्रियतेचा परिणाम ग्राम विकासावर होतो.

६) ग्रामपंचायत क्षेत्रातील नागरिक राजकीय दृष्ट्या जागरूक नसतात. काही ठिकाणी केवळ औपचारिक बैठक म्हणून ग्रामसभेच्या बैठकीकडे पाहिले जाते. तर काही ठिकाणी फक्त कागदोपत्री बैठका घेतल्या जातात पण प्रत्यक्षात बैठका होत नाही.

**ग्रामसभेस प्रभावी बनवण्याचे उपाय**

१३ व्या लोकसभेच्या २००२ च्या नागरी आणि ग्रामीण विकास बाबतच्या स्थायी समितीने ग्रामसभा अधिक कार्यक्रम व प्रभावी बनवण्यासाठी काही सूचना आणि उपाय सुचविलेले आहेत.

१) स्थायी समितीला असे आढलून आले की घटनात्मक दृष्ट्या ग्रामसभेचे अधिकार व कार्य राज्य विधिमंडळाच्या कक्षेत येतात त्या अनुषंगाने ग्रामसभेच्या अधिकारात वाढ करण्याच्या दृष्टिकोनातून महाराष्ट्र शासनाने २००३ साली आर्थिक गैरव्यवहाराला जबाबदार असलेली ग्रामपंचायत बरखास्त करण्याचे अधिकार ग्रामसभेला देण्याचा महत्त्वपूर्ण कायदा संमत केलेला आहे.

२) ग्रामसभेच्या बैठकींना सरपंच व उपसरपंच यांना उपस्थित राहणे कायद्याने बंधनकारक करावे. अशा प्रकारची वैधानिक तरतूद महाराष्ट्र शासनाने केली आहे.

३) स्थायी समितीला असे आढळून आले की गणसंख्यापूर्ती अभावी ग्रामसभेच्या बैठका होत नाहीत आणि जर त्या झाल्या तर सरपंच व उपसरपंच यांच्या मनमानी कारभाराला कारणीभूत ठरतात. यासाठी गणपूर्ती आवश्यक आहे. त्याशिवाय ग्रामसभेच्या बैठका घेण्यात येऊ नयेत. तेव्हा अशा परिस्थितीमध्ये ग्रामपंचायतीचा विकास निधी थांबवावा आणि ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेच्या बैठका व्यवस्थित

गणसंख्या पूर्ती ने झाल्या की त्यांना पुन्हा विकास निधी द्यावा तेव्हा ग्रामसभेच्या बैठकींना गणसंख्या पूर्तीची अट कायदेशीर बंधनकारक करणे आवश्यक आहे.

४) ग्रामसभेची बैठक घेण्यापूर्वी गावातील लोकांना सभेची नोटीस किमान सात दिवस अगोदर मिळावी. बैठकीची वेळ तारीख ठिकाण या गोष्टींचा स्पष्ट उल्लेख असणारी नोटीस ग्रामपंचायतच्या कार्यालयात तसेच गावातील महत्त्वाच्या ठिकाणी लावण्यात यावी जेणेकरून ती गावातील लोकांच्या नजरेस पडेल.

५) ग्रामसभेच्या बैठकींना स्त्रिया उपस्थित राहत नाहीत यासाठी महिला संघटना महिला मेळावे या द्वारे त्यांना जागृत करून ग्रामसभेच्या बैठकींना उपस्थित राहण्यास प्रवृत्त करावे.

६) गावातील सामाजिक व आर्थिक दृष्ट्या दुर्बल असणाऱ्या लोकांना ग्रामसभेच्या बैठकींना उपस्थित राहण्यासाठी चर्चेत सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन दिली पाहिजे ग्रामसभेच्या बैठकीपूर्वी करमणुकीचे कार्यक्रम मनोजरंजनाचे कार्यक्रम ठेवावेत म्हणजे लोक आपोआपच ग्रामसभेच्या बैठकीस येऊ शकतील.

थोडक्यात ग्रामपंचायत म्हणजे लोकशाहीच्या प्राथमिक शाळा आहेत. या दृष्टिकोनातून ग्रामसभेकडे पाहणे आवश्यक आहे. महाराष्ट्र शासनाने ग्रामसभेला विशेष अधिकार दिल्यामुळे पंचायतराज व्यवस्था अधिक बळकट होत आहे. ७३ व्या घटनादुरुस्तीने ग्रामसभांना वैधानिक अधिकार मिळाले त्यामुळे पंचायतराज  व्यवस्थेत ग्रामसभांना विशेष महत्त्व प्राप्त झालेले आहे. मुंबई ग्रामपंचायत सुधारणा अध्यादेश, २००२ अन्वये ग्रामसभेला राज्यशासन किंवा केंद्राच्या व्यक्तिगत लाभधारक योजने करता लाभार्थी निवड करण्याचे कायदेशीर अधिकार मिळाले आहेत. या अधिकाराचा वापर ग्रामपंचायतचा कारभार स्वच्छ पारदर्शक आणि लोकहिताचा होण्यासाठी झाला पाहिजे. भारतीय स्वातंत्र्य चळवळ सक्षम होण्यासाठी महात्मा गांधीजींनी ग्रामीण भागातील सर्व स्तरातील लोकांना आपल्या बरोबर घेउन स्वातंत्र्यसंग्राम यशस्वी केला. पंचायतराज पद्धती यशस्वी करण्यासाठी आणि गांधीजींचे ग्रामस्वराज्याचे स्वप्न साकार करण्यासाठी ग्रामीण भागात ग्रामसभा अधिक सक्षम होणे नितांत गरजेचे आहे. वास्तविक ग्रामपंचायत म्हणजे लोकशाहीच्या शाळा आहेत या शाळांमध्ये कोणते शिक्षण मिळते यावर देशातील लोकशाहीची यशस्विता अवलंबून असते. या सर्व बाबींचा विचार करता ग्रामरसभा निकोप आणि चांगल्या वातावरणामध्ये गाव पातळीवर होणे आवश्यक आहे. यातच भारतीय लोकशाहीचे यश अवलंबून आहे.

## ब) पंचायत समिती

### प्रास्ताविक

पंचायतराज व्यवस्थेतील पंचायत समिती हा मधला स्तर आहे. या स्तराला इतर राज्यात विविध नावे आहेत. त्यापैकी पश्चिम बंगालमधील परिषद आचलिक परिषद, गुजरात मध्ये तालुका परिषद, मध्यप्रदेशमध्ये जनपद पंचायत, तामिळनाडूत पंचायत संघ परिषद अशी नावे आहेत. नावाप्रमाणे रचना ही भिन्नभिन्न आहेत अशा या रचनेत राष्ट्रीय स्तरावर सर्वसाधारणपणे पदसिद्ध आणि सहयोगी सदस्य असतात. पदसिद्ध सदस्यात पंचायत समितीच्या क्षेत्रातील ग्रामपंचायतचे सरपंच जिल्हा परिषदेचे त्या क्षेत्रातील निर्वाचित सदस्य.

बलवंतराव मेहता समितीच्या शिफारशीप्रमाणे स्थानिक शासन ही उच्च स्तर जिल्हा परिषदेकडे राहील आणि निम्नस्तरीय ग्रामपंचायत ही गावाकडे राहिली या दोघांना जोडणारा स्तर म्हणजे पंचायत समिती असेल. त्यानुसार पंचायत समिती ही तालुकास्तरावर स्वशासन संस्था आहे. बलवंतराव मेहता समितीच्या दृष्टीने हा दुवा जोडणारा स्तर पंचायत समिती फार महत्त्वाचा आहे कारण त्याद्वारे नियोजन व अंमलबजावणी करणारी विकासाशी संबंधित ही संस्था होय. महाराष्ट्रात जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ च्या ५६ व्या कलमानुसार पंचायत समिती स्थापना करण्यात आलेली आहे. त्यानुसार प्रत्येक गटासाठी (तालुक्यासाठी) एक पंचायत समिती असेल. पंचायत समिती ही ग्रामीण भागाच्या विकासासाठी स्थापन केलेली संस्था असते. या समितीच्या कार्यकक्षेत नागरी संस्थांचा (नगरपालिकेचा) समावेश केला जात नाही.

**पंचायत समितीची रचना**

पंचायत समिती सदस्यांचे विकास गटातील लोकसंख्येच्या प्रमाणात निश्चित केली जाते. पंचायत समितीच्या विकास गटात जिल्हा परिषद जेवढे मतदारसंघ निर्वाचन गण असतात त्याच्या दुप्पट मतदारसंघ असतात. जिल्हा परिषदेचे एका मतदारसंघाचे निर्वाचक गण पंचायत समिती दोन संघ निर्माण केले जातात. पंचायत समितीचे सदस्यांची निवड प्रौढ व गुप्त मतदान पद्धतीने होते. वयाची १८ वर्षे पूर्ण असणाऱ्या प्रत्येक स्त्री-पुरुषांना मतदानाचा अधिकार असतो. मतदानाचे नाव निर्वाचक मतदार संघाच्या यादीत असावे लागते.

**पंचायत समिती मधील राखीव (आरक्षित जागा)**

पंचायत समितीच्या राखीव जागांची तरतूद पुढील प्रमाणे केली आहे.

अ) अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांना त्यांच्या त्या क्षेत्रातील लोकसंख्येच्या प्रमाणात पंचायत समितीवर जागा आरक्षित केल्या जातात. त्या जागांपैकी १/३ तीन जागा त्याच प्रवर्गातील महिलांसाठी राखीव ठेवल्या जातात.

ब) नागरिकांच्या मागास वर्गातील प्रवर्गासाठी पंचायत समितीचे एकूण जागापैकी २७ % जागा राखीव ठेवल्या जातात त्याच वर्गातील स्त्रियांसाठी १/३ जागा राखीव असतात.

क) २०११ पासून पंचायत समितीमधील एकूण सर्वसाधारण जागापैकी ५० टक्के जागा स्त्रियांसाठी राखीव ठेवल्या जातात. हे राखीव किंवा आरक्षित जागांचे प्रमाण पंचायत समितीमध्ये स्त्रियांसाठी आरक्षित करण्यात आलेल्या जागा पंचायत समितीच्या विविध मतदारसंघांना आळीपाळीने नेमून देण्यात येतात.

**पात्रता**

पंचायत समितीची निवडणूक लढवण्यासाठी उमेदवाराला पुढील पात्रता धारण करावी लागते.

१) ती व्यक्ती भारताचा नागरिक असली पाहिजे.

२) तिने वय २१ वर्षे पूर्ण केली असली पाहिजे.

३) विकास गटातील कोणत्याही मतदारसंघाच्या मतदार यादीत त्या व्यक्तीचे नाव असणे आवश्यक आहे.

४) ती व्यक्ती शासकीय स्थानिक स्वराज्य संस्था नोकरीत नसावी. तसेच ती व्यक्ती जिल्हा परिषदेचे किंवा पंचायतीच्या कराची थकबाकीदा नसावी.

५) फौजदारी गुन्ह्याबाबत त्या व्यक्तीला एक वर्षाची शिक्षा झाली असेल तर तिला पंचायत समिती निवडणूक लढवता येणार नाही.

**पंचायत समितीचा कार्यकाल**

पंचायत समितीचा कार्यकाल पाच वर्षात असतो. या कालावधीत पंचायत समितीच्या पहिल्या सभेच्या तारखेपासून सुरू होते पंचायत समितीचा कार्यकाल संपण्यापूर्वी पंचायत समिती बरखास्त होऊ शकते. पंचायत समिती बरखास्त केल्यानंतर कोणत्याही परीस्थीतीत सहा महिन्याच्या आत तिची निवडणूक राज्य शासनाला घ्यावीच लागते. तसेच पंचायत समितीचे सदस्य मुदत संपण्यापूर्वी आपल्या पदाचा राजीनामा सभापतींकडे देतात.

**पंचायत समितीचे विसर्जन**

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ च्या कलम २६९ प्रमाणे पंचायत समिती पुढील विशिष्ट कारणासाठी शासनाकडून बरखास्त होऊ शकते

अ) पंचायत समितीने आपला अधिकार मर्यादेचे उल्लंघन केल्यास

ब) १९६१ च्या कायद्यानुसार घालून दिलेल्या कर्तव्याची अंमलबजावणी केली नसेल व राज्यशासनाने दिलेल्या आदेशाचे पालन न केल्यास पंचायत समिती विसर्जित होऊ शकते.

**पंचायत समितीचे पदाधिकारी**

**सभापती व उपसभापती :**

महाराष्ट्र जिल्हा परिषद पंचायत समिती अधिनियम १९६१ च्या कलम ६४ प्रमाणे पंचायत समिती आपल्या सदस्यातून एका सदस्याचे सभापती व आणखी एका सदस्याची उपसभापती म्हणून निवड करीत असते ही निवड पंचायत समितीच्या पहिल्या बैठकीत होते. जिल्हाधिकारी नियुक्त केलेल्या अधिकारी हा निवड समितीचा अध्यक्ष असतो. निर्वाचन अधिकारी या नात्याने त्यास निर्णायक मत देण्याचा अधिकार असतो.

**पंचायत समितीच्या सभापतीचे आरक्षण**

१) राज्यातील अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांची लोकसंख्या विचारात घेऊन त्याच्यासाठी पंचायत समितीच्या सभापतीचीपदी आरक्षण ठेवण्यात येतात. त्यापैकी १/३ पदे स्त्रियांसाठी राखीव ठेवली जातात.

२) राज्यातील पंचायत समितीची एकूण सभासदांच्या पदापेक्षा २७% ही नागरिकांच्या मागास प्रवर्गातील व्यक्तीना राखून ठेवली जातात त्यापैकी १/३ पदे स्त्रियांसाठी राखीव ठेवली जातात.

३) राज्यातील पंचायत समितीमधील सभापती पदाच्या एकूण लोकसंख्येच्या १/२ पदे स्त्रियांसाठी राखीव ठेवली जातात.

सभापतीपदाचे आरक्षण राज्य शासनामार्फत ठाकली जातात. राज्यात पंचायत समिती सभापतींची आरक्षित ठेवलेली पदे राज्यातील वेगवेगळ्या पंचायत समित्यांना आळीपाळीने नेमून देण्यात येतात. उपसभापतीच्या पदासाठी आरक्षण नसते. त्याला सुद्धा सभापतीप्रमाणे एकापेक्षा जास्त सहकारी संस्थांचे सभापतीपद स्वीकारता येणार नाही.

**सभापती उपसभापती यांचा कार्यकाल व राजीनामा**

पंचायत समितीचा सभापती व उपसभापती याचा कार्यकाल सन २००० सालापासून अडीच वर्षाचा करण्यात आलेला आहे. मुदतीपूर्वी त्यांना राजीनामा देता येतो. सभापती आपल्या पदाचा राजीनामा जिल्हा परिषदेच्या अध्यक्षाकडे तर उपसभापती आपल्याबद्दल राजीनामा पंचायत समितीच्या सभापती देतो.

**अविश्वासाचा ठराव**

पंचायत समितीचे सभापती उपसभापती त्यांच्याविरुद्ध अविश्वासाचा ठराव पास झाला तर त्यांना त्याच्या पदावरून कमी करता येते. त्यासाठी पंचायत समितीची विशेष सभा बोलवण्यात येते पंचायत समितीच्या १/३ सदस्यांनी सभापती किंवा उपसभापती यांच्याविरुद्ध अविश्वासाचा ठराव मांडण्यासाठी विशेष सभा बोलवावी

अशी मागणी केल्यास जिल्हाधिकारी मागणी पत्रक मिळाल्यापासून सात दिवसाच्या आत पंचायत समितीची विशेष सभा बोलवतो आणि तो सभेची नोटीस काढण्यापासून ३० दिवसाच्या आत तशी विशेष सभा घेण्याची व्यवस्था करतो. त्यानुसार सभापतीवरती अविश्वास ठराव आणता येऊ शकतो. २/३ बहुमताने अविश्वासाचा ठराव मंजूर तर सभापती आपल्या पदाचा राजीनामा देतो. अविश्वासाचा ठराव विशेष सभेत मांडला गेला नाही किंवा तो ठराव फेटाळला गेला तर विशेष सभेच्या तारखेपासून पुढे एक वर्ष अविश्वास ठराव पुन्हा पंचायत समिती पुढे मांडता येत नाही.

**सभापती उपसभापती यांची पदच्युती**

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ नुसार कलम ७३ मध्ये सभापती किंवा उपसभापती यांना पुढील कारणास्तव त्याच्या पदावरून कमी करता येते तशी तरतूद केली आहे.

१) सभापती किंवा उपसभापती यांनी आपली कर्तव्य पार पाडली नाहीत व गैरवर्तुणूक केली तर

२) पंचायत समितीचा सभापती किंवा उपसभापती पंचायत समितीच्या पूर्वपरवानगीशिवाय तीस दिवसापेक्षा अधिक काळ गैरहजर राहिल्यास पंचायत समितीच्या सभापतीचे किंवा उपसभापतीचे पद कोणत्याही कारणाने रिक्त झाल्यास शक्य तितक्या लवकर नव्या सभापती निवड केली जाते.

**सभापती व उपसभापती यांचे मानधन**

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ च्या कलम ७० नुसार सभापती व उपसभापती यांना मानधन व भत्ते दिले जातात. १९९४ च्या दुरूस्तीनुसार पंचायत समितीच्या सभापतीला दरमहा दहा हजार आणि उपसभापतीला दरमहा आठ हजार मानधन दिले जातात. तसेच त्यांना मोफत निवासस्थान व घरभाडे मिळते.

**पंचायत समितीच्या सभापतीचे अधिकार व कार्ये**

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ च्या कलम ७६ मध्ये पंचायत समितीच्या सभापतीचे अधिकार व कार्या याविषयी तरतूद केलेली आहे. सभापतीला पुढील अधिकार देण्यात आले आहेत.

१) पंचायत समितीच्या सभा बोलविणे त्या सभांचे अध्यक्षस्थान स्वीकारणे व कामकाज पाहणे, चालवणे.

२) पंचायत समितीची कागदपत्रे व रेकॉर्डची तपासणी करणे.

३) पंचायत समितीच्या कार्यक्षेत्रात जिल्हा परिषदचेच्या नियंत्रनाखाली राज्यशासनाचे अधिकार व कार्य करीत असणाऱ्या प्रशासन देखरेख नियंत्रण ठेवणे.

४) अनुदानातून करावयाची कामे, योजना, त्यासंबंधी राज्य सरकारकडून मिळालेल्या अधिकाराचा वापर करणे

५) पंचायत समितीच्या कार्यक्षेत्रात काम करणाऱ्या सेवकवर्गाकडून माहिती,विवरणपत्रे, हिशेब व अहवाल मागविणे.

**उपसभापतीचे अधिकार**

महाराष्ट्र जिल्हापरिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ च्या ७७ व्या कलमात उपसभापतीचे अधिकार व कामे दिलेली आहेत ती पुढील प्रमाणे

१) सभापतीच्या अनुउपस्थित उपसभापती पंचायत समितीचे अध्यक्षपद स्वीकारणे.

२) पंचायत समितीचा सभापती आपल्या कडील काही अधिकारी उपसभापतीकडे सोपवितो.

३) सभापतीचे पद रिक्त असल्यास ते पद नवीन सभापती निवडीपर्यंत उपसभापती सांभाळतो.

४) पंचायत समितीच्या कार्यक्षेत्रातील जिल्हा परिषदेच्या नियंत्रणाखालील कार्य करणाऱ्या संस्था, गट आणि विकास योजनेच्या वर निरीक्षण ठेवणे, अहवाल तयार करणे अशी कामे उपसभापतीला करावी लागतात.

**गटविकास अधिकारी**

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ च्या कलम ९७ आणि ९८ मध्ये गट विकास अधिकारीची नियुक्ती आणि कार्य याविषयी तरतूद केलेली आहे. पंचायत समितीच्या कार्यकारी अधिकारी व सचिव या नात्याने गटविकास अधिकाऱ्याचे पद महत्त्वाचे व आवश्यक मानले जाते. त्याची नियुक्ती राज्यशासनाकडून लोकसेवा आयोगामार्फत केली जाते. लोकसंख्येच्या प्रमाणात गटविकास अधिकाऱ्याचा दर्जा ठरत असतो.

**गटविकास अधिकाऱ्याची कार्ये**

१) पंचायत समितीचा सचिव या नात्याने ग्रामसेवकांच्या सभा बोलाविणे, आयोजन करणे, कामकाजाची नोंद ठेवणे.

२) विस्तार अधिकाऱ्याच्या कार्यावर नियंत्रण ठेवणे.

३) पंचायत समितीच्या विविध ठरावाचे अंमलबजावणी करणे.

४) पंचायत समितीच्या नियंत्रणाखाली कार्य करणाऱ्या जि. प. वर्ग तीन व चार या सेवकांच्या रजा मंजूर करणे.

५) पंचायत समितीचा सचिव या नात्याने पंचायत समितीच्या सर्व बैठकींना उपस्थित राहणे पण बैठकीमध्ये मतदानाचा अधिकार असणार नाही.

६) तालुका कायदेविषयक मोफत सल्ला समितीचे सचिव म्हणून काम पाहणे.

७) ग्रामपंचायतच्या कार्यावर नियंत्रण ठेवणे, पंचायत समितीच्या कार्याचा अहवाल जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याकडे पाठवणे.

पंचायत समितीचा गटविकास अधिकारी हा राज्य शासनाचा प्रतिनिधी या नात्याने राज्य शासन आणि पंचायत समिती यामधील दुवा आहे. तो ग्रामविकास खात्याकडील अधिकारी म्हणून गटविकास अधिकारी या नात्याने पंचायत समितीचे कामकाज पाहतो. पंचायत समितीचे पदाधिकारी कर्मचारी आणि लोकप्रतिनिधी यांच्या सहकार्याने आणि परस्पर सामंजस्याने विकास योजना यशस्वी करण्याची महत्त्वपूर्ण जबाबदारी गटविकास अधिकारी पार पडत असतो. त्या दृष्टीने गट पातळीवर गटविकास अधिकाऱ्याची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण मानली जाते.

**पंचायत समितीची अधिकार व कार्ये**

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ च्या कलम १०१ व कलम १०८ मध्ये पंचायत समितीचे अधिकार व कामे यांची तरतूद केलेली आहे. कलम १०८ मध्ये पंचायत समितीचे अधिकार पुढील प्रमाणे देण्यात आलेली आहेत.

१) पंचायत समिती आपल्या कार्यक्षेत्रातील विकास योजनांचा आराखडा तयार करते.

२) स्थानिक साधनसंपत्तीचा जास्तीत जास्त उपयोग करून घेण्यासाठी गट अनुदानातून हाती घ्यावयाची कामे आणि विकास योजनेचा आराखडा तयार करणे.

३) अनुभवातून कोणत्याही कार्यास व विकास योजना मंजूर करून त्याची अंमलबजावणी करणे.

४) विकास गटातील जिल्हा परिषदेची कार्य आणि विकास योजना अंमलात आणणे.

५) पंचायत समिती आपल्या विकासगटात कोणत्या योजना व कामे उपयुक्त ठरतील याविषयी जिल्हा परिषदेकडे शिफारस करते.

६) सभापती, उपसभापती व अधिकाऱ्याकडे कायद्यानुसार जी कामे सोपविलेली नसतील याची कामे पार पाडणे.

७) सभापती, उपसभापती आणि अधिकारी यांनी घेतलेल्या निर्णयात सुधारणा, बदल करण्याचा अधिकार पंचायत समितीला आहे.

८) पंचायतीच्या कार्यक्षेत्रात अस्तित्वात असलेल्या करात, शुल्कात वाढ यासंबंधी जिल्हा परिषदेकडे प्रस्ताव पाठवणे.

९) गटविकास अधिकाऱ्याच्या कार्यावर देखील नियंत्रण ठेवणे,

१०) पंचायत समितीच्या सभांचा इतिवृत्तांत दर तीन महिन्यांनी जिल्हा परिषदेकडे पाठविणे.

कलम १०१ अन्वये पंचायत समितीच्या अधिकारी क्षेत्रात येणाऱ्या विषयांचा समावेश या अधिनियमांच्या दुसऱ्या अनुसूचित केलेला आहे. दुसऱ्या अनुसूचीतील विषय संबंधित कार्य करणे व विकास योजना राबवणे हे पंचायत समितीचे महत्त्वचे कर्तव्य मानले जाते. पंचायत समितीचे अधिकारातील विषयांचा तपशील पुढीलप्रमाणे सांगता येईल.

**१) कृषी :** खरीप व रब्बी पिकांच्या मोहिमा, सधन भातशेती, शेतीचा विकास व सुधारणा, आदर्शकृषीपद्धती व कृती यांचे प्रात्यक्षिक, आदर्श कृषीक्षेत्राची स्थापना, सुधारित प्रगती शेती अवजारांचा प्रचार, उत्पादन वाढ, गोदामे बांधणे व ती सुरक्षित ठेवणे, रासायनिक खते, शेती अवजारे, मिश्रे खते स्थानिक खते सुधारित बी बियाणे यांचा पुरवठा वितरण, पीक स्पर्धा इत्यादी विषय कृषी कार्यक्षेत्रात येतात.

**२) पशुसंवर्धन व दुग्धशाळा विकास :** गावातील पशुवैद्यकीय पेट्या, पशुवैद्यकीय मदत केंद्रीय, तालुका पशुधन-सुधारणा, वैरण विकास भूखंड, सुधारित पैदाशीच्या मेंढ्या व कोंबड्या यांचे वितरण, गुरांची प्रदर्शने, मेळावे, दूधशाळांचा विकास इत्यादी.

**३) गायराने व वने :** गावराने, गायराने कुरणे यांचा विकास करणे.

**४) समाजकल्याण :** मागासवर्गीय शेतकऱ्यांना अर्थसहाय्य करणे, विमुक्त जातींना चरखे देणे, कपडे पुरवणे, अस्पृश्यता निवडण्यासाठी हरिजन सप्ताह साजरा करणे, आंतरजातीय विवाहांना प्रोत्साहन देणे, मागासवर्गीय लोकांच्या कल्याणासाठी, महिला व बालकल्याण बालकांच्या विकास कार्यक्रम राबवणे, बालवाडी सुरू करणे, पिण्याच्या पाण्याच्या विहिरींची सोय करणे.

**५) शिक्षण :** प्राथमिक शाळांच्या इमारती बांधणी क्रीडांगणे व शैक्षणिक साधनसामग्री यांची व्यवस्था करणे. शैक्षणिक उद्दिष्ट साध्य करणे.

**६) वैद्यकीय, आयुर्वेद आणि सामाजिक सार्वजनिक आरोग्य :** आयुर्वेदिक औषधांच्या पेट्यांची व्यवस्था करणे. अनुदानित वैद्यकीय केंद्रीय व्यावसायिक व सहाय्यक केंद्र निर्माण करणे. ग्रामीण स्वच्छता ठेवणे सार्वजनिक आरोग्य विषयक सुविधा व व्यवस्थापन ठेवणे.

**७) इमारती व दळणवळण :** ग्रामीण रस्ते, त्यावरील पूल, नाले बांधणे, त्यांची दुरुस्ती व व्यवस्था ठेवणे, रस्त्याच्या दुतर्फ झाडे लावणे त्यांची निगा ठेवणे.

**८) प्रसिद्धी, सामूहिक विकास :** करमणुकीच्या कार्यक्रमाद्वारे प्रसिद्धी. सामूहिक विकास कार्यक्रम राबविणे स्थानिक विकास कार्यक्रम आयोजित करणे

**९) समाज शिक्षण :** प्रौढ साक्षरता केंद्रे, क्रीडांगणे, साधनसामग्री, ग्रंथालये वाचनालय यांची व्यवस्था व निर्मिती करणे. कल्याणकारी संघटना महिला संघटना शिशु संघटना स्थापन करून महिला व शिशुयांचे कल्याण साधने.

**१०) ग्रामीण गृहनिर्माण :** ग्रामीणगृहनिर्माण, नवीन गावठाणे वसविणे धर्मशाळा, चावड्या, सराई, सार्वजनिक परिसंस्था निर्माण करून त्याची व्यवस्था ठेवणे सार्वजनिक मैदानी अशा ठिकाणी वृक्षारोपण करणे.

१९९२ साली झालेल्या ७३ व्या घटनादुरुस्तीनुसार राज्यघटनेत अकरावी अनुसूची समाविष्ट केलेली असून पंचायतीच्या कामकाजाचे २९ विषय स्पष्ट केलेले आहेत. त्यापैकी ९ विषयासंदर्भात राज्य सरकारने पंचायतना अधिकार द्यावेत असे महाराष्ट्र राज्य प्रथम वित्त आयोगाने सुचवले होते त्यानुसार १९९९ पासून राज्यशासनाने

१) जमीन सुधारणा व जमीन एकत्रिकरण

२) मत्स्य उत्पादन

३) वन उत्पादन

४) लघुउद्योग, ग्रामउद्योग व कुटीरउद्योग

५) ग्रामीण उद्योगीकरण

६) व्यावसायिक व तांत्रिक शिक्षण

७) प्रौढ शिक्षण, अनौपचारिक शिक्षण

८) भूसंसारण

९) सार्वजनिक वितरण

अशा ९ विषयांबाबत पंचायतींना अधिकार देण्यास सुरुवात केली आहे.

**पंचायत समितीचे आर्थिक व्यवस्था व अंदाजपत्रक**

महाराष्ट्र शासन दुसऱ्या अनुसूचित नमूद केलेले विषय विचारात घेऊन विकास योजना पार पाडण्यासाठी पंचायत समितीस (विकास गटास) संबंधित जिल्हा परिषदेमार्फत प्रत्येक वर्ष अनुदान देत असते. जिल्ह्यातील जमीन महसुलावर बसलेला उपकारातून जी रक्कम मिळते त्यातून जिल्हा परिषद व पंचायत समिती यांना स्थानिक उपकर रूप अनुदान मिळत असते.

**अंदाजपत्रक**

प्रत्येक वर्षी पंचायत समितीला आपले जमाखर्चाचे अंदाजपत्रक राज्यशासनाने विहित केलेल्या तारखेपूर्वी तयार करून आणि मंजूर करून जिल्हा परिषदेकडे पाठवावे लागते. पंचायत समितीने अशा प्रकारे अंदाजपत्रक जिल्हा परिषदेकडे पाठवली नाही तर गट विकास अधिकारी तयार केलेल्या अंदाजपत्रक मंजूर साठी जिल्हा परिषदेत पाठवतो. जिल्हा परिषद दुरुस्ती करून किंवा आहे त्या स्थितीत अंदाजपत्रकास मंजुरी देते. पंचायत समितीचे अंदाजपत्रक हा जिल्हा परिषदेचे अर्थसंकल्पाचाच एक भाग समजला जातो. त्यामुळे त्यास अंतिम मंजूरी देण्याचा अधिकार जिल्हा परिषद आसतो. थोडक्यात, पंचायत समितीने सर्व आर्थिक अधिकार जिल्हा परिषदेकडे असलेले दिसतात.

**पंचायत समितीच्या समित्या (विकास गटातील समित्या)**

महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती अधिनियम १९६१ अन्वये पंचायत समिती गटातील विविध योजना व कामे पार पाडण्यासाठी विविध समित्या निर्माण केल्या जातात. लोकसंपर्कासाठी, लोकांना शासकीय कामे योजना समजावून घेण्यासाठी तसेच लोकांच्या गरजा, प्रश्न समजावून घेण्यासाठी त्यांच्या तक्रारी निवारण करण्यासाठी आणि शासकीय कार्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी विविध समित्या निर्माण केल्या जातात.

**१) सरपंचांची समिती :** कलम ७७ (अ) मध्ये सरपंचाच्या समितीची तरतूद केली आहे. या समितीत विकास गटातील एकूण १५ सरपंच किंवा विकास गटातील एकूण सरपंचाच्या १/५ यापैकी जी संख्या अधिक असेल तेवढे सरपंच या समितीचे सदस्य असतात. पंचायत समितीचा उपसभापती हा सरपंच समितीचा पदसिद्ध सभापती असतो. तर विस्तार अधिकारी पदसिद्ध सचिव असतो. ग्रामपंचायतच्या कारभार व्यवस्थित चालावा ग्रामपंचायतच्या समस्या व गरजा विचारात घेऊन त्यांना योग्य मार्गदर्शन घ्यावे ग्रामपंचायत समिती पंचायत समितीला योग्य मार्गदर्शन व सहकारी करीत असते.

**२) रोजगार हमी योजना समिती :** पंचायत समितीच्या तालुक्याचे आमदार असतात या समितीचे अध्यक्ष असतात. तसेच त्या तालुक्याचे तहसीलदार या समितीचे सचिव असतात. विकास गटातील कामाचा आणि विकास योजनांचा आढावा घेऊन त्यांची नियोजन करणे आणि जास्तीतजास्त लोकांना रोजगार मिळवून देणे, नवीन कामे मंजूर करून रोजगार उपलब्ध करून देणे अशी कार्य ही समिती करीत असते.

**३) जवाहर रोजगार योजना दक्षता समिती :** गटविकास अधिकारी या समितीचे पदसिद्ध अध्यक्ष असतात. तर विस्तार अधिकारी हे सचिव म्हणून काम करतात. तालुक्यामध्ये रोजगार योजनेची कामे चालू आहेत त्या कामांच्या ठिकाणी भेटी देऊन ही समिती त्यांचे हिशेब तपासते आणि तेथील लोकांना योजनेच्या संदर्भातील तक्रारी एकूण निवारण करते.

**४) समन्वय समिती किंवा सुसूत्रीकरण व पुनर्विलोकन समिती :** पंचायत समितीच्या कार्यक्षेत्रातील तालुक्याचे आमदार या समितीचे अध्यक्ष आणि तहसीलदार हे सचिव असतात. याशिवाय पंचायत समितीची सभापती, गट विकास अधिकारी आणि इतर सात सदस्य समितीचे सदस्य असतात. त्यामध्ये दोन स्त्रिया, एक मागासवर्गीय सदस्य असणे आवश्यक असते. तालुक्यातील विविध विकास योजना विशेषत; पिण्याच्या पाण्याच्या योजना, विंधन विहिरी खणणे अशा योजनेची सुस्थिती करून निर्णय घेणे घेण्याचे व शासनाकडे शिफारस करण्याची कार्य समिती करत असते. जिल्ह्यात सुत्रीकरण समिती टंचाईग्रस्त गावे ठरवितात व त्यासंबंधीचा अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठवला जातो.

**५) संजय गांधी स्वावलंबन आणि निराधार योजना समिती :** तालुक्याच्या आमदारांच्या शिफारशींनी या समितीचे अध्यक्षची व इतर सदस्यांची नियुक्ती राज्य शासनाकडून केली जाते. पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी या समितीच्या पदसिद्ध सदस्य आणि तहसीलदार या समितीचे सचिव असतो. निराधार लोकांना मदत देऊन त्यांना स्वावलंबी बनवण्याची कार्य या समितीद्वारे केले जाते.

**६) एकात्मिक ग्रामीण विकास लाभार्थींची समिती :** केंद्र शासनाच्या एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रमानुसार दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांना त्यांच्या विकासासाठी आर्थिक सहकार्य, अनुदान आणि कर्ज रूपाने मदत करणे ही या समितीचे प्रमुख उद्दिष्ट असते.

**७) पंचायत समितीची आमसभा :** जिल्ह्यातील प्रत्येक पंचायत समिती आपला कामाचा वार्षिक आढावा घेण्यासाठी आणि पुढील वर्षाच्या कामाचा आराखडा ठरविण्यासाठी दरवर्षी आमदारांच्या अध्यक्षतेखाली आमसभा घेते. गटविकास अधिकारी या समितीचे सचिव असतात. सचिव पंचायत समितीच्या सभापतीच्या सल्ल्याने आमसभा भरवितो. या आमसभेला पंचायत समितीच्या कार्यक्षेत्रातील सरपंच, ग्रामसेवक, सहकारी संस्थांचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, शिक्षक, प्राध्यापक, स्वयंसेवी संस्थांचे प्रमुख यांना बोलावले जाते. आमसभा पंचायत समितीच्या संपूर्ण वर्षाच्या कामाचा आढावा घेऊन या संदर्भात सूचना उपाय सुधारणा सुचविण्याचे कार्य करीत असते.

**८) अन्नधान्य वितरण दक्षता समिती :** या समितीचे अध्यक्ष त्या तालुक्याचे आमदार असतात. तालुक्यातील स्वस्त धान्य दुकानातील धान्याचे वितरण वाटप याबाबत नियंत्रण ठेवण्याची कार्य ही समिती करीत असते.

**९) तालुका क्रीडा समिती :** तालुक्यातील तहसीलदार या समितीचे अध्यक्ष पंचायत समितीचे सभापती, उपाध्यक्ष, गटविकास अधिकारी सचिव तसेच इतर सात ते नऊ सदस्य समितीमध्ये असतात. ग्रामीण भागात खेळाची आवड निर्माण घ्यावी म्हणून क्रीडा स्पर्धाचे आयोजन या समिती मार्फत केले जाते.

वरील विविध समित्यांशिवाय तालुका पातळीवर पुढील काही समित्या निर्माण केल्या जातात. या समित्यावर पंचायत समितीचे नियंत्रण असते.

अ) स्वयंरोजगार प्रशिक्षण केंद्र

ब) ग्रामीण प्राथमिक आरोग्य केंद्र सल्लागार समिती

क) कृषी उत्पन्न बाजार समिती

ड) महिला दक्षता आणि सुरक्षा समिती

इ) तालुका भ्रष्टाचार निर्मूलन समिती

फ) तालुका कायदेशीर मोफत सल्ला व सहाय्य विषयक समिती

अशा प्रकारे विविध प्रकारच्या समित्या, पंचायत समिती, गटविकास अधिकारी यांच्या मार्फत स्थानिक स्वराज्य संस्था मधील मधला स्तर आपली विकासात्मक भूमिका बजावत आसतो. या प्रकारे पंचायत समिती माहिती घेता येईल .

**(क) जिल्हा परिषद**

**प्रास्ताविक**

बलवंतराय मेहता समितीने लोकशाही विकेंद्रीकरणाची जी त्रिस्तरीय पंचायत राज्याची व्यवस्था सुचविली होती. त्यातील जिल्हा परिषद सर्वोच्च (शिखर) संस्था होय. भारतात जिल्हा परिषद विविध घटक राज्यात विविध नावाने संबोधली जाते. उत्तर प्रदेश, पंजाब, हरियाणा, राजस्थान, गुजरात, बिहार, ओरिसा, महाराष्ट्र या घटक राज्यत 'जिल्हापरिषद' तर तामिळनाडू, कर्नाटक राज्यात 'जिल्हा विकास परिषद' आसाममध्ये 'महकमा परिषद' या नावाने ओळखले जाते.

महाराष्ट्रात वसंतराव नाईक समिती शिफारशीवरून १९६१ साली 'महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम' संमत करण्यात आला. त्यानुसार १ मे १९६२ पासून मुंबईशिवाय महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांत जिल्हा परिषद स्थापन करण्यात आल्या. वसंतराव नाईक समितीने पंचायत राज व्यवस्थेतील जिल्हा परिषदेला महत्त्वाची कार्यकारी संस्था बनवण्याची शिफारस केली होती. महाराष्ट्र शासनाने ही शिफारस स्वीकारून जिल्हा परिषदेला पंचायतराज व्यवस्थेत महत्त्वपूर्ण स्थान दिलेले आहे.

**जिल्हा परिषदेची रचना**

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ च्या प्रकरण दोनमधील सहाव्या कलमात अशी तरतूद करण्यात आलेली आहे की, 'प्रत्येक जिल्ह्याकरता अध्यक्ष व परिषद यांची मिळून, एक जिल्हा परिषद स्थापन करण्यात येईल आणि या अधिनियमाद्वारे जिल्हा परिषदेकडे जे अधिकार व जी कार्य देण्यात येतील त्या सर्व अधिकाराचा वापर जिल्हा परिषदेने केला पाहिजे व ती सर्व कार्य जिल्हा परिषदेने पार पाडली

पाहिजेत. प्रत्येक जिल्हा परिषद ही एक निगम व निकाय असून त्या नावाने जिल्हा परिषदेला इतरावर व इतरांना जिल्हा परिषद दावा लावण्याचा अधिकार असतो.

**जिल्हा परिषदेची रचना:**

१९९३ साली ७३ वी घटनादुरुस्ती होऊन भारतीय राज्यघटनेच्या नवव्या भागात कलम २४३ मध्ये पंचायतराज व्यवस्थेबाबतच्या तरतुदी करण्यात आलेल्या आहेत. ७३ व्या घटनादुरुस्तीपूर्वी भारतीय राज्यघटनेत पंचायतराजला घटनात्मक स्थान नव्हते. स्थानिक स्वराज्य संस्था हा राज्य सूचीतील विषय असल्यामुळे घटक राज्यांनी आपल्या सोयीप्रमाणे पंचायत राज व्यवस्था निर्माण केल्या. १९९३ पूर्वी जिल्हा परिषदेची रचना पुढीलप्रमाणे होती.

१) जिल्हा परिषदेवर निवडून आलेले सर्व सदस्य

२) जिल्ह्यातील सर्व खासदार व आमदार

३) पंचायत समितीचे सभापती, सहकारी समित्यांचा एक प्रतिनिधी

४) अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीचे सदस्य

७३ व्या घटनादुरुस्तीनंतर जिल्हा परिषदेच्या वरील रचनेत बदल झाला. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९९४ नुसार महाराष्ट्र जिल्हा परिषदेवर सहयोगी सदस्य घेण्याची किंवा स्वीकृत सदस्य घेण्याची तरतूद रद्द केल्यामुळे आता फक्त प्रत्यक्ष निवडणुकीद्वारे निवडून आलेले सदस्य व संबंधित जिल्ह्यातील पंचायत समितीचे सभापती हे पदसिद्ध सभासद एवढीच सदस्य जिल्हा परिषदेमध्ये असतात.

**जिल्हा परिषदेचे सभासद संख्या**

राज्यशासनाकडून जिल्ह्याची निर्मिती होते. जिल्ह्याच्या हद्दीत फेरफार करण्याचा अधिकार राज्य शासनाला असतो. एखाद्या जिल्ह्यात कोणते क्षेत्र समाविष्ट करता येईल किंवा कोणते क्षेत्र वगळता येईल किंवा दोन जिल्ह्यांचे एका जिल्ह्यात एकत्रिकरण किंवा एका जिल्ह्यातून जिल्ह्यात विभक्तीकरण करता येईल यासंबंधीचे अधिकार राज्य शासनाने देण्यात आलेले आहेत.

अ) महाराष्ट्रत एका जिल्हा परिषदेत राज्यनिर्वाचना आयोग ठेवून देईल त्यानुसार कमीत कमी ५० व जास्तीत जास्त ७५ निर्वाचन सदस्य असतात. उदा. पुणे, नागपूर जिल्हा परिषद प्रत्येकी ७५ व गडचिरोली, भंडारा, चंद्रपूर जिल्ह्यात प्रत्येकी ५० निर्वाचित सदस्य आहेत.

ब) जिल्ह्यातील सर्व पंचायत समितीचे सभापती जिल्हा परिषदचे पदसिद्ध सदस्य असतील.

क) उपमुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद सचिव असतो.

**जिल्हा परिषदेतील आरक्षण (राखीव जागा)**

जिल्हा परिषदेतील निवडणुकीद्वारे भरावयाच्या जागापैकी काही जागा विशिष्ट विभागासाठी राखीव ठेवल्या जातात. राखीवजागांचे प्रमाण पुढीलप्रमाणे असते.

१) अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीसाठी राखीव जागा जिल्हा परिषदेच्या क्षेत्रतील अनुसूची जाती व अनुसुचित जमाती यांच्या लोकसंख्येच्या प्रमाण किती असेल त्या प्रमाणात त्या वर्गासाठी जिल्हा परिषदेवर त्याच्या जागा राखीव ठेवण्यात येतात व १/३ या जागा याच वर्गातील स्त्रियांसाठी राखीव ठेवल्या जातात.

२) नागरिकांच्या मागास प्रवर्गासाठी राखीव जागा जिल्हा परिषदेच्या क्षेत्रतील एकूण जागेच्या २७ टक्के जागा या नागरिकांच्या मागास प्रवर्गासाठी राखीव असून त्यापैकीच १/३ जागा याच वर्गातील स्त्रियांसाठी राखीव ठेवल्या जातात.

३) महिलांसाठी राखीव जागा एकूण जिल्हा परिषदेच्या क्षेत्रतील संख्येच्या किंवा एकूण जागेच्या ५०% जागा महिला सदस्यांना आरक्षित केल्या जातात.

**पात्रता**

जिल्हा परिषदेच्या निवडणूकीसाठी उमेदवाराच्या ठिकाणी पुढील पात्रता आवश्यक मानली जाते.

१) ती व्यक्ती भारतीय नागरिक असावी.

२) त्या व्यक्तीचे व २१ वर्षे पूर्ण झालेले असावे.

३) जिल्ह्यातील कोणत्याही जिल्हापरिषदेच्या मतदारसंघाच्या मतदार यादी त्या व्यक्तीचे नाव असावे.

४) राज्य विधिमंडळाच्या निवडणुकीत त्यावेळी अंमलात आलेल्या कोणत्याही कायद्याद्वारे ती व्यक्ति अपात्र ठरविण्यात आलेली नसावी.

५) ती व्यक्ती पंचायतीच्या किंवा जिल्हा परिषदेच्या कराची थकबाकीदार नसावी.

६) त्या व्यक्तीने परकीय नागरिकत्व स्वीकारलेली नसावे.

७) जिल्हा परिषद निवडणूक लढवणे व्यक्तीला दोन पेक्षा जास्त आपत्य नसावीत.

**जिल्हा परिषदेचा कार्यकाल**

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ नुसार कलम १० मध्ये जिल्हा परिषदेच्या प्रत्यक्ष निवडणुकीनंतर जिल्हा परिषदेची पहिली सभा ज्या तारखेला होईपर्यंत त्या तारखेपासून जिल्हा आणि त्याच्या सदस्यांचा कार्यकाल पाच वर्षाचा असतो.

**जिल्हा परिषदेचे सदसत्व पुढील कारणामुळे संपुष्टात येऊ शकते**

अ) जिल्हा परिषदेचा सदस्य स्वमर्जीने आपल्या पदाच्या राजीनामा देऊ शकतो. तो स्वतःच्या सहीने जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष च्या नावाने पत्र लिहून राजीनामा देऊ शकतो.

ब) जिल्हा परिषदेच्या उपस्थित असलेल्या सभासदांपैकी २/३ सदस्यांनी त्या सदस्याला पदावरून काढून टाकण्याची शिफारस केली असेल तर.

क) जिल्हा परिषदेच्या सदस्य जिल्हा परिषदेच्या सभांना सतत सहा महिने गैरहजर राहिल्यास.

**जिल्हा परिषदेचे विसर्जन**

जिल्हा परिषदचा पाच वर्षाचा कार्यकाल संपण्यापूर्वी राज्यशासन जिल्हा परिषदेचे विसर्जन करू शकते. आशा विसर्जित केलेले जिल्हा परिषदेच्या निवडणुका सहा महिन्याच्या आत घेण्यात येतात. तेवढाच कालावधी नव्याने निवडणुका झालेल्या जिल्हा परिषदेला मिळतो.

**जिल्हा परिषदेचे पदाधिकारी अध्यक्ष : उपाध्यक्ष**

महाराष्ट्र जिल्हा परिषद पंचायत समिती अधिनियम १९६१ अन्वये कलम ४२ मध्ये अध्यक्ष उपाध्यक्षांची पदाची तरतूद पुढीलप्रमाणे केली आहे. 'प्रत्येक जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदी त्या परिषदेने आपल्या निवडून आलेल्या जिल्हा परिषद सदस्यातून निवडलेला एक अध्यक्ष असेल, तसेच जिल्हा परिषद आपल्या निवडून आलेल्या सदस्यांपैकी एकाची उपाध्यक्ष म्हणून निवड करील.'

जिल्हा परिषदेची सार्वत्रिक निवडणूक पार पाडल्यानंतर अध्यक्ष व उपाध्यक्ष यांची निवड करण्यासाठी जिल्हा परिषदेची बैठक बोलावली जाते. या बैठकीचा अध्यक्ष जिल्हाधिकारी किंवा त्यांनी नियुक्त केलेल्या उपजिल्हाधिकारी दर्जा असणारा अधिकारी स्वीकारतो असतो. अध्यक्ष उपाध्यक्षांच्या निवडीबाबत वाद निर्माण झाला तर तीस दिवसाच्या आत विभागीय आयुक्त कडे दाद मागता येते.

**जिल्हा परिषदेचे अध्यक्षपदासाठी आरक्षण**

महाराष्ट्रातील जिल्हापरिषद आरक्षण तरतूद पुढीलप्रमाणे केलेली आहे.

१) राज्यातील लोकसंख्या विचारात घेऊन त्या प्रमाणे जिल्हा परिषदेचे अध्यक्षयांची पदे अनुसूचित जाती व जमातीसाठी राखून ठेवली जातात. त्यापैकी १/३ जागा स्त्रियांसाठी राखीव ठेवल्या जातात.

२) नागरिकांच्या मागास प्रवर्गासाठी राखीव जागा जिल्हा परिषदेच्या क्षेत्रतील एकूण जागेच्या २७ टक्के जागा या नागरिकांच्या मागास प्रवर्गासाठी राखीव असून त्यापैकीच १/३ जागा याच वर्गातील स्त्रियांसाठी राखीव ठेवल्या जातात.

३) महिलांसाठी राखीव जागा एकूण जिल्हा परिषदेच्या क्षेत्रतील संख्येच्या किंवा एकूण जागेच्या ५०% जागा महिला सदस्यांना आरक्षित केल्या जातात.

**अध्यक्ष उपाध्यक्ष यांचा कार्यकाल व राजीनामा**

जिल्हा परिषद अध्यक्षाचा कार्यकाल पहिल्या बैठकीपासून अडीच वर्षाचा असतो. तो आपल्या पदाचा राजीनामा स्वेच्छेने देऊ शकतो. कार्यकाल समाप्तीनंतर लगेचच पुन्हा अध्यक्ष व उपाध्यक्ष यांची निवड केली जाते. राजीनामा: जिल्हा परिषद अध्यक्ष आपला पदाचा राजीनामा विविध नमुन्यात स्वतःच्या सहीने विभागीय आयुक्ताकडे देतो. उपाध्यक्ष व इतर सदस्य आपला राजीनामा जिल्हा परिषदेचे अध्यक्षकडे देतात अध्यक्षाचे पद काही कारणाने रिक्त झाल्यास शक्यतितक्या लवकर ते पद भरले जाते.

**अविश्वासाचा ठराव**

महाराष्ट्र जिल्हा परिषद पंचायत समिती अधिनियम, १९६१ अन्वये कलम ४९ मध्ये जिल्हा परिषद अध्यक्ष किंवा उपाध्यक्षांच्या विरुद्ध विश्वस्त ठराव आणून त्या ठरावा द्वारे त्यांना पदावरून दूर करण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. जिल्हा परिषदेतील १/३ निर्वाचित सदस्यांनी जिल्हा परिषदेची अध्यक्ष व उपाध्यक्ष यांच्या विरुद्ध अविश्वास ठरावाची मागणी जिल्हाधिकाऱ्याकडे केल्यास जिल्हाधिकारी मागणी पत्र मिळवल्यापासून सात दिवसाच्या आता जिल्हा परिषदेची विशेष सभा बोलवतो त्यानुसार जिल्हा परिषदेत निर्वाचित सदस्य संख्येच्या २/३ बहुमताने विश्वास ठराव मंजूर करून अध्यक्षाला पदावरून दूर करू शकतो.

**अध्यक्ष उपअध्यक्ष यांचे मानधन व सुविधा**

कलम ४७ अन्वये जिल्हा परिषदेच्या अध्यक्षला २०,००० हजार रुपये मानधन देण्यात येते. याशिवाय त्याला मोफत निवासस्थान व इतर सुविधा मिळतात. उपाध्यक्षला दर महा १०,००० हजार रुपये मानधन व इतर सुविधा व भत्ते मिळतात.

**जिल्हा परिषद अध्यक्षांचे अधिकार व कार्ये**

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ च्या कलम ५४ मध्ये जिल्हा परिषदेचे अध्यक्षांचे अधिकार व कार्य यांची तरतूद केलेली आहे. अध्यक्षाला पुढीलप्रमाणे अधिकार दिलेले आहेत.

१) जिल्हा परिषदेचा सभा बोलावणे, त्यांचे अध्यक्षस्थान स्वीकारणे व कामकाज चालवणे.

२) जिल्हा परिषदेचे अभिलेख (रेकॉर्ड्स) पाहणे, कागदपत्रे हाताळणे.

३) जिल्हा परिषदेच्या आर्थिक व प्रशासकीय कारभार नियंत्रण ठेवणे.

४) जिल्हा परिषद, स्थायी समिती, पंचायत समिती यांनी केलेले ठराव व घेतलेल्या निर्णय यांची अंमलबजावणी होते का नाही ते पाहणे.

५) लोकहिताच्या किंवा सुरक्षिततेच्या दृष्टीने महत्त्वाची निर्णय घेणे.

६) ज्या विकास योजनेची तरतूद जिल्हा परिषदेच्या अर्थसंकल्पात केलेली नाही, परंतु अशा योजना पार पाडण्यासाठी ते काम जिल्हा परिषदेकडे सुचवले असेल तर अध्यक्ष त्यासंबधी निर्देश देऊ शकतो.

७) जिल्हा परिषद अध्यक्ष हा जिल्हा परिषद स्थायी समितीचा पदसिद्ध अध्यक्ष असतो. त्यांमुळे तो स्थायी समितीचे कामकाज पाहतो.

८) जिल्हा परिषदेचा अध्यक्ष मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याचे गोपनीय अहवाल लिहून ते विभागीय आयुक्तांकडे पाठवण्याचे कार्य पाहतो.

**जिल्हा परिषद उपाध्यक्षाचे अधिकार व कार्ये**

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ च्या कलम ५५ मध्ये जिल्हा परिषदेच्या उपाध्यक्षाकडे पुढीलप्रमाणे अधिकार व कामे दिलेली आहेत.

१) जिल्हा परिषदेच्या अध्यक्षाच्या गैरहजरीत उपाध्यक्ष जिल्हा परिषदेच्या सभांचे अध्यक्षस्थान स्वीकारून कामकाज चालवतो.

२) जिल्हा परिषदेच्या अध्यक्षांचे काही अधिकार व कर्तव्य राज्यशासनाच्या नियमांच्या अधीनतेने उपाध्यक्षाचे कडे सोपवली जातात.

३) जिल्हा परिषद अध्यक्षाचे पद जेव्हा रिकामे होते त्यावेळी उपाध्यक्षला अध्यक्षांचे अधिकार व कर्तव्य पार पाडावी लागतात.

४) जिल्हा परिषदेचा उपाध्यक्ष हा काही विषय समितीच्या सभापती म्हणून काम पाहतो.

**मुख्य कार्यकारी अधिकारी**

महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती अधिनियम १९६१ च्या कलम ९४ व९५ मध्ये जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेमणूक, अधिकार व कार्य संबंधित तरतूद करण्यात आलेली आहे. जिल्हा परिषदेच्या प्रशासकीय प्रमुखास मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) असे म्हणतात. प्रत्येक जिल्हा परिषद एक मुख्य कार्यकारी अधिकारी व त्याच्या मदतीला एक किंवा दोन उपमुख्य कार्यकारी अधिकारी राज्य शासनामार्फत नियुक्ती केली जाते. जिल्हा परिषदेच्या विशेष सभेला मुख्य कार्यकारी अधिकारी मतदान करण्याचा अधिकार आहे.

**जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी असून त्यांना पुढील कार्य करावी लागतात.**

१) जिल्हा परिषदच्या १९६१ च्या अधिनियमानुसार ९५ व्या कलमात जे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यास प्रदान करण्यात आलेले आहेत त्या सर्व अधिकारांचा वापर तो करत असतो.

२) जिल्हा परिषदेचे अधिकार व कर्मवीर यांची कामे व कर्तव्य ठरवून देण्याची कार्य मुख्य कार्यकारी अधिकारी असतो.

३) जिल्हा परिषदेच्या कोणत्याही सभेस आणि पंचायत समितीच्या सभेस मुख्य कार्यकारी अधिकारी हजर राहू शकतो.

४) जिल्हा परिषदेचा एखादा अधिकारी रजेवर असल्यास किंवा त्याची बदली झाली असल्यास त्याच्या कामाची तो तात्पुरती व्यवस्था करतो.

५) मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषदेची सर्व कामे आणि विकास योजना यांची त्वरित अंमलबाजावणी करण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना करीत असतो.

६) मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा निधीतून पैसे काढून ते वितरित करतो.

७) जिल्हा परिषदेचे अंदाजपत्रक तयार करणे आणि प्रथम ते स्थायी समितीस व नंतर जिल्हा परिषदेस सादर करणे अशी जबाबदारी त्याच्यावर असते.

अशा प्रकारे जिल्हा परिषदेच्या प्रशासनात मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याची भूमिका महत्वपूर्ण असलेली दिसते. जिल्हा परिषदेनचे दैनंदिन कामकाज चालवण्याची जबाबदारी त्याच्यावर असते. जिल्हा परिषदेच्या ध्येयधोरणांची आणि योजनांची प्रत्यक्ष कारवाई करण्याची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याला पार पाडावी लागते. अलीकडेच महाराष्ट्र राज्य शासनाने जिल्हा परिषदेकडे अनेक अधिकार व योजना हस्तांतरित केल्यामुळे जिल्हा परिषदेंना मिनी मंत्रालयाचे स्वरूप आले असून जिल्हा परिषदेच्या प्रशासनावर राज्य शासनाचे नियंत्रण वाढू लागली आहे.

**जिल्हा परिषदेच्या समित्या**

महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समिती अधिनियम १९६१ कलम ७८ मध्ये ९३ मध्ये जिल्हा परिषदेची स्थायी समिती व इतर ९ विषय समित्या या संबंधित तरतूद करण्यात आलेली आहे. कलम ७८ मध्ये असे म्हटले आहे की प्रत्येक जिल्हा परिषदेला एक स्थायी समिती व इतर ९ विषय समित्या पुढील प्रमाणे असतील. १) वित्त समिती २) बांधकाम समिती ३) कृषी समिती ४) समाज कल्याण समिती ५) शिक्षण समिती ६) आरोग्य समिती ७) पशुसंवर्धन समिती ८) महिला व बाल कल्याण समिती ९) जलसंधारण आणि पाणीपुरवठा समिती

याशिवाय जिल्हा परिषद वेळोवेळी कामाच्या स्वरूपानुसार आवश्यक त्या समित्या नेमू शकते.

**समित्यांची रचना**

**१) स्थायी समिती :** जिल्हा परिषदेची अत्यंत महत्त्वाची समिती होय. स्थायी समितीत पुढील सदस्यांचा समावेश केला जातो. जिल्हा परिषद अध्यक्ष हा समितीचा पदसिद्ध अध्यक्ष असतो व जिल्हापरिषदेच्या सर्व विषय समितीचे सभापती सदस्य असतात आणि जिल्हा परिषदेत सदस्यांनी त्यांच्यापैकी निवडून दिलेल्या आठ सदस्य.

**२) वित्त समिती :** जिल्हा परिषदेवर सदस्यांनी त्यांच्यामधून निवडलेले आठ सदस्य वित्त समितीत असतात. मुख्य लेखा व वित्त अधिकारी हा समितीचा पदसिद्ध सचिव असतो.

**३) कृषी समिती :** जिल्हापरिषदेच्या निवडून आलेल्या सदस्यांतून दहा सदस्य असतात आणि कृषी अधिकारी पदसिद्ध सचिव

**४) बांधकाम समिती :** जिल्हापरिषदेच्या निवडून आलेल्या सदस्यांतून आठ सदस्य व मुख्य कार्यकारी अभियंता पदसिद्ध सचिव आसतो.

**५) समाजकल्याण समिती :** जिल्हापरिषदेच्या निवडून आलेल्या सदस्यांतून त्यापैकी पाच अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीचे सदस्य उरलेल्या सदस्य नागरिकांच्या मागास प्रवर्गातील या समितीत असतात यामध्ये नऊ पैकी दोन महिला सदस्य असणे आवश्यक आहे. तर जिल्हा परिषद समाज कल्याण अधिकारी हा या समितीचे पदसिद्ध सचिव असतो.

**६) शिक्षण समिती:** या समिती जिल्हा परिषदेचे  आठ निर्वाचित  सदस्य असतात. त्यांची निवड जिल्हा परिषदेचे सदस्य करतातल. जिल्हा शिक्षणाधिकारी हा या समितीचा पदसिद्ध सचिव असतो.

**७) सार्वजनिक आरोग्य व वैद्यकीय सेवा :** या समितीमध्ये आठ जिल्हा परिषद निर्वाचन सदस्य असतात. त्यांची निवड जिल्हा परिषदेचे सदस्याकडून होते. जिल्हा समाजकल्याण अधिकारी हाच या समितीचा सचिव असतो.

**८) महिला व बालकल्याण समिती :** जिल्हापरिषदेच्या निवडून आलेल्या सदस्यांतून या समितीत आठ सदस्य असतात. समितीचा अध्यक्ष महिला सदस्य असतो. या समितीत किमान सहा महिला सदस्य असाव्या लागतात.

**९) पशुसंवर्धन व दुग्धशाळा समिती :** जिल्हापरिषदेच्या निवडून आलेल्या सदस्यांतून या समितीत किमान आठ सदस्यची निवड करतात. जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी पदसिद्ध सचिव असतो.

**१०) जलसंधारण व पाणीपुरवठा समिती :** जिल्हापरिषदेच्या निवडून आलेल्या सदस्यांतून जलसंधारण व जलपुरवठा समितीमध्ये १२ सदस्य असतात. ग्रामीण पेय जल-पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता यासमितीवर काम पाहतो.

स्थायी समिती व इतर विषय समित्यांची निवडणूक एकल  संक्रमण मतदानाद्वारे प्रमाणशीर प्रतिनिधित्व पद्धतीनुसार निवड केली जाते. जिल्हा परिषदेच्या सदस्यस स्थियी समिती सदस्य धरून एकाच विषय समिती सदस्य स्वीकारता येते. विषय समिती सदस्य निवडणुकीवर काही वाद निर्माण झाल्यास असा विवाद निवडणूकच्या दहा दिवसाच्या आत  विभागीय आयुक्ताकडे मांडता येतो.

**समिती सदस्यांचा कार्यकाल**

कलम ८२ नुसार जिल्हा परिषदेच्या स्थायी समितीच्या आणि विशेष समिती सदस्य कालावधी त्या जिल्हा परिषदेचे सदस्यांच्या कालावधी बरोबरच समाप्त होणार असेल. विषय समितीच्या सदस्यांचा कार्यक्रम पाच वर्षाचा असतो. एकदा  सदस्य आपल्या पदाचा राजीनामा स्वमर्जीने देऊ शकतो.

**विषय समितीचे सभापती**

जिल्हा परिषदेच्या पहिल्या सभेनंतर १५ दिवसाच्या आत जिल्हाधिकारी, ज्या सदस्यांना जिल्हा परिषदेत मतदान करण्याचा अधिकार आहे अशा सदस्यांची सभा बोलवून त्या सभेत विषय समितीच्या सभापतीची निवड करतात. प्रत्येक जिल्हा परिषद विषय समितीचे पाच सभापती असतात.

**विषय समितीच्या सभापतीचा कार्यकाल**

विषय समितीच्या सभापतीपदाचा कालावधी अडीच वर्षाचा असतो. आपला पदाचा कार्यकाळ संपण्यापूर्वी सभापती आपल्या पदाचा राजीनामा जिल्हा परिषद अध्यक्ष देऊ शकतो.

**वेतन**

विषय समितीच्या सभापतीचे दरमहा बारा हजार रुपये मानधन दिले जाते. याशिवाय त्यांना इतर सोयी सवलती मिळतात.

**जिल्हा परिषदेचे अधिकार व कार्ये**

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ च्या कलम १०० (३ ते ११) मध्ये जिल्हा परिषद अधिकार व कार्य त्यांचे तरतूद केलेली आहे.

१) जिल्हा परिषदेस जिल्ह्यातील रहिवाशांचे आरोग्य, शिक्षण, सुरक्षितता, किंवा त्यांच्या सांस्कृतिक, सामाजिक व आर्थिक हिताच्या दृष्टीने योग्य असेल असे कोणते काम किंवा उपाय योजना त्या जिल्ह्यात अंमलात आणण्याची तरतूद करता येईल.

२) जिल्हा परिषद, स्थानिक साधनसंपत्तीचा जास्तीतजास्त उपयोग करून जिल्ह्यातील योजनांबद्द विकास साधण्याचा प्रयत्न करेल त्यानुसार योजना तयार करेल.

३) जिल्हा परिषदेच्या २/३ बहुमताने ठराव पास करून जिल्ह्यातील कोणत्याही जाहीर स्वागत समारंभ किंवा कार्यक्रम यासाठी तरतूद करीत.

४) अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागासलेले इतर वर्गांच्या विकासाचे राज्य शासनाच्या आदेशाप्रमाणे उपायोजना करणे व त्यांच्या अंमलबजावणीसाठी पुरेशी रक्कमेची तरतूद करणे.

५) राज्यशासनाने वेळोवेळी कायद्याद्वारे सोपिलेली कर्तव्य व कार्य पार पाडण्याची कार्य जिल्हा परिषद करत असते.

६) जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या कामावर सर्वसाधारण देखील नियंत्रण ठेवते.

७) जिल्हा परिषद स्थायी समितीच्या आणि विशेष समितीच्या कामकाजाचा अहवाल कोणतेही वेळी मागू शकते.

८) जिल्हा परिषदेच्या कार्यक्षेत्रातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना सभेस उपस्थित राहण्याबाबत जिल्हा परिषदेकडून आदेश दिले जातात.

९) जिल्हा परिषदेच्या वर्ग १ व वर्ग २ च्या अधिकाऱ्यांची दोन महिने कालावधीपर्यंतची रजा मंजूर करणे व त्यांच्या कामाचे दरवर्षी मूल्यमापण करते.

१०) राज्य शासनाने एखादा भाग टंचाइग्रस्त म्हणून घोषित केला तर त्या संबधी राज्य शासनाने दिलेली कार्य जिल्हा परिषदेला करावी लागतात.

अशा पद्धतीची कार्य राज्य शासनाच्या मार्गदर्शन खाली जिल्हा परिषद करीत असते.

**जिल्हा यादी कामाचे विषय**

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ च्या कलम १०० (अ) मध्ये पहिली अनुसूची मध्ये जे विविध विषय दिले आहेत. त्यासंबंधी असणारी कामे व विकास योजना अमलात आणणे, त्यासाठी जिल्हा निधीतून खर्चाची तरतूद करणे यासंबंधी 'जिल्हा यादी' तयार करण्यात आलेली आहे. या विषयाच्या अनुषंगाने जिल्हा परिषद विविध स्वरूपाचे कार्य करीत असते.

१) **कृषी :** पीक स्पर्धा, पीक संरक्षण, कृषी उत्पादन वाढविण्यासाठी कार्य इ.

२) **पशुसंवर्धन व दुग्ध शाळा विकास :** जनावरांच्या लशीकरणाची व्यवस्थ इ

३) **वने :** झाडे लावणे त्याचे संगोपन करणे इ

४) **समाज कल्याण :** मागास वर्गाचा शैक्षणिक विकास, अस्पुस्यता निवारण इ.

५) **शिक्षक प्राथमिक :** शाळा स्थापन करणे, पाठ्यक्रम, पाठ्यपुस्तके, शिष्यवृत्ती शिवाय प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाची व्यवस्थापन करणे.

६) **सार्वजनिक आरोग्य व वैद्यकीय सेवा :** प्राथमिक आरोग्य केंद्र, फिरती आरोग्य केंद्र, जिल्हा रुग्णालय

७) **इमारती व दळणवळण :** ग्रामीण रस्ते जिल्ह्यातील सर्व रस्ते पुले यांचे बांधकाम करणे.

८) **सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी :** ग्रामीण पाणीपुरवठा ग्रामीण जमिनी सारण जत्रा यात्रा आणि पाणीपुरवठा पिण्याच्या पाण्याची व्यवस्था ठेवणे.

९) **पाटबंधारे :** शेतीला पाणीपुरवठा करणाऱ्या लघुपाटबंधारे करणे.

१०) **प्रसिद्धी :** फिरती प्रसिद्धी वाहने, जिल्हा प्रदर्शने, करमणुकीचे कार्यक्रम व ग्रामीण ध्वनिक्षेपण यासंबंधी व्यवस्था ठेवणे.

११) **समूहिक विकास :** सामुहिक विकास कार्यक्रम राबविणे.

१२) **समाज शिक्षण :** प्रौढ साक्षरता केंद्रे, महिला बालकल्याण केंद्रे निर्माण करणे. क्रीडा, खेळ यासंबंधी व्यवस्था पाहणे.

१३) **ग्रामीण घरनिर्माण :** ग्रामीण भागातील घराच्या निर्मितीच्या योजना करणे.

१४) **संकीर्ण (इतर विषयी)** : ग्रामोद्योग, आदर्श गाव योजना, गावाचे आर्थिक कल्याण, सार्वजनिक आरोग्य, सुरक्षितता यासाठी बांधकाम उपाययोजना करणे. बाजार, धर्मशाला विश्रांतीग्रह, गावठाणे यांचे सुधारणा करणे सार्वजनिक मैदाने सुव्यवस्था ठेवणे. गरीब लोकांचे गृहनिर्मिती योजना आखणे, जंगली

श्वापदापासून लोकाचे संरक्षण करणे इत्यादी आणि इतर सर्व प्रकारे विविध विषयांच्या अनुषंगाने जिल्हा परिषदेच्या परिक्षेत्रात येणाऱ्या सर्व जिल्हा परिषदेच्या कार्यासाठी जिल्हा निधीतून पैशाची व्यवस्था केली जाते.

**जिल्हा परिषदेच्या उत्पन्नाची साधने**

प्रत्येक जिल्हा परिषदेला विकास कार्य पार पाडण्यासाठी स्थावर व जंगम अशी दोन प्रकारची मालमत्ता मिळवण्याचा आणि धारण करण्याचा अधिकार आहे. प्रत्येक जिल्हा निधी या नावाचा एक स्थानिक निधी असतो. या निधीत कोणकोणत्या रकमा जमा केल्या जातात. त्याबाबतची तरतूद जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ च्या कलम १३० मध्ये केलेली आहे.

पुढील रकमा जिल्हा निधीत भरण्यात येतात.

१) जनपद क्षेत्राच्या स्थानिक निधीत असणारी शिल्लक रक्कम.

२) सर्व प्रकारच्या कराच्या, उपकाराची रक्कम.

३) जिल्हा परिषदेने धारण केलेल्या कोणत्याही रोख्यावरील व्याज आणि त्याच्या विक्रीचे उत्पन्न.

४) खाजगी व्यक्तीने अंशदान म्हणून दिलेली रक्कम.

५) पंचायत समित्या, व्यक्ती आणि परिसंस्था यांना द्यावयाची सर्व अनुदान, कर्जे आणि अशदाने.

६) जिल्हा निधी शासकीय कोषागार किंवा शासकीय कोषागारचे कामकाज ज्या बँकेकडे सोपविले असेल किंवा राज्यशासनाने मान्यता दिलेल्या कोणत्याही सरकारी संस्थेत ठेवण्यात येते.

प्रत्येक जिल्हा परिषदेचे किंवा पंचायत समितीचे जमा व खर्च यांचे लेखे राज्यशासनाने ठरविलेल्या विहित नमुण्यात ठेवले जातात.

सामन्यात : जिल्हा परिषदेला कर आणि शासकीय अनुदान या दोन मार्गाने उत्पन्न मिळत असते.

**अ) कराधान :** महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ च्या कायद्यात कलम १४३ ते कलम १७९ मध्ये कराधन आणि करवसुलीबाबत तरतूद करण्यात आलेली आहे. जिल्हा परिषदेला विविध कराद्वारे उत्पन्न मिळते. पुढील प्रकारचे कर जिल्हा परिषद आकारू शकते.

१) जमीन महसुलीच्या प्रत्येक रुपयावर वीस पैसे उपकर बसविणे व तो गोळा करून जिल्हा निधीत जमा करणे.

२) पाणीपट्टीवर उपकर बसवणे व तो गोळा करून जिल्हा निधीत जमा करणे.

३) एखाद्या जमिनीतील खनिजे शासनाच्या मालकीची असतील तर शासनाला स्वामित्वधन देय असेल तर आशा जमनीवर उपकर बसविणे.

४) यात्रेकरूंवर कर बसवण्यात.

५) जमिनीवर व इमारती विशेष कर बसविणे.

६) कोणत्याही सार्वजनिक बाजारात विशेष कर बसविणे.

**ब) जिल्हा परिषदाना वित्तीय सहाय्य :**

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ च्या कायद्यात कलम नं १८० ते १८९ मध्ये जिल्हा परिषदेला मिळणाऱ्या वित्तीय साह्यासंबंधीची तरतूद करण्यात आलेली आहे. जिल्हा परिषदेला विविध विकास योजना व त्याअनुषंगाने करावयाची कार्य यासाठी पैसा लागतो. राज्यशासन अनुदानरूपाने जिल्हा परिषदेला आर्थिक सहाय्य देत असते.

**१) वन – महसूल अनुदान :** जिल्हा परिषदेच्या क्षेत्रातील वन महसुलाच्या उत्पादनावरील सात टक्के रक्कम राज्य शासन जिल्हा परिषदेला देते.

**२) सप्रयोजन अनुदान :** जिल्हा परिषदेच्या विषय सूचीतील विषयासंबंधीची कार्य, विकास योजना किंवा राज्यशासनाने जिल्हा परिषदेकडे सोपविलेली कार्य व योजना पार पाडण्यासाठी राज्यशासन सप्रयोजन अनुदान देते.

**३) आस्थापना अनुदान :** जिल्हा परिषदेच्या नोकरवर्गाचे वेतन भत्ते देण्यासाठी राज्य शासन जिल्हा परिषदेला आस्थापना अनुदान देते.

**४) स्थानिक उपकर अनुरूप अनुदान :** राज्यशासनाने जिल्हा परिषदेच्या कार्यकक्षेत किमान महसूलला पेक्षा अधिक दराने त्यावर उपकर बसविला असेल तर तो जादा महसूल गोळा होतो तो राज्य शासन जिल्हा परिषदला देते.

**५) प्रोत्साहनपर अनुदान :** एखादा जिल्हा परिषदेणे उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल तिला राज्यशासन प्रोत्साहनपर अनुदान देते.

**६) योजना अंतर्गत परियोजनांसाठी अनुदान :** जिल्ह्या यादीतील विषयासंबंधी कार्य आणि विकास योजना राज्याच्याविकास योजनात समाविष्ट केल्या असतील तर राज्यशासन संबधित जिल्हापरिषदे मार्फत अनुदान देते.

**७) गट अनुदाने :** प्रत्येक पंचायत समितीस विकासकामे व योजना पार पडण्यासाठी राज्यशासन संबंधित जिल्हा परिषदेमार्फत प्रत्येक वर्षी अनुदान देते.

अशा प्रकारे राज्यशासन जिल्हा परिषदेला मोठ्या प्रमाणावर अनुदानापोटी आर्थिक साहाय्य देत असते. तरी अनुदानाव्दारे मिळणारा पैसा कसा खर्च करावा हे ठरविण्याचे स्वतंत्र जिल्हा परिषदेला नसते. थोडक्यात, वित्तीय परावलंबनामुळे जिल्हा परिषदेला आपली कार्य पार पाडण्यासाठी राज्यशासनावर अवलंबून राहावे लागते. तेव्हा जिल्हा परिषद आपले स्थानिक उत्पन्न वाढवणे आवश्यक आहे. आशा प्रकारे त्रिस्तीय पंचायतराज व्यवस्था महाराष्ट्रात कार्य करीत आहे.

**ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थेचे अधिकार आणि कार्य**

स्थानिक शासन संस्था या सर्वात प्राथमिक स्तरावरील लोकशाही शासन संस्था आहेत. या संस्थांचा लोकांशी जवळचा संबंध येत असतो. आपल्या परिसराचा विकास करणे आणि लोकांना आवश्यक सेवा

पुरवणे हे त्यांचे महत्त्वाचे कार्य आसते. आपले दैनंदिन व्यवहार सांभाळून लोकांना स्थानिक शासन संस्थेच्या कारभारात सहजपणे सहभाग घेणे शक्य हाते. एक जबाबदार नागरिक घडवण्याचे प्रशिक्षण या संस्था देतात. नेतृत्वगुणाच्या विकासाची संधी स्थानिक शासन संस्थेमुळे मिळते. त्याचबरोबर नागरी गुणांची जोपासना परस्पर सहकार्य, शिस्त आणि सहिष्णुता यांची जोपासना स्थानिक शासन संस्थाच्या कामकाजातून निर्माण होते. ग्रामसभेच्या निमित्ताने गावाच्या विकासाचे काम करण्यासाठी लोक एकत्र येतात. परस्परांना सहकार्य करून नवीन मार्ग शोधतात. सहकार्यातून आपण आपला विकास साधू शकतो असा विश्वास लोकांमध्ये निर्माण होतो.सर्व स्थानिक स्वराज्य संस्था आर्थिक विकास, पायाभूत सुविधांचा विकास आणि सामाजिक न्यायाला चालना देण्याच्या उद्देशाने कार्य करत असतात. भारतातील स्थानिक शासन संस्थाची सर्वात महत्वाची कार्ये म्हणजे ग्रामीण भागात शिक्षणाविषयी जागरुकता पसरवणे, रस्ते व वाहतूक व्यवस्था, पायाभूत सुविधा निर्माण करणे. विविध सरकारी योजनांच्या योग्य अंमलबजावणीद्वारे कृषी विकासाला चालना देते. आरोग्य सुविधांचेवितरण करणे जेणेकरून लोकांचे आरोग्य चांगले राहील. शिवाय ग्रामीण भागातील लघुउद्योगांना चालना देणे. दुग्धव्यवसाय, पशुसंवर्धन आणि वनीकरण विकसित करणे ही देखील स्थानिक स्वराज्य संस्थांची कार्ये आहेत.

**भारतातील स्थानिक स्वराज्य संस्थांचे अधिकार**

७३ व्या घटनादुरुस्तीनुसार कलम २४३ (ग) मध्ये पंचायत राज्य संस्थांचे अधिकार जबाबदाऱ्या व कार्य स्पष्ट करण्यात आलेली आहेत. या तरतुदीनुसार राज्य विधिमंडळ कायदे करून पंचायत राज्यसंस्थांना आवश्यक ते अधिकार देईल. स्थानिक स्वराज्य संस्थांचे अधिकार केवळ परिभाषित केलेले नाहीत आणि ते राज्यांच्या आवश्यकतेनुसार असू शकतात. आर्थिक विकासानुसार पंचायती आणि नगरपालिकांना राज्य सरकारांकडून अधिकार दिले जातात. स्थानिक स्वराज्य संस्था स्थापनेमागील प्राथमिक उद्दिष्ट सरकारला सामाजिक आणि आर्थिक विकासाच्या नियोजनात मदत करणे हे होते. यांचे काही प्रमुख अधिकार खालीलप्रमाणे.

**१) सामाजिक अधिकार :** पंचायत राज क्षेत्रातील नागरिकांच्या विकासाच्या दृष्टीकोनातून विविध योजना तयार करणे आणि अशा योजनांची अंमलबजावणी करण्याचे अधिकार पंचायतराज संस्थांवर सोपविण्यात आले आहेत.

**२) आर्थिक अधिकार :** आर्थिक व सामाजिक विकास साधण्यासाठी पंचायत राज क्षेत्रातील या संस्थाना कर गोळा करण्याचे, करलावण्याचे आणि व्यवस्थापित करण्याचे अधिकृत अधिकार आहेत. याच बरोबर अन्य ग्रामीण स्थानिक संस्थानाही वरीलप्रमाणे अधिकार प्राप्त होतात.

**३) लेखा व लेखापरीक्षण करण्याचा अधिकार :** पंचायतराज संस्थाचे कलम २४३ (जे) नुसार पंचायतराज संस्थांचे हिशेब (लेखा) व हिशेबतपासणी (लेखापरीक्षण) करण्यात येईल. याचबरोबर पंचायतराज क्षेत्रातील सर्व संस्थाना या अधिकाराचा वापर करून लेखा व लेखापरीक्षण करण्याचा अधिकार प्राप्त होईल.

**४) निवडणूक विषयक अधिकार :** पंचायतराज व्यवस्थेमध्ये निवडणुकीच्या संदर्भात काही वाद निर्माण झाल्यास त्यामध्ये न्यायालयाचा हस्तक्षेप होणार नाही. या संबधी निर्णय घटनात्मक तरतुदीनुसार घेण्यात येईल.

**५) इतर अधिकार :** पंचायतराज व्यवस्थेच्या माध्यमातून लोकशाही विकेंद्रीकरण आणि सामूहिक विकास कार्यक्रम व सामूहिक विकासाच्या योजना राबवण्यासाठी जे आवश्यक आहे ते सर्व अधिकार पंचायतराजना देण्यात आलेले आहेत. ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास होण्यासाठीचे अधिकार पंचायतराज संस्थांना देण्यात आलेले आहेत, यामध्ये कृषी, आरोग्य, शिक्षण, सामाजिक, आर्थिक व राजकीय अधिकार पंचायतराज व्यवस्थेला प्राप्त होतात. तसेच आर्थिक विकास व सामाजिक न्याय यासंबंधी २९ विषयांची यादी संविधानाच्या ११ व्या अनुसूची मध्ये दिलेली आहे. त्यानुसार पंचायतराजना सर्व अधिकार प्राप्त होतात.

**स्थानिक स्वराज्य संस्थांची कार्ये**

१) आर्थिक विकास, सामाजिक न्याय आणि पायाभूत सुविधांच्या विकासाला चालना देणे हे स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्राथमिक उद्दिष्ट आहे.

२) वाहतूक, रस्ते, वीजवाहिन्या, शाळा, रुग्णालये इत्यादी मूलभूत पायाभूत सुविधा निर्माण करणे.

३) सामुदायिक मालमत्ता तयार करणे आणि त्यांची देखभाल करणे.

४) सिंचन आणि पाणी योजनांचे योग्य व्यवस्थापन, जमीन सुधारणे आणि मृदा संवर्धन करून शेतीच्या विकासाला चालना देणे.

५) शिक्षणाला चालना देण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या कार्यक्षेत्र प्राथमिक शिक्षण व्यवस्था निर्माण करणे. विद्यार्थ्यांच्या मनात शिक्षण विषयक जागरूकता निर्माण होण्यासाठी विविध उपक्रम राबविणे.

६) आरोग्य विषयक सुविधा वाढवणे आणि आरोग्याविषयी जागरूकता निर्माण होण्यासाठी विविध उपक्रम राबविणे.

७) गावातील लघुउद्योगांना चालना देणे.

८) सामाजिक वनीकरण, दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन आणि पशुसंवर्धन विकसित करणे.

९) ग्रामीण आणि शहरी भागांचा विकास करण्यासाठी राज्य सरकार ज्या विविध योजना निर्माण करते त्याची अंमलबजावणी करण्याची महत्वपूर्ण जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्थाची आसेल.

१०) स्थानिक स्वराज्य संस्थाच्या कक्षेतील नागरिकाच्या संरक्षणाच्या दृष्टीकोनातून जी कार्य पारपाडणे आवश्यक आहेत ती कार्य पार पडणे.

## १.३ सारांश

या घटकात आपण पंचायत राजपूर्वीची पार्श्वभूमी, ७३ वी घटना दुरुस्ती, जिल्हापरिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायत तसेच पंचायतराज व्यवस्थेचे अधिकार आणि कार्य यांची माहिती घेतली. त्याचा थोडक्यात सारांश पुढीलप्रमाणे आहे.

**१) पंचायतराज व्यवस्थेची पार्श्वभूमी :**

सामूहिक विकास कार्यक्रम

बलवंतराय मेहता समिती

वसंतराव नाईक समिती

प्राचार्य पी बी पाटील समिती

**२) ७३ व्या घटना दुरुस्ती : महत्त्वाच्या तरतुदी**

घटनात्मक दर्जा, त्रिस्तरीय व्यवस्था, ग्रामसभा, पंचायतीची रचना, आरक्षण व्यवस्था, सदस्यसाठी पात्रता, अपात्रता, अधिकार व कार्य, आर्थिक तरतूद, वित्त आयोग, राज्य लेखा व लेखा परीक्षण, राज्य निवडणूक आयोग.

७३ व्या घटनादुरुस्तीने पंचायतराज व्यवस्थेची प्रतिष्ठा वाढली. त्यांना घटनात्मक दर्जा मिळाल्याने विशेष अधिकार प्राप्त झाले. तसेच आरक्षण, नियमित निवडणुका या बाबीची तरतूद झाल्याने त्यांच्या कारभारात सुसूत्रता आली.

**ग्रामपंचायत**

पंचायत व्यवस्थेतील तिसरा महत्त्वाचा घटक.

कायद्याने व्यवस्था.

सभासद संख्या.

पात्रता आरक्षण इ. बाबतची तरतूद.

कार्य : विविध समित्या, ग्रामस्वच्छता, शासकीय योजनार्थ अंमलबजावणी इ.

ग्रामसेवकामार्फत प्रशासन चालवणे.

**पंचायत समिती**

पंचायतराज व्यवस्थेतील पंचायत समिती हा दुसरा महत्त्वाचा घटक.

जिल्हा परिषद व ग्रामपंचायत यांना जोडणारा दुवा.

सभात संख्या निश्चित.

पात्रता, आरक्षण इ. बाबत तरतूद

कार्य : विविध समित्याद्वारे, ग्रामपंचायतींना मार्गदर्शन.

गटविकास अधिकारी हा प्रशासकीय प्रमुख.

**जिल्हा परिषद**

पंचायतराज व्यवस्थेतील महत्त्वाचा घटक

कायदेने अधिष्ठात व्यवस्था

सभासद संख्या निश्चित : कमीत कमी ५०, जास्तीत जास्त ७५

पात्रता, आरक्षण इ बाबत तरतुदी, निश्चित कार्यकाल

कार्य : विविध समित्याद्वारे कार्य

विषय समित्या : कृषी, वित्त, बांधकाम, शिक्षण, समाज, कल्याण, आरोग्य, पशुसंवर्धन, महिला व बालविकास, जलसंधारण

शासनाचा जिल्हा परिषद जिल्हा स्तरावरील महत्त्वाचा घटक म्हणून कार्य अपेक्षित.

**पंचायतराज व्यवस्थेची अधिकार व कार्य**

अधिकार : सामाजिक अधिकार, आर्थिक अधिकार, लेखा व लेखापरीक्षण करण्याचा अधिकार, निवडणूक विषयक अधिकार इतर अधिकार.

कार्य : पाणी, सिंचन, शिक्षण, वनीकरण, दुग्धविकास, ग्रामीण शहरी भागांचा विकास इ.

## १.४ पारिभाषिक शब्द , शब्दार्थ

- **गणसंख्या :** एखाद्या व्यवस्थेतील सदस्यांच्या एकूण संख्येच्या ५०% संख्या ही गणसंख्या मांडली जाते.
- **आय ए एस :** इंडियन ॲडमिनिस्ट्रेटिव्ह सर्विस यात प्रवेश परीक्षेद्वारे उमेदवार निवडले जातात.
- **ऐच्छिक कार्य :** ज्यांची तात्काळ आवश्यकता नाही अशी कार्ये.
- **लेखा व लेखापरीक्षण :** हिशेब ठेवणे, ठेवलेले हिशोबांची तपासणी करणे.
- **केंद्रशासित प्रदेश :** ज्या प्रदेशावर केंद्र सरकारचा अधिकार असतो असे प्रदेश.

## १.५ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

**स्वयं: अध्ययन प्रश्न १**

पुढील विधाने चूक की बरोबर ते सांगा

१) सामुहिक विकास कार्यक्रम हा ग्रामीण विकासाचा कार्यक्रम नव्हता.

२) पंचायत राज्य व्यवस्थेसाठी मेहता समितीने व्दिस्तरीय रचनेची शिफारस केली.

३) महाराष्ट्राने वसंतराव नाईक समितीच्या शिफारशी स्वीकारून पंचायतराज व्यवस्था आणली.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न २**

**पुढील प्रश्नांची एक दोन वाक्यात उत्तरे लिहा.**

१) ७३ व्या घटना दुरूस्तीतील दोन तरतुदी सांगा.

२) ७३ व्या घटनादुरूस्तीचे महत्व सांगा.

**स्वयं : अध्ययन प्रश्न – ३**

**पुढील प्रश्नांची उत्तरे एक दोन वाक्यात लिहा.**

१) पंचायत व्यवस्थेतील तिसरा महत्त्वाचा घटक कोणता?

२) ग्रामपंचायतीमध्ये स्त्रियांसाठी आरक्षण किती टक्के असते?

३) ग्रामपंचायतीची दोन कामे सांगा?

**स्वयं: अध्ययन प्रश्न : ४**

**पुढील विधाने चूक की बरोबर ते सांगा.**

१) पंचायत समिती ही जिल्हा परिषद आणि ग्रामपंचायत यांच्यात दुवा साधणारी व्यवस्था मानली जाते.

२) पंचायत समितीच्या सभापती व उपसभापती यांचा कालावधी अडीच वर्षाचा असतो.

३) पंचायत समितीचे स्वातंत्र अंदाजपत्रक असते.

**स्वयं : अध्ययनासाठी प्रश्न – ५**

पुढील विधाने चूक की बरोबर ते सांगा.

१) महाराष्ट्र जिल्हा परिषदेसाठी सदस्य संख्या जास्तीत जास्त ७५ इतकी असते.

२) जिल्हा परिषदेचा कालावधी अडीच वर्षाचा असतो.

३) जिल्हा परिषदेचा कार्यकारी अधिकारी हा भारतीय प्रशासकीय सेवेतील असतो.

**स्वयं : अध्ययन प्रश्न – ६**

**पुढील प्रश्नांची उत्तरे एक – दोन वाक्यात लिहा.**

१) भारतातील स्थानिक स्वराज्य संस्थेचे दोन अधिकार सांगा.

२) स्थानिक स्वराज्य संस्थेची दोन कार्ये स्पष्ट करा.

३) स्थानिक स्वराज्य संस्थेचे आर्थिक अधिकार सांगा.

## १.६ स्वयं अध्ययन प्रश्नाची उत्तरे :

- **स्वयंअध्ययन प्रश्न १ ची उत्तरे**

  १) चूक २) चूक ३) बरोबर

- **स्वयंअध्ययन प्रश्न २ ची उत्तरे**

  १) ७३ व्या घटनादुरुस्ती मधील दोन तरतुदी पुढील प्रमाणे आहेत.

अ) पंचायत व्यवस्थेला घटनात्मक दर्जा ब) पंचायत व्यवस्थेला आर्थिक तरतूद मिळावी

२) ७३ व्या घटनादुरुस्ती पंचायत राज व्यवस्थेला घटनात्मक दर्जा मिळाला.

- **स्वयंअध्ययन प्रश्न ३ ची उत्तरे**

१) पंचायत व्यवस्थेतील तिसरा महत्त्वाचा घटक ग्रामपंचायत आहे.

२) ग्रामपंचायती मध्ये स्त्रियांसाठी १/३ आरक्षण असते.

३) ग्रामपंचायतची कामे

अ) कृषी कार्य : आधुनिक बी बियाणांचा वापर करणे, पिकांचे रक्षण करणे.

ब) वने : ग्रामवने, गायरान यांचा संभाळ व देखभाल, वनीकरणस प्रोत्साहन देणे.

- **स्वयंअध्ययन प्रश्न ४ ची उत्तरे**

१) बरोबर २) बरोबर ३) बरोबर

- **स्वयंअध्ययन प्रश्न ५ ची उत्तरे**

१) बरोबर २) चूक ३) बरोबर

- **स्वयंअध्ययन प्रश्न ६ ची उत्तरे**

१) सामाजिक अधिकार व लेखा व लेखापरीक्षण करण्याचा अधिकार.

२) वाहतूक, रस्ते, वीजवाहिन्या, शाळा, रुग्णालये इत्यादी मूलभूत पायाभूत सुविधा निर्माण करणे, सामुदायिक मालमत्ता तयार करणे आणि त्यांची देखभाल करणे.

३) आर्थिक अधिकार : आर्थिक व सामाजिक विकास साधण्यासाठी पंचायत राज क्षेत्रातील या संस्थाना कर गोळा करण्याचे, कर लावण्याचे आणि व्यवस्थापित करण्याचे अधिकृत अधिकार आहेत. याच बरोबर अन्य ग्रामीण स्थानिक संस्थानाही वरीलप्रमाणे अधिकार प्राप्त होतात.

## १.७ सरावासाठी स्वाध्याय

अ) पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा

१) महाराष्ट्र पंचायतराज व्यवस्था कशी विकसित झाली ते सांगा.

२) जिल्हापरिषदेची रचना, कार्य स्पष्ट करा.

३) ७३ व्या घटना दुरुस्तीने केलेली घटनात्मक प्रक्रिया कशी राबवली जाते ते सांगा.

४) पंचायत समितीचे कार्य स्पष्ट करा.

ब) टिपा लिहा

१) जिल्हा परिषदेच्या समिती. २) ग्रामसभा.

३) पंचायत राज व्यवस्थेची कार्य. ४) ग्रामसभे समोरील आव्हाने सांगा.

## १.८ अधिक वाचनासाठी पुस्तके (संदर्भ ग्रंथ)

निवडक संदर्भसूची

१) चौधरी राजेश, अशोक दत्तात्रेय, (१९९९) 'ग्रामपंचायत अधिनियम १९५८', १८ वी आवृत्ती

२) महाराष्ट्र शासन (विधी व न्याय विभाग), (१९६१)'महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम'

३) महाराष्ट्र शासन (ग्रामविकास व जलसंधारण विभाग), (१९५९) 'मुंबई ग्रामपंचायत निवडणूक अधिनियम'

४) पाटील पी. बी. (२०००) 'पंचायत राज्याकडून ग्रामस्वराज्याकडे' (समाजवादी प्रबोधनी, इचलकरंजी)

५) महाराष्ट्र शासन (ग्रामविकासव जलसंधारण विभाग), (२०११) 'पंचायत राज्य संस्थेकरिता ग्रामस्थांची सनद' (भाग १ व २)

६) नरसिंहराव पी. व्ही. (३ जुलै, १९९३), 'पंचायत राज्य संस्थेचे पुनरज्जीवन'

७) चौधरी द.ह., (१९९९), महाराष्ट्र नगर परिषदा निवडणूक अधिनियम

८) पाटील बी.बी., (२०१४), महाराष्ट्र शासन व राजकारण (फडके प्रकाशन, कोल्हापूर)

९) भणगेरविंद्र पांडुरंग., (२०१२), भारतातील स्थानिक स्वराज्य संस्था (प्रशांत पब्लिकेशन्स)

❑❑❑

# घटक २
# ग्रामीण स्थानिक स्वराज्य शासन संस्थांच्या योजना

**अनुक्रमणिका**


२.० उद्दिष्टे

२.१ प्रस्तावना

२.२ विषय विवेचन

२.२.१ महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण हमी योजना (मनरेगा)

२.२.२ महिला स्वयं सहाय्यता गट

२.२.३ प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना

२.३ सारांश

२.४ पारिभाषिक शब्द व त्यांचे अर्थ

२.५ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

२.६ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.७ सरावासाठी स्वाध्याय

२.८ अधिक वाचनासाठी संदर्भ


## २.० उद्दिष्टे

या घटकाचा अभ्यासानंतर आपल्याला-

- ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थाच्या माध्यमातून राबविल्या जाणाऱ्या योजनांची पार्श्वभूमी समजून घेणे.
- मनरेगा, महिला स्वयंसहायता समूह, प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना या बद्दल सविस्तर माहिती समजून घेणे.
- वरील योजनांचे देशाच्या विकासात असणारे योगदान समजून घेणे.

## २.१ प्रस्तावना:

भारताच्या स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारताने स्वीकारलेले आर्थिक विकासाचे प्रारूप समाजवादाचा प्रभाव असणारा होता आणि त्यामुळे स्वतंत्र भारताचा पाया कल्याणकारी राज्य व्यवस्था या सैद्धांतीक तत्त्वांवर आधारलेला राहिला. भारतीय राज्यसंस्थेचा अर्थसिद्धांत रोजगार आणि दारिद्र्य मुक्तता यांची सांगड घालणारा आहे त्याचप्रमाणे स्त्री-पुरूष, कुटुंब आणि गाव यांच्या सक्षमीकरणाला बळ देणारा आहे. त्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्था सुधारली की देशाचे अर्थचित्र बदलेल अशी धारणा तत्कालीन नेतृत्वाची होती. दारिद्र्याचा, रोजगाराचा, कौशल्याचा प्रश्न सोडविण्याकरिता शासनाच्या स्तरावर प्रयत्न केले जातात आणि योजना पण आखल्या जातात. प्रस्तुत योजना आखून त्यात लोकसहभाग वाढवून त्याची अंमलबजावणी करणे हा

एक उत्तम पर्याय निवडून त्यामधून ग्रामीण विकासाला चालना देता आली. लोककल्याण साध्य करण्यासाठी ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था च्या माध्यमातून विविध शासकीय लोकोपयोगी योजना राबविण्यात आल्या. त्यामध्ये प्रामुख्याने खालील योजनांचा समावेश आहे.

**समुदाय विकास कार्यक्रम :**

भारत सरकारने विकासाच्या संदर्भात सुरू केलेला पहिला कार्यक्रम समुदाय विकास कार्यक्रम या नावाने २ ऑक्टोबर १९५२ मध्ये सुरू केला. ग्रामीण विकासांमध्ये म.गांधीनी ग्रामस्वराज्याच्या माध्यमातून जी मुल्यव्यवस्था मांडली त्याचा संदर्भ घेऊन आणि गांधींच्या कार्याचे औचित्य लक्षात घेऊन त्यांच्या जन्मदिनी ही योजना लागू करण्यात आली. ग्रामीण विकासांच्या दृष्टीने कार्यक्रम आखणे आणि त्यामध्ये जनतेचा प्रत्यक्ष सहभाग नोंदविणे या उद्देशांवर ही योजना आधारीत होती. विकास कार्यक्रम योग्य प्रकारे अंमलात यावा याकरिता याला पंचवार्षिक योजनेमध्ये स्थान देण्यात आले. आर्थिक संरक्षण असल्याने योजना फलदायी ठरेल असा कयास बांधल्या गेला. या योजनेची अंमलबजावणी राज्य सरकारांवर सोपविण्यात आली. महाराष्ट्र शासनाने ग्रामीण विकासांच्या अंतर्गत आरोग्य, स्वच्छता, शेतीविकास साक्षरता, सामाजिक कल्याण या बिंदूंना केंद्रीत ठेवून समुदाय विकास कार्यक्रम प्रत्यक्षात लागू करण्यात आला.

**एकात्मिक ग्रामीण विकास योजना :**

पहिल्या योजनेतून आलेल्या अनुभवांच्या आधारावर भारत सरकारने १९७८-७९ मध्ये योजनेचा विस्तार केला. यावेळी जनता पक्षाच्या मोरारजी देसाईचे सरकार केंद्रात सत्तारूढ होते. त्यांनी एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम या नव्या नामाभिधानाने कार्यक्रम लागू केला. ग्रामीण भागातील दारिद्र्य दूर करणे हा योजनेचा उद्देश होता. १९५२ च्या योजनेमध्ये ग्रामीण विकासाच्या आर्थिक अंगाकडे दुर्लक्ष झाल्याची भावना नव्या सरकारची होती. त्याचप्रमाणे इंदिरा गांधींच्या कार्यकाळात पहिल्या योजनेचा आढावा घेतल्या गेला होता. मात्र १९७८-७९ पासुन अंमलबजावणीला सुरूवात झाली. ग्रामीण भागातील दारिद्र्याला आळा घालणे, जीवनमान उंचावणे, त्याकरिता आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देणे, मुख्यत्वे ज्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न २०,००० पेक्षा कमी आहे, त्यांच्या उत्पन्नात बदलाव घडवून आणणे हे यामध्ये अंतर्भूत होते.

**सुवर्ण जयंती ग्राम स्व-रोजगार योजना :**

१ एप्रिल १९९९ पासुन एकात्मिक ग्रामीण विकास योजना सुवर्ण जयंती ग्राम स्व-रोजगार योजना यामध्ये विलीन करण्यात आली. या योजनेमध्ये वय वर्ष १८ ते ३५ या गटातील लोकांना व्यवसाय व उद्योगाचे प्रशिक्षण देण्याची तरतूद होती. प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर १०,००० रूपयापर्यंत कर्ज आणि ठराविक प्रमाणात अनुदान याचा अंतर्भाव होता. अनुसूचित जाती आणि जमातीच्या लोकांना यामध्ये प्राधान्य देण्यात आले.

**भारत निर्माण योजना:**

ग्रामीण क्षेत्रातील लोकांचे जीवनमान वाढवून मानवी संसाधनांचा विकास करण्याच्या हेतूने केंद्र सरकारने २००१ पासुन ग्रामोद्य योजना आणली. ही योजना १६ डिसेबर २००५ पासुन भारत निर्माण योजना म्हणून सुरू करण्यात आली. भारत सरकारने राज्य सरकारांच्या सहकार्याने सुरू केलेली कालबद्ध स्वरूपाची ही योजना होती. यामध्ये ग्रामीण विद्युत्तीकरण, दूरध्वनी, रस्ते, पिण्याचे पाणी, गृहबांधणी, जलसिंचन यांचा समावेश करण्यात आला. भारत निर्माण योजनेचा दुसरा टप्पा २००९ ते २०१२ या दरम्यान राबविण्यात आला.

**जवाहर रोजगार योजना :**

केंद्र सरकारच्या ग्रामीण विकासांच्या योजनांमध्ये एखाद्याच योजनेच्या अनुषंगातून धोरण राबविण्यात आलेत असे नाही तर, समांतर योजनांचाही वापर केंद्र सरकारांनी केलेला दिसून येतो. सहभागी लोकशाही, दारिद्रिय निर्मूलन, रोजगार निर्माण या दृष्टीने ग्रामपंचायतीच्या माध्यमातून विकासाचा विस्तार करण्याकरिता या योजनेचा वापर करण्यात आला. १ एप्रिल १९८९ पासुन ही योजना राबविणयस सुरूवात झाली. दहा वर्षानंतर एप्रिल १९९९ मध्ये जवाहर ग्राम समृद्धी योजनेत तिचे रूपांतरण करण्यात आले आणि नंतर ती ‘‘संपूर्ण ग्रामीण रोजगार योजनेत’’ विलीन करण्यात आली.

**संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना :**

ग्रामीण क्षेत्रातील रोजगार निश्चितता आणि बेकारांना काम, अन्नधान्याची शाश्वतता या उद्देश्यातून सप्टेंबर २००१ पासुन संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना सुरू करण्यात आली.

अशा विविध शासकीय योजनांच्या माध्यमातून ग्रामीण भागातील जनतेचा विकास करण्यासाठी स्थानिक पातळीवर ग्रामीण स्थानीक स्वराज्य संस्था स्थापन करून योजनांची अंमलबजावनी केली जाते. प्रस्तुत प्रकरणामध्ये आपण प्रमुख तीन योजनांचा सविस्तर आढावा घेणार आहोत. त्यामध्ये

१) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (MANREGA)

२) महिला स्वयंसहाय्यता समूह (Women Self Help Group)

३) प्रधान मंत्री कौशल्य विकास योजना (PM Kaushalya Vikas Yojana)

## २.२ विषय विवेचन :

### २.२.१ महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (MANREGA) :

मागेल त्याला काम या तत्त्वावर आधारलेल्या या योजनेत नोंदणीकृत कुटुंबातील वित्तीय वर्षात किमान १०० दिवस केंद्रीय निधीतून अकुशल रोजगाराची हमी आणि उर्वरित दिवसासाठी राज्य निधीतून अकुशल रोजगाराची हमी दिली जाते. हा कायदा पारित झाल्यानंतर बारमाही विकासाची, कष्टकऱ्यांची, गरजूंना

रोजगार पुरवणारी योजना म्हणून ओळखल्या जाणाऱ्या रोजगार हमी योजनेच्या मुळ गाभ्यावर आधारलेल्या राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचा उगम झाला. केंद्राच्या व राज्यांच्या रोजगार निर्मितीच्या सर्व योजना एकत्रित करून त्यातील चांगल्या तरतुदींचा लाभ ग्रामीण भागातील मजुरांना देणारी ही एक व्यापक व अभिनव अशी योजना आहे. आज ही योजना राष्ट्रीय स्तरावरील रोजगार योजनांची प्रेरक ठरली. या योजनेच्या अंमलबजावणी साठी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा-२००५ पारित करण्यात आला आणि दि. ०२ ऑक्टोबर २००९ पासुन या योजनेस महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा) म्हणून संबोधले जाते.

**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा-२००५ मधील तरतुदी :**

१) ग्रामीण क्षेत्रातील कुटुंबांना निर्वाहासाठी सुरक्षितता मिळावी यासाठी अंगमेहनतीचे अकुशल काम करण्यास तयार असणाऱ्या प्रत्येक कुटुंबास एका आर्थिक वर्षात १०० दिवसाचा रोजगार देण्याची हमी या कायद्यामध्ये करण्यात आलेली आहे.

२) मनरेगाची व्याप्ती ही ग्रामीण क्षेत्रापुरतीच मर्यादित असून शहरी भागाचा यात समावेश नाही.

३) ग्रामपंचायत स्तरावर घ्यावयाच्या कामाची निवड ग्रामसभेत होत असल्यामुळे कामांच्या निवडीत ग्रामस्थांची मुख्य भूमिका असते. तालुका पातळीवरील नियोजन आराखड्यात पंचायत समिती तर जिल्हा पातळीवरील आराखड्यात जिल्हा परिषद मंजुरी देत असल्यामुळे मंजुरीसाठी विलंब होत नाही.

४) मंजूर कामांच्या ५० टक्के खर्चाची कामे ग्रामपंचायतीमार्फत केली जातात तर उर्वरित ५० टक्के कामे ही शासनामार्फत केली जातात.

५) कुशल व अकुशल कामाचे प्रमाण ६०:४० असे आहे.

६) महिलांचा आर्थिक व सामाजिक विकास व्हावा याकरिता मनरेगा अंतर्गत एकूण लाभार्थ्यांपैकी एक तृतीयांश महिला असाव्यात अशी तरतूद आहे.

७) समाजातील मागासवर्गाचे विशेष हित, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व महिलांचे सबलीकरण करण्याचा प्रयत्न मनरेगामधून करण्यात आलेला आहे.

८) किमान वेतन कायदा १९४८ नुसार कामाची मजुरी ६० रूपयापेक्षा कमी नसावी.

९) स्त्री-पुरूषांना समान कामासाठी समान वेतन.

१०) कामाची मजुरी थेट बँक किंवा पोस्ट खात्यात जमा.

११) काम झाल्यानंतर १५ दिवसापर्यंत कामाची मजुरी वाटप करणे बंधनकारक आहे. अन्यथा मजुरी देय कायदा १९३६ च्या तरतुदीनुसार मोबदला देय आहे.

१२) कामासाठी अर्ज केल्यापासुन १५ दिवसाचे आत काम उपलब्ध करणे बंधनकारक आहे. अन्यथा पहिल्या ३० दिवसांपर्यंत किमान वेतनाच्या २५ टक्के दराने तर पुढील १०० दिवसापर्यत ५० टक्के दराने बेरोजगार भत्त्याची तरतूद.

**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची उद्दिष्ट्ये :**

ग्रामीण क्षेत्रातील बेरोजगार श्रमिकांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी या योजनेची अंमलबजावणी करण्यात आलेली आहे. या योजनेच्या कार्यान्वयासाठी पुढील उद्दिष्ट्ये निश्चित करण्यात आली आहे.

१) ग्रामीण भागातील अकुशल काम करण्यास इच्छुक असणाऱ्या प्रत्येक कुटुंबातील प्रौढ व्यक्तीला योजने अंतर्गत १०० दिवस प्रतिकुटुंब रोजगाराची हमी देणे.

२) योजने अंतर्गत केल्या गेलेल्या कामातून गावासाठी स्थायी स्वरूपाची मालमत्ता निर्माण करणे.

३) ग्रामीण भागातील शेतकरी / शेतमजुरांना या अधिनियमाच्या माध्यमातून रोजगाराचा हक्क प्रदान करणे.

४) सामाजिक सुरक्षा देणे.

५) महिला व दुर्बल घटकांचे सबलीकरण करणे.

६) पंचायतराज संस्थांचे बळकटीकरण करणे.

**मनरेगाचे वैशिष्ट्ये :**

मनरेगा योजना ही 'मागेल त्याला काम' या अधिकारिक वैशिष्ट्यावर आधारलेली असली तरी रोजगार उपलब्ध करून देण्यासोबतच ग्रामीण जनतेला स्वावलंबी बनविणे, मानवी हक्कांची प्रतिष्ठा राखणे, आर्थिक सक्षमीकरण तसेच महिलांना सक्षम बनविण्याचे कामही मनरेगा योजनेच्या माध्यमातून होत असल्याचे लक्षात येते. मनरेगा योजनेची काही ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) ग्रामीण क्षेत्रात वास्तव्यास असणाऱ्या प्रत्येक प्रौढ व्यक्तीला १०० दिवसाच्या रोजगाराची हमी.

२) प्रत्येक नोंदणीकृत कुटुंबाला एक जॉब कार्ड देण्यात येईल जे पुढील पाच वर्षासाठी वैध असेल.

३) प्रत्येक जॉब कार्डधारक ग्रामपंचायत कार्यालयात जाऊन कामाची मागणी करू शकतो.

४) कामासाठी अर्ज केल्यावर पोचपावती मिळते.

५) कामासाठी अर्ज केल्यापासुन १५ दिवसाचे आत रोजगार उपलब्ध करणे बंधनकारक.

६) १५ दिवसात काम न मिळाल्यास बेरोजगारी भत्त्याचे प्रावधान.

७) कामाचे ठिकाण हे ग्रामपंचायतीपासुन ५ कि.मी. अंतरापेक्षा जास्त असू नये.

८) कामाचे ठिकाण ५ कि.मी. पेक्षा जास्त अंतरावर असल्यास प्रवास भत्त्याचे प्रावधान.

९) मजुरी ही प्रत्यक्ष कामाच्या गुणवत्तेवर व प्रमाणावर अवलंबून असते.

१०) कामाच्या ठिकाणी पिण्याचे पाणी व वेदना, आजारपण किंवा छोट्या जखमेसाठी प्रथमोपचार पेटीची तरतूद.

११) कामाच्या ठिकाणी ५ पेक्षा अधिक लहान मुल असतील तर त्यांच्या देखभालीसाठी एका स्त्रीची निवड केली जाते.

१२) एकूण मजुर संख्येच्या १/३ इतकी महिलांची संख्या अनिवार्य.

१३) कामाची मजुरी सरळ बँक किंवा टपाल खात्यात जमा.

१४) या योजनेअंतर्गत हाती घेतलेली सर्व कामे कोणत्याही कंत्राटदारामार्फत न करता विभागाकडून केली जातात.

१५) पारदर्शकता राखण्यासाठी सामाजिक लेखा परिक्षणाची तरतूद.

१६) मजुरांना कामावर अपघात झाल्यास सानुग्रह देण्याची तरतुद

अशाप्रकारे मजुरांना कामाची मागणी करण्याचा आणि मागितल्यानुसार काम मिळण्याचा कायदेशीर हक्क हे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायद्याचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य आणि वेगळेपणही आहे. या आधी राबविल्या गेलेल्या इतर कोणत्याही रोजगार कार्यक्रमात अशी तरतुद नव्हती.

**मनरेगा अंतर्गत काम मिळविण्यासाठीची प्रक्रिया :**

**नोंदणी :**

मनरेगा अंतर्गत काम मिळविण्यासाठी सर्वप्रथम नोंदणी करणे महत्वपूर्ण आहे. ही नोंदणी करण्यासाठी स्थानिय ग्राम पंचायत कार्यालयात साध्या कागदावर किंवा ग्रामपंचायतीमध्ये उपलब्ध नमुन्यावर अर्ज करून करता येते. नोंदणीचा अर्ज कुटुंबाला एकत्रितपणे तसेच कोणत्याही ग्रामीण प्रौढ व्यक्तीला स्वतंत्रपणे करता येते. हा नोंदणी अर्ज ग्रामपंचायत कार्यालय प्रमुख किंवा सचिव यांना देता येते. अर्जामध्ये कुटुंबाच्या त्या सर्व सदस्यांची नावे द्यायची आहे, जे कायद्यानुसार अंगमेहनतीची कामे करण्यास तयार आहेत. त्यासोबतच सदस्यांचे वय, लिंग, जाती समूह (अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती) याची नोंदणी आवश्यक आहे. नोंदणी प्रक्रिया ही ग्रामपंचायत कार्यालयात वर्षभर सुरू असेल तसेच इच्छुक व्यक्तींकडून जॉबकार्डसाठी तोंडी अर्ज देखील स्वीकारण्याची तरतूद केली आहे व अशा तोंडी अर्जाला अन्य अर्जाप्रमाणेच स्वीकार करून त्याची नोंद घेण्याचे बंधन ग्रामपंचायतीला आहे. ग्रामीण कुटुंबाला कायद्यान्वये नोंदणी करवून घेण्याचा अधिकार आहे.

**नोंदणी अर्जाची पडताळणी :**

नोंदणी अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्वरीत ग्रामपंचायतीमार्फत आलेल्या अर्जाची पडताळणी केली जाते. त्यामध्ये नियमानुसार सर्व अटींची पूर्तता करण्यात आली की नाही हे प्रामुख्याने तपासले जाते, ज्यात मुख्यत्वे:

- अर्जदार ग्रामपंचायतीचा स्थानिक निवासी आहे अथवा नाही.
- अर्जामध्ये नमूद कुटुंबातील सर्व सदस्य प्रौढ म्हणजेच १८ वर्षाहून अधिक वयाचे आहे अथवा नाही.
- सर्व सदस्य एकाच कुटुंबाचे आहे अथवा नाही.

या बाबींची पडताळणी केली जाते.

**जॉबकार्ड (रोजगार पत्रक) :**

पडताळणीनंतर प्रत्येक नोंदणीकृत कुटुंबाला एक जॉबकार्ड प्रदान केले जाते. हे जॉबकार्ड पाच वर्षासाठी वैध असते. अर्ज केल्याच्या १५ दिवसात जॉबकार्ड जारी करणे अनिवार्य आहे. जॉबकार्डवर कुटुंबातील नोंदणी केलेल्या प्रत्येक सदस्यांचा फोटो असतो. जॉबकार्ड तयार झाल्यानंतर ते स्थानिक समुदायाच्या उपस्थितीत वितरित केले जाते. जॉबकार्डमधील महत्वपूर्ण नोंदीमध्ये जॉबकार्ड क्रमांक, जॉबकार्ड जारी केल्याची तारीख, जॉबकार्ड धारक कुटुंबाची संपूर्ण माहिती व जॉबकार्ड जारी करणाऱ्या अधिकाऱ्याची स्वाक्षरी याचा समावेश होतो.

जॉबकार्ड हे मनरेगा योजनेच्या कार्यान्वयातील सर्वात महत्वपूर्ण दस्तऐवज आहे. हे जॉबकार्ड निःशुल्क वितरीत केले जाते. जॉबकार्डमुळे मजुरांना कुठल्याही प्रकारच्या फसवणूकीला बळी पडण्यापासून वाचवता येते. जॉबकार्डमुळे मनरेगाच्या अंमलबजावणीत पारदर्शकता राखता येते असे म्हणणे वावगे ठरणार नाही. जॉबकार्ड हे मजुराकडेच असले पाहिजे ते कोणत्याही परिस्थितीत अन्य व्यक्ती आपल्याकडे ठेवू शकत नाही. जॉबकार्डची वैधता ही पाच वर्षाची असल्यामुळे प्रत्येक पाच वर्षानंतर जॉबकार्ड अद्यावत करणे अनिवार्य आहे. घरातील एखादा सदस्य प्रौढ झाल्यास, एखाद्या सदस्याचा मृत्यु झाल्यास किंवा विवाहामुळे एखादा सदस्य कमी झाला किंवा वाढला असता त्याची नोंद अद्यावत करताना जॉबकार्डमध्ये करावी. ग्रामपंचायतीतर्फे दरवर्षी अद्यावत प्रक्रिया केली जाते. जॉबकार्डमध्ये एखादी गोष्ट समाविष्ट केल्यानंतर किंवा काढल्यानंतर त्याची माहिती ग्रामसभेसमोर मांडणे आवश्यक असते. अशा बदलांची माहिती ग्रामपंचायतीमार्फत कार्यकम अधिकाऱ्याकडे पाठविली जाते. ज्यामुळे अधिकृत कागदपत्र अद्यावत करणे सोयीचे जाते.

**कामाची मागणी :**

मनरेगा अंतर्गत प्रत्येक जॉबकार्डधारक कुटुंबातील सदस्य कामाच्या मागणीचा अर्ज ग्रामपंचायतीकडे करू शकतो. ही मागणी कमीत कमी १४ दिवसांच्या कामाची असली पाहिजे. कामासाठी करावयाचा अर्ज हा ग्रामपंचायतीमध्ये उपलब्ध छापील नमुन्यावर किंवा साध्या कागदावरही केला जाऊ शकतो. ज्या लोकांना लिहिता वाचता येत नाही अशा लोकांनी मौखिक अर्ज केल्यास त्यालाही इतर अर्जाप्रमाणे मानले जाते व त्याची नोंद घेतली जाते. अर्जावर जॉबकार्ड क्रमांक, कोणत्या दिवसापासून काम हवे आहे आणि किती दिवसासाठी काम हवे आहे हे स्पष्टपणे नमूद केलेले असले पाहिजे.कामाच्या मागणीसाठी व्यक्तीगत अर्जाव्यतिरिक्त सामुहिक अर्ज देखील करता येतो. तसेच जर एखादी व्यक्ती काही कारणास्तव अर्जाची

प्रक्रिया आधी पूर्ण करू शकली नसेल व ती व्यक्ती सरळ कामाच्या ठिकाणी जाऊन कामाची मागणी करत असेल तर अशा व्यक्तीचे नावही हजेरी वहीमध्ये नोंदविले जाते.

**पोचपावती :**

कामासाठी अर्ज केल्यापासून १५ दिवसाचे आत अर्जदाराला काम उपलब्ध करून देणे ही ग्रामपंचायतीची जबाबदारी आहे. असे न झाल्यास अर्जदारास १५ दिवसानंतर बेरोजगारी भत्ता देण्याचे प्रावधान अधिनियमात केलेले आहे. यासाठीच ज्या कोणी कामासाठी अर्ज केलेला असेल त्याला पोचपावती देणे त्यावर तारीख आणि अर्ज स्वीकारणाऱ्याची स्वाक्षरी असणे ही ग्रामपंचायतीची कायदेशीर जबाबदारी आहे.

**मनरेगा योजनेचे नियोजन :**

कुठल्याही योजनेचे यश हे त्या योजनेच्या नियोजनावर अवलंबून असते. योजना कार्यान्वीत करणाऱ्या संस्थांचे नियोजन हे कुठल्याही योजनेच्या यशस्वीतेसाठी अत्यंत महत्वपूर्ण असते. मनरेगा योजनेत असलेल्या तरतुदींचा विचार केल्यास नियोजनाशिवाय ही योजना राबविल्याच जाऊ शकत नाही. याचे मुख्य कारण म्हणजे नियोजनाशिवाय कामासाठी अर्ज केलेल्या प्रत्येक व्यक्तीस १५ दिवसाने आत काम उपलब्ध करून देणे शक्य नाही. तसेच सामुदायिक संपत्तीची निर्मिती करणेही शक्य होणार नाही.

**विकास योजना व प्रकल्पाची यादी तयार करणे :**

मनरेगा योजनेअंतर्गत प्रत्येक ग्रामपंचायतीला विकास योजना तयार करावी लागते. ज्यामध्ये प्रस्तावित कार्याचा (प्रकल्पाची यादीचा) समावेश असेल, ही यादी १५ ऑक्टोबरपर्यंत तयार करावी जेणेकरून पुढील वर्षी प्रस्तावित कामाची अंमलबजावणी करण्यासाठी मंजुरीसाठी कार्यक्रम पदाधिकाऱ्याकडे पाठविता येऊ शकेल. प्रकल्पांची यादी ही प्रशासनिक व तांत्रिक मान्यता मिळालेली ग्राम निहाय कामाची यादी होय. या यादीमधील कामांना मागणीनुसार त्वरीत सुरू करता येते. ज्या वर्षात काम करायचे आहे त्याच्या आधीच ३१ डिसेंबरपर्यंत अशी प्रकल्पाची यादी तयार करण्यात येते. विकास योजना ही संपूर्ण आर्थिक वर्षासाठी तयार केलेली असते. ज्यामध्ये किती रोजगाराची मागणी येऊ शकते ते समजून घेणे, अशा कामाची यादी करणे जी या मागणीला पूर्ण करण्यायोग्य रोजगार निर्माण करू शकते, विकास योजनेच्या आधारे काम आणि मजुरीच्या रक्कमेचे मुल्यांकन केले जाते. तयार केलेल्या विकास योजनेची काही कामं एखाद्या वर्षात केली जाऊ शकत नसतील तर त्या कामांना पुढील वर्षी हाती घेतले जाऊ शकते. विकास योजना तयार करताना प्रस्तावित प्रकल्पांच्या यादीनुसार प्रती व्यक्ती कामाच्या दिवसांची एकूण संख्या अंदाजित कामाच्या मागणीपेक्षा अधिक असणे आवश्यक आहे. कामाच्या ठिकाणाची ओळख पटविण्यासाठी खाते क्रमांक आणि आसपासच्या ठिकाणांचा उल्लेख करण्यात येतो. विकास योजनेत प्रत्येक कामाच्या संभाव्य लाभाचे मुल्यांकन करण्यात येते व ही प्रकल्पाची यादी ग्रामपंचायत कार्यालयात सोप्या व स्थानिक भाषेत प्रकाशित करेल अशी तरतुद आहे. प्रत्येक वेळ काम सुरू करतांना, कामाच्या दरम्यान आणि काम संपल्यानंतर असे तीन वेळा छायाचित्रण करणे आवश्यक आहे.

मनरेगा अंतर्गत कामाचा वार्षिक आराखडा तयार करण्याकरिता वेळापत्रक

| अ.क्र. | दिनांक | कार्यवाही |
|---|---|---|
| १. | १५ ऑगस्ट | ग्रामसभेत वार्षिक आराखडा मंजूर करून घेऊन, कार्यक्रम अधिकाऱ्यांना सादर करणे. |
| २. | २५ सप्टेंबर | कार्यक्रम अधिकारी ग्रामपंचायतीचा एकत्रित आराखडा पंचायत समितीला सादर करेल. |
| ३. | २ ऑक्टोबर | पंचायत समिती गटनिहाय वार्षिक आराखडा तयार करून, जिल्हा कार्यक्रम समन्वयक (जिल्हाधिकारी) यांना सादर करेल. |
| ४. | १५ नोव्हेंबर | जिल्हा कार्यक्रम समन्वयक जिल्ह्याचा वार्षिक आराखडा व लेबर बजेट जिल्हा परिषदेला सादर करेल |
| ५. | १ डिसेंबर | जिल्हा परिषद जिल्हयाच्या वार्षिक आराखड्यास मंजूरी देईल. |
| ६. | १५ डिसेंबर | जिल्हा कार्यक्रम समन्वयक प्रत्येक ग्रामपंचायतीत घ्यावयाच्या कामांचे शेल्फ तयार करतील. |
| ७. | ३१ डिसेंबर | सर्व जिल्हे त्यांचे लेबर बजेट, आयुक्त नरेगा यांना सादर करतील. आयुक्त नरेगा ते शासनामार्फत केंद्र शासनाच्या मान्यतेसाठी सादर करतील. |
| ८. | जानेवारी | केंद्र शासनाद्वारे लेबर बजेटचे परिक्षण व त्रुटीची पूर्तता करणे. |
| ९. | फेब्रुवारी | केंद्रीय प्राधीकृत समितीची बैठक व राज्याच्या लेबर बजेटला मान्यता. |
| १०. | फेब्रुवारी /मार्च | मंजुर लेबर बजेट राज्यास वितरित करणे व राज्याद्वारे महिनानिहाय व जिल्हानिहाय एम.आय.एस. मध्ये नोंद घेऊन त्याची माहिती जिल्हा, गट व ग्रामपंचायतीस देणे. |
| ११. | एप्रिल | राज्य शासन वर्षाच्या सुरूवातीचा शिल्लक निधी केंद्र शासनास कळविल व केंद्र शासन निधीचा पहिला हप्ता राज्यास वितरित करेल. |

**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत केली जाणारी कामे :**

१) पेयजल स्रोतांसह भूजलाचे पूनर्भरण करण्यावर विशेष भर देऊन भूमिगत पाट, मातीची धरणे, संरोधी धरणे यासारखी भूजल स्तर वाढविणारी व त्यात सुधारणा करणारी जलसंधारणाची व जलसंचयाची बांधकामे.

२) व्यापक पाणलोट क्षेत्र प्रक्रिया करता येईल असे समतल चर, मजगी घालणे, समतल बांध दगडी संरोधक, दगडमातीचे कक्षबांध (गॅबीयण संरचना) आणि पाणलोट विकासाची कामे यासारखी जलव्यवस्थापन विषयक कामे.

३) सुक्ष्म व लघु पाटबंधाऱ्याची कामे आणि सिंचन कालवे व नाली बांधणे, त्याचे नुतनीकरण करणे व परिक्षण करणे.

४) सिंचन तलाव व इतर जलाशये यामधील गाळ उपसन्यासह पारंपारीक जलाशयाचे नुतनीकरण करणे.

५) परिच्छेद ४ मध्ये अंतर्भुत असलेल्या कुटुंबाना फलोपयोग घेण्याचा रितसर हक्क मिळवून देईल असे सर्वसामान्य व वन जमिनीवरील सडक पट्टया, कालवा बांध, तलाव अग्रतट (टैंक फोरशोअर) आणि किनारी पट्टे यावरील वनरोपण, वृक्षरोपण आणि फलोत्पादन.

६) सामुहिक जमिनीवरील भूविकासाची कामे.

अशा प्रकारे मनरेगा या योजनेचा सविस्तर आढावा आपण घेतलेला आहे. यावरून आपल्या लक्षात येते कि ग्रामीण भागातील रोजगाराचे प्रश्न सोडविण्यासाठी मनरेगा हि योजना अत्यंत प्रभावी व उपकारक ठरली आहे. या योजनेमुळे ग्रामीण भागातील लोकांना शाश्वत रोजगाराची हमी मिळाल्यामुळे त्यांचे जीवनमान उंचावयाला मदत झाली आहे.

### २.२.२ महिला स्वयंसहाय्यता समूह (Women Self Help Group)

महिलांचा सर्वांगीण विकास व्हावा, समाजकारण व अर्थकारण यामध्ये त्यांचा सहभाग वाढावा, त्यामाध्यमातून महिलांमध्ये राजकीय जाणीव जागृती होऊन महिलांमधील नेतृत्व क्षमतेचा देखील विकास व्हावा यादृष्टीने भारत सरकारने महिलांच्या उन्नतीसाठी अनेक नवनवीन योजनांची निर्मिती करून अंमलबजावणी केली. त्यापैकी एक महत्त्वपूर्ण योजना म्हणजे महिला स्वयंसहाय्यता समूह होय. स्वयंसहाय्यता समूहाकडे केवळ आर्थिक दृष्टिकोनातून पाहणे योग्य ठरणार नाही. महिलांचा आर्थिक विकास केवळ एवढ्याच मर्यादीत दृष्टिकोनातून ही योजना सुरू झालेली नाही, तर महिलांचा आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, व्यावसायिक व राजकीय असा सर्वांगीण विकास या योजनेच्या माध्यमातून करण्याचा शासनाचा प्रयास आहे. एकंदरित महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी स्वयंसहाय्यता समूहाची चळवळ भारतात सुरू झाली आहे. त्यामुळे आज लाखोंच्या संख्येने स्त्रिया या चळवळीत सहभागी होतांना दिसत आहेत.

स्वयंसहाय्यता समूह, बचतगट, शेजारगट, लघुवित्त बचतगट अशा वेगवेगळ्या संकल्पनेतून जगामध्ये स्वयंसहाय्यता समूहांची चळवळ व्यापक बनत आहे. जागतिक पातळीवर सर्वप्रथम स्वयंसहाय्यता समूहाची स्थापना बांगलादेशात करण्यात आली. बांगलादेशातील ग्रामीण बँकेचे प्रणेते व २००६ चे नोबेल पुरस्काराचे मानकरी असणारे महंमद युनुस यांनी प्रथम बांग्लादेशात स्वयंसहाय्यता समूहाची मुहूर्तमेढ रोवली. भारतातही १ एप्रिल १९९९ पासून सुवर्ण जयंती ग्रामीण स्वयंरोजगार योजनेच्या अंतर्गत स्वयंसहाय्यता समूहांची स्थापना करायला सुरूवात झाली. देशात सर्वप्रथम १९८५ मध्ये 'म्हैसुर पुनर्निधारण आणि विकास एजन्सी'

(मायराडा) या संस्थेने बचतगट चळवळ सुरू केली. त्यानंतर १९९३ मध्ये रिझर्व्ह बँकेने त्यास कायदेशीर मान्यता देखील दिली. यानंतर देशातील अनेक राज्यांमध्ये या चळवळीचा प्रसार झपाट्याने झाला. त्यामध्ये आंध्रप्रदेश, तामिळनाडू, महाराष्ट्र, राजस्थान, केरळ ही राज्ये आघाडीवर होती. महाराष्ट्रातील अमरावती जिल्ह्यात तर १९४७ पासूनच बचतगट चळवळीचा प्रयोग महिलांनी सुरू केला. राज्यात महिलांच्या सक्षमीकरणासाठी स्वयंसहाय्यता समूहांच्या माध्यमातून महिलांच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय उन्नतीकरिता एक व्यापक असे व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आले. या समूहांच्या माध्यमातून राज्यातील अनेक महिला स्वतःचा सर्वांगीण विकास साधत आहेत.

भारत सरकारतर्फे २००१ हे वर्ष 'महिला सक्षमीकरण वर्ष' म्हणून देशात सर्वत्र साजरे करण्यात आले. या निमित्त्याने महिलांच्या सक्षमीकरणासाठी त्यांच्या अधिकारात वाढ करून हे अधिकार कसे वापरायचे याची जाणीव त्यांना करून देण्याबाबतची आवश्यकता पहिल्यांदाच सर्वमान्य करण्यात आली. यातूनच पुढे महिला सक्षमीकरण व त्यांच्या नेतृत्व विकासाचे वारे संपूर्ण देशभर झपाट्याने वाहू लागले. महिलांचा अर्थाजनात सहभाग असल्याशिवाय त्यांच्यात सामाजिक व राजकीय जाणीव निर्माण होणे शक्य नाही. ही बाब लक्षात घेऊनच महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाची प्रक्रिया आता देशभर सुरू झाली आहे. महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाचे एक महत्त्वपूर्ण अंग म्हणजेच देशभरात आजवर स्थापन झालेले लाखो महिला स्वयंसहाय्यता समूह. हे समूह महिलांच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय भागीदारीत महत्त्वाची भूमिका पार पाडत असून महिलांच्या नेतृत्व विकास प्रक्रियेत मैलाचा दगड ठरलेले आहेत. महिला स्वयंसहाय्यता समूहांच्या माध्यमातून महिलांच्या सक्षमीकरणासाठी देशभर सुरू असलेल्या चळवळीने आता लोक चळवळीचे स्वरूप धारण केले असून याचे अनेक दृष्य परिणाम सर्वत्र दृष्टिपथास पडत आहेत. सन २०११ च्या जनगणनेनुसार देशातील ५४.७७% लोक ग्रामीण भागात राहतात. ४५.२३% लोक शहरात वास्तव्य करतात. देशात महिला साक्षरतेचे प्रमाण ग्रामीण भागात ५८.७५% तर शहरी भागात ७९.९२% आहे. देशात दारिद्र्य रेषेखाली जीवन जगणाऱ्या कुटुंबांची संख्या २१.८०% असून ग्रामीण भागातील २८.३०% लोक दारिद्र्य रेषेखालील जीवन जगतात. म्हणजेच देशासमोर दारिद्र्य व निरक्षरता या दोन भीषण समस्या उभ्या आहेत. या दोन्ही समस्या परस्परपुरक आहेत. यामुळे या समस्यांच्या विळख्यात सापडलेल्या समाजाला मुक्त करण्यासाठीचे सामर्थ्य त्या समाजातील महिलांमध्ये निर्माण करणे गरजेचे आहे. हे सामर्थ्य निर्माण करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य संपूर्ण देशभरात महिलांच्या स्वयंसहाय्यता समूहांच्या माध्यमातून होत आहे. आजच्या स्थितीत देशातील महिलांच्या स्वयंसहाय्यता समूहाचे अवलोकन केल्यास या समूहांच्या माध्यमातून एक अभूतपूर्व अशी आर्थिक, सामाजिक व राजकीय क्रांती देशात घडून येतांना दिसत आहे. त्यामुळेच सन २०१० पर्यंत देशाच्या ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबाला स्वयंसहाय्यता समूहाशी जोडण्याचा शासनाचा मानस होता. महिलांच्या कलागुणांचा विकास, निर्णय निर्धारण क्षमतांचा विकास, नेतृत्वाचा विकास आणि त्यांच्यात प्रचंड आत्मविश्वास निर्माण करण्याच्या कामी स्वयंसहाय्यता समूहांची भूमिका अतिशय महत्त्वपूर्ण ठरलेली आहे. या सर्वामुळे स्वयंसहाय्यता समूहाची चळवळ ही खऱ्या अर्थाने महिला सक्षमीकरणाची व नेतृत्व विकास प्रक्रियेची चळवळ बनलेली आहे. महिलांचे स्वयंसहाय्यता समूह हे महिलांच्या समान गरजा

आणि समान आर्थिक पार्श्वभूमी असलेल्या महिलांचे गट आहेत. 'स्वयंसहाय्यता समूह' या नावाने हा गट उदयास आला असून एकमेकांना सहाय्य करणारे हे एक संघटन आहे. त्यांच्यामध्ये १० ते २० सभासदांचा समूह एकत्र आलेला असून एकमेकांना आर्थिक मदत करणे हे मूलभूत तत्त्व त्यात अंतर्भूत आहे. त्यामुळे नियमितपणे बचत जमा करणे, जमा झालेल्या बचतीतून गरजू सदस्यांना कर्ज उपलब्ध करून देणे, कर्ज व व्याजाची नियमितपणे परतफेड करणे, गटांच्या सभांना उपस्थित राहून चर्चा करणे, निर्णयप्रक्रियेत सहभाग घेणे, गटांचा हिशेब व इतर आवश्यक लेखा पुस्तके सांभाळणे, विविध ठिकाणी आयोजित सभा, चर्चासत्रे, कार्यशाळा यामध्ये गटाचे प्रतिनिधित्व करणे, समूहाच्या समस्यांचे निराकरण करणे, तसेच समूहाशी संबंधित कार्यासोबतच अनेक शासकीय, सामाजिक व राजकीय उपक्रमांमध्ये सहभाग घेणे यासारख्या बाबीमुळे महिलांच्या व्यक्तिमत्त्व विकासासोबतच त्यांच्यामधील सक्षमीकरण व नेतृत्व गुणांना देखील वाव मिळतो.

समाजातील महिलांच्या सर्वांगीण विकासाचे मुख्य साधन म्हणून स्वयंसहाय्यता समूहाकडे पाहिले जाते. देशातील कोट्यावधी स्त्रियांच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय क्षेत्राला आकार देण्याचे काम स्वयंसहाय्यता समूहांच्या माध्यमातून अतिशय जोमाने सुरू आहे. हे समूह महिलांच्या विकासाचे, सक्षमीकरणाचे तसेच नेतृत्व विकासाचे महत्त्वपूर्ण माध्यम ठरत असून 'स्वयंसहाय्यता समूह म्हणजेच महिला सक्षमीकरण व नेतृत्व विकासाची दिशा' हे समीकरण आता सर्वमान्य होत आहे. विशेषतः ग्रामीण भागातील, दारिद्र्य रेषेखालील महिलांना स्वयंसहाय्यता समूहांच्या माध्यमातून प्रगती करणे हा एक उत्तम राजमार्ग प्रस्थापित होत आहे. त्यामुळेच स्वयंसहाय्यता समूहाची चळवळ देशाच्या प्रत्येक कानाकोपऱ्यात पोहचल्याचे दिसते. या चळवळीच्या माध्यमातून महिला भक्कमपणे स्वतःच्या पायावर उभ्या राहत आहेत. या समूहांच्या माध्यमातून बचतीबरोबरच स्वरोजगार, साक्षरता, आरोग्य, सामाजिक उपक्रम, महिला सक्षमीकरण आणि राजकीय सहभाग अशा विविध क्षेत्रात महिला सहभागी होत आहेत. या सर्व उपक्रमांमुळे महिलांचे समाजात स्वतःचे एक मानाचे स्थान निर्माण होते, त्यांच्यात आत्मविश्वास जागृत होतो. त्यामुळे आपल्यासोबत स्वतःच्या कुटुंबाला व पर्यायाने संपूर्ण समाजाला पुढे नेण्याचे सामर्थ्य महिलांमध्ये निर्माण होते. 'चूल व मूल' या पारंपरिक चौकटीतून स्त्रिया बाहेर पडून विकासाच्या प्रवाहात सहभागी होत आहेत. यासर्वामुळे स्वयंसहाय्यता समूहाची चळवळ म्हणजे महिलांच्या विकासाचे एक आंदोलन ठरत आहे.

भारतीय राज्यघटनेद्वारे देशातील स्त्रियांना सर्व क्षेत्रात समानता उपलब्ध करून दिली. त्यामुळे अनेक क्षेत्रात सामाजिक, आर्थिक व राजकीय परिवर्तनाच्या प्रक्रिया सुरू झाल्या. त्यात १९९३ च्या ७३ व ७४ व्या घटनादुरूस्तीने तर अधिकच भर घातली. या घटनादुरूस्तीने स्थानिक स्वराज्य संस्था व पंचायत राजव्यवस्थेमध्ये महिलांना ३३ टक्के आरक्षण उपलब्ध करून दिले. महाराष्ट्र सरकारने २०११ मध्ये हे आरक्षण ५० टक्के केल्याने फार मोठ्या प्रमाणात महिलांचे राजकीय समावेशन या बदलामुळे झाले. महाराष्ट्रात स्वयंसहाय्यता समूहातील महिलांनी या बदलत्या राजकीय प्रवाहाचा पूरेपूर लाभ घेतला. स्वयंसहाय्यता समूहातील महिला पंचायत राजव्यवस्थेत मोठ्या प्रमाणात राजकीय नेतृत्व प्राप्त करताना दिसत आहेत. केवळ राजकीय पार्श्वभूमी असलेल्या घराण्यातील महिलाच निवडणूकीत सहभाग घेतात व निवडून येतात अशी महिलांच्या राजकीय सहभागाबाबत टीका होत होती. आज मात्र स्वयंसहाय्यता समूहातील

महिलांनी हा पायंडा बदलून टाकला आहे. अगदी सर्वसामान्य कुटुंबातील महिलांचे नेतृत्वही स्वयंसहाय्यता समूहांमुळे जोमदारपणे पुढे येऊन प्रस्थापित होत आहे. स्थानिक स्वराज्य संस्था व पंचायत राज व्यवस्थेवर तर या महिला मोठ्या आत्मविश्वासाने व धिटाईने कारभार करून लोकशाही प्रक्रिया बळकट करीत आहेत.

**स्वयंसहाय्यता समूह : अर्थ व स्वरूप**

जेव्हा एखादी व्यक्ती स्वतःच्या किंवा गटाच्या व्यक्तिगत किंवा सामूहिक अडचणी दूर करण्यासाठी, गरजा भागविण्यासाठी किंवा आपल्या आकांक्षेच्या पूर्ततेसाठी काही कृती करते, त्याला स्वयंसहाय्यता कृती म्हणतात. अर्थातच ती कृती स्वयंस्फूर्त असावी म्हणजे ती स्वतःला सुचलेली, पटलेली, कराविशी वाटणारी असावी. दुसऱ्या व्यक्तीने लादलेली नसावी. म्हणजेच ती कृती बोजा न वाटता आवडीने केली जाते. अशा व्यक्ती जेव्हा एकत्र येतात आणि एकमेकांच्या अडचणींवर स्वतःच उपायकृती करतात तेव्हा त्याला स्वयंसहाय्यता समूह असे म्हणतात. येथे स्वतःच स्वतःला सहाय्य करून आकांक्षापूर्ती करणे महत्त्वाचे आहे. 'स्वयं सहाय्य समूह' या संकल्पनेची नेमकी व्याख्या करणे कठीण बाब आहे. या समूहाचे विविध पैलू म्हणून त्याच्या व्याख्याही विविध आहेत. या समूहाकडून वेगवेगळ्या अपेक्षा वेगवेगळ्या योजना व प्रकल्पातून केल्या जातात. तद्वतच त्या-त्या वेळी व्याख्याही वेगवेगळ्या केल्या जातात. स्वयंसहाय्यता समूहाच्या काही महत्त्वाच्या व सर्वस्पर्शी व्याख्या पुढीलप्रमाणे आहेत.

''उत्तम जीवनमानाकडे वाटचाल करण्याच्या ध्येयाने महिलांनी परस्पर सहकार्यातून चालविलेला समूह म्हणजे स्वयंसहाय्यता समूह होय.''

''नियमितपणे केलेल्या अल्पबचतीतून, आर्थिक सहाय्य करण्यासाठी, बीज भांडवल उभे करण्यासाठी, संघटन शक्ती वाढविण्यासाठी, परस्परांच्या सहकार्याने, सभासदांच्या नेतृत्वाने तयार झालेला गट म्हणजे स्वयं सहाय्यता गट असे म्हणता येईल.''

''स्वयंसहाय्यता गट म्हणजे निश्चित स्वरूपाचे सामुदायिक उद्दिष्ट घेऊन तयार केलेली लोकांची स्वयंसेवी संघटना होय.''

''बचत गटांनाच स्वयं सहाय्य गट असेही म्हटले जाते. स्वयं सहाय्य गट म्हणजे आपणच आपल्या आधारासाठी स्थापन केलेला गट होय.''

''मौद्रिक अभिसरणाच्या निमित्ताने समूहात एकत्र येऊन सामुदायिक बुद्धिमत्तेच्या वापरातून विविध प्रश्नांची विवेकपूर्ण सोडवणूक करणाऱ्यांना नामी संधी देणारा मंच म्हणजे बचतगट होय.''

बचत गटामध्ये महिला एकत्र येऊन निर्णय घेतात. ते निर्णय त्यांच्या कल्याणासाठी असतात. त्यामध्ये कुणा एकाची मक्तेदारी नसते. तर सामूहिक अधिकार असतो. त्यातून सामूहिक विकासाचा मंत्र जपला जातो. बचतगटांतून समानतेची, सहभागाची जपवणूक होते. ही लोकशाही मूल्यांना पूरक व पोषक आहे. त्यामुळे बचत गटांना लोकशाहीचे दुसरे रूप म्हटले जाते. या वैशिष्ट्यावरून असे म्हणता येईल, ''महिलांनी, महिलांच्या विकासासाठी, महिलांमार्फत चालवली जाणारी प्रभावी व सुनियोजित आर्थिक संरचना म्हणजे बचतगट होय.''

स्वयंसहाय्यता समूह महिलांना स्वावलंबी बनविण्याचे एक साधन आहे. या समूहामुळे समाज व राष्ट्रविकासात महिलांना मोठी चालना मिळत आहे. प्रत्येक गावात व शहरांमध्ये स्थापित झालेले बचत गट म्हणजे महिलांना सशक्त, सबळ व सक्षम होण्याचे एक वरदान आहे. स्वयंसहाय्यता गट म्हणजे परावलंबनातून स्वावलंबनाकडे, स्वावलंबनातून परस्परावलंबनाकडे जाण्याकरिता स्वेच्छेने, सहमतीने एक विचाराने एकत्र येऊन स्थापन केलेला महिलांचा गट होय. वरील व्याख्यांवरून असे म्हणता येईल की, महिलांनी स्वतःच्या आर्थिक समस्येच्या निराकरणासाठी परस्पर सहकार्यातून निर्माण केलेला समूह म्हणजे स्वयंसहाय्यता समूह होय. या व्याख्यांवरून स्वयंसहाय्यता समूहाची विभिन्न वैशिष्ट्ये दिसून येतात.

**स्वयंसहाय्यता समूहाची वैशिष्ट्ये :**

स्वयंसहाय्यता समूह हे महिलांसाठी सर्वांगीण विकासाचे एक मुख्य साधन आहे. समान गरजा, समान उद्दिष्टे, सारख्याच विचारांचे लोक एकत्र येऊन स्वतःच्या विकासाबरोबर गटांचा पर्यायाने समाजाचा समूह शक्तीच्या जोरावर विकास करण्याकरिता एकत्र येऊन गटाची बांधणी करून त्या माध्यमातून सर्वांगीण प्रगती करतात. यामधून महिलांच्या सामूहिक शक्तीचे दर्शन होते. याकरिता स्वयंसहाय्यता गट एक व्यासपीठ आहे. या समूहांची सामाजिक, आर्थिक व राजकीय वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील:

**१) समान गरजा व उद्दिष्टे:**

स्वयंसहाय्यता गटात सर्व सभासदांच्या गरजा व उद्दिष्टे याबाबत समानता किंवा साधर्म्य असणारे लोक एकत्र येतात. समान विचार व गरजांमुळे गटबांधणी होऊन गटाचा विकास होतो. त्यामुळे सभासदांच्या गरजांची पूर्तता होऊ शकते. म्हणून गटातील सभासद समानतेला महत्त्व देणारे असतात. तसेच गटातील सभासदांचा आर्थिक, सामाजिक स्तर सारखाच असतो. सर्व सभासदांची उद्दिष्टे समान असतात, म्हणून सर्वांचा समान फायदा होतो.

**२) समानता तत्त्व :**

भारतीय लोकशाहीतील समानता तत्त्वाचे पालन स्वयंसहाय्यता समूहामध्ये होते. ही समानता वय, व्यवसाय, वस्ती, वावर, लिंग, भाषा, प्रश्न, सुखदुःखे इत्यादी बाबत असते. या समूहातील सूक्ष्म सहकार सर्वांना बरोबर घेऊन जाणारा असतो. म्हणजेच समानतेचे रक्षण स्वयंसहाय्यता गटात होत आहे.

**३) एकात्मतेची भावना :**

स्वयंसहाय्यता समूहातील महिला सदस्या एकाच ठिकाणी राहणाऱ्या परंतु परस्परांशी फारशी जवळीक नसली तरी एकमेकांबद्दल या भावनेने आस्था, आदर, आपुलकी असणाऱ्या तसेच भावनिक संबंध, बांधिलकीची भावना, एकीसाठी सर्व व सर्वांसाठी एक, एकमेकास साह्य, मदत करतात. त्यामुळे सभासदांमध्ये एकात्मतेची भावना वृद्धिंगत होऊन समाज एकजुटीने राहू शकतो.

**४) स्वशक्ती व समूहशक्तीची जाणीव:**

स्वयंसहाय्यता गटाच्या माध्यमातून महिला एकत्र येतात, एकजूट करतात. त्यामुळे स्वशक्तीच्या बळावर आपले प्रश्न त्यांना सोडविता येतात. त्याचप्रमाणे संघप्रक्रियेतून समूहशक्तीचे दर्शन समाजाला होते. समूहशक्ती बचतगटामुळे प्रबळ बनते.

**५) सामुदायिक निर्णय व कृती:**

स्वयंसहाय्यता समूहातील महिला व्यवहार, समस्या आणि कामकाज याबाबत एकत्र येऊन निर्णय घेतात आणि सामुदायिक कृती करून अंमलबजावणी करतात, विचारांची सल्लामसलत करून कृती करतात.

**६) हक्काचे व्यासपीठ:**

स्वयंसहाय्यता समूह हे महिलांना एकत्रित करण्याचे माध्यम असून महिलांच्या कलागुणांना वाव आणि वक्तृत्वाला संधी देणारे, विचारांचे प्रबोधन करणारे तसेच समाजाचे सर्वांगीण प्रबोधन करणारे महिलांचे हक्काचे व्यासपीठ आहे.

**७) विश्वासाचे प्रतीक :**

स्वयंसहाय्यता समूह हे एकमेकांच्या विश्वासाने चालणारे प्रतिक आहे. सर्व सभासद एकमेकांना विश्वासात घेतात. कोणीही कोणाची फसवणूक करीत नाही. गटातील सर्व महिला विश्वासाने व्यवहार करतात. महिलांच्या विश्वासाचा फायदा बचत गटांना तर होतोच शिवाय त्यामुळे या महिलांमध्ये विविध गुणांची वृद्धी होते.

**८) सुरक्षितता :**

स्वयंसहाय्यता गटातील सभासद अन्यायास प्रतिकार करण्यासाठी एकत्र येतात. त्यामुळे समाजात स्त्रीला सुरक्षितता प्राप्त होते. स्वयंसहाय्यता समूहाच्या सभासदाला व व्यवसायाला विम्याचे कवच असते. तसेच त्यांच्या उत्पादनाला सुरक्षित बाजारपेठा मिळू शकतात.

**९) मुक्त अभियान :**

स्वयंसहाय्यता समूह चळवळ अनौपचारिक असून त्याची कोठेही अधिकृत नोंदणी करावी लागत नाही. तसेच गटस्थापनेसाठी अधिकृत नियमावली नाही. स्वयंसहाय्यता समूहात कोणीही सदस्य होऊ शकतात. तसेच समूहाची स्थापना, निर्मिती प्रक्रियेत कोणालाही सक्रीय होता येते. नवीन बचत गटाची निर्मिती करताना गटाचे सदस्य परस्परांना व्यक्तिगत मार्गदर्शन करू शकतात.

**१०) समाज परिवर्तनाचे साधन :**

समाजातील ५०% असलेल्या महिला वर्गाचे फार मोठे परिवर्तन स्वयंसहाय्यता समूहांमुळे होते. या समूहांच्या माध्यमातून समाजातील विविध घटकातील, सर्व जाती धर्मातील, तळागाळातील, उपेक्षित व मागास महिलांचा कौटुंबिक, व्यावसायिक, शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक व राजकीय विकास होतो.

पर्यायाने समाज आणि देशाच्या परिवर्तनात या समूहांची उपयोगिता सिद्ध होते. त्यामुळे स्वयंसहाय्यता समूहांना समाज परिवर्तनाचे एक प्रभावी साधन मानले जाते.

**११) नीतीमूल्यांवर भर :**

स्वयंसहाय्यता समूहामध्ये गटात सर्व सभासद आपापली नीतीमूल्ये जपत असतात. तसेच गटांची नीतीतत्त्वे व प्रणाली जपतात. यामधून आदर्श व्यक्तिमत्त्व घडण्यास मदत होऊन मूल्याधिष्ठित समाजाची निर्मिती होते.

**१२) स्वेच्छा सभासदत्व :**

स्वयंसहाय्यता गटात सर्वांना स्वेच्छा सभासदत्व असते. बचत गटात येण्यास कोणालाही सक्ती, जबरदस्ती केली जात नाही. सर्वजण स्वेच्छेने व स्वखुषीने सभासदत्व स्वीकारतात. फक्त सहयोगी प्रबोधन करतात. म्हणजे सभासदत्वासाठी कोणत्याही प्रकारची अट नसते.

**१३) काटकसर वृत्ती:**

स्वयंसहाय्यता गटातील सदस्य हे आर्थिकदृष्ट्या कमकुवत असतात. आपल्या दैनंदिन उत्पन्नातून थोडीफार काटकसर करून बचत करतात. कारण उत्पन्न साधने मर्यादितअसतात. त्यातून काटकसर वृत्ती जोपासली जाते. हे स्वयंसहाय्यता समूहाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य मानले जाते.

**१४) सभासद संख्या**

स्वयंसहाय्यता गटातील सभासद संख्या १० ते २० एवढीच असते. २० पेक्षा जास्त सभासद असतील तर कंपनी कायद्यानुसार नोंदणी करणे सक्तीचे असते. तसेच १० पेक्षा कमी सभासद असल्यास गटाचा पुरेसा निधी साधनसूचित जमा होत नाही.

**१५) आर्थिक देवाणघेवाण :**

स्वयंसहाय्यता समूहात सर्व सभासद समान बचत जमा करतात. दरमहा जमा बचतीतून कर्ज व्यवहार करतात. त्यातून व्यवसाय निर्माण करतात. व्यवसायातून बचत करतात. त्यातून गटाची पतनिर्मिती करतात. तसेच बँका गटांना कर्जव्यवहारास मदत करतात. व्याजाची आकारणी करतात म्हणजे गटात मनव्यवहाराबरोबर आर्थिक व्यवहार केले जातात. त्यामुळे स्वयंसहाय्यता गट आर्थिकदृष्ट्या सक्षम बनतात.

**१६) रोखीचा व्यवहार :**

स्वयंसहाय्यता गटातील बचत आणि कर्ज व्यवहार रोखीने केले जातात. त्यामुळे व्यवहारात पारदर्शकता येते. रोखीच्या व्यवहारामुळे स्वयंसहाय्यता समूहातील सर्व सभासदांना व्यवहाराचे ज्ञान प्राप्त होते.

**१७) लाभाचे समान वाटप :**

स्वयंसहाय्यता समूहामध्ये व्याजस्वरूपात व व्यवसायरूपात नफा प्राप्त होऊन गटास लाभांश प्राप्त होतो. या लाभांश रकमेचे वाटप समान पद्धतीने केले जाते. लाभांशाचे वाटप करण्याचे बंधन गटावर असत नाही. सभासदांच्या इच्छेनुसार लाभांशाचे वाटप करतात.

**१८) स्वनिर्मित व लवचिक नियमावली :**

स्वयंसहाय्यता गटाची स्थापना, दैनंदिन कामकाज, संघटिका आणि सहसंघटिका यांची निवड इत्यादी बाबत शासकीय नियमावली नसते. प्रत्येक गटाने आपली नियमावली परिस्थितीनुसार बनवलेली असते. त्या नियमावलीत गरजेनुसार लवचिकता आणली जाते. गटाने स्वतः नियमावली तयार केलेली असल्यामुळे त्यात बदल करता येतो. सदर नियमावली अतिशय लवचिक असते.

**१९) सहकाराचे प्रशिक्षण**

स्वयंसहाय्यता गटाचे कार्य सहकार तत्त्वावर आधारित असते. सहकाराप्रमाणे व्यावसायिक शिक्षण प्रशिक्षण देण्यात येते. सभासदांचे सतत प्रबोधन केले जाते. त्यांच्यामध्ये एकीची भावना निर्माण होते. सहकाराच्या शिक्षणामुळे व्यावसायिक वृद्धी होते. त्यामुळे सहकार वृत्ती वाढीस लागते.

**२०) सहकारांतर्गत सहकार :**

बचत गटाची चळवळ हे सहकाराप्रमाणे असून एकमेकास साह्य करणारी संघटना आहे. प्रत्येक गटाचे प्रत्येक गटाला सहकार्य मिळते तसेच सभासद संख्या मर्यादित असल्यामुळे सभासदांमध्ये सहकार्याची भूमिका असते. गटाचे कामकाज चालविण्यासाठी संघटिका व सहसंघटिका यांना गट सदस्यांकडून सहकार्य लाभते.

**२१) लोकशाही संघटन :**

स्वयंसहाय्यता समूह हे लोकांनीच लोकांकरिता चालविलेले असतात. त्यामुळे हे समूह लोकशाही संघटन ठरतात. शिवाय या समूहांच्या संघटिका, सहसंघटिकांची निवड लोकशाहीप्रमाणे होते. सभासदाच्या मताला फार महत्त्व असते. सभासदांचे भांडवल, धर्म, जात, वर्ण, वंश या घटकांना अजिबात थारा नसतो. गटातील सर्व कारभार व निर्णय, कृती सर्वानुमते केली जाते. प्रत्येक सभासदाच्या मताची कदर केली जाते. या पद्धतीने स्वयंसहाय्यता समूहांमध्ये लोकशाही मूल्ये जोपासली जातात.

**२२) नेतृत्व :**

महिलांच्या नेतृत्व गुणांचा विकास हे स्वयंसहाय्यता समूहाचे सर्वात महत्त्वाचे फलित आहे. स्वयंसहाय्यता गटाचे संघटिका व सहसंघटिका हे नेतृत्व करतात. शिवाय प्रत्येक सभासदास गटाचे नेतृत्व करण्याची संधी मिळते. तसेच प्रत्येकजण गटाचे व्यवस्थापन करून नेतृत्व स्वीकारतो. त्यामुळे स्वयंसहाय्यता समूहातील प्रत्येक व्यक्तीच्या नेतृत्व गुणांचा विकास होऊन राजकीय क्षेत्रात देखील ते स्वतःचे वलय तयार करतात. याच नेतृत्व गुणांच्या विकासामुळे स्वयंसहाय्यता समूहातील अनेक महिलांचे राजकीय क्षेत्रात समावेशन होऊन विभिन्न राजकीय पातळीवर या महिला नेतृत्व प्राप्त करतांना दिसून येतात.

**२३) लोकशाही मूल्यांची जपणूक:**

स्वयंसहाय्यता बचत गटांमध्ये धर्मनिरपेक्ष, सर्वानुमते निर्णय, प्रत्येकाच्या मतांची कदर, आदरभाव, समता, स्वातंत्र्य, न्याय ही लोकशाहीची मूल्ये जोपासली जातात. देशातील लोकशाहीची मूल्ये परिदृढ

करण्याच्या दृष्टिकोनातून स्वयंसहाय्यता समूहांची उपयोगिता महत्त्वपूर्ण आहे. शिवाय स्वयंसहाय्यता समूहांमध्ये महिलांची संख्या जास्त असल्यामुळे सुसंस्कृतपणा जोपासला जातो.

**२४) राजकीय व धार्मिक तटस्थता :**

स्वयंसहाय्यता बचत गटात सर्व समान असतात. सर्वांना समान लाभ असतो. त्यामुळे राजकीय प्रभाव आणि धार्मिक दडपणास स्वयं सहाययता गट बळी पडत नाहीत.

**२५) दबावगट :**

स्वयंसहाय्यता गटात सर्वाधिक महिला संख्या असून प्रत्येक वाडी-वस्तीवर गटांची निर्मिती होत आहे. शिवाय गटातील सर्व सभासद लवकर एकत्र जमा होतात. कारण मर्यादित सभासदामुळे तोंडी निरोप दिले तरी जमा होतात. त्यामुळे समाजातील अपप्रवृत्तीला आळा बसतो. समाजात बचत गटांच्या दबावगटामुळे महिलांवरील अत्याचार कमी होत आहेत.

बचत गटांच्या वरील वैशिष्ट्यांवरून असे स्पष्ट होते की बचत गट हे महिलांच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय सक्षमीकरणाकरिता अत्यंत उपयोगी साधन आहे. बचत गटाच्या चळवळीमुळे अनेक महिला राजकीय क्षेत्रातही आपले स्थान पक्के करतात. बचत गटातील वातावरण महिलांच्या राजकीय व्यवस्थेतील सहभाग व विकासासाठी पोषक ठरत आहे. त्यामुळे महिलांचा राजकारणातील सहभाग दिवसेंदिवस वाढत आहे. बचत गटामुळे महिलांना प्रत्यक्ष निर्णय-निर्धारण प्रक्रियेत सहभागी होण्याची संधी प्राप्त होत असते. एकंदरित महिलांच्या राजकीय नेतृत्व विकासासाठी व प्राप्तीसाठी स्वयंसहाय्यता समूह अत्यंत महत्त्वाची भूमिका पार पाडत आहेत.

**आदर्श स्वयंसहाय्यता समूहाचे निकष :**

स्वयंसहाय्यता समूहाच्या दर्जा निश्चितीस खास महत्त्व देतांना उत्तम गटाचे काही निकष ठरवून देण्यात आलेले आहेत. त्या निकषाप्रत स्वतःला नेणारे प्रयत्न बचत गटाने संघटितपणे करावेत ही अपेक्षा आहे. सदर निकषाची यादी पुढीलप्रमाणे आहे.

१) लोकशाही संचालन
२) सामुदायिक निर्णय
३) उचित प्राधान्यक्रम
४) बैठक व बचत सातत्य
५) नोंदणी व परतफेड
६) उपक्रमात सहभागिता
७) पारदर्शिकता - स्वच्छ कारभार
८) साक्षरता दर
९) जबाबदारीचे वहन
१०) प्रभावी नेतृत्व
११) अनुभव देवघेव
१२) विस्तार उपक्रम
१३) भावी नियोजन
१४) संकटकालीन तरतूद
१५) दखल किंवा मान्यता

**स्वयंसहाय्यता समूहाची रचना :**

समान गरजा असलेल्या व्यक्तिनी एकत्र येऊन समान आर्थिक उद्दिष्टे व सामाजिक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी एकाच भागातील लोकांनी एकत्रितपणे स्वयंसहाय्यता समूहाची रचना करायची असते. साधारणतः स्वयंसहाय्यता समूहाच्या रचनेमध्ये महिलांचा सहभाग जास्त असतो. एकाच गावातील किंवा वाडीवस्तीवरील समान सामाजिक, आर्थिक स्तरामधील समविचारी तसेच समान गरजा असणाऱ्या महिला स्वयंसहाय्यता गटाची स्थापना करतात. यामध्ये काही गट हे पुरूषांचे तर सर्वाधिक गट हे महिलांचे असतात. बचतीच्या माध्यमातून बचत गटातील स्त्रिया एकत्र येतात व त्याच बचतीच्या माध्यमातून इतर महिलांच्या गरजा व अडचणी सोडविण्यासाठी कर्जस्वरूपात अर्थसहाय्य करतात.

स्वयंसहाय्यता समूहाची स्थापना १० ते २० सदस्यांकडून केली जाते. या समूहातील महिलांची आर्थिक परिस्थिती साधारणतः समान असते. गरीबीचे दुष्टचक्र दूर करण्यासाठी ह्या महिला सामुहिक शक्तीच्या जोरावर परस्परांना मदत करतात.स्वयं सहाय्यता समूहाच्या स्थापनेकरिता किमान सभासद संख्या जरी १० असली तरी पहाडी क्षेत्र, वाळवंटीय प्रदेश, अवर्षणग्रस्त प्रदेश, कमी लोकसंख्येच्या प्रदेशात तसेच अपंग व्यक्तिकरिता ही किमान सभासद संख्या ५ आहे. स्वयंसहाय्यता समूहाच्या रचना निर्मितीत अनेक शासकीय तसेच गैरशासकीय संस्था सहभागी होत असतात. सामाजिक एकजुटता, प्रशिक्षण, क्षमता निर्माण या माध्यमातून स्वयंसहाय्यता समूहाचे गठन करण्यात येते. स्वयंसहाय्यता समूहाच्या माध्यमातून स्थानिक गरजांच्या पूर्तीसाठी कौशल्यविकासावर भर दिला जातो. भारतात सुवर्ण जयंती ग्रामीण स्वयंरोजगार योजनेमार्फत ज्या स्वयंसहाय्यता समूहाची स्थापना करण्यात येते त्या समूहातील सभासदांची नावे ग्रामसभेद्वारे घोषीत दारिद्र्य रेषेखालील यादीत असणे गरजेचे आहे. १२ स्वयंसहाय्यता समूहाची रचनानिर्मिती करताना सुरूवातीला समविचारी व्यक्ती निवडाव्यात, त्यांच्यासमोर बचतगटाचा विचार मांडावा, बचत गटाबद्दल सविस्तर माहिती त्यांना द्यावी. एकंदरित स्वयंसहाय्यता समूहाबाबत त्यांच्यात जागृती निर्माण करावी. सभासद शक्यतो स्थानिक असावेत तसेच कुठल्याही वित्तीय संस्थांचे ते थकबाकीदार नसावेत. सभासद सज्ञान असावेत, ते समूहांमध्ये स्वयंस्फुर्तीने सहभागी झालेले व शिस्तीचे पालनकर्ते असावेत. त्यांना बचतगटात नेमके काय कार्य करावयाचे आहे याबाबत जाणीव असावी. नेतृत्वगुण लक्षात घेऊन सभासदांमधून बचतगटाचा प्रमुख निवडावा त्याला सहकार्य करणारा सहसंघटक तसेच सचिवाचीही निवड करावी. बँकेशी संपर्क साधून आपल्या गटाच्या कार्यप्रणालीविषयी, ध्येय- धोरणांविषयी, उद्दिष्टांविषयी तसेच बचतीद्वारे जमा होणारी रक्कम आणि तिचा विनियोग या विषयीची संपूर्ण कल्पना या संबंधित व्यक्तिनी बँक अधिकाऱ्यांना द्यावी. बँकेत खाते उघडून आठवड्यास, पंधरा दिवसांनी किंवा दर महिन्यास ज्याप्रमाणे शक्य होईल त्याप्रमाणे बचत सुरू करावी. त्यानंतर कर्ज वितरणासाठी व्याजाचे दर, मागणी अर्ज, जामिनकी विषयीची कागदपत्रे इत्यादी निश्चित करावेत. बचत गटाचे शिक्केही घेणे गरजेचे असते.

बचत गटाचे कामकाज करत असतांना गटाचे पदाधिकारी महत्त्वपूर्ण भूमिका बजावत असतात. त्यांना गटाचे नेतृत्व करायचे असल्याने त्यांची निवड सर्वानुमते होत असते. बचत गटाच्या नेतृत्वाची निवड ही

लोकशाही पद्धतीनुसार क्षमता व जाणीव असलेल्या महिलांमधून केली जाते. बचत गटाच्या विकासाकरिता गटांच्या नेत्यांमध्ये साधारणपणे पुढील गुण असावेत.

- स्वयंशिस्तता व निर्णयक्षमता असावी.
- गट व समाजाभिमुख गरजेचे ज्ञान त्यांच्याकडे असावे.
- त्यांची वर्तणूक चांगली असावी.
- गटकार्यामध्ये इतर सभासदांकरिता स्वतःच्या प्रतिष्ठेचा त्याग करणारे असावेत.
- सहनशिलता असावी.
- गटाचे नियम, अटी व गरजा कालपरत्वे बदलणारे असावेत.
- त्यांनी गटातील सदस्यांमध्ये भेदाभेद न करता एकतेची भावना निर्माण करावी.
- गटाच्या विकासाकरिता सतत प्रयत्नशिल राहणारे असावेत.

साधारणतः वरील गुणधर्म असणाऱ्या व्यक्तिमधून एकाची अध्यक्ष, एक उपाध्यक्ष, एक सचिव व आवश्यकतेनुसार एकाची खजिनदार म्हणून निवड करावी लागते.

**स्वयंसहाय्यता समूहाच्या नेतृत्वाची जबाबदारी व कर्तव्ये :**

स्वयंसहाय्यता समूहाच्या नेत्यांना विविध स्वरूपाची जबाबदारी व कर्तव्ये अतिशय कटाक्षाने पार पाडावी लागतात. तोच बचत गटाच्या विकासाचा खरा आधार आहे.

कोणत्याही गटाची यशस्विता ही त्या गटाच्या नेतृत्वावर अवलंबून असते. बचत गटाच्या नेत्याला अनेक जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात. त्यामध्ये गटातील इतर सदस्यांनाही समाविष्ट करून त्यांचाही विकास त्या माध्यमातून घडवून आणला जातो. गट नेतृत्वाला पुढील जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात.

- स्वयंसहाय्यता समूहाच्या विकासाचे निरिक्षण करणे आणि गटाचे ध्येय गाठणे.
- बचत गटाच्या सदस्यांकडून नियमांच्या अंमलबजावणी संदर्भात खात्री करणे.
- गटचर्चा, निर्णयप्रक्रिया व गटकार्यात बचत गटातील सर्व सदस्यांना सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करणे.
- स्वयंसहाय्यता समूह संदर्भात नवीन संकल्पनांची गटातील सर्व सदस्यांना ओळख करून देणे.
- वैयक्तिक व गटकार्याचा अहवाल गटासमोर सादर करणे.
- विशेष प्रसंगी आपल्या बचत गटाचे सादरीकरण करणे.

**स्वयंसहाय्यता समूहाच्या नेतृत्वाची कर्तव्ये**

स्वयंसहाय्यता समूहाच्या नेतृत्वाला अनेक जबाबदाऱ्यांसोबतच विभिन्न कर्तव्ये देखील पार पाडावी लागतात. ती कर्तव्ये पुढीलप्रमाणे आहेत.

- स्वयंसहाय्यता समूहाच्या सभा आणि सत्राचे आयोजन करणे.
- स्वयंसहाय्यता समूहाच्या सभेचे संचालन करणे.
- स्वयंसहाय्यता समूहाच्या चर्चेत व निर्णयप्रक्रियेमध्ये सर्व सदस्यांना सहभागी करून घेणे.
- सर्व सदस्य व इतर पदाधिकारी योग्यरित्या कार्य करतात की नाही याची चाचपणी करणे. त्याकरिता त्यांना प्रोत्साहन देणे.
- गटातील सर्व सदस्य आपला बचत निधी नियमितपणे जमा करतात की नाही याची खात्री करणे.
- गटातील सर्व सदस्यांना कामाचे समान वितरण करणे.
- बचत गटामध्ये कामाचे नियोजन योग्यरित्या होते की नाही याची खात्री करणे.
- गटातील सर्व सदस्यांमध्ये सुसंवाद घडवून आणणे.
- सभेच्या दरम्यान गटाच्या कार्याचे सादरीकरण करणे.
- बँकेच्या व्यवहारासंदर्भात सभेमध्ये चर्चा घडवून आणणे व बँकेच्या व्यवहारासंबंधित लेखाजोखा योग्यरित्या आहे अथवा नाही याची खात्री करणे.
- गटकार्याच्या सर्व नोंदी व्यवस्थित ठेवणे.
- बचत गटाच्या कार्याची व सभेची नियमावली तयार करणे.

बचत गटाच्या नेतृत्वाला वरील जबाबदाऱ्या व कर्तव्ये पार पाडावी लागतात. त्यासाठी लागणारी कौशल्ये त्यांनी अवगत केलेली असावीत. बचत गटातील सदस्यांमध्ये नेतृत्वाची जबाबदारी आळीपाळीने सांभाळावी लागत असल्याने अनेक गुणांचा विकास त्यांच्यामध्ये होतो. या गुणांच्या आधारावर बचत गटातील अनेक महिला विविध क्षेत्रासोबत राजकीय क्षेत्रात सुद्धा उल्लेखनीय कार्य करतांना दिसतात.

**स्वयंसहाय्यता समूहाची नियमावली :**

कुठलाही संघ, संस्था यशस्वीपणे चालविण्यासाठी त्यांची काही उद्दिष्टे निश्चित असावी लागतात. त्या अंतर्गत कार्य करणाऱ्या विविध घटकांमध्ये काही नियम असावे लागतात. त्या नियमांच्या आधारे अपेक्षित ध्येयापर्यंत पोहचणे सुलभ होते. बचत गट देखील एक संस्था आहे. ती व्यवस्थित चालविण्यासाठी निश्चित स्वरूपाची नियमावली असणे गरजेचे असते. गटातील सर्व सदस्यांना मान्य असेल अशा स्वरूपाची नियमावली तयार करून तीची स्वतंत्ररित्या नोंद घेणे गरजेचे असते. यामधील नियमांचे पालन स्वयंसहाय्यता

समूहातील सर्व पदाधिकारी व सदस्यांनी करणे आवश्यक असते. साधारणतः स्वयंसहाय्यता समूहांना पुढील नियमांचे पालन करावे लागते.

**स्वयंसहाय्यता समूहासाठी मार्गदर्शक नियम :**

प्रत्येक स्वयंसहाय्यता समूहाने आपल्या आवश्यकतेप्रमाणे हा तपशिल ठरवावा.जसे -

- स्वयंसहाय्यता समूहाचे नाव
- स्वयंसहाय्यता समूहाचा संपर्कासाठी पत्ता
- बचत गटाच्या मासिक बैठकीची तारीख, वेळ व स्थळ.
- सभासद होण्यासाठीच्या अटी
- अध्यक्ष, सचीव, संघटक यांच्या निवडीचे निकष व त्यांच्या निवडीचा कालावधी.

**स्वयंसहाय्यता समूहाची उद्दिष्टे :**

समाजाच्या विकासासाठी समाजातील प्रत्येक घटकाचा विकास व प्रत्येक घटकाला विकासाची समान संधी मिळणे आवश्यक आहे. विकासाच्या क्षेत्रात आज महिला मागे पडल्याचे दिसून येते. विकासाच्या संधीक्षेत्रात स्त्रिया जर मागे राहिल्या तर खऱ्या अर्थाने महिला- सशक्तीकरण होणार नाही. आजच्या कल्याणकारी राज्याच्या कल्पनेमुळे शासनाला समाजातील प्रत्येक घटकाच्या विकासाकडे लक्ष केंद्रीत करावे लागते. सरकारला याविषयीची जाणीव असल्यामुळे सर्व शासकीय योजना व कार्यक्रमामध्ये महिला विकासाकडे विशेष लक्ष पुरविले जाते. विशेषतः ग्रामीण विकास व स्वरोजगार याबाबत संबंधित सर्व कार्यक्रम व योजनांमध्ये महिलांच्या विकासावर लक्ष केंद्रीत करण्यात येत आहे. त्याकरिता विभिन्न योजनांमधून महिलांचे स्वयंसहाय्यता समूह स्थापन करून त्यांच्या सर्वांगीण विकासाकडे सरकार लक्ष पुरविते.एकंदरित महिला विकास हा घटक केंद्रीभूत ठेवून इतर अनेक उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी स्वयंसहाय्यता समूहाची स्थापना करण्यात आली आहे. ती उद्दिष्टे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) स्वयंसहाय्यता समूहातील सदस्यांचे आर्थिक व सामाजिक हित जोपासणे.

२) समूहातील सदस्यांच्या बचतीचे रक्षण करणे.

३) सदस्यांना पुरविलेली बचत आणि कर्ज सुविधा शाश्वत असणे.

४) स्वयंसहाय्यता समूहाच्या माध्यमातून लोकशाही पद्धतीने चालणारा, जबाबदार आणि उत्तरदायी समूह घटकांची निर्मिती करणे.

५) या समूहातील सर्व सदस्यांना आर्थिक व व्यावहारिकदृष्ट्या सक्षम बनविणे.

६) समूहातील सर्व सदस्यांमध्ये समानता निर्माण करणे.

भारतामध्ये बचत गटाच्या चळवळीत स्वयंसेवी संस्थांचे योगदान अतिशय महत्त्वाचे आहे. भारतात अनेक स्वयंसेवी संस्था बचत गटाचे कार्य करीत असल्यामुळे त्यांच्या अनुदान प्राप्त संस्था संख्येत तसेच अनुदान रकमेत वाढ होत आहे. स्वयंसेवी संस्था अनुदानाच्या अभिलाषेमुळे बचतगट निर्मितीची संख्या वाढवित आहेत. देशात स्वयंसहाय्यता समूहांना बँकेशी संलग्न करण्याच्या कार्यक्रमात स्वयंसेवी संस्थांचे योगदान महत्त्वपूर्ण असल्याचे दिसून येते. महाराष्ट्रात स्वयंसहाय्यता समूहाच्या चळवळीत देखील स्वयंसेवी संस्थांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. महाराष्ट्रात चैतन्य संस्था, अन्नपूर्णा महिला मंडळ, महिला बाल व ग्रामीण विकास मंडळ या स्वयंसेवी संस्थांचा नामोल्लेख आवश्यक ठरतो. चैतन्य संस्थेने ग्रामीण व आदिवासी भागात ही चळवळ जोमात चालविली आहे. राज्यातील स्वयंसहाय्यता समूहांच्या विकासासाठी चैतन्य संस्थेने 'चालना व्यासपीठ' प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी सुरू केले, चालनाच्या मार्फत स्वयंसहाय्यता गटांना सक्षम बनविण्यासाठी स्वगती प्रकल्प सुरू आहेत. राज्यातील अनेक स्वयंसेवी संस्था स्वयंसहाय्यता गट चळवळीला योग्य दिशा देण्याचे, सहभागीदारांच्या क्षमता वाढीसाठी प्रभावी प्रशिक्षण देण्याचे कार्य करीत आहेत. त्यामुळे महाराष्ट्रात स्वयंसहाय्यता समूह चळवळ सर्व भागात फोफावत आहे. या संस्था बचत गटांना अनेक सामाजिक उपक्रमात सहभागी करून घेतात. यासोबतच विभिन्न प्रशिक्षणातून बचत गटातील महिलांमध्ये नेतृत्व विकास, संघटन कौशल्य, वक्तृत्वकला, सादरीकरण, निर्णयक्षमता आदी गुणांचा विकास स्वयंसेवी संस्थांच्या मार्फत केला जातो. या गुणांमुळे बचत गटातील महिला राजकीय क्षेत्रात आपला ठसा उमटवितांना दिसत आहेत. यावरून महाराष्ट्रात स्वयंसेवी संस्थांमुळे बचत गटाच्या आर्थिक चळवळीला सामाजिक व राजकीय उपक्रमांची जोड प्राप्त होत असल्याचे दिसून येते.

महाराष्ट्रातील तेजस्विनी ग्रामीण महिला सक्षमीकरण योजना व उमेद योजना ही स्वयंसहाय्यता समूहातील महिलांच्या विकासासाठी एक व्यापक व सर्वसमावेशक अशी योजना आहे. या योजनेच्या पूर्ततेसाठी संपूर्ण महाराष्ट्रात १२० स्वयंसेवी संस्थांचे योगदान घेण्यात आले. या उपक्रमाच्या माध्यमातून महाराष्ट्र शासनाकडून ५० कोटी व आंतरराष्ट्रीय कृषी विकास निधी मार्फत ११५ कोटी वित्तसहाय्य स्वयंसेवी संस्थांमार्फत महाराष्ट्रातील महिला स्वयंसहाय्यता समूहांना करण्यात आले. ५८ स्वयंसेवी संस्था बचत गटातील महिलांच्या कौशल्य, क्षमता आदी गुणांच्या विकासाकरिता प्रशिक्षणाच्या माध्यमातून योग्य वातावरणाची निर्मिती करतात. त्यामधून इतर गुणांसोबत स्त्रियांच्या नेतृत्व गुणांचाही विकास होतो. नेतृत्व गुणांच्या विकासातून महिला राजकीय क्षेत्रात आपले स्थान परिपक्व करतात. त्याकरिता महिलांचे समूह तयार करून त्यामार्फत वेगवेगळ्या चळवळी राबविणे आवश्यक आहे. अशा चळवळीमधून महिलांना राजकीय प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी आधार मिळतो. बचत गटातील महिलांच्या विकासाकरिता अनेक स्वयंसेवी संस्था वेगवेगळ्या पातळीवर कार्य करीत असतात. त्यामुळे बचत गटातील महिलांना संभाषण कौशल्य, निर्णयनिर्धारण क्षमता व नेतृत्व विकासाची संधी त्यामधून प्राप्त होते.

### २.२.३ प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना :

कोणत्याही देशाच्या आर्थिक आणि सामाजिक विकासासाठी कौशल्य व ज्ञान या दोन प्रेरणादायी बाबी आहेत. सध्याच्या वैश्विक परिस्थितीमध्ये ज्या उदयोन्मुख अर्थव्यवस्थांकडे उच्च कौशल्य पातळी आहे ते देश कोणत्याही आव्हानांचा सामना करू शकतात. कोणत्याही देशामध्ये कौशल्य विकास कार्यक्रमासाठी मुख्यत: युवा पिढीवर लक्ष केंद्रीत केले जाते. या संदर्भात आपल्या देशाची स्थिती चांगली आहे. लोकसंख्येमधील एक मोठा गट कृतीशील आहे. यामुळे भारताला सुवर्ण संधी प्राप्त होते परंतु त्याचसोबत समोर मोठी आव्हाने देखील उभी ठाकतात. जेव्हा आपली लोकसंख्या विशेषत: युवा पिढी निरोगी, सुशिक्षित व कुशल होईल तेव्हाच आपल्या अर्थव्यवस्थेला याचा लाभ होईल. भारताकडे युवकांची संख्या अतुलनीय आहे ज्यामुळे भविष्यात सामाजिक व आर्थिक विकास वृध्दींगत होणे निश्चित आहे. आपल्या देशात ६०५ दशलक्ष लोकं २५ वर्षांपेक्षा लहान आहेत. रोजगारासाठी उपयुक्त कौशल्य प्राप्त करून युवा पिढी परिवर्तनाचे प्रतिनिधी होऊ शकतात. यामुळे फक्त त्यांचेच जीवन सुधारणार नाही तर दुसऱ्यांच्या आयुष्यात देखील ही युवा पिढी आमुलाग्र बदल घडवून आणू शकतात.

**उद्देश :**

२०१५ साली जाहीर झालेली प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना (पीएमकेव्हीवाय) ही युवकांच्या कौशल्य प्रशिक्षणासाठी एक मुख्य योजना आहे. या योजनेअंतर्गत, अभ्यासक्रमात सुधारणा, योग्य शिक्षण आणि प्रशिक्षित शिक्षकांवर अधिक लक्ष केंद्रीत करण्यात आले आहे. प्रशिक्षणामध्ये व्यवहार कुशलता व व्यवहार परिवर्तन याचा देखील समावेश आहे.

**अंमलबजावणी:**

कौशल्य विकास व उद्योग मंत्रालय राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळाच्या (एनएसडीसी) माध्यमातून या कार्यक्रमाची अंमलबजावणी केली जाते. या अंतर्गत २४ लाख युवकांना प्रशिक्षण कक्षेत आणले आहे. कौशल्य प्रशिक्षण नॅशनल स्किल कॉलिफिकेशन फ्रेमवर्क (एनएसक्यूएफ) व उद्योग द्वारा निश्चित केलेल्या मानदंडांवर आधारित असेल. या कार्यक्रमाअंतर्गत तृतीयपक्षी मूल्यांकन संस्थांनी केलेल्या मूल्यांकन व प्रमाणपत्रानुसार प्रशिक्षणार्थींना रोख पारितोषिक दिले जाईल. एनएसडीसीने वर्ष २०१३-१७ या कालावधीसाठी केलेल्या कौशल्य तूट अध्ययनाच्या माध्यमातून येणाऱ्या मागणीच्या आधारे कौशल्य प्रशिक्षण देण्यात येईल. केंद्र व राज्य सरकार, उद्योग आणि व्यावसायिक समूहांसोबत विचार विनिमय केल्यानंतर भविष्यातील मागणीचे आकलन केले जाईल. याकरिता, एक मागणी समूह मंच देखील सुरू करण्यात येत आहे. कौशल्य विकासाचे लक्ष्य निश्चित करतेवेळी नुकतेच लागू केलेले 'मेक इन इंडिया, डिजिटल इंडिया, राष्ट्रीय सौर ऊर्जा अभियान व स्वच्छ भारत अभियान' या कार्यक्रमांची मागणी देखील लक्षात घेतली जाईल.

**लक्ष समूह :**

प्रधानमंत्री कौशल्य विकास योजनेअंतर्गत श्रम बाजारात पहिल्यांदाच प्रवेश करणाऱ्यांवर मुख्यत्वे करून लक्ष केंद्रीत केले जाईल आणि विशेषत: १० वी व १२ वी नंतर शिक्षण अर्धवट सोडलेल्या विद्यार्थ्यांवर देखील लक्ष केंद्रीत केले जाईल. एनएसडीसीच्या प्रशिक्षण भागीदारांद्वारे या योजनेची अंमलबजावणी केली जाईल. सध्या अंदाजे २,३०० केंद्रांवर एनएसडीसीचे १८७ प्रशिक्षण भागीदार आहेत. या व्यतिरिक्त केंद्र व राज्य सरकारांशी संबंधित प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांना देखील या योजनेअंतर्गत प्रशिक्षणासाठी जोडण्यात येईल. पीएमकेव्हीवाय अंतर्गत सेक्टर कौशल्य परिषद व राज्य सरकारे देखील कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रमांची देखरेख करतील. योजनेअंतर्गत एक कौशल्य विकास व्यवस्थापन प्रणाली (एसडीएमएस) देखील स्थापन केली जाईल. जी सर्व प्रशिक्षण केंद्रांचा तपशील आणि प्रशिक्षण व अभ्यासक्रमाच्या गुणवत्तेची तपासणी करून त्याची नोंद करेल. जिथे शक्य असेल तिथे प्रशिक्षण प्रक्रियेमध्ये बायोमॅट्रिक प्रणाली व व्हिडिओ रेकॉर्डिगचा देखील अंतर्भाव करण्यात येईल. प्रशिक्षणार्थींकडून माहिती (फिडबॅक) जमा करण्यात येईल जी पीएमकेव्हीवाय योजनेच्या परिणामकारकतेच्या मूल्यांकनाचा मुख्य आधार असेल. तक्रारींच्या निवारणासाठी एक प्रभावी तक्रार निवारण प्रणाली देखील सुरू केली आहे .याव्यतिरिक्त कार्यक्रमाच्या प्रचार-प्रसारासाठी एक ऑनलाईन नागरिक पोर्टल देखील सुरू केले आहे .कौशल्य मेळाव्यांच्या माध्यमातून युवकांना संघटीत केले जाईल आणि यासाठी स्थानिक पातळीवर राज्य सरकारं, स्थानिक संस्था, पंचायती राज संस्था व समुदाय आधारित संस्थांची मदत घेतली जाते.

कौशल्य व उद्योग विकास याचा समावेश वर्तमान केंद्र सरकारच्या प्राधान्य सूचित आहेत. 'मेक इन इंडिया' अभियानाचे लक्ष्य साध्य करण्यामध्ये नवीन स्थापित कौशल्य आणि उद्योग विकास मंत्रालयाची भूमिका महत्वपूर्ण आहे. भारताला एक निर्मिती केंद्र म्हणून उदयाला येण्यासाठी हे अभियान महत्वपूर्ण आहे. विकसनशील अर्थव्यवस्थेमध्ये निर्मिती क्षेत्रासह सर्व क्षेत्रांच्या मागणीनुसार प्रशिक्षित मनुष्यबळ तयार करण्यामध्ये या मंत्रालयाची भूमिका महत्वपूर्ण आहे. यासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व उपयुक्त उपाययोजनांना समाविष्ट करून घेण्यासाठी एक नवीन राष्ट्रीय कौशल्य व उद्योग विकास धोरण देखील तयार करण्यात आले आहे. या धोरणाच्या माध्यमातून उच्च दर्जाच्या मनुष्यबळाचा विकास करण्याच्या दिशेने रुपरेखा तयार करण्यात येत आहे.

२०१५ ते २०२२ दरम्यान या योजनेचे तीन टप्पे पूर्ण झाले आहेत. अंदाजित एक कोटी सदतीस लाख तरुणांना कौशल्य प्रशिक्षण देण्यात आले आहे आणि सुरवातीपासून योजनेची अंमलबजावणी करत असताना समोर आलेल्या आव्हानांचा अभ्यास करून या योजनेचा चौथा टप्पा ''स्किल इंडिया प्रोग्राम'' या नावाने प्रधान मंत्री कौशल्य विकास योजना ४.० नावाने सुरु करण्यात आला आहे.या योजनेचा चौथा टप्प्याची २०२२ ते २०२६ या कालावधीमध्ये त्याची अंमलबजावणी केली जाणार आहे.

संपूर्ण विश्वात जलद गतीने विकसित होणारी अर्थव्यवस्था म्हणून भारताने आपली ओळख निर्माण केली आहे. जगातील तीन महत्त्वपूर्ण अर्थव्यवस्थांच्या यादीत लवकरच भारताचा समावेश होईल अशी

आशा आहे. वर्ष २०२४ पर्यंत भारत जगातील तिसऱ्या क्रमांकाचे निर्मिती केंद्र म्हणून देखील आपले स्थान निर्माण केले आहे. अनुकूल लोकसंख्या आणि दर्जात्मक मनुष्यबळाच्या उपलब्धतेमुळे आपला देश जागतिक अर्थव्यवस्थेत विशेष छाप सोडू शकतो. भविष्यातील बाजारपेठेसाठी कौशल्य विकासासह मनुष्यबळ विकसित करण्यासाठी प्रधानमंत्री कौशल्य विकास योजनेमुळे आपल्या अर्थव्यवस्थेला निश्चितच लाभ होईल. नवीन धोरणांतर्गत अभियान म्हणून लागू केलेली ही नवीन योजना मनुष्यबळ आणि उद्योग विकासामध्ये एका नवीन युगाची सुरुवात करेल.

## २.३ सारांश

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर आपल्या देशामध्ये लोकांचे जीवनमान उंचावण्यासाठी शासकीय पातळीवर अनेक उपाययोजना करण्यात आल्या. विविध लोक कल्याणकारी योजनांच्या माध्यमातून देशातील गरिबी, दारिद्र्य,बेरोजगारी सारखे अत्यंत गंभीर प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. समुदाय विकास कार्यक्रम, पंचवार्षिक योजना, एकात्मिक ग्रामीण विकास योजना, भारत निर्माण योजना अशा विविध योजनांच्या माध्यमातून विकासाचे प्रारूप यशस्वी करण्यासाठी प्रयत्न करण्यात आले.याचबरोबर मनरेगा सारखी योजना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून राबवून ग्रामीण भागातील बेरोजगारीचा प्रश्न मिटविण्याचा प्रयत्न करण्यात आला. मागेल त्याला काम या तत्वावर योजना राबवून किमान रोजगाराची उपलब्धता करण्यात आली. महिला स्वयंसहाय्यतासमूहाच्या माध्यमातून महिलांचे आर्थिक सक्षमीकरण, राजकीयदृष्ट्या सबलीकरण करण्याचे काम या संघटनांच्या माध्यमातून करण्यात येत आहे. महिला स्वावलंबी व आर्थिक दृष्ट्या स्वायत्त व्हाव्यात यासाठी प्रयत्न केले जात आहेत आणि परिणामस्वरूप महिलांच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय जीवनात आमुलाग्र बदल घडून येत असल्याचे आपल्याला दिसते. त्याचबरोबर २०१५ साली सुरु केलेली. प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना देशातील तरुणांच्या कौशल्याधारित रोजगाराचा प्रश्न मिटविण्यामध्ये महत्वाचे योगदान देत आहे.सध्याच्या खुल्या अर्थव्यवस्थेच्या काळात बाजारात कौशल्यपूर्ण व्यक्तीची आवश्यकता आहे. आपल्या देशातील तरुणांना कौशल्यपूर्ण बनवून त्यांची कार्य क्षमता वाढविण्यामध्ये प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना अत्यंत महत्वाची भूमिका पार पडत असल्याचे आपल्याला दिसते.

## २.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

१) **कल्याणकारी राज्यव्यवस्था** – व्यक्तीला आपला अधिकाधिक विकास साधता यावा यासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण करणारी राज्यव्यवस्था.

२) **पंचवार्षिक योजना** – देशाच्या आर्थिक आणि सामाजिक विकासाला चालना देण्यासाठी सुरू केलेली योजना

३) **स्वयंसहाय्यता समूह** – सामुदायिक उद्दिष्ट घेऊन तयार केलेली लोकांचे स्वयंसेवी संघटना होय.

## २.५ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

**अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) म.गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना कोणत्या साली सुरु झाली?

२) स्वयंसहाय्यता समूह म्हणजे काय?

३) प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना केंव्हा जाहीर झाली?

४) ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये कोणकोणत्या संस्थांचा समावेश होतो?

## २.६ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे :

१) २००५

२) ठराविक असे सामुदायिक उद्दिष्ट घेऊन तयार केलेले लोकांचे स्वयंसेवी संघटना

३) २०१५

४) जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्राम पंचायत

## २.७ सरावासाठी स्वाध्याय

**अ) थोडक्यात उत्तरे लिहा .**

१) स्वातंत्र्यानंतर शासनाने राबविलेल्या लोककल्याणकारी योजनांचा थोडक्यात आढावा घ्या.

२) ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांची योजनांच्या अंमलबजावणी मधील भूमिका स्पष्ट करा.

३) गरिबी व दारिद्रय निर्मुलनामध्ये लोककल्याणकारी योजनांचा प्रभाव स्पष्ट करा.

**ब) टिपा लिहा**

१) म. गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा

२) महिला स्वयंसहाय्यता समूह

३) प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना

## २.८ अधिक वाचनासाठी संदर्भ

१) इंडिया एअर बुक २०२४

२) Press Information Bureau (PIB) <https://pib.gov.in/>

3) Aslam M., 'Panchyati Raj in India', National Book Trust India, New Delhi

४) नान्देडकर व्ही. जी., 'पंचायतीराज : एक विश्लेषण' परामर्श, केसागर, पुणे.

५) भोळे भा. ल., (२०२०) 'भारताचे गणराज्याचे शासन आणि राजकारण', पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर.

६) बिरमल नितिन, पवार वैशाली, 'महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्था', डायमंड प्रकाशन, पुणे.

७) पाटील व्ही. बी., 'महाराष्ट्रातील पंचायतराज व नागरी स्थानिक स्वराज्य संस्था', केसागर, पुणे.

८) लवटे किशोर, (२०२३), 'पंचायत राज', किशोर पब्लिकेशन.

❑❑❑

# घटक १
# नागरी स्थानिक स्वराज्य शासन संस्थांच्या घटनात्मक तरतुदी

**अनुक्रमणिका**


१.० उद्दिष्ट्ये

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

 १.२.१ ७४ वी घटना दुरुस्ती कायदा-१९९३

 १.२.२ नगरपालिकेची रचना, अधिकार आणि कार्ये

 १.२.३ महानगरपालिकेची रचना, अधिकार आणि कार्ये

१.३ सारांश

१.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

१.५ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

१.६ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.७ सरावासाठी स्वाध्याय

१.८ अधिक वाचनासाठी संदर्भ


## १.० उद्दिष्टे

१. विद्यार्थ्यांना नागरी स्वराज्य संस्थेची ओळख करून देणे.

२. विद्यार्थ्यांना नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमधील निवडणूक प्रक्रियेची माहिती करून देणे.

३. नगरपालिकेची रचना, अधिकार आणि कार्य याची माहिती देणे.

४. महानगरपालिकेची रचना, अधिकार आणि कार्य यांची माहिती देणे.

५. नागरी स्वराज्य संस्थांमधील कामकाजामध्ये प्रत्यक्ष अप्रत्यक्ष सहभाग नोंदवणे.

## १.१ प्रास्ताविक

प्राचीन कालखंडापासून भारतात नागरी संस्कृतीची सुरुवात झाली. सिंधू संस्कृतीतील मोहेंजोदडो, हडप्पा ही याचे उत्तम उदाहरण आहेत. नागरीकरणाच्या माध्यमातून आज शहरी भागात प्रचंड लोकसंख्या निर्माण झालेली आहे. ज्या भागात अधिक लोकसंख्या एकवटलेली असते म्हणजेच लोकसंख्येची घनता

जास्त असते जिथे शिक्षण, व्यापार, वाहतूक, दळणवळण, बँका, मनोरंजनाची साधने उपलब्ध असतात, तसेच विविध भौतिक सुविधा उपलब्ध असतात, राहणीमान उंचावलेले असते अशा वस्तीला नगर असे म्हणतात. २०,००० पेक्षा जास्त लोक वस्तीस 'नागरी' असे म्हणतात. बदलत्या परिस्थितीनुसार आणि साधनांमुळे धर्म, भाषा, संस्कृती इ. भेदभाव असून देखील एकत्रित राहण्याची पद्धती नागरिकांमध्ये वाढल्याचे दिसून येते. लोक आहे त्या परिस्थितीत एकत्रित राहण्याचे निश्चित करतात यातूनच नागरिकरणाची प्रक्रिया घडून येते.

**नागरी स्थानिक स्वराज्य शासन संस्थांचा विकास**

भारतात प्राचीन कालखंडापासूनच नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचा विकास झाल्याचे दिसते. वैदिक कालखंडात नगर राज्यांचा उल्लेख आढळतो. राजधानीचे शहर म्हणून नगरांना महत्त्व दिले जात होते. व्यापार, उद्योग, सत्ता, यांसाठी नगर राज्य प्रसिद्ध होती, मोहेंजोदडो, हडप्पा येथील नगर राज्यांच्या रचनेवरून अभ्यासांती नागरी संस्कृतीचे अस्तित्व असल्याचे स्पष्ट होते. मॅगॅस्थेनीस या पाश्चात्य विचारवंताने राजधानी पाटलीपुत्र चे वर्णन केलेले आहे तेथे व्यापार, कर, लोकसंख्या, परराष्ट्र धोरण याविषयी विविध समित्या स्थापन केल्याचे दिसते व या माध्यमातून कारभार पाहिला जात असे. आधुनिक नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचा पाया ब्रिटीश कालखंडात घातला गेला. ब्रिटिशांनी आपल्या छावण्या नागरी भागात उभारले असल्याने ब्रिटिशांनी ग्रामीण स्थानिक स्वशासनाच्या अगोदर नागरी स्थानिक संस्थांकडे लक्ष दिले. नागरी भागात सोई सुविधा पुरविण्याच्या दृष्टिकोनातून नागरी स्थानिक स्वराज्य संस्था सुरू केल्या. भारतात पहिली महानगरपालिका इ. स. १६८७ मध्ये ब्रिटिश सम्राट जेम्स दुसरा याने 'मद्रास' येथे स्थापन केली. १७२० च्या राजपत्राद्वारे मद्रास, बॉम्बे आणि कलकत्ता येथे 'महापौर' न्यायालय स्थापन करण्यात आली. १८४२ साली पश्चिम बंगाल राज्यात स्थानिक शासन संस्थेविषयी कायदा संमत करण्यात आला. आधुनिक नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचा पहिला कायदा म्हणजे १८७० साली लॉर्ड मेयोचा ठराव होय. या ठरावाच्या आधारेच विविध प्रांतात नगरपालिका कायदा संमत करण्यात आला. लॉर्ड रिपन चा १८८२ चा स्थानिक स्वशासन ठराव भारतातील स्थानिक स्वशासनाचा पाया मानला जातो. इ.स. १८८८ मध्ये Bombay Municipal Act संमत करण्यात आला. नंतर १९०७ चा विकेंद्रीकरण आयोग, १९०९ चा मोर्ले मिंटो सुधारणा कायदा, १९१९ मोंटेस्क्यू चेम्सफर्ड सुधारणा कायदा व १९३५ चा भारत प्रशासन कायदा यानुसार नागरी स्थानिक संस्थांचा विकास झाला.

स्वातंत्र्योत्तर कालखंडानंतर भारत सरकारने ग्रामीण भागाकडे अधिक लक्ष दिले. त्यामुळे ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थेसंबंधी कायदे प्रथम संमत करण्यात आले व त्यानंतर नागरी स्थानिक स्वशासना संबंधी कायदे करण्यात आले.

१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली व नंतर महाराष्ट्रात नगरपालिकेसंबंधी पूर्वी अस्तित्वात असलेले विविध कायदे एकत्रित करण्यात आले.

१. मुंबई जिल्हा नगरपालिका अधिनियम १९०१

२. मुंबई ब्युरो नगरपालिका अधिनियम १९२५

३. विदर्भासाठी मध्य प्रांत आणि वऱ्हाड नगरपालिका अधिनियम १९२२

४. मराठवाडा, हैदराबाद जिल्हा नगरपालिका कायदा १९५६

याचे एकत्रीकरण करून १० सप्टेंबर १९६५ रोजी ''महाराष्ट्र नगरपालिका, नगरपंचायती व औद्योगिक नागरी अधिनियम'' १९६५ सर्वत्र लागू करण्यात आला.

नरसिंहराव सरकारने १९९१ मध्ये योग्य सुधारणांसह विधेयक लोकसभेत मांडले. राज्यसभा आणि लोकसभा यांच्या मंजुरीनंतर, राष्ट्रपतींच्या संमतीने १ जून १९९३ पासून या विधेयकाची कार्यवाही सुरू झाली.

**७४ व्या घटनादुरुस्तीतील तरतुदी :**

१९९३ रोजी ७४ व्या घटनादुरुस्तीने कलम २४३ (त) २४३ (य, छ) नुसार तरतुदी केल्या आहेत.

१. रचना नगरपालिकेच्या संदर्भात जिल्हा, महानगरक्षेत्र, नगरपालिका क्षेत्र, पंचायत, लोकसंख्या इ. संज्ञांचा अर्थ कलम २४३ (त) मध्ये देण्यात आला.

२. नगरपालिका स्थापन करणे कलम २४३ (थ) नुसार प्रत्येक राज्यात तीन नागरी स्थानिक स्वराज्य संस्था स्थापन करण्यात येतील.

   अ. नगरपंचायत : ग्रामीण क्षेत्रामधून नागरी क्षेत्रामध्ये संक्रमण होत असलेल्या क्षेत्राला नगरपंचायत स्थापन करण्यात येईल.

   ब. नगरपरिषद : लहान नागरी क्षेत्रासाठी नगरपरिषदेची स्थापना करण्यात येईल.

   क. महानगरपालिका : मोठ्या शहरासाठी महानगरपालिका स्थापन केली जाईल.

या नियमानुसार राज्यपाल एखाद्या औद्योगिक क्षेत्राला 'औद्योगिक वसाहत' म्हणून घोषित करू शकतील.

३. नगरपालिका रचना : कलम २४३ (द) मध्ये नगरपालिकेची रचना सांगितली आहे. नगरपालिकेतील सर्व सदस्य त्या क्षेत्रातील लोकांद्वारे निवडणुकीच्या माध्यमातून निवडले जातील. नगरपालिका क्षेत्रातील भागाला प्रभाग म्हणून प्रादेशिक मतदारसंघांमध्ये विभागणी करण्यात येईल. राज्य विधिमंडळ कायदा करून नगरपालिकांमध्ये पुढील व्यक्तींना प्रतिनिधीत्व मिळावे यासाठी तरतूद करू शकते.

१. नगरपालिका प्रशासनाचे विशेष ज्ञान असणाऱ्या अनुभवी व्यक्ती. तथापि अशा सदस्यांना बैठकांमध्ये मतदान करण्याचा अधिकार नसेल.

२. नगरपालिका क्षेत्राचा पूर्णपणे अथवा काही भाग समाविष्ट असणाऱ्या एखाद्या मतदारसंघाचा प्रतिनिधी म्हणजे आमदार किंवा खासदार.

३. नगरपालिका क्षेत्रात मतदार म्हणून नोंद असलेली राज्यसभा आणि विधान परिषदेचे सदस्य.

४. प्रभाग समित्या वगळता अन्य समित्यांचे अध्यक्ष नगरपालिकेच्या सभाध्यक्षाची निवड केलेल्या पद्धतीने केली जाईल हे राज्याचे विधिमंडळ स्वतंत्र कायदा करून ठरवेल.

५. प्रभाग समिती रचना कलम २४३ (ध) नुसार प्रभाग समित्यांची स्थापना आणि रचनेची तरतूद केली आहे. तीन लाख किंवा त्यापेक्षा अधिक लोकसंख्या असणाऱ्या नगरपालिकांच्या भौगोलिक क्षेत्रांमध्ये एक अथवा अधिक प्रभागांचा समावेश असलेल्या प्रभाग समित्या स्थापन केल्या जातील. राज्य विधिमंडळ कायद्यानुसार प्रभाग समित्यांची रचना, त्यांचे प्रादेशिक क्षेत्र आणि समितीतील सदस्य निवडीची पद्धत या संबंधित तरतूद करेल. अशा प्रभाग समित्यातील प्रतिनिधित्व करणारे नगरसेवक प्रभाग समित्यांचे सदस्य असतील राज्य विधिमंडळ या प्रभाग समित्याखेरीज इतर समित्यांच्या निर्मितीची तरतूद करू शकते.

६. राखीव जागा कलम २४३ (न) नुसार प्रभाग समिती यांची स्थापना आणि रचनेबाबत तरतुदी केल्या आहेत.

१. नगरपालिकेत नगरपालिका क्षेत्रातील अनुसूचित जाती जमातींच्या एकूण लोकसंख्येच्या प्रमाणात जितकी लोकसंख्या आहे त्यानुसार त्या समाज घटकांसाठी राखीव जागा असतील. अशा राखीव जागांचे नगरपालिकेतील विविध मतदार संघामध्ये चक्राकार पद्धतीने वितरण करण्यात येईल. यातील किमान एक तृतीयांश जागा याच समाज घटकातील स्त्रियांसाठी राखीव असतील.

२. नगरपालिकेत प्रत्यक्ष भरावयाच्या एकूण जागांपैकी ५० टक्के जागा स्त्रियांसाठी राखीव ठेवण्यात येतील. यामध्ये अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती मधील महिलांसाठी राखीव ठेवण्यात आलेल्या जागांचा देखील समावेश असेल.

३. राज्य विधिमंडळ कायदा करून नगरपालिकेतील अध्यक्षांची पदे अनुसूचित जाती जमाती आणि महिलांसाठी आरक्षित ठेवू शकते. कायदेमंडळ कायद्याद्वारे नगरपालिकेतील जागा आणि अध्यक्षांची पदे मागासवर्गासाठी राखीव ठेवण्याची तरतूद करू शकते.

७. कार्यकाल : कलम २४३ (प) नुसार नगरपालिकांच्या कार्यकाळाविषयी तरतूद केली आहे. नगरपालिकेचा कार्यकाळ पहिल्या बैठकीपासून पाच वर्षांचा असेल. तिचे मुदतपूर्व विसर्जन केले जाऊ शकते मात्र बरखास्तीनंतर पुन्हा निवडणुका घेऊन नगरपालिकेची निर्मिती करावी लागते. मात्र विसर्जित झाल्याच्या तारखेपासून सहा महिन्याच्या आत निवडणुका घ्याव्या लागतात. उर्वरित कालावधी सहा महिन्यांपेक्षा कमी असल्यास निवडणूक घेण्याची आवश्यकता नसते.

८. सदस्याची अपात्रता : कलम २४३ (फ) नुसार एखादी व्यक्ती नगरपालिकेची निवडणूक लढवण्यासाठी पुढील कारणामुळे अपात्र ठरू शकते. संबंधित राज्याच्या विधिमंडळ निवडणुकीसंबंधी प्रचलित कोणत्याही कायद्याने अपात्र ठरविल्यास किंवा राज्य विधिमंडळाच्या कोणत्याही कायद्याने अपात्र

घोषित केल्यास. जर २१ वर्षे पूर्ण झालेल्या व्यक्तीस ती २५ वर्ष पूर्ण झालेली व्यक्ती नाही या कारणास्तव अपात्र ठरवता येणार नाही.

९. नगरपालिकांचे अधिकार ७४ व्या घटना दुरुस्तीनुसार राज्याचे विधिमंडळ कायदा करून नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांची कार्ये पार पाडण्यासाठी आवश्यक ते अधिकार देऊ शकेल.

१०. नगरपालिकेचे उत्पन्न :

   १. पथकर आणि शुल्क यांची आकारणी, संकलन आणि विनियोग करण्याचा अधिकार देईल.

   २. राज्यांनी आकारलेले व संकलित केलेले कर, शुल्क पालिकांकडे ठेवणे.

   ३. राज्याच्या संचित निधीतून पालिकांना अनुदान देणे, नागरी संस्थांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी आवश्यक असलेल्या उपाययोजना करणे

११. लेखापरीक्षण : कलम २४३ (य) नुसार राज्य विधिमंडळ नगरपालिकांचे लेखे ठेवणे आणि त्यांचे परीक्षणाबाबत कायदा करू शकते. यामुळे नागरी स्वराज्य संस्थांवर आर्थिक नियमन योग्य प्रकारे होऊ शकते.

१२. निवडणुका : कलम २४३ (य, क) नुसार राज्य निवडणूक आयोग नगरपालिकांच्या सर्व निवडणूक मतदार यादींच्या निर्मिती प्रक्रियेचे, पर्यवेक्षण, निर्देशन आणि नियंत्रण करेल. निवडणुकांचे आयोजन करण्याचे अधिकार आयोगाला आहे.

१३. केंद्रशासित प्रदेशातील नागरी स्थानिक शासन संस्था कलम २४३ (य, ख) नुसार राष्ट्रपती काही अपवाद वगळता आणि सुधारणा करून कोणत्याही केंद्रशासित प्रदेशाला हा कायदा लागू करतो.

१४. विवक्षित क्षेत्रांना लागू नसणे : कलम २४३ (य, ग) नुसार अनुक्रमे अनुसूचित क्षेत्र आणि आदिवासी प्रदेशांना हा कायदा लागू होणार नाही. उदाहरणार्थ पश्चिम बंगालमधील दार्जिलिंग जिल्ह्याच्या पहाडी क्षेत्रासाठी असलेल्या दार्जिलिंग गुरखा पहाडी परिषदेच्या अधिकार व कार्यांना बाधा आणणार नाहीत.

१५. जिल्हा नियोजन समिती कलम २४३ (य, घ) राज्य विधिमंडळ जिल्हास्तरावर नियोजन समिती स्थापण्याचा अधिकार दिला आहे. यानुसार राज्य विधिमंडळ कायदा करून पुढील तरतुदी करू शकते.

   १. जिल्हा समितीची रचना

   २. सदस्यांच्या निवडीची पद्धती

   ३. जिल्हा नियोजना संबंधी समितीची कार्ये.

   ४. समितीच्या अध्यक्षांच्या निवडीची पद्धती.

जिल्हा नियोजन समितीस काही अधिकार व कार्य दिली आहेत. पंचायती राज्यसंस्था आणि नगरपालिका यांचे समान हितसंबंध असलेल्या बाबींचा नियोजनात विचार करणे. विकास योजना तयार

करताना नियोजन, पाण्याचे वाटप, नैसर्गिक व भौतिक साधने, पर्यावरण संरक्षण इत्यादी गोष्टींचा साकल्याने विचार करणे.

१५. महानगर नियोजन समिती कलम २४३ (य, ड) महानगर क्षेत्रात संपूर्ण महानगर क्षेत्रासाठी एक प्रारूप विकास योजना तयार करणे हा या समितीचा उद्देश आहे. राज्य विधिमंडळ कायद्याद्वारे पुढील बाबींसाठी तरतूद करू शकेल

१. महानगर नियोजन समिती यांची रचना.

२. समित्यांमधील जागा ज्या रीतीने भरण्यात येतील त्या संदर्भातील नियम.

३. अशा समित्यांवरील भारत सरकार व राज्य सरकार यांचे प्रतिनिधित्व

४. अशा समित्यांच्या अध्यक्षांच्या निवडीची पद्धती.

५. महानगर क्षेत्राचे नियोजन आणि समन्वय संदर्भीय समित्यांची कार्ये.

प्रत्येक महानगर नियोजन समिती प्रारूप विकास योजना तयार करताना महानगर क्षेत्रातील नगरपालिका, पंचायती यांना तयार केलेल्या योजना पाण्याचे वाटप, बहुतेक साधन संपत्ती, पर्यावरण संरक्षण, भारत सरकारने व राज्य सरकारने ठरवून दिलेली उद्दिष्टे इत्यादी गोष्टींचा साकल्याने विचार करेल.

### १.२.२ नगरपालिकेची रचना, अधिकार आणि कार्य

लहान नागरी क्षेत्रासाठी नगरपालिकेची स्थापना केली जाते. म्हणजेच २५००० लोकसंख्येच्या शहरासाठी नगरी परिषद स्थापन केल्या जातात. १९०१ साली सर्वप्रथम मुंबई नगरपालिका स्थापन झाली. महाराष्ट्रात १९६५ साली ''महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम'' १९६५ कायदा निर्माण झाला. यापूर्वी महाराष्ट्रात विविध कायदे अस्तित्वात होते नंतर हे सर्व अधिनियम एकत्रित करून १९६५ रोजी नवीन कायदा अस्तित्वात आला.

१. नगरपरिषदांचे वर्गीकरण : महाराष्ट्रातील नगरपरिषदांचे वर्गीकरण लोकसंख्येच्या प्रमाणात केले जाते. ते पुढील प्रमाणे.

| अ.क्र. | नगरपरिषदेचा वर्ग | लोकसंख्येचे प्रमाण व सदस्य संख्या | नगरपरिषदांची संख्या |
|---|---|---|---|
| १ | 'अ' वर्ग | १ लाख लोकसंख्येसाठी सदस्य संख्या ४० ते ६० त्यापुढील लोकसंख्येला ८००० ला एक सदस्य | २१ |
| २ | 'ब' वर्ग | ४० हजार ते १ लाखांपर्यंत सदस्य संख्या ३० ते ४० त्यापुढील पाच हजार लोकसंख्येला एक सदस्य | ६२ |
| ३ | 'क' वर्ग | २५ हजार ते ४० हजार लोकसंख्येला सदस्य | १४१ |

| | | | |
|---|---|---|---|
| | | संख्या १७ ते २३. २५ हजार लोकसंख्येच्या पुढील प्रमाण ३००० लोकसंख्येला एक सदस्य | |

२. आरक्षण व्यवस्था सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी नगरपरिषदेत आरक्षणाचे तत्व स्वीकारले आहे. आरक्षण पुढीलप्रमाणे.

१. अनुसूचित जाती अनुसूचित जमातीला त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात काही जागा राखीव ठेवल्या जातात. या राखीव जागांपैकी एक तृतीयांश जागा याच प्रवर्गातील महिलांकरिता राखीव असतात.

२. इतर मागास प्रवर्गासाठी २७% जागा राखीव असतील यापैकी एक तृतीयांश जागा याच प्रवर्गातील महिलांसाठी राखीव असतात.

३. एकूण सर्वसाधारण जागांपैकी एक द्वितांश जागा स्त्रियांसाठी राखीव असतील. यामध्येच अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागास प्रवर्ग महिलांचा देखील समावेश असेल.

३. पात्रता :

१. तो भारताचा नागरिक असावा.

२. त्या क्षेत्राच्या मतदार यादीत त्याचे नाव असावे.

३. वयाची २१ वर्षे पूर्ण असावीत.

४. राखीव जागेसाठी त्याच संवर्गातील उमेदवार असावा.

५. ज्या संवर्गाकरिता राखीव जागा असेल त्याच संवर्गातील व्यक्ती असावी.

६. उमेदवार वेडा, वेडसर, भ्रष्टाचारी असता कामा नये.

७. कोणत्याही कारणास्तव दोन वर्षापेक्षा अधिक कालावधीची कारावासाची शिक्षा झालेली नसावी व एखाद्या व्यक्तीस अशी शिक्षा झाली असल्यास शिक्षेचा कालावधी संपल्यानंतर पाच वर्षाचा कालावधी संपलेला असावा

४. नामनिर्देशित सदस्य : नामनिर्देशित सदस्यांची नियुक्ती राज्य सरकारकडून केली जाते. या सदस्यांचे प्रमाण निर्वाचित सदस्य संख्येच्या १०% असते किंवा जास्तीत जास्त पाच सदस्य नामनिर्देशित केले जातात.

१. वैद्यकीय व्यवसायातील किमान पाच वर्षाचा अनुभव.

२. सामाजिक सेवेतील किमान पाच वर्षाचा अनुभव

३. कामगार कायद्याची माहिती व त्या क्षेत्रातील कार्याचा अनुभव.

४. नगरसेवक म्हणून पाच वर्षाचा अनुभव.

५. नगरपरिषदेचा मुख्य कार्य अधिकारी म्हणून पाच वर्षाचा अनुभव.

६. नगर आयुक्त म्हणून दोन वर्षाचा अनुभव.

अशा व्यक्ती नामनिर्देशित सदस्य म्हणून निवड केल्या जाऊ शकतात. परंतु यांना मतदानाचा अधिकार नसतो.

५. नगरपरिषदेचा कार्यकाल : ७४ व्या घटना दुरुस्ती नुसार नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचा कार्यकाल पाच वर्षाचा आहे. नगरपरिषदेचा सार्वत्रिक निवडणुकीनंतर भरणाऱ्या पहिल्या बैठकीच्या तारखेपासून हा कालावधी सुरू होतो. नगरसेवकांचा कार्यकाल देखील पहिल्या बैठकीच्या दिनांकापासून पाच वर्षाचा असतो. मुदतीपूर्वी नगरपरिषद विसर्जित केली जाऊ शकते. विसर्जित झालेल्या नगर परिषदेची सहा महिन्याच्या आत निवडणूक घेतली पाहिजे असे बंधन अधिनियमात आहे. एखादा सदस्य स्वमर्जीने आपल्या पदाचा राजीनामा जिल्हाधिकाऱ्याकडे देऊ शकतो.

६. नगराध्यक्ष व उपनगराध्यक्ष : नगरपरिषदेच्या राजकीय प्रमुखास नगराध्यक्ष असे म्हणतात. नगराध्यक्ष पदास विशेष महत्त्व आहे. मानसन्मान दर्जा व अधिकाराच्या दृष्टीने या पदाला अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. राजकीय दृष्टिकोनातून आपल्याच पक्षाचा नगराध्यक्ष असावा यासाठी राज्य पातळीवरील नेते प्रयत्नशील असल्याचे दिसते. सुरुवातीला नगराध्यक्ष व उपनगराध्यक्ष यांची निवड नगरपरिषदेतील निवडून आलेल्या सदस्यांमार्फत होत असे. २००१ साली नगरसेवकांकडून नगराध्यक्ष निवडण्याची पद्धत बंद करण्यात आली व थेट जनतेतून नगराध्यक्ष निवडण्याची पद्धत स्वीकारण्यात आली. नगरपालिका क्षेत्रातील मतदारांकडून प्रत्यक्ष प्रौढ मतदान पद्धतीने नगराध्यक्षाची निवड केली जाते.

७. नगराध्यक्ष पदाचे आरक्षण : ७४ व्या घटनादुरुस्तीनुसार नगर परिषदेच्या नगराध्यक्षासाठी पुढील प्रमाणे आरक्षण असेल.

१. अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती करता राखून ठेवावयाच्या नगराध्यक्ष पदांच्या संख्येचे राज्यातील नगर परिषदेच्या नगराध्यक्ष पदांच्या एकूण संख्येचे असलेले प्रमाण त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात ठरवले जाते. राज्यातील सर्व नगरपरिषदांच्या क्षेत्रातील त्यांची लोकसंख्या लक्षात घेऊन सदर लोकसंख्येच्या प्रमाणात नगराध्यक्षपदे आरक्षित केली जातात. या आरक्षित पदांपैकी एक तृतीयांश पदे अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींच्या स्त्रियांसाठी राखून ठेवली जातात.

२. राज्यातील एकूण नगराध्यक्षांच्या २७% जागा इतर मागास प्रवर्गासाठी राखीव ठेवल्या जातात. यापैकी एक तृतीयांश पदे त्याच प्रवर्गातील महिलांसाठी राखून ठेवली जातात.

३. राज्यातील एकूण नगराध्यक्ष पदांच्या एक द्वितियांश पदे स्त्रियांसाठी राखीव ठेवली जातात. यामध्येच अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि नागरिकांच्या मागासवर्गातील प्रवर्गातील

स्त्रियांसाठी असलेल्या पदांचा समावेश असेल. घटनादुरुस्तीनुसार नगर परिषदेच्या नगराध्यक्षासाठी पुढील प्रमाणे आरक्षण असेल.

८. नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष पदाचा कार्यकाल : नगराध्यक्ष पदाचा कार्यकाल त्याने ज्या दिवशी नगराध्यक्ष म्हणून पदभार स्वीकारला त्या दिवसापासून पाच वर्षाचा असतो. महाराष्ट्र शासनाने या कार्यकालमध्ये अनेक वेळेस बदल केलेला दिसून येतो १९६५ ला नगराध्यक्ष पदाचा कालावधी पाच वर्षाचा होता, १९९४ मध्ये एक वर्षाच्या करण्यात आला, १९९९ पासून हा कालावधी अडीच वर्षाचा करण्यात आला, तर २००१ पासून हा कालावधी पाच वर्षाचा करण्यात आला आहे. नगराध्यक्षपदी निवड झाल्यानंतर पहिल्या दोन वर्षापर्यंत त्याच्यावर अविश्वास आणता येत नाही.

नगराध्यक्षाला सहकार्य करण्यासाठी उपनगराध्यक्ष पदाची तरतूद केलेली आहे. उपनगराध्यक्षाच्या अनुपस्थितीत त्याचा कार्यभार सांभाळण्याचे काम उपनगराध्यक्ष करतो. नगरपरिषदेत निवडून आलेल्या सदस्यांमधून बहुमताने उपनगराध्यक्षाची निवड केली जाते. उपनगराध्यक्ष आपला राजीनामा नगराध्यक्षाकडे देतो.

९. मानधन व आथित्य भत्ता : नगरपालिकेच्या वर्गवारीनुसार नगराध्यक्षाला मानधन व आतिथ्य भत्ता दिला जातो.

  १. अ वर्ग नगरपरिषद असेल तर नगराध्यक्षास कमाल ३००० रुपये मानधन व कमाल वार्षिक १५००० आतिथ्य भत्ता दिला जातो.

  २. ब वर्ग नगर परिषदेच्या नगराध्यक्षास २५०० रुपये मानधन व कमाल १०००० रुपये वार्षिक आतिथ्य भत्ता दिला जातो.

  ३. क वर्ग नगर परिषदेतील नगराध्यक्ष कमाल २००० रुपये मानधन व ७५०० रुपये आतिथ्य भत्ता वार्षिक दिला जातो.

१०. नगराध्यक्षाची कार्ये : महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नागरी अधिनियम, १९६५ नुसार नगराध्यक्ष पुढील कामे करावी लागतात.

  १. नगरपालिकेच्या सभांचे अध्यक्षस्थान भूषविणे.

  २. नगरपालिकेतील सभांचे संचलन करणे व सभागृहात शिस्त शांतता व सुव्यवस्था निर्माण करणे.

  ३. नगरपालिकेतील प्रशासकीय यंत्रणेवर देखरेख व नियंत्रण ठेवणे.

  ४. राज्य शासनाने सोपविलेली कार्य पार पाडण्याचे काम नगराध्यक्षाचे आहे.

  ५. मुख्याधिकाऱ्याच्या कार्यावर नियंत्रण देखरेख ठेवणे.

  ६. अंदाजपत्रक तयार करण्यास मदत करणे, दैनंदिन कामकाजावर नियंत्रण ठेवणे.

७. कागदपत्रांची पाहणी करणे समित्यांचे गठन करणे.

११. मुख्याधिकारी : नगर नगरपालिकेच्या प्रशासकीय प्रमुखास मुख्याधिकारी असे संबोधले जाते. विविध राज्यात त्यांना विविध नावाने संबोधले जाते. याची नेमणूक राज्य शासनाकडून केली जाते. नगरपालिकेच्या श्रेणीनुसार मुख्य अधिकाऱ्याचा दर्जा ठरतो. अ दर्जाच्या नगरपालिकेच्या मुख्याधिकारी उपजिल्हाधिकारी दर्जाचा, तर ब वर्गाच्या नगरपालिकेचा अधिकारी हा तहसीलदार दर्जाचा असतो, क वर्गाच्या नगरपालिकेचा मुख्याधिकारी वर्ग दोन दर्जाचा असतो. त्याची नियुक्ती महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाकडून होत असते. त्याचे अधिकार आणि कर्तव्य पुढीलप्रमाणे आहे.

१. नगराध्यक्षाच्या सल्ल्याने नगरपालिकेच्या बैठका बोलावणे.

२. नगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत हजर राहून कामकाजात सहकार्य करणे.

३. नगरपालिकेच्या सभेत संमत झालेल्या ठरावांची अंमलबजावणी करणे.

४. नगरपालिका क्षेत्रात सुरू असलेल्या विविध योजनांची अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणांवर देखरेख व नियंत्रण ठेवणे.

५. नगरपालिकेच्या लेखांकनाची अहवालाची तपासणी करणे.

६. नगरपालिका क्षेत्रात सुरू असलेल्या चुकीच्या कामकाजाची प्रकरणी हाताळून ते नगराध्यक्षाच्या व संबंधित समितीच्या निदर्शनास आणून देणे.

७. नगरपालिकेच्या उत्पन्नात आणि आर्थिक स्थितीत सुधारणा घडवून आणण्याच्या दृष्टिकोनातून प्रयत्न करणे.

१२. नगरपरिषदेच्या समित्या : नगरपालिकेला विविध स्वरूपाची दैनंदिन कार्य पार पाडण्यासाठी विषयानुसार समित्या तयार केलेल्या असतात. त्या दोन प्रकारच्या असतात एक स्थायी समिती व विषय समिती महाराष्ट्रात अ, ब दर्जाच्या नगरपालिकेत पुढील प्रमाणे समित्या असतात.

१. स्थायी समिती

२. विषय समिती

३. सार्वजनिक बांधकाम समिती

४. सार्वजनिक स्वच्छता वैद्यकीय उपचार व आरोग्य समिती

५. शिक्षण समिती

६. महिला व बालकल्याण समिती

७. नियोजन आणि विकास समिती

८. पाणीपुरवठा व जलनिस्सारण समिती

**१. स्थायी समिती :** नगरपालिकेतील सर्वात महत्त्वाची समिती आहे. नगरपालिकेतील महत्त्वाचे निर्णय स्थायी समिती पुढे मांडले जातात. नगरपालिकेचा अध्यक्ष हा स्थायी समितीचा पदसिद्ध अध्यक्ष असतो. तसेच सर्व विषय समित्यांचे सभापती या समितीचे सदस्य असतात. या व्यतिरिक्त नगरपरिषद सदस्यातून तीन सदस्य समितीवर निवडून दिले जातात. विषय समित्यांमध्ये घेतलेले निर्णय स्थायी समितीकडे पाठवले जाऊन स्थायी समिती त्यासंबंधातील आपले निर्णय नगरपालिकेकडे पाठवीते. स्थायी समितीची बैठक दर महिन्याला भरते. विशेष बैठक बोलवण्याचा अधिकार स्थायी समितीला आहे.

**विषय समित्यांचे संघटन :** विषय समित्यांची सदस्य संख्या नगरपालिकेत मार्फत निश्चित केली जाते. परंतु विषय समित्यांची सदस्य संख्या नगरपरिषद सदस्यांच्या एक चतुर्थांश पेक्षा कमी किंवा एक तृतीयांश पेक्षा अधिक असता कामा नये. सदस्य निवड एकल संक्रमणीय मतदान पद्धतीने केली जाते. नगराध्यक्ष कोणत्याही विषय समितीचा सदस्य होऊ शकत नाही. परंतु कोणत्याही विषय समितीच्या चर्चेमध्ये सहभाग घेऊ शकतो, त्याला मतदानाचा अधिकार नसतो. सर्व समित्यांच्या अध्यक्षांचा कार्यकाल एक वर्षाचा असतो. प्रत्येक विषय समितीचा अधिकार क्षेत्र त्या समिती पुरतेच मर्यादित असते. विषय समितीने घेतलेले निर्णय स्थायी समितीकडे येतात, स्थायी समिती त्या संदर्भात आपले मत मांडून पुढील मंजुरीसाठी नगरपालिकेकडे पाठवते.

१३. नगरपरिषदेची कार्ये : नगरपरिषद कार्यांची दोन भागात वर्गीकरण करण्यात येते अनिवार्य कार्य व ऐच्छिक कार्य अनिवार्य कार्य पार पाडणे नगरपरिषदेत बंधनकारक असते. ऐच्छिक कार्य मात्र नगरपरिषदेच्या इच्छेवर व आर्थिक ऐपती वर अवलंबून असतात 'महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नागरी अधिनियम' १९६५ नुसार नगर परिषदेची आवश्यक कार्य पुढील प्रमाणे.

**१. अनिवार्य कार्ये**

१. सार्वजनिक रस्ते जागा इमारतीच्या ठिकाणी दिवाबत्तीची व्यवस्था करणे.

२. नगरपरिषदक्षेत्रात पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे.

३. सार्वजनिक रस्त्यांवर व जागांवर पाणी शिंपडणे.

४. सार्वजनिक ठिकाणी रस्ते, गटार यांची स्वच्छता ठेवणे.

५. शहरातील अनावश्यक झाडे, झुडपे काढून स्वच्छता ठेवणे.

६. आगीपासून जीविताची व मालमत्ता चे रक्षण करण्याकरिता अग्निशामक दल सुसज्ज ठेवणे.

७. धोक्याच्या इमारती पाडणे व तेथील लोकांचे पुनर्वसन करणे.

८. स्मशानभूमी बांधणे शहरातील सार्वजनिक रस्ते, नाले, शौचालय, स्वच्छतगृह, स्नानगृह उभारणे व त्याचे देखभाल ठेवणे.

९. नगरपरिषदक्षेत्रात नागरिकांना पिण्याकरिता शुद्ध पाण्याची व्यवस्था करणे.

१०. रस्ते व चौकांना नावे व क्रमांक देणे.

११. जन्म, मृत्यूच्या नोंदी ठेवणे.

१२. सार्वजनिक लस टोचणी मोहीम हाती घेणे.

१३. कुटुंब नियोजन व कुटुंब कल्याण राबवणे व प्रोत्साहन देणे.

१४. प्राथमिक शाळा उघडणे व त्याची व्यवस्था करणे.

१५. नगरपरिषद क्षेत्राच्या प्रशासनावरील वार्षिक अहवाल तयार करणे.

१६. शहरातील शौचकुपांच्या आधुनिकीकरण करणे, मल व केर कचरा यांची विल्हेवाट लावून शासनाने सुचविल्यास त्यापासून मिश्र खते तयार करणे.

२. **ऐच्छिक कार्ये**

१. गलिच्छ वस्त्यांची सुधारणा करणे.

२. नागरिक क्षेत्रातील गरिबी दूर करणे.

३. गुरांचे व कोंडवाडे व जनावरांना निर्दयीपणे वागवण्यास प्रतिबंध करणे.

४. चर्मसंस्करणीचे विनिमयन करणे.

५. सार्वजनिक उद्याने व बाग बागबगीचे उभारणे व त्याचे व्यवस्था ठेवणे.

६. लोकांकरिता संगीताचे व्यवस्था करणे.

७. नगरपालिका क्षेत्रातील जनगणना करणे, सर्वेक्षण करणे.

८. मोकाट कुत्र्यांना अटकाव तसेच घातक व पिसाळलेल्या कुत्र्यांना ठार करण्याची व्यवस्था करणे.

९. दूरध्वनीच्या तारांची उभारणी व व्यवस्था करणे.

१०. नगरपरिषदेच्या कर्मचाऱ्यांसाठी निवासस्थानाची तरतुद करणे.

११. गरीब लोकांकरिता आरोग्यकारक निवासस्थाने बांधणे.

१२. वीजशक्ती किंवा गॅस पुरवण्याची व्यवस्था करणे.

१३. ग्रंथालय, वस्तू संग्रहालय, रुग्णालय उभारणे दूध व दुग्धजन्य पदार्थांचा पुरवठा करणे.

या व अशा अनेक प्रकारची कामे नगरपालिकेला पार पाडावी लागतात.

**नगरपरिषदेचे कामकाज :** 'महाराष्ट्र नगरपरिषद नगरपंचायत व औद्योगिक नागरी अधिनियम' १९६५ अन्वये नगरपरिषदेच्या सभा व कामकाज यासंबंधी कायदेशीर तरतूद केली आहे. नगरपरिषदेची सभा दोन महिन्यातून एकदा बोलाविले जाते. नगरपरिषदेत विशेष सभा बोलावण्याचा अधिकार नगराध्यक्षाला असतो नगराध्यक्षांनी सर्वसाधारण सभा घेण्यास दिरंगाई, कसूर, बेजबाबदारपणा दाखवल्यास मुख्य अधिकारी जिल्हाधिकाऱ्याला तशी तातडीने माहिती देतो व जिल्हाधिकारी तशी खात्री करून माहिती मिळाल्यापासून सात दिवसाच्या आत नगर परिषदेची सर्वसाधारण सभा बोलावतो. सर्वसाधारण सभेचे अध्यक्षपद नगराध्यक्ष स्वीकारतो. नगरपरिषदे कामकाज सुरू होण्यासाठी गणपूर्ती महत्त्वाची आहे. एकूण नगरसेवकांच्या एक तृतीयांश एवढे नगरसेवक हजर राहणे आवश्यक असते. विशेष सभेसाठी एकूण नगरसेवकांच्या एकद्वितीयांश सदस्य हजर राहणे गरजेचे असते. गणपुरती न झाल्यास पिठासीन अधिकारी ती सभा तहकूब करतो व पुढील तारीख देतो.

१. नगरपालिकेच्या उत्पन्नाची साधने वर पाहिलेले नगरपरिषदेची अनिवार्य कार्य व ऐच्छिक कार्य पार पाडण्यासाठी नगरपरिषदकडे पुरेसा पैसा असणे गरजेचे आहे. नागरिकांना विविध सोयी सुविधा देत असताना आर्थिक बाबी सुद्धा महत्त्वाच्या असतात. सामान्यता राज्यशासन, नगरपरिषदा यांच्या करापासून मिळणाऱ्या उत्पन्नाची वाटणी, नगरपरिषदेचे कर, राज्याच्या संचितेतून मिळणारे अशा विविध प्रकारे नगरपरिषदेला पैसा उपलब्ध होतो.

   १. कर रूपाने मिळणाऱ्या उत्पन्नात नगरपरिषदेला मालमत्तेवरील कर, जकात कर, करमणूक कर, विशेष शिक्षण कर, जाहिरातींवरील कर, वाहन कर, इत्यादी माध्यमातून नगरपालिकेला पैसा मिळत असतो.

   २. नगरपरिषदांना विविध विकास योजनांच्या माध्यमातून राज्य शासनाकडून अनुदान मिळते यामध्ये पाणीपुरवठा योजना, रस्ते निर्मिती व देखभाल, सांस्कृतिक भवन निर्मिती, शिक्षण व आरोग्य विषयक सुविधा इत्यादी माध्यमातून अनुदान मिळते

   ३. कर्जरूपाने नगरपालिकेला काही निधी उभा करता येतो, यामध्ये दीर्घकालीन योजना कार्य पार पाडण्यासाठी एक तृतीयांश रक्कम अनुदान आधारे व दोन तृतीयांश रक्कम नाममात्र व्याजदराने कर्जरूपात मिळते.

### १.२.३ महानगरपालिकेची रचना, अधिकार आणि कार्ये

नागरी स्थानिक स्वराज्य संस्था मधील सर्वोच्च संस्था म्हणजे महानगरपालिका होय. मोठ्या शहरात अर्थात महानगरात महानगरपालिका कार्यरत असते. ७४ व्या घटना दुरुस्तीनुसार मोठ्या शहरासाठी महानगरपालिका स्थापन केली जाईल असा उल्लेख आहे. भारतात पहिली महानगरपालिका इ. सन १६८७ मध्ये मद्रास येथे स्थापन करण्यात आली भारतात सुरुवातीला मुंबई, कलकत्ता, मद्रास आणि त्रिवेंद्रम या चार ठिकाणी महानगरपालिका होत्या

महाराष्ट्रात पुढील महानगरपालिका अधिनियम अस्तित्वात आहेत.

१. मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८.

२. नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८

३. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९.

४. महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती आणि औद्योगिक नागरी अधिनियम, १९६५.

५. महाराष्ट्र नगरपालिका आणि नगरपरिषदा (दुरुस्ती) अधिनियम, १९९४.

सध्या महाराष्ट्रात एकूण २९ महानगरपालिका कार्यरत आहेत त्या पुढीलप्रमाणे.

१. बृहन्मुंबई महानगरपालिका

२. पुणे महानगरपालिका

३. नागपूर महानगरपालिका

४. सोलापूर महानगरपालिका

५. कोल्हापूर महानगरपालिका

६. ठाणे महानगरपालिका

७. पिंपरी-चिंचवड महापालिका

८. नाशिक महानगरपालिका

९. औरंगाबाद महानगरपालिका

१०. कल्याण-डोंबिवली महानगरपालिका

११. अमरावती महानगरपालिका

१२. नवी मुंबई महानगरपालिका

१३. नांदेड वाघाळा महानगरपालिका

१४. उल्हास नगर महानगरपालिका

१५. सांगली-मिरज-कुपवाडा महापालिका

१६. मालेगाव महानगरपालिका

१७. भिवंडी-निजामपूर महानगरपालिका

१८. अकोला महानगरपालिका

१९. भाईंदर महानगरपालिका

२०. अहमदनगर महानगरपालिका

२१. धुळे महानगरपालिका

२२. जळगाव महानगरपालिका

२३. वसई-विरार महानगरपालिका

२४. परभणी महानगरपालिका

२५. चंद्रपूर महानगरपालिका

२६. लातूर महानगरपालिका

२७. पनवेल महानगरपालिका

२८.इचलकरंजी महानगरपालिका

२९. जालना महानगरपालिका

१. महानगरपालिकेचा दर्जा : महानगरपालिका अधिनियमानुसार प्रत्येक महानगरपालिका एक निगम निकाय असेल. म्हणजेच एक व्यक्तीभूत संस्था. तिला स्वतःची मालमत्ता बाळगण्याचा, मालमत्ता संपादन करण्याचा अधिकार आहे. महानगरपालिका दुसऱ्यावर अथवा दुसरी तिच्यावर खटला दाखल करू

शकतात. महानगरपालिकेला स्वतःचे नाव, स्वतःचा शिक्का आपली संपादित मालमत्ता इत्यादी परंपरा अखंडित चालू शकते. महानगरपालिकेची रचनेत पुढील घटकांचा समावेश होतो

१. महानगरपालिकेची परिषद.

२. महानगरपालिकेचे पदाधिकारी

३ महानगरपालिकेचे आयुक्त

४. महानगरपालिकेच्या समित्या

२. महानगरपालिका परिषद :

महानगरपालिका परिषद सदस्यांची संख्या ही त्या शहराच्या लोकसंख्येवर अवलंबून असते. निवडणूक आयोग प्रत्येक महानगरपालिकेची सदस्य संख्या निश्चित करते, व सदस्य संख्या निश्चित झाल्यानंतर लोकसंख्येच्या प्रमाणावर शहराचे विविध प्रभाग पाडण्यात येतात. सदस्यांची निवड ही प्रौढ व गुप्त मतदान पद्धतीने होते. महानगरपालिकेची सदस्य संख्या पुढीलप्रमाणे

| लोकसंख्या | | सदस्य संख्या | | वाढीव लोकसंख्या |
|---|---|---|---|---|
| किमान | कमाल | किमान | कमाल | मागील सदस्य |
| ३ लाख | ६ लाख | ६५ | ८५ | ३ लाखांवरील प्रत्येक १५,००० लोकसंख्येमागे एक सदस्य |
| ६ लाखापेक्षा जास्त | १२ लाख | ८५ | ११५ | ६ लाखावरील प्रत्येकी २०,००० लोकसंख्येमागे एक सदस्य |
| १२ लाखापेक्षा जास्त | २४ लाख | ११५ | १४५ | १२ लाखावरील प्रत्येक ४०,००० लोकसंख्येमागे एक सदस्य |
| २४ लाखापेक्षा जास्त लोकसंख्येसाठी | – | १४५ | २२१ | २४ लाखावरील प्रत्येक एक लाख लोकसंख्येमागे एक सदस्य असे २२१ पर्यंत |

३. नामनिर्देशित सदस्य : नामनिर्देशित सदस्य हे अनुभव व ज्ञानाच्या आधारे नियुक्त केले जातात. नामनिर्देशित सदस्यांची संख्या जास्तीत जास्त पाच एवढी असते. महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर पहिल्या बैठकीत निवडून आलेल्या सदस्यांकडून नामनिर्देशित सदस्यांची निवड केली जाते. त्यांना मतदानाचा हक्क नसतो. परंतु ते महानगरपालिकेच्या बैठकीस उपस्थित राहू शकतात. त्यासाठीच्या पात्रता पुढीलप्रमाणे.

१. जिल्हास्तरावरील रुग्णालयात किमान पाच वर्षे वैद्यकीय व्यवसायाचा अनुभव.

२. सामाजिक कार्यकर्ता व समाज कल्याणाच्या कार्यात किमान पाच वर्षापासून कार्यरत असावा.

३. कामगार क्षेत्रातील कायद्याचे ज्ञान व अनुभव असणारी व्यक्ती.

४. किमान पाच वर्षे महानगरपालिका सदस्य राहिलेली व्यक्ती.

५. महानगरपालिका आयुक्त किंवा मुख्य अधिकारी म्हणून किमान पाच वर्षाचा अनुभव असलेली व्यक्ती.

४. आरक्षण :

सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी नगरपरिषदेत आरक्षणाचे तत्व स्वीकारले आहे. आरक्षण पुढीलप्रमाणे :

१. अनुसूचित जाती अनुसूचित जमातीला त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात काही जागा राखीव ठेवल्या जातात. या राखीव जागांपैकी एक तृतीयांश जागा याच प्रवर्गातील महिलांकरिता राखीव असतात.

२. इतर मागासन प्रवर्गासाठी २७% जागा राखीव असतील यापैकी एक तृतीयांश जागा याच प्रवर्गातील महिलांसाठी राखीव असतात.

३. एकूण सर्वसाधारण जागांपैकी एक द्वितांश जागा स्त्रियांसाठी राखीव असतील. यामध्येच अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागास प्रवर्ग महिलांचा देखील समावेश असेल.

५. पात्रता : महानगरपालिकेची निवडणूक लढवू इच्छिणाऱ्या उमेदवारासाठी पुढील पात्रता लागते.

   १. तो भारताचा नागरिक असावा.

   २. त्या क्षेत्राच्या मतदार यादीत त्याचे नाव असावे.

   ३. वयाची २१ वर्षे पूर्ण असावीत.

   ४. राखीव जागेसाठी त्याच संवर्गातील उमेदवार असावा.

   ५. ज्या संवर्गाकरिता राखीव जागा असेल त्याच संवर्गातील व्यक्ती असावी.

   ६. उमेदवार वेडा,वेडसर, भ्रष्टाचारी असता कामा नये.

   ७. कोणत्याही कारणास्तव दोन वर्षापेक्षा अधिक कालावधीची कारावासाची शिक्षा झालेली नसावी व एखाद्या व्यक्तीस अशी शिक्षा झाली असल्यास शिक्षेचा कालावधी संपल्यानंतर पाच वर्षाचा कालावधी संपलेला असावा.

६. कार्यकाल : ७४ घटनादुरुस्ती अन्वये महानगरपालिकेतील चा कार्यकाल पाच वर्षाचा आहे. निर्वाचित सदस्यांचा कार्यकाल पाच वर्षाचा आहे. पाच वर्षाचा कार्यकाल पूर्ण होण्यापूर्वी सदस्य आपल्या पदाचा राजीनामा देऊ शकतात. ते आपला राजीनामा महापालिकेच्या आयुक्ताकडे देतात. राजीनाम्यानंतर महानगर पालिकेचा कार्यकाल सहा महिन्यापेक्षा अधिक असल्यास मध्यावधी निवडणूक घेण्याची गरज असते. महानगरपालिकेच्या एखाद्या सदस्यांनी गैरवर्तन अथवा

लज्जास्पद वर्तन केल्यास, कर्तव्यात कसूर केल्यास महानगरपालिकेच्या एकूण सदस्यांपैकी तीन चतुर्थांश सदस्यांच्या मान्यतेने त्या सदस्यास पदावरून कमी केले जाते.

७. महानगरपालिकेचा महापौर व उपमहापौर महापौर हा महानगरपालिकेचा राजकीय प्रमुख असतो. शहराचा प्रथम नागरिक असतो. भारतात सुरुवातीला महानगरपालिकेच्या प्रमुखास ब्रिटन प्रमाणेच मेयर या नावाने संबोधले जात होते. नंतर मेयर शब्दासाठी पर्यायी शब्द महापौर कायम झाला.

८. महापौर पदाचे आरक्षण :

    १. अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती करिता राज्यातील महानगरपालिका असलेल्या शहराच्या एकूण लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण असेल. याच आरक्षणापैकी याच प्रवर्गातील महिलांकरता एक तृतीयांश पेक्षा कमी नाही इतके आरक्षण असेल.

    २. राज्यातील महापौर पदांच्या एकूणच संख्येच्या २७% जागा नागरिकांच्या मागास प्रवर्गाकरिता राखीव असतील. या राखीव जागांपैकी एक तृतीयांश पदे याच प्रवर्गातील महिलांसाठी राखीव असतील.

    ३. राज्यातील एकूण महापौर पदाच्या एक तृतीयांश जागा महिलांकरता राखीव असतील. यामध्येच अनुसूचित जाती अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्ग वर्गातील महिलांचा देखील यात समावेश असेल.

९. कार्यकाल : महापौर व उपमहापौर यांचा कार्यकाल महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर झालेल्या पहिल्या सभेच्या तारखेपासून पाच वर्षाचा असेल. महापौर आपला कार्यकाल संपण्यापूर्वी स्व मर्जीने आपल्या पदाचा राजीनामा देऊ शकतो महापौर आपला राजीनामा विभागीय आयुक्ताकडे देतो.

१०. मानधन व भत्ते ७४ व्या घटना दुरुस्तीनुसार महापौरांचे मानधन व भत्ते यांची तरतूद केलेली आहे. महानगरपालिका नियमानुसार व राज्य शासनाच्या आदेशानुसार सदस्यांना व पदाधिकाऱ्यांना मानधन व भत्ते दिले जातात.

११. महापौराचे अधिकार व कार्य महापौरास पुढील प्रमाणे अधिकार दिलेले आहेत.

    १. महानगरपालिका परिषदेची बैठक बोलवणे. परंतु दोन बैठकीत ३० दिवसांपेक्षा अधिक अंतर असणार नाही याची दक्षता घेणे. तसेच परिषदेची खास बैठक पाहिजे तेव्हा बोलवण्याचा अधिकार महापौराला आहे.

    २. महानगरपालिकेच्या बैठकीचे अध्यक्ष स्थान भूषविणे, बैठकीचे संचलन करणे व बैठकीच्या कामकाजावर नियंत्रण ठेवणे.

३. महानगरपालिकेच्या संपूर्ण प्रशासनावर नियंत्रण ठेवणे. महानगरपालिकेच्या प्रशासना संबंधी आयुक्तांकडून अहवाल मागविणे.

४. महानगरपालिकेच्या सर्व कागदपत्रांची व अभिलेखांची तपासणी करणे.

५. महापालिकेचा पत्रव्यवहारावर नियंत्रण ठेवणे, सदस्यांचे तात्पुरते निलंबन करणे.

६. महानगरपालिकेच्या कामाची पाहणी व चौकशी करणे, नागरिकांच्या तक्रारींची निवारण करणे.

१२. महानगरपालिका आयुक्त महानगरपालिकेचा प्रशासकीय प्रमुख म्हणून महानगरपालिका आयुक्ताचे महत्त्वाचे स्थान आहे. नगर आयुक्ताची नियुक्ती राज्य शासनाकडून केली जाते. महाराष्ट्र शासनाचा प्रमुख म्हणून महानगरपालिका आयुक्त महानगरपालिकेत काम करतो. महानगरपालिका आयुक्त पदावर काम करणारा व्यक्ती भारतीय प्रशासन सेवेतील आय.ए.एस अधिकारी असतो.

कार्यकाल: महानगरपालिका आयुक्त कार्यकाल वेगवेगळ्या शहरात वेगवेगळा आहे. महाराष्ट्रातील महानगरपालिका आयुक्ताचा कार्यकाल तीन वर्षाचा आहे. या कार्यकालात बदल करण्याचा अधिकार राज्य शासनास असतो. राज्य शासनाला मुदतवाढ देण्याचा व कार्यकाल संपण्यापूर्वी परत बोलवण्याचा अधिकार देखील आहे. शिवाय महानगरपालिकेच्या विशेष सभेत एकूण सदस्यांपैकी किमान पाच अष्टमांश सदस्यांनी बहुमताने ठराव संमत करून आयुक्ताला परत बोलावावे अशी मागणी केल्यास राज्य शासन आयुक्तास परत बोलावू शकते.

**महानगर पालिका आयुक्ताचे अधिकार व कार्ये :**

१. महानगरपालिकेचा प्रशासकीय प्रमुख या नात्याने महापालिकेच्या बैठकीत सहभाग घेणे व आपले मत मांडणे.

२. प्रशासकीय अनुभवाच्या व अभ्यासाच्या आधारे महानगरपालिकेला सामान्य धोरण निश्चितीच्या वेळी सल्ला व मार्गदर्शन देणे.

३. परिषदेने कायदा संमत केले नंतर त्याची अंमलबजावणी करण्यासाठी नियम उपनियम तयार करणे.

४. महानगरपालिकेच्या परिषदेने संमत केलेल्या सर्व नियमांची अंमलबजावणी करण्याचे काम आयुक्तावर असते.

५. महानगरपालिकेचा मुख्य प्रशासक या नात्याने पालिका प्रशासनावर नियंत्रण ठेवणे.

६. महानगरपालिकेतील अधिकारी व कर्मचारी यांच्यात कामाचे विभाजन करून जबाबदाऱ्या निश्चित करणे.

७. कर्मचाऱ्यांचे वेतन, भत्ते, रजा, प्रशिक्षण, बढती सेवानिवृत्ती, वेतन इत्यादी प्रश्न सोडवणे.

८. महानगरपालिकेला मिळालेल्या नेमणुकीच्या अधिकारांची अंमलबजावणी करणे.

९. आपत्कालीन परिस्थितीत आपत्ती निवारणासाठी योग्य उपाययोजना करणे.

१०. महानगरपालिकेचे अंदाजपत्रक तयार करणे व ते परिषदेच्या संमतीसाठी पाठवणे.

११. अंदाजपत्रकाची अंमलबजावणी करणे.

१२. महानगरपालिकेचा प्रतिनिधी म्हणून महापालिकेच्या कर प्रणाली, खरेदी-विक्री संपत्ती संपादन व हस्तांतरण इत्यादी कार्य करणे.

वरील अधिकार व कार्य दिलेली असली तरी. याशिवाय आणखी बरीच कामे आयुक्तांना पार पाडावे लागतात. महानगरपालिकेच्या दैनंदिन कामकाजापासून ते विविध विकास कामे राबविण्याची भूमिका आयुक्तांवर असते.

**महानगरपालिकेची कार्ये :** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ६३ ते ६६ मध्ये मध्ये महानगरपालिकेची कार्ये दिली आहेत. महानगरपालिकेला अनिवार्य स्वरूपाचे व ऐच्छिक स्वरूपाची कार्ये पार पाडावी लागतात.

**अनिवार्य कार्ये :**

१. शहरातील महानगरपालिकेचे कार्यक्षेत्र निश्चित करणे.

२. महानगरपालिकेच्या सीमा ठरविणे व त्यात फेरबदल करणे.

३. महानगरपालिका क्षेत्रात पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे.

४. जल निस्सारणाची व्यवस्था करणे, दुर्गंधीयुक्त पदार्थांची विल्हेवाट लावणे.

५. शहरातील साफसफाई व स्वच्छता राखणे, केरकचरा गोळा करून विल्हेवाट लावणे.

६. शहरातील नाले, मल निस्सारणाची कामे, सार्वजनिक शौचालय व स्वच्छता ग्रहांची सोय करणे.

७. महानगरपालिका क्षेत्रात दिवाबत्तीची सोय करणे.

८. महानगरपालिका क्षेत्रात अग्निशामक दलाची व्यवस्था करणे.

९. शहरातील विविध रस्त्यांना व सार्वजनिक ठिकाणे यांना नावे देणे.

१०. स्मशानभूमीची व्यवस्था करणे.

११. जनावरांचे कत्तलखाने बांधणे व ते सुस्थितीत ठेवणे.

१२. आरोग्य कार्यात सार्वजनिक रुग्णालयाची व्यवस्था करणे, संसर्गजन्य रोगांपासून बचाव करण्यासाठी प्रतिबंधक लसी टोचणे.

१३. जन्ममृत्यूच्या नोंदी ठेवणे.

१४. मोकाट जनावरांसाठी कोंडवाडा बांधणे व त्यांचे व्यवस्था करणे.

१५. प्राथमिक शिक्षणाची सोय करणे.

१६. शहरातील धोक्याच्या इमारती पाडून त्याची व्यवस्था करणे.

१७. शहरातील उपद्रवकारक व धोकादायक व्यवसाय उद्योगधंदे बंद करणे.

१८. शहरातील सर्व रस्त्यांचे सफाई तसेच सार्वजनिक रस्ते पूल जोड रस्ते बांधणे व सुस्थितीत ठेवणे.

१९. शहरातील गलिच्छ वस्त्यांचे निर्मूलन करणे.

२०. शहरातील मोकाट कुत्र्यांचा प्रतिबंध करणे.

२१. खाजगी वापरा करिता पुरेशी पाण्याची व्यवस्था करणे.

या व अशा प्रकारे अनेक अनिवार्य कार्य महानगरपालिकेला पार पाडावी लागतात.

**ऐच्छिक कार्ये :**

महानगरपालिकेला आपल्या मर्जीनुसार व कुवतीनुसार ऐच्छिक कार्ये करावयाचे असतात.

१. शहरातील अंध, अपंग, बहिरे, मुके अशा व्यक्तींची काळजी घेण्यासाठी संस्था स्थापन करणे व त्यांची व्यवस्था ठेवणे.

२. प्रसुतिगृह व बालकल्याण केंद्र स्थापन करणे व त्यांची निगा राखणे.

३. शहरात मनोरंजनांच्या साधनांची व्यवस्था करणे.

४. सार्वजनिक व्यापारी संकुल, क्रीडांगणे, उद्याने मनोरंजनाच्या जागा उपलब्ध करून देणे.

५. सार्वजनिक स्नानगृहे, पोहण्याचे तलाव, सार्वजनिक स्थळे, कपडे धुण्याची ठिकाण उभारणे व त्यांची व्यवस्था करणे.

६. महानगरपालिका अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी घरकुल उभारणे.

७. ग्रंथालय, वाचनालय, वनस्पती संग्रहालय, कलादादने, प्राणी संग्रहालय उभारणे व त्यांची व्यवस्था ठेवणे.

८. शहरांतर्गत प्रवासा करता वाहतूक व्यवस्था करणे.

९. शहरातील नागरिकांसाठी दुग्धजन्य पदार्थ उपलब्ध करून देण्याकरता दूध डेअरी उभारणे.

१०. शहरात होणाऱ्या विवाहांच्या नोंदी ठेवणे.

११. वृद्धाश्रम उभारणे व त्यांची व्यवस्था करणे.

१२. सार्वजनिक कार्यक्रमातिरिक्त अंशदान करणे.

१३. पिण्याच्या पाण्याचे नळ, जनावरांना पाणी पिण्याकरिता हौद उभारणे.

१४. महानगरपालिकेच्या उत्पन्नाची साधने :

**महानगरपालिकेला उत्पन्नाचे विविध मार्ग :**

१. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमानुसार त्या-त्यावेळी अमलात असलेल्या कायद्या मधील तरतुदीनुसार महापालिकेला निधी मिळतो.

२. महानगरपालिकेच्या वतीने मालमत्तेचा विनीयोग करून मिळालेला पैसा.

३. महानगरपालिकेच्या मालमत्तेपासून मिळणाऱ्या भाड्याच्या सर्व रकमा.

४. कर रूपाने गोळा केलेला पैसा.

५. न्यायालयीन दंडा शिवाय वसूल झालेल्या फी व दंडाच्या रक्कमा.

६. शासन, सार्वजनिक संस्था, खाजगी संस्था, खाजगी व्यक्ती यांचेकडून अनुदान देणगी व ठेव रूपाने मिळालेला पैसा.

७. मालमत्ता कराच्या माध्यमातून म्हणजेच पाणीपट्टी, अतिरिक्त पाणीपट्टी, साफसफाई कर, अतिरिक्त साफसफाई कर, भूमी व इमारतींवरील कर या माध्यमातून पैसा महानगरपालिके कडे जमा होतो.

८. वाहने, जनावरे यांवरील कर, ने-आण करणारी वाहने या माध्यमातून मिळालेला कर.

९. शहरात येणाऱ्या विविध प्रकारच्या मालावर वस्तूंवरील बसवलेला कर, शहरात विक्रीसाठी वापरासाठी येणाऱ्या बाहेरील मालावरील उपकर, आकारला जातो. संकीर्ण करा अंतर्गत व्यापार, व्यवसाय कर, नोकरी वरील कर, वृत्तपत्रातील जाहिराती व्यतिरिक्त अन्य जाहिरातींवरील कर, नाट्यगृहे, मनोरंजन कर, संपत्तीच्या हस्तांतरणावरील कर, रस्ता कर इत्यादी करा पासून मिळणारे उत्पन्न.

१०. करा पेक्षा वेगळ्या मार्गाने मिळणारे उत्पन्न : महानगरपालिकेला हॉटेल, डेअरी,वर्कशॉप, फॅक्टरी यांच्यावरील परवाना शुल्क मिळते.

११. याशिवाय राज्य शासनाच्या करातील मिळणारा वाटा, राज्य शासनाकडून मिळणारे अनुदान, व कर्जाच्या माध्यमातून मिळणारा पैसा. हा महानगरपालिकेसाठी उत्पन्नाचे स्त्रोत ठरतो.

१५. महानगरपालिका समित्या : महानगरपालिकेच्या कामकाजाचा जलगतीने होण्या साठी व लोकांना सोयी सुविधा देण्याच्या दृष्टिकोनातून चार महत्त्वपूर्ण समित्या आहेत. महानगरपालिका नागरी प्रशासनातील एक महत्त्वपूर्ण व मोठी संस्था आहे.

१. स्थायी समिती

२. परिवहन समिती

३. प्रभाग समिती

४ विशेष व तदर्थ समिती

**१. स्थायी समिती :** महानगरपालिकेत स्थायी समिती महत्त्वपूर्ण समिती असते. सदर समितीला कायदेशीर दर्जा असतो. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ नुसार महानगरपालिकेत स्थायी समिती नियुक्त करण्याचा अधिकार आहे. स्थायी समितीत महानगरपालिकेतील सोळा सदस्यांचा समावेश असतो. या समितीतील दरवर्षी निम्मे सदस्य निवृत्त होतात आणि तेवढेच नव्याने घेतले जातात. त्यामुळे या समितीचे काम अखंडपणे सुरू राहते, स्थायी समितीतून निवृत्त होणाऱ्या सदस्यास पुन्हा पुढील वर्षी समितीवर येऊ शकतो. स्थायी समितीतील सर्व सदस्य महानगरपालिकेचे निर्वाचित सदस्य असतात. स्थायी समितीचे सदस्य आपल्या पहिल्या बैठकीत आपल्यातीलच एका सदस्याची सभापती म्हणून निवड करतात. राजकीय दृष्ट्या सभापती पद हे महत्त्वपूर्ण असते. स्थायी समितीचा व सभापतीचा कार्यकाल एक वर्षाचा असतो. मुदतीपूर्वी सभापती आपल्या पदाचा राजीनामा देऊ शकतो. महापालिकेचा सचिव स्थायी समितीचा सचिव म्हणून काम पाहतो. स्थायी समितीचे आठवड्यातून एकदा बैठक होते.

**स्थायी समितीचे अधिकार व कार्ये :**

१. महानगरपालिकेच्या आयुक्ताला महत्त्वाच्या कामांमध्ये स्थायी समितीचे सहकार्य करणे.

२. महानगरपालिकेचा अर्थसंकल्प तयार करताना विचारविनिमय करून महापालिकेत सादर करणे मदत करणे.

३. महापालिकेतील आयुक्त उपायुक्त शहर अभियंता यांना स्थायी समितीच्या आदेशाचे पालन करावे लागते.

४. महापालिकेतील कर्मचाऱ्यांवर नियंत्रण व देखरेख ठेवणे.

५. स्थायी समितीच्या पूर्व समितीने महापालिकेचा आयुक्त हंगामी कर्मचाऱ्यांची नेमणूक करू शकतो.

६. महापालिकेची विशेष सभा बोलवण्याचा अधिकार स्थायी समितीला आहे.

**२. परिवहन समिती :** महानगरपालिकेत परिवहन उपक्रम राबवण्यासाठी परिवहन समिती स्थापित केली जाते. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ नुसार परिवहन समितीचे रचना अधिकार कार्य सांगितले आहेत. परिवहन समिती १३ सदस्य असतात महानगरपालिकेच्या सदस्यांकडून त्यांची निवड केली जाते, परिवहन किंवा प्रशासनाचा अनुभव असणाऱ्या शिवाय ज्यांच्याकडे अभियांत्रिकी, औद्योगिक, वाणिज्य क्षमता आहेत अशा व्यक्तींमधून महानगरपालिका सदस्यांची निवड करते. हे सदस्य महानगरपालिकेचे निर्वाचित सदस्य असू शकतील किंवा असूही शकणार नाही. स्थायी समितीचा अध्यक्ष परिवहन समितीचा सदस्य असतो. परिवहन समितीचे १/२ सदस्य दर दोन वर्षांनी निवृत्त होतात आणि तेवढेच नव्याने निवडले जातात. परिवहन समितीचे सदस्य आपल्यातून एकाची सभापती, म्हणून निवड करतात सभापतीचा कार्यकाल एक वर्षाचा असतो.

**३. प्रभाग समिती :** लोकसंख्येनुसार प्रभाग समित्या तयार केल्या जातात. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ अन्वये महापालिकेच्या लोकसंख्येच्या प्रमाणात प्रभाग समित्या स्थापल्या जातात. कोणत्या प्रभाग समितीत कोणत्या प्रभागाचा समावेश करावा यासंबंधीचा अधिकार महानगरपालिकेला दिला आहे. लोकसंख्येनुसार प्रभाग समित्या पुढील प्रमाणे १. तीन लाख ते साडेचार लाखाला तीन प्रभाग समिती २. साडेचार लाख ते बारा लाखाला चार प्रभाग समित्या ३. बारा लाख ते चोवीस लाखाला नऊ प्रभाग समिती. ४. चोवीस लाखापेक्षा जास्त तेरा प्रभाग समित्या असे विभाजन केलेले असते.

प्रत्येक प्रभाग समितीमध्ये पुढील व्यक्तींचा समावेश असतो. प्रभाग समितीच्या प्रादेशिक क्षेत्रातील निवडणूक विभागाचे प्रतिनिधित्व करणारे महानगरपालिका सदस्य, प्रभाग समितीच्या प्रादेशिक क्षेत्राचा प्रभारी अधिकारी, प्रभागात मतदार म्हणून नोंद असलेले तीन सदस्य. प्रभाग समितीचा कार्यकाल पाच वर्षाचा असतो.तर सभापतीचा कार्यकाल एक वर्षाचा असतो.

**प्रभाग समितीची कार्ये :**

१. स्वच्छता, पाणीपुरवठा, जल निसारण इत्यादी बाबतीत नागरिकांच्या समस्या सोडविणे.

२. प्रभागाशी संबंधित खर्चासाठी अर्थसंकल्पाच्या विविध लेखा शीर्षकाखालील प्रस्ताव आयुक्ताकडे पाठवण्यापूर्वी त्याच्यावर चर्चा विचारविनिमय करणे.

३. महानगरपालिकेच्या विकासाच्या दृष्टिकोनातून योग्य व आवश्यक असणारी कामे प्रभाग समितीकडे सोपवली जाऊ शकतात.

**विशेष व तदर्थ समिती :** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ नुसार विशेष वतर्त समितीची तरतूद आहे. महानगरपालिका वेळोवेळी विषय समित्यांची स्थापना करते. समितीचे कार्यक्षेत्र निश्चित केलेले असते. सदर समितीत महिला सदस्य असावे लागतात. विशेष समितीचे सदस्य आपल्यातून एकाची सभापती व एकाचे उपसभापती म्हणून निवड करतात.

आवश्यकतेनुसार सदस्य आपल्यातून हव्या तेवढ्या तदर्थ समित्या नेमू शकतात. महानगरपालिका योग्य वाटतील असे विषय या समितीकडे सोपवले जातात, व त्याची चौकशी करून तो अहवाल सादर करण्यास सांगितले जाते. महापालिकेतील विशेष समित्या व तदर्थ समित्या यांची एकूण संख्या पाच पेक्षा अधिक असता कामा नये, अशी तरतूद आहे.

## १.३ सारांश

आधुनिक कालखंडामध्ये धर्म, जात, भाषा, संस्कृती इ. मतमतांतरे असून देखील एकत्रित राहण्याचे पर्यावरण नागरीकरण प्रक्रियेत वाढले आहे. प्रत्येक नगरामध्ये अथवा महानगरामध्ये वेगवेगळ्या नागरी केंद्री योजना पाण्याचे वाटप, बहुतेक साधनसंपत्ती, पर्यावरण, संरक्षण इत्यादींना शासनाने विशेष प्राधान्य देऊन नागरीकरणाला चालना दिलेली दिसून येते.

## १.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

महापौर : महानगरपालिकेचा राजकीय प्रमुख

नगराध्यक्ष : नगरपरिषदेचा राजकीय प्रमुख

आयुक्त : महानगरपालिकेचा प्रशासकीय प्रमुख

## १.५ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

१. भारतात पहिली महानगरपालिका प्रथम कोठे स्थापन झाली?

२. महाराष्ट्र राज्याची स्थापना कोणत्या साली झाली?

३. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी कोणता अधिनियम लागू करण्यात आला?

४. नगरपालिकेत इतर मागास प्रवर्गासाठी किती टक्के आरक्षण असते?

५. नगर पालिकेच्या राजकीय प्रमुखास काय म्हणून संबोधतात?

६. स्थायी समितीचा अध्यक्ष कोण असतो?

७. नगरपालिकेतील मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याची नेमणूक कोण करते?

८. स्थायी समितीच्या सभापतीच्या कार्यकाल किती वर्षाचा असतो?

९. महानगरपालिकेच्या कार्यकाल किती वर्षाचा आहे?

१०. महापौर आपला राजीनामा कोणाकडे देतो?

## १.६ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१. भारतात पहिली महानगरपालिका प्रथम मद्रास येथे स्थापन झाली.

२. महाराष्ट्र राज्याची स्थापना १ मे १९६० साली झाली.

३. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी 'महाराष्ट्र नगरपालिका, नगरपंचायती व औद्योगिक नागरी अधिनियम', १९६५, अधिनियम लागू करण्यात आला.

४. नगरपालिकेत इतर मागासन प्रवर्गासाठी २७% टक्के आरक्षण असते.

५. नगर पालिकेच्या राजकीय प्रमुखास नगराध्यक्ष म्हणून संबोधतात.

६. स्थायी समितीचा अध्यक्ष नगराध्यक्ष असतो.

७. नगरपालिकेतील मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याची नेमणूक राज्य शासन करते.

८. स्थायी समितीच्या सभापतीच्या कार्यकाल १ वर्षाचा असतो.

९. महानगरपालिकेच्या कार्यकाल पाच वर्षाचा आहे.

१०. महापौर आपला राजीनामा कोणाकडे विभागीय आयुक्ताकडे देतो.

## १.७ सरावासाठी स्वाध्याय

अ) टिपा लिहा

१. नगरपालिका उमेदवारासाठीची पात्रता.

२. नगराध्यक्षाचे अधिकार व कार्ये.

३. नगर आयुक्त.

४. स्थायी समिती.

ब) दीर्घोत्तरी प्रश्न

१. ७४ व्या घटनादुरुस्तीच्या तरतुदी स्पष्ट करा.

२. नगर पालिकेचे अधिकार व कार्ये स्पष्ट करा.

३. महानगरपालिकेची रचना, अधिकार व कार्ये स्पष्ट करा.

## १.८ अधिक वाचनासाठी संदर्भ

१. प्रा. बिराजदार घोडके, भारतातील स्थानिक स्वशासन संस्था, अंकुश पब्लिकेशन्स, नागपूर, १९९९

२. डॉ. श्याम शिरसाठ, प्रा.भगवान सिंग बैनाडे, भारतातील स्थानिक स्वराज्य संस्था, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, २००६.

३. प्रा. अ. ना. कुलकर्णी, भारतातील स्थानिक स्वशासन, विद्या प्रकाशन, नागपूर, २०००.

४. प्रा. के. आर. बंग, महाराष्ट्राचे शासन आणि राजकारण, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, २००९.

६. प्रा. बी. बी. पाटील, महाराष्ट्र शासन आणि राजकारण, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

❑❑❑

# घटक २
# नागरी स्थानिक स्वराज्य शासन संस्थांच्या योजना
## (Schemes of Urban Local Self Government)

**अनुक्रमणिका**

२.० उद्दिष्ट्ये

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय - विवेचन

२.२.१ पाणी स्वच्छता योजना

२.२.२ कचरा व्यवस्थापन योजना

२.२.३ झोपडपट्टी विकास कार्यक्रम

२.३ सारांश

२.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

२.५ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

२.६ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.७ सरावासाठी स्वाध्याय

२.८ अधिक वाचनासाठी संदर्भ

## २.० उद्दिष्ट्ये

नागरी स्थानिक स्वराज्य संस्थामधील योजना या घटकाच्या अभ्यासनंतर आपणास-

- भारतातील आणि महाराष्ट्रातील सांडपाणी, कचरा आणि झोपडपट्टीची समस्या किती गंभीर आहे यांची माहिती होईल.
- स्थानिक स्वराज्य संस्थानी सांडपाणी, कचरा आणि झोपडपट्टयांची समस्या सोडविण्यासाठी आजपर्यंत केलेल्या कार्याची माहिती मिळेल.
- केंद्र सरकार, राज्यसरकार आणि स्थानिक स्वराज्य संस्थानी  या सोडविण्यासाठी तयार केलेल्या योजना प्रकल्प कार्यक्रम अभियान प्राधिकरण नियम आणि कायदे यांची माहिती होईल.
- कचरा आणि सांडपाण्याची समस्या निवारण्यसाठी त्यावर केल्या जाणाऱ्या शास्त्रीय प्रक्रिया व्यवस्थापन आणि विल्हेवाट लावण्याच्या प्रक्रियेची माहिती होईल.

- झोपडपट्ट्याच्या निर्मल्यून विकास व पुनर्विकास करुन लोकाचे जीवनमान व राहणीमान उंचवण्यासाठी सरकारने केल्या प्रयत्नांची माहिती प्राप्त होईल.
- सांडपाणी कचरा आणि झोपडपट्यांची समस्या सोडविण्यासाठी जबाबदारी फक्त सरकारचीच नाही नागरिक ही स्वत:त्यामध्ये सहभागी होवून ही समस्या सोडवू शकतात याची जाणिव निर्माण होईल.

## २.१ प्रास्ताविक

भारत हे एक विकसनशील राष्ट्र आहे. मागास राष्ट्रांचा विकसित राष्ट्रांकडे प्रवास होताना ज्या ज्या स्तरातून देश मार्गक्रमण करीत असतात त्या सर्व पायऱ्या आपण आता अनुभवतो आहोत. या सर्व पायऱ्यांवर प्रक्रियेमध्ये फक्त सरकारांनीच प्रयत्न आणि विकास योजना राबवायच्या आणि नागरिकांनी फक्त लाभ घ्यायचा ही मानसिकता नागरिकांची असता कामा नये. आधुनिक काळात भारतात खेडी, छोटी शहरे आणि महानगरांचा विकास झपाट्याने होत आहे. महानगरांचा होणारा अमर्याद आणि आक्राळविक्राळ विकास नागरिकांचा जीवनावर परिणाम करत आहे. लोकसंख्येचा झालेला प्रस्फोट नागरिकरण औद्योगिकरण आणि वाढती बेराजगारी शेतीतील नैसर्गिक संकटे यामुळे रोजगार आणि अर्थार्जनासाठी ग्रामीण भागातील परराज्यातील आणि काही शेजारच्या राष्ट्रातील लोकसध्दा महानगरांच्या दिशेन निघालेले आपण पाहतो एवढया सर्व लोकाना शहरामध्ये समावून घेणे ही एक शहरांमधल प्रमुख समस्या बनली आहे. त्यातूनच पुढे झोपडपटयांची समस्या जन्मास आली अशा दाट आणि जटिल किचकट झोपडपट्टयामधून लोकसंख्येची घनता प्रचंड वाढली यासर्व लोकसंख्येपुढे नागरी व्यवस्था आणि सेवास्स्थांवर ताण वाढू लागला नागरी सेवा संस्था काही वेळा हतबल होतात एवढया माळया अनियत्रित लोकसमुदयाच्या जीवनमान आरोग्यमान रोजगार निर्माण करताना सरकारांची देखील दमछाक होत परिणामी मोठया शहरांमध्ये उग्र स्वरुपाच्या सांडपाण्याच्या कचरा निर्मुलनाच्या आणि झोपडपट्टयांच्या प्रश्न दिवसे दिवस गंभीर होत चालत आहे. सांडपाण्याच समस्या कचऱ्याची समस्या आणि झोपडपट्टयाची समस्याचे स्वरुप कसे आहे तयावर कोणकोणत्या उपयायोजना केल्या जात आहे तव नागरिकांचे जीवन सुसह्य करण्यासाठी केल्या जाणाऱ्या प्रयत्नांचा अभ्यास करणे क्रमप्राप्त झाले आहे.

## २.२ विषय विवेचन

### २.२.१ **पाणी स्वच्छता योजना** (Water Sanitization Scheme)

पाणी हे जीवन आहे हवा आणि पाणी या पृथ्वीवरील सर्वात मौल्यवान गोष्टी आहेत. स्वच्छ पाणी या पृथ्वीवरील सर्वात मौल्यवान गोष्ट आहेत स्वच्छ पाणी जैवविविधतेस उपकारक ठरते महानगरांमध्ये प्रत्येक व्यक्तीपर्यत पाणी पोहोचविणे ही आव्हानात्मक बाब आहे. शहरांमध्ये कार्यरत असणाऱ्या नगरपालिका, महानगरपालिका, राज्यसरकारे आणि केंद्रसरकार जाणिवपुर्वक मोठया प्रमाणात प्रयत्न करुन प्रत्येक व्यक्तीला स्वच्छ आणि पिण्यायोग्य पाणी मिळेल याकरिता आटोकाट प्रयत्न करत असतात त्यांच्या प्रयत्नांना कमी अधिक प्रमाणात यश मिळतांना दिसते मानवाला होणाऱ्या रोगापैकी ९७: रोग पाण्यावाटे होत असतात

शहरांसह ग्रामीण भागात सुध्दा अलिकडील काळात जलप्रदुषण वाढताना दिसते. पेयजलाच्या स्त्रोतांमध्ये मिसळणारे शुध्दीकरण प्रक्रिया न केलेले सांडपाणी किटकनाशके कारखान्यातील रासायनिक पदार्थ मिश्रीत सांडपाणी घरांमधील धुणीभांडी आंघोळीमधून निर्माण होणारे सांडपाणी मलमूत्र विर्सजनातून मिसळणारे दुषित पाणी पावसाळयात मोठ्या प्रमाणात पडणारे पाणी त्यातून जमिनीवरील घाण कचरा वंगण रासायनिक पदार्थ यांचे मिश्रण होवून ते पाणी नदीनाल्यामध्ये मिसळते त्यातून मोठया प्रमाणात पाण्याचे स्त्रोत प्रदुषित होतात. या पाण्यातूनच मानवाला उपयुक्त पेजयजल तयार करण्याच जबाबदारी विशेषत: स्थानिक स्वराज्य संस्थांवरच असते, ही प्रक्रिया अत्यंत किचकट आणि तेवढीच जबाबदारी आहे.

आपण लोक गाव शहरांमध्ये पाण्यावाटे साथीचे रोग पसरलेले पाहतो. मानवी जीवनास धोका उत्पन्न होण्यासाठी पाण्यातून आलेले जंतु विषाणु रासायनिक पदार्थ हेच कारण असते. अलिकडील काळात राज्य आणि केंद्र सरकारने अनेक उपाययोजना कायदे अभियाने कार्यक्रम राबवून प्रत्येक घराला शुध्द पेजजल पुरविण्याच्या योजना राबविलेल्या दिसतात पाणी स्वच्छता योजनेस इंग्रजीमध्ये Water Sanitization Scheme असे म्हणतात. वर उल्लेख केलेल्या विविध कारणांमुळे पेयजलाचे स्त्रोत म्हणजे नद्या तलाव सरोवरे, निर्झरे, ओढे व समुद्र प्रदुषित होते, परिणाम मानवी जीवनच काय अखंड जीवसृष्टीला त्याचे परिमामण भोगावे लागतात जलचक्र बिघडते पर्यावरणात अनियत्रित बदल होतात. त्याचे परिणाम कृषी औद्योगिकरणावर होवून संपुर्ण मानवी जीवन राष्ट्रे प्रभावित होतात एवढे महत्वपूर्ण स्थान शुध्द पाण्यात मानवाच्या जीवनात आहे.

**जलप्रदुषण किंवा सांडपाणी निर्माण होण्याची कारणे –**

पेयजलाचे स्त्रोत प्रदुषित होण्यासाठी मुख्यकारण पाण्यात मिसळणारे सांडपाणी होय सांडपाण्यास इंग्रजीमध्ये किंवा असे म्हणतात. प्रथम आपण सांडपाणी म्हणजे काय? ते पाहूया मनुष्यांच्या दैनंदिन वापरातून निर्माण झालेले टाकाऊ पाणी म्हणजे सांडपाणी होय. यालाच अपशिष्ट जल असेही म्हणतात. सांडपाणी विविध प्रकारचे असते घरातील किंवा हॉटेलमधील, स्वयंपाकगृह, स्नान कपडे धुण्यातून जे अस्वच्छ पाणी निर्माण होते ते तुलनेने कमी अपायकारक असते. या पाण्याला करडे सांडपाणी म्हणतात तर शौचालयातून बाहेर पडणारे मलमुत्र मिश्रीत पाणी असते ते अधिक दुर्गधीयुक्त आणि जास्त अपायकारक असते. त्या पाण्यास काळे सांडपाणी म्हणतात. या पाण्यात सुक्ष्म रोगजंतु, जिवाणु, विषाणु आणि परजीवी यासारखे हानीकारक सुक्ष्म जीव असतात रस्त्याच्या दुतर्फा असणाऱ्या गटारांमधून वाहणारे पाणी पावसाचे आणि पुरातून येणारे पाणी हे देखील सांडपाण्याचाच प्रकार आहे. पावसाच्या पाण्यात माती जमीनीवरील रसायने, वायू, घाण, कचरा, धूळ, तेल, वंगण इ मिश्रित होतात व ते पाणी गटार नाले ओढ्यामधून नद्या तलावांमध्ये मिसळते औद्योगिक वसाहतीमध्ये अनेक कारखाने असतात ते कारखाने चालविण्याकरिता प्रंचड मोठया प्रमाणात पाणी लागते. या कारखान्यामधून सुध्दा वापरलेले टाकाऊ पाणी बाहेर पडते त्याला औद्योगिक अपशिष्ट जल म्हणतात. हे पाणी देखील जलप्रदुषणास कारणीभूत ठरते ग्रामीण भागातसुध्दा पिकांवर वापरले जाणारे किटकनाशक, तणनाशक रासायनिक खते, साखर कारखाने सुतगिरण्या ग्रामीण

लघुउद्योग यामधून निघणारे प्रदुषित पाणी जलस्त्रोतांमध्ये सामील होते यातून जलप्रदुषणाची समस्या निर्माण होते.

**सांडपाण्याचे प्रकार आणि व्यवस्थापन**

सर्वसाधारणपणे माणूस घरात हॉटेल किंवा धर्मशाळांमध्ये वास्तव्य करतो. व्यक्तीगत स्वच्छतेसाठी अंघोळ स्वयंपाक भांडी व कपडे धूत असतो. त्यातून निर्माण होणाऱ्या सांडपाण्याला म्हणतात शौचालयातून बाहेर पडणारे मलमूत्र मिश्रित दुर्गधीयुक्त पाण्याला म्हणतात तर मोठ मोठया रासायनिक अणुउर्जा प्रकल्पातून बाहेर पडणाऱ्या पाण्याला म्हणतात हे तीनही प्रकारचे प्रदुषित पाणी त्यावर शुध्दीकरणाची प्रक्रिया न करता जलस्त्रोतामध्ये सोडल्यास जलस्त्रोत प्रंचड प्रभावित आणि प्रदुषित होतात.

मानवनिर्मित सांडपाणी रोखणे ही अशक्य कोटीतील गोष्ट आहे. त्यास कितीही पर्याय आणि उपायोजना केल्या तरी ते १००: रोखणे शक्य नाही. मग त्या पाण्याने उत्तम जलव्यवस्थापन करुन त्यावर प्रक्रिया करुन त्याच्या पुनर्वापर करणे म्हणजे सांडपाण्याचे व्यवस्थापन होय. सांडपाणी व्यवस्थापन आणि पुनर्वापरही आजची अत्यंत गरजेची संकल्पना बनलेली आहे. किंबहूना त्याशिवाय मानवी जीवनाचे आस्तित्व अशक्य आहे. मूलत: सांडपाण्याची निर्मिती कमी प्रमाणात होईलयाची काळजी घेणे त्याचे पध्दतीशीर संकलन करणे त्याच्या गुणधर्मावरुन वगीकरण करणे त्याची साठवणूक करणे व त्याचा पुनर्वापर करणे याला सांडपाणी व्यवस्थापन म्हणता येईल. सांडपाणी भुयारी गटर किंवा मल वाहिन्यांमधून एक किंवा अनेक ठिकाणी वाहून नेले जाते. त्याचे वर्गीकरण आणि संकलन झाल्यानंतर ते काही दिवस मोठया खडयांमध्ये किंवा टाक्यामध्ये स्थिर ठेवले जाते. त्याचे शास्त्रीय परीक्षण केले जाते. त्या पाण्यावर अनेक चाचण्या व प्रक्रिया केल्या जातात. त्यामध्ये भौतिक विश्लेषण रासायनिक विश्लेषण सुक्ष्मजीव विश्लेषण असे अनेक संस्कार केले जातात. त्यातील स्थायू घनपदार्थ बाजूला काढून ते पुरणे, जाळणे किंवा त्यापासून जैविक गाढूंळ खत बनविणे इ कार्ये केली जातात. अशा सर्व प्रक्रिया केल्यानंतर जर ते पाणी मानवी जीवनास पर्यावरणास धोकादायक नाही, असे सिध्द झाल्यास त्यांच्या पुनर्वापर केला जातो. नंतर ते नद्या तलाव सरोवरे यामध्ये सोडले जाते तसेच शेती बागा व औद्योगिक वापरासाठी उपयोग केला जातो. म्हणजे त्याची योग्य विल्हेवाट लावली जाते.

**सांडपाण्यामुळे होणारे रोग/आजार –**

माणसाला होणाऱ्या आजारांपैकी ५०: आजार हे प्रदुषित पाण्यामुळे होतात त्याचे गंभीर परिणाम मानवाला भोगावे लागतात. प्रसंगी मोठया प्रमाणात जीवितहानी होण्याचा धोका असतो. अशा प्रदुषित पाण्याचे सेवन केल्यामुळे अतिसार (उलटया जुलाब) त्वचेचे संसर्गजन्य आजार कॉलरा कावीळ विषमज्वर पोलिओ अंमश (प्रचंड पोटदुखी व शौचावाटे रक्त पडणे) गॅस्ट्रोएंट्रायटीस (उलट्या जुलाब जठरात दाह होणे) अमिबियासीस (आंतड्यासंबधी आजार) यासारख्या रोगांना मनुष्य बळी पडतो. त्यातून तात्पुरते किंवा कायमस्वरुपी आजार होतात. तसेच काहीवेळा माणसाचा मृत्यु देखील होवू शकतो.

**पाणी स्वच्छतेचे विविध कार्यक्रम /अभियान**

**१) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण १९७६-** महाराष्ट्र सरकारला पाणी स्वच्छतेचे महत्व आणि त्यातले धोके खुप आधी समजले होते. वाहत्या शहरीकरण आणि औद्योगिकरणामुळे प्रदुषित पाण्याचा गंभीर प्रश्न निकाली काढण्यासाठी १९७६ मध्ये महाराष्ट्र पाणीपुरवठा व जलनिसारण मंडळ (MWSSB) या संस्थेची स्थापना करण्यात आली त्यालाच पुन्हा महाराष्ट्र जीवन प्राधिकरण असे नाव देण्यात आले या संस्थेने पाणीपुरवठा आणि स्वच्छतेच्या बाबतीत भरीव कामगिरी केली पाणी पुरवठा आणि मल निसारण योजनाचे नियोजन रचना देखभाल अंमलबजावणी करणे स्वच्छ पाणीपुरवठा आणि मलनिसारण योजनाबाबत स्थानिक स्वराज्य संस्था आणि सरकारला मार्गदर्शन करणे असे व्यापक हेतू आणि उद्दिष्टे या संस्थेने पार पाडली आहेत.

**२) संत गाडगेबाबा अभियान**

महाराष्ट्र सरकारने या अभियानाची सुरुवात २५ डिसेंबर २००० रोजी केली व या अभियानाने प्रभावीपणे अमंलबजावणी २००२-२००३ पासून झाली या अभियानातून महाराष्ट्र सरकारला खुप अपेक्षा होत्या. जलस्त्रोतांचे संवर्धन करणे सौचालये बाधण्यास मदत करणे सांडपाण्याचे योग्य व्यवस्थापन करणे आणि स्वच्छतेबाबत जनजागृती निर्माण करणे शाळा आंगणामध्ये स्वच्छता आणि सुविधा उपलब्ध करणे अशा व्यापक उद्दिष्ठांसह हे अभियान कार्यक्षमपणे राबविण्यात आले याचे सकारत्मक परिणाम देखील दिसू आले.

**३) सुजल निर्मल महाराष्ट्र अभियान -**

एक महत्वकांक्षी हेतू आणि उद्दिष्टे डोळयासमोर ठेवून महाराष्ट्र सरकारने हे अभियान सुरु केले हे अभियान ग्रामीण आणि शहरी अशा दोन्ही विभाागात राबवले गेले ग्रामीण आणि शहरी भागात सुरक्षित आणि शुध्द पाण्याचा पुरवठा करणे, पाणी स्त्रोतांचे सरंक्षण करणे पुनर्भरणासाठी विशेष योजना राबविणे, जलजन्य रोग रोखण्यासाठी पेयजलाची गुणवत्ता सुधारणे, सांडपाणी व्यवस्थापन आणि स्वच्छता करणे त्याकरिता पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देणे, ग्रामीण भागात नागरी भागात आरोग्यविषयक जनजागृती करणे अशी व्यापक उद्दिष्टे नियोजित करुन हे अभियान महाराष्ट्रामध्ये राबविण्यात आले.

**४) महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महा अभियान** (MSJNM) **१९९७ - १९९८**

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महा अभियान ही योजना १९९७-९८ मध्ये महाराष्ट्र सरकारने निर्माण केली ही एक महाराष्ट्र सरकारची महत्वकांक्षी योजना असून शहरी भागाचा सर्वागीण विकास करणे, त्यामध्ये पाणी आणि आरोग्याचा सोयीना प्राधान्यक्रम देणे, शहरी वसाहतीतील पायाभूत सुविधा निर्माण करणे, रस्ते पूल सांडपाणी व्यवस्था सुधारणे, वृध्दीगत करणे, स्वच्छता आणि घन कचऱ्याचे व्यवस्थापन करणे, सांडपाणी शुध्दीकरणाचे प्रकल्प उभारणे व कार्यान्वित करणे प्रदुषण नियंत्रण करणे इ उद्दिष्टे या अभियानाने पूर्ण केले.

**५) स्वच्छ भारत अभियान २०१४**

स्वच्छ भारत अभियान हे केंद्र सरकारने राज्य सरकाराच्या सहकार्याने २ ऑक्टोबर २०१४ रोजी सुरु केले. ही एक राष्ट्रव्यापी महत्वाकांक्षी योजना आहे. संपुर्ण भारतात स्वच्छता आणि त्याकरिता आवश्यक असणाऱ्या पायाभूत सुविधांच्या बाबतीत या योजनेत मोठया प्रमाणात कार्य आणि उद्दिष्टे पार पाडण्यात आली पिण्याच्या पाण्याचा पुरवठा प्रत्येक घरापर्यत पोहोचविणे स्वच्छता आणि सांडपाणी व्यवस्थापनाच्या मुद्दयावर प्रभावीपणे व व्यापकपणे कार्य करणे त्याकरिता स्थानिक समुदायाच्या सहभाग तसेच सामाजिक संस्थाच्या सहभागाने हे अभियान राबवले आहे भारतातील भव्य आणि मोठया प्रकल्पांमध्ये या अभियानाचा समावेश होतो.

**६) स्वच्छ महाराष्ट्र मिशन २०२३**

महाराष्ट्र शासनाने शहरी आणि ग्रामीण भागात स्वच्छता आणि पेयजल विकासात संपूर्ण भारतात महत्वपूर्ण कार्य केलेले आहे सन २०२३ मध्ये या अभियानाची सुरुवात करण्यात आली शहरी भागातील स्वच्छतेचे व्यवस्थापन हा यामागचा उद्देश होता. महाराष्ट्रातील ४२% जनता शहारांमध्ये राहते शहरांची जास्तीत जास्त संख्या असलेले महाराष्ट्र हे राज्य आहे त्यामुळे ग्रामीण भागाबरोबरच शहरी भागांचा विकसाने समतोल साधले जाते शहरी भागातील स्वच्छता घनकचरा व्यवस्थापन प्रक्रियेमध्ये सुधारणा करणे वापरलेल्या पाण्याचे म्हणजेच सांडपाण्याचे व्यवस्थापन करणे व त्या पाण्याचा पुनर्भरण करणे स्वच्छतेबाबत जनजागृती करणे व त्यामध्ये लोकसहभाग वाढविणे अशी उद्दिष्टे या अभियानातून ठरविले आहेत.

**७) महातॉ शको–**

महाराष्ट्रातील ग्रामीण आणि शहरी भागामध्ये शुध्द स्वच्छ आणि पुरेसा पाणीपुरवठा सुनिश्चीत करणे शहरी आणि ग्रामीण भागातील सांडपाणी घनकचऱ्याचे व्यवस्थापन करणे आणि त्याचबरोबर इतर स्वच्छता सुधारणा करणारी योजना राबविणे पेयजल पुरवठा करणारी प्रणाली तसेच पाणवठे जलाशय जलसंधारण यंत्रणा आणि प्रक्रिया आणि मलनिसारण सुविधा प्रक्रिया यांची निर्मिती करणे आणि त्यांची देखरेख करणे अशी मर्यादीत धोरणे ठेवून ही योजना राबविणेत आली.

**८) जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय पुररुत्थान अभियान** (JNNURM)

३ डिसेबर २००५ रोजी केंद्र सरकारने चालू केलेले हे केवळ शहरी भागासाठी राष्ट्रव्यापी अभियान होते. शहरांचा पुनरुत्थान अर्थातच आधुनिकीकरणासाठी हे अभियान महत्वपुर्ण ठरले. शहरातील पायाभूत सोई सुविधा निर्माण करणे शहरीभागातील पाणीपुरवठयांच्या समस्यांचे निराकरण करणे स्वच्छ पाणीपुरवठा प्रत्येक घरापर्यत पोहोचविणे सांडपाणी व्यवस्थापन करणे, स्वच्छता रस्ते वाहतूक इ पायाभूत सुविधेसाठी निधी पुरविणे नागरीकरणासाठी स्थायी आणि पर्यावरणाच्या सरंक्षणसाठी कायमस्वरुपी उपाय करणे घरगुती आणि सार्वजनिक स्वच्छता सुविधा निर्माण करणे इ. अत्यंत व्यापक ध्येयधोरणे आणि उद्दिष्टांच्या पुर्तीसाठी

हे राष्ट्रव्यापी महत्वकांक्षी अभियान राबविण्यात आले या अभियानाने सकरात्मक परिणाम शहरांमध्ये दिसून आले.

Urban Infrastructure Development Scheme for small Medium Towns. UIDSSMT

**लहान आणि मध्यम शहारांसाठी पायाभूत सुधारणा योजना –**

भारतामध्ये महानगरापेक्षा लहान आणि मध्यम आकाराची शहरे अधिक प्रमाणात आहेत अशा शहरांचा विकास साधण्यासाठी त्यांच्या पायाभूत साधणांचा विाकस करण्यासाठी भारत सरकारने ही योजना तयार केली आहे.या योजनेची उद्दिष्टे देखील अत्यंत व्यापक आणि परिणामकारक आहेत ही योजना जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय शहर पुनरुत्थान अभियानाचाच एक भाग म्हणून कार्यान्वित करण्यात आली लहान आणि मध्यम शहरांमध्ये रस्ते पाणीपुरवठा सांडपाणी व्यवस्थापन गटारी व्यवस्थापन घनकचरा व्यवस्थापन या सारख्या मूलभूत सुविधांचा विकास करणे या शहरातील नागरिकांचे जीवनमान आरोग्यमान सुधारणे व त्यांना स्वच्छ पेयजल स्वच्छता आणि वाहतुकीची सेवा पुरविणे इ उद्दिष्टे या राष्ट्रव्यापी अभियानाने बऱ्यापैकी पुर्ण झाली.

अशा अनेक राष्ट्रव्यापी आणि प्रादेशिक पातळीवर योजना प्रकल्प अभियान कार्यक्रम राबविण्यात आल्या भारत एक विकसनशील देश आहे विकसीत राष्ट्राच्या दिशेने वाटचाल करीत असतांना ग्रामीण आणि शहरीभागात स्वच्छ पेयजल पायाभूत सुविधा सांडपाण्याचे व्यवस्थापन या संकल्पना खुपच महत्वाच्या ठरतात.

या क्षेत्रात कार्य करणाऱ्या संस्था /संघटना

**१) पर्यावरणीय नियोजन आणि तंत्रज्ञान केंद्र**

(Center for Environmental Planning and Technology (CEPT))

गुजरात राज्यातील अमहदाबाद येथे स्थापन झालेली अग्रगण्य संस्था आहे पर्यावरणीय नियोजन आणि तंत्रज्ञान या क्षेत्रातील उच्च शिक्षण आणि संशोधनासाठी समर्पित संस्था आहे पर्यावरणाच्या तंत्रज्ञानाबाबत पदवी, पदव्युत्तर पदवी, पीएचडी पर्यतचे शिक्षण आणि संशोधन या संस्थेत केले जाते.

**२) जल आणि स्वच्छता केंद्र**

(Center For Water and Sanitation (CWAS))

पाणी आणि स्वच्छता या दोन गोष्टीसाठी कार्यरत असलेली ही संख्या आहे ब्न्च्ज मधील एक विभागीय संस्था आहे पाणी आणि स्वच्छता यांचे शिक्षण आणि संशोधन करणारी संस्था म्हणून यांची प्रचीती आहे नागरी भागातील जलव्यवस्थापन स्वच्छता आणि पाणीपुरवठयाशी संबधित समस्यावर ही संस्था काम संशोधन करते जलव्यवस्थापनाचे शिक्षण देणे जलसंधारणाचे कार्यक्षमतेने वापर करण्याचे प्रशिक्षण देणे पाणी योजनासाठी स्वच्छता प्रकल्प योजनाची प्रभावीपणे अंमलबजावणी करणे स्वच्छता आणि पाणीपुरवठा

व्यवस्थेत बदल सुधारणा करुन सामाजिक विकास करणे पाणी आणि स्वच्छता क्षेत्रातील नवनवीन तंत्रज्ञान आणि पध्दतीचे संशोधन आणि विकास करणे उपयायोजना शोधने इ कार्ये ही संस्था करते.

**३) भूजल सर्व्हेक्षण आणि विकास संचलनालय**

(Ground Water Directorate of Survey's and Development (GSDA))

हा महाराष्ट्र शासनाचा महत्वपुर्ण विभाग आहे. जमीनीवरील पाण्याबरोबरच जमीनीखालील म्हणजे भूजल संसाधनाचा अभ्यास संरक्षण महाराष्ट्रातील भूजल स्त्रोतांचे स्थान शोधणे, उपलब्धता करणे, भूजलाची पातळी आणि गुणवत्तेचे संरक्षण करुन माहिती संकलन करणे जलस्त्रोतांचा वापर आणि व्यवस्थापन योग्य रीतीने करण्याचे कार्य करते भूजल पातळी वाढविणेसाठी पाण्याच्या स्त्रोतांचे जलाशय जलसाठे टाक्या आणि इतर पाणी पुनर्भरण करण्याच्या उपाययोजना करणे भूजलसाठयांचे प्रदुषण रोखण्यासाठी उपाययोजना पर्याय सुचविणे तसेच पाण्याची गुणवत्ता सुधारण्यासाठी पर्यायी उपयायोजना सुचविणे इ कार्ये या संस्थेमार्फत केली जातात.

**४) पाणी पुरवठा आणि स्वच्छता मंत्रालय महाराष्ट्र राज्य**

(Ministry of Water Supplay and Sanitation (WSSD))

पाणी आणि स्वच्छता या क्षेत्रासाठी समर्पित भावनेने काम करणारे महाराष्ट्र सरकारचे हे महत्वपुर्ण खाते आहे. मा. गुलाबराव पाटील हे या खात्याचे मंत्री आहेत. महाराष्ट्रातील पाणी पुरवठा योजनांची कार्यक्षमता सुधारणे पाणीपुरवठा आणि स्वच्छता सुधारणांसाठी आधुनिक तंत्रज्ञान व उपाययोजना करणे उपलब्ध जलस्त्रोंतांचे प्रदुषणापासून संरक्षण आणि पुरर्भरण करण्यासाठी उपाय करणे पेयजल आणि स्वच्छतेच्या समस्यांवर शाश्वत उपाय शोधणे आणि कार्यान्वित करणे, जलसंकट कमी करणे, पेयजल आणि स्वच्छता सुविधा पुरविणे इ. महत्वपूर्ण कार्ये या विभागामार्फत पार पाडले जातात.

**समारोप**

स्वच्छ आणि सुरक्षित पेयजल मिळविणे हा खरेतर आपला अधिकार आहे भारत हा जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश आहे. जगातील विकसनशील देशांच्या तुलनेत भारताने केलेली सर्वागीण प्रगती निश्चितच वाखाणन्यासारखी आहे. नागरिकांचे आरोग्य हे त्यांनी सेवन केलेल्या पाण्यावर अवलंबून असते पिण्याचे पाणी जेवढे स्वच्छ आणि सुरक्षित असेल तेवढे नागरिकांचे आरोग्य उत्तम राहते भारतीय राज्यघटनेच्या ७३ व्या आणि ७४ व्या घटना दुरुस्तीने स्वच्छता आणि सुरक्षित पेयजलाच्या पुरवठयाची जबाबदारी राज्यसूचित दिलेली आहे. त्यामुळे ती सर्वस्वी जबाबदारी राज्य सरकारांची असते तरी सुध्दा केंद्रसरकारने नागरिकांना स्वच्छ आणि सुरक्षित पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देण्यासाठी पुढाकार घेते. अनेक कायदे योजना उपक्रम कार्यक्रम राबवून प्रचंड प्रमाणात राज्यांना निधी देवून हे उद्दिष्टे पुर्ण करण्यासाठी प्रयत्न करते. नगरपालिका, महानगरपालिका, राज्यसरकार, केंद्रसरकार या उद्दिष्टांशी प्रामाणिकपणे उत्तरदायी

राहण्याचा प्रयत्न करते. या प्रयत्नांना नागरिकांनी देखील प्रयत्नपुर्वक प्रामाणिक साथ दिली पाहिजे. पेयजलांचे स्त्रोत स्वच्छ सुरक्षित राहण्यासाठी व्यक्तिगत आणि पातळीवर प्रयत्न करणे आवश्यक आहे.

### २.२.२ कचरा व्यवस्थापन योजना

**प्रस्तावना**

भारतीय समाज दिवसेंदिवस प्रगतीकडे वाटचाल करीत आहे. ही प्रगती सर्वांगीण स्वरुपाची आहे. सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक, वैज्ञानिक अशी सर्वांगीण व सकारात्मक पध्दतीची ही प्रगती दिसून येते. प्रगती बरोबरच भौतिक प्रगती देखील होत आहे. भौतिक साधनसंपत्तीमध्ये अमुलाग्र बदल झाला आहे. बदलत्या जीवनशैलीमध्ये पुर्वीपेक्षा अधिक वस्तूंचा वापर होणे अपरिहार्य आहे. अधिक वस्तू वापरण्याच्या हव्यासातून पर्यावरणाची होणारी हानी हा वर्तमान आणि भविष्यातील चिंतेचा विषय बनला आहे. मानवाची बदलती जीवनशैली ही पर्यावरणपूरक असावी तर पर्यावरणाचे संतुलन राहते. परंतु आज तसे होताना दिसत राही माणूस पर्यावरणाचा कोणताही विचार न करता अनिर्बंध आणि बेलगाम झालेला आहे. मौज मजा चैनी आणि चंगळवाद बोकाळताना दिसतो. आपण करीत असलेल्या असलेल्या कृतीमुळे पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे याचे भान आजच्या मनुष्याला हवे तेवढ्या प्रमाणत राहिलेले नाही. औद्योगिकरण आणि शहरीकरणाच्या प्रक्रियेमध्ये होणाच्या बदलांमुळे होणारी पर्यावरणाची हानी काही अंशी मान्य जरी केली तरी तीला पायबंद घालणे आवश्यक आहे. अन्यथा त्याचे दृष्य परिणाम आपणा सर्वांनाच भोगावे लागतात. या बदलत्या जीवनशैलीमुळे जेवढे विपरीत परिणाम झाले आहेत, त्यापैकी एक महत्वाचा परिणाम म्हणजे कचरा होय आपली घरे हॉटेल्स दुकाने शेतीमालावर प्रक्रिया करणारे उद्योग कार्यालये, बाजार, दवाखाने, बांधकाम, शेती, भाजी-मंडई यासारख्या अनेक ठिकाणातून मोठ्या प्रमाणात कचरा उत्पन्न होतो. या कचऱ्याची योग्य आणि पध्दतीशीर पणे विल्हेवाट न लावल्यामुळे कचरा मोठ्या प्रमाणात पर्यावरणाची हानी करताना दिसतो. नद्या समुद्र सरोवर तलाव धरणे इ. पेयजलांच्या स्रोतामध्ये आपण केलेला कचरा सोडून मोठया पर्यावरणीय समस्या निर्माण होतात तसेच जैवविविधता आणि अन्नसाखाळीला धोका पोहोचतो.

महाराष्ट्रात दरवर्षी लाखो टन कचरा निर्माण होतो. यातील कचऱ्याचे विश्लेषण केल्यास ते शहरे आणि महानगरांमध्ये अधिक प्रमाणात तयार होते. त्या तुलनेत ग्रामीण भागात कचरा उत्पन्न होण्याचे प्रमाण कमी आहे. तसेच ग्रामीण भागातील कचरा कमी घातक स्वरुपाचा असल्याचे दिसते. आपणास शहरामध्ये आणि उपनगरांमध्ये कचऱ्याचे डोंगर उभे असल्याचे पहावयास मिळतात. या कचरा मनुष्य जीवन धोक्यात आणू शकतो. अशा या घन कचऱ्याचे ग्रामीण आणि शहरी भागात पध्दतीशीरपणे व्यवस्थापन करण्याचे आव्हान आपणासमोर आहे. कचऱ्याचे संकलन त्याचे योग्य आणि शास्त्रीय पध्दतीने वर्गीकरण करणे त्यावर प्रक्रिया करुन त्याची योग्य विल्हेवाट लावणे यालाच कचऱ्याचे व्यवस्थापन म्हणतात हे कचरा व्यवस्थापन आजच्या प्रमुख समस्यांपैकी एक समस्या बनली आहे.

**कचरा उत्पन्न होण्याची कारणे आणि प्रकार –**

माणासाची बदलती जीवनशैली आणि भौतिक प्रगती व पर्यावरण रक्षणाबद्दल असेलेली अज्ञान, अनास्था आवश्यक आणि अनावश्यक वस्तूंचा बेसुमार वापर एकदाच वापरुन फेकून देण्याच्या वस्तू साधने वापरा आणि फेका अशा तात्पुरत्या स्वरुपाच्या उत्पादनातून मोठया प्रमाणात कचरा निर्माण होतो. ग्रामीण भागातील शेतीतून निर्माण होणारा अनुपयोगी पदार्थ शेतीपुरक व्यवसायातून शेतीमाल प्रक्रिया उद्योगातून शिल्लक राहणारे अनुपयोगी पदार्थ कारखाने  औद्योगिक वसाहतीमधून बाहेर फेकले जाणारे, अनुपयोगी वस्तू उत्पादने रसायने घरे हॉटेल्स धर्मशाळा दवाखाने भाजीमंडई सभा संमेलने कार्यक्रम धार्मिक आणि सामाजिक उपक्रम उत्सव पर्यटन केंद्रे, घाट, चौपाटया, गॅरेज इ. ठिकाणी बेसुमार कचरयाची निर्मिती होते. हा घन कचरा कधी विघटन होउन पुन्हा वापरलयासारखा असतो किंवा कधी विघअन न होता पुनर्वापर करता येण्यासारखा असतो. तर कधी हा न विरघळणारा न विघटन होणारा घातक आणि रासायनिक स्वरुपाचा कचरा असतो. यासर्व प्रकारचा कचरा शास्त्रिय पध्दतीने वर्गीकरण करुन विल्हेवाट लावण्याची गरज आज निर्माण झाली आहे.

आपल्या दैनंदिन जीवनामध्ये अनेक प्रकारचा कचरा पहावयास मिळतो. कचऱ्याचे अनेक प्रकार आहेत. यातील मुख्य प्रकार म्हणजे सेंद्रिय कचरा आणि असेंद्रिय कचरा. काही कचरा असा असतो की तो व्यक्तीगत आणि सामुहिक किंवा शासकिय पातळीवर एकत्र संकलित करुन त्यावर प्रक्रिया करुन सेंद्रिय खत, गांडूळ खत निर्माण करता येते त्यास नैसर्गिक किंवा सेंद्रिय खत म्हणतात. तर ज्या कचऱ्याचे आहे त्या अवस्थेत किंवा प्रक्रिया करुन पुनर्वापर करता येतो त्यास असेंद्रिय कचरा म्हणतात. या दोन्ही कचऱ्याचे पुन्हा उपप्रकार पडतात ते पूढीलप्रमाणे.

१) **ओला कचरा** (Wet Waste)

हा कचरा घरे, हॉटेल्स, शेती, शेतीमाल प्रक्रिया उद्योग, खाद्यतेलाचे कारखाने, गीरण्या, घाने पीठ गीरण्या, स्वयंपाकगृहातून निर्माण होतो. या कच–यावर प्रक्रिया करुन मानवी जीवनास उपयुक्त ठरतील असे उत्पादन तयार करता येते. हा कचरा सर्वात कमी घातक व कमी उपद्रव करणारा असतो. यातून विघटन होणारा कचरा (Biodegradable Waste) असेही म्हणतात. यापासून कंपोस्ट खते, गांडूळ खते, जैविक व नैसर्गिक खते तयार करता येतात. यामध्ये घरातील उरलेले खाद्यपदार्थ, भाकरी, भात, भाज्या अन्न पदार्थ तसेच कुजलेली, खराब फळे, त्यांच्या साली, पाला–पाचोळा, पानगळ, आणि झाडा–झुडपांची पाने, फुले, फांद्या इ. गोष्टींचा समावेश होतो. तसेच या कच–यापासून खत, उर्जा, इंधन निर्माण करता येते.

ओल्या कचऱ्याचे अनेक उपप्रकार पहावयास मिळतात त्यामध्ये घरगुती ओला कचरा, शेती आणि बगीच्यांमधून उत्पन्न होणारा ओला कचरा, पशु–पक्षीपालन, मत्स व्यवसायातून निर्माण होणारा कचरा, आद्योगिक ओला कचरा असे ओला कच–याचे अनेक प्रकार आपणांस पहावयास मिळतात.

ओला कचऱ्याचे संकलन, पुनर्वापर व्यवस्थापन हे सोपे आणि पर्यावरणपूरक असते. त्यापासून सेंद्रियखत, गांडूळखत तसेच बायोगॅस आणि उर्जानिर्मिती आणि त्यावर उत्तम शास्त्रिय प्रक्रिया केल्यास

त्यापासून जनावरांसाठी खाद्य देखील बनवता येते. ओला कचरा तूलनेने कमी घातक आणि पर्यावरण स्नेही असतो. त्याचे शास्त्रिय पध्दतीने संकलन, वर्गीकरण प्रक्रिया आणि पुनर्वापर केल्यास तो मानवी जीवनास उपयुक्त संसाधन ठरतो. या कच-यामुळे प्रदुषण कमी होवून, स्वच्छता होते व पर्यावरणाचे संतुलन राखता येते.

२) **सुका किंवा कोरडा कचरा** (Dry Waste)

हा कचरा आपल्या घरांमधून, दवाखाने, दुकाने, कारखाने, औद्योगिक वसाहती, गॅरेज, वैद्यकिय संशोधन केंद्रे, औद्योगिक व अनुउर्जा प्रकल्प यामधून प्रामुख्याने उत्पन्न होतो. त्यामध्ये प्लॉस्टिकच्या वस्तू, काच, थर्माकोल, धातू, इलेक्टॉनिक उपकरणे, वाहनांचे सुटे पार्ट, औजारे, संशोधन आणि विकास (R and D Section) संस्था या मधून निर्माण होतो. आपली आधुनिक आणि बदली जीवनशैली यातून या कच-याची मोठया प्रमाणात निर्मिती होते. या कच-याचे अनेक उपप्रकार पडतात. प्लॅस्टिक, नायलॉन, रबर, सिंथेटिक वस्तू, प्लास्टिक पिशव्या, गोणी, बाटल्या, कप, प्लास्टिक फर्निचर, कपडे, पडदे, पाईप्स व घरगुती वस्तू यांचा समावेश होतो. काच आणि धातू हा दूसरा प्रकार असून त्यामध्ये काचेच्या वस्तू, ग्लास, तावदाने, तांबा,पितळ, ॲल्युमिनीअम, लोखंड इ, धातूंच्या वस्तू तसेच कागद आणि कपडयांपासून तयार होणारे पुस्तके, पुठठे, वर्तमान पत्रे, कार्टून खोकी, टिश्यु पेपर इ. समावेश होतो. यातील आणखी एक प्रकार म्हणजे इलेक्टॉनिक वस्तूचा समावेश होतो. रेडिओ, टिव्ही, संगणक, प्रिंटर, की-बोर्ड, माउस चार्जर, वायर , बल्ब, रेफ्रिजरेटर, वातानूकूलन यंत्रे इ. यांचा समावेश होतो. बांधकामातून निर्माण होणारा कचरा हा देखील एक प्रकार आहे. यामध्ये सिमेंट, विटा, लोखंडी सळया, तारा, रंगाचे डबे, मलबा ;राडा रोडाद्ध, बॅरल्स, फळया, इ.चा समावेश होतो.

कोरडा किंवा सुका कचरा हा ओल्या कच-याच्या तूलनेत अधिक उपद्रवी असतो. तो सहजासहजी विरघळत नाही किंवा विघटन होत नाही किंवा त्याचे विघटन होण्यास खुपमोठा कलावधी लागतो. या कचऱ्याचे पध्दतशीर आणि शास्त्रीय पध्दतीने संकलन आणि वर्गीकरण केले जाते. त्याचा पुनर्वापर (Resuse) आणि पुनर्वक्रण (Recycle) करता येते. त्यातून पून्हा उत्पादन घेता येते व अगदिच धोकादायक किंवा अविघटनशील कचरा जमिनीत पुरला जातो किंवा सुरक्षितपणे जाळून त्यापासून उष्णता, विज, इंधन निर्माण करता येते हा कचरा प्रदुषणास पूरक असतो तसेच अनवधानाने व्यक्ति किंवा जनावरे तसेच जलचरांच्या पोटात गेल्यास प्राण गमावण्याचा धोका असतो. इलेक्टॉनिक कचऱ्यातील विषारी पदार्थ धोकादायक असतात.

नागरिकांनी आणि रासायनिक स्वराज्य संस्थांनी काळजी पूर्वक त्याचे वारंवार पूनर्वापर करुन तसेच निकामी झाल्यानंतर त्याचे योग्य वर्गीकरण करुन त्यावर प्रक्रिया करणाऱ्या व्यवस्थेकडे दिल्यास सुक्या कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावता येते. अर्थातच त्याचे व्यवस्थापन करता येते.

## ३) **घातक कचरा** (Hazardous Waste)

ज्या कचऱ्यापासून मणूस्थ प्राणिमात्र म्हणजेच जैव विविधता आणि पर्यावरण धोक्यात येते त्यास हानी पोहोचते त्या कचऱ्याला घातक कचरा (Hazardous Waste) म्हणतात. हा कचरा पध्दतशीरपणे वर्गीकरण करुन त्याची विल्हेवाट स्वतंत्रपणे लावावी लागते. अन्यथा ते मानवास आणि पर्यावरण धोकादायक ठरते. या कचऱ्यामध्ये ज्वलनशील पदार्थ (Flamable) विषारी, स्फोटक किंवा जंतूसंसर्ग तसेच किरणोत्सर्जन करणाऱ्या पदार्थांचा समावेश होतो. घातक कचऱ्याचे अनेक प्रकार होय. यामध्ये किटकनाशके, सौचालये, घरातील फरशी, स्नानगृहे, रंग कालबाह्य झालेली औषधे इ. समावेश होतो. घातक कचऱ्याचा दुसरा प्रकार म्हणजे इ-कचरा होय. यातील इलेक्ट्रॉनिक कचरा (E-Waste) म्हणतात. यामध्ये सर्व प्रकाराच्या इलेक्ट्रॉनिक वस्तूंचा समावेश होतो. कचऱ्यातील आणखी एक प्रकार म्हणजे औद्योगिक घातक कचरा होय. यामध्ये कारखाने, कार्यशालेमधून तसेच औष्णिक व अनुउर्जा प्रकल्पातून बाहेर पडणारी रसायने, रंग, राख, जडधातू, वंगण यांचा समावेश होतो. यातील चौथा प्रकार म्हणजे जैववैद्यकिय कचरा होय. (Biomedical Waste) दवाखाने, वैद्यकिय संशोधन संस्था यामधून जे टाकाउ पदार्थ उत्पन्न होतात त्यास जैववैद्यकिय कचरा म्हणतात. यामध्ये वापरलेला सुया, सलाईन, इंजेक्शन सीरींज, पाईप, पेशी, रक्त, मलमुत्र शारिरीक स्त्राव, संसर्गजन्य वस्तू, ग्लोव्हज, मास्क, ड्रेसिंग पट्टया, कापूस, लॅबमधील नमूने, रसायने, एक्स-रे, सी.टी.स्कॅनसाठी वापरलेली आवजारे इ. या समावेश या कचऱ्यांमध्ये होतो.

## **कचऱ्याचे व्यवस्थापन आणि विल्हेवाट लावणे** (Waste Management and Disposal)

कचरा कोणत्याही प्रकारचा असो तो कमी अधिक प्रमाणात मानवी जीवनास आणि पर्यावरणास धोकादायक असतोच. त्यामुळे सर्व प्रकारच्या कचऱ्याचे पध्दतशीरपणे, स्वतंत्रपणे संकलन करणे, त्याचे शास्त्रीय पध्दतीने वर्गीकरण करणे, त्यावर विविध प्रक्रिया करुन विश्लेषन करणे, तसेच त्याचे पुर्नवापर आणि विल्हेवाट लावण्याच्या प्रक्रियेला कचरा व्यवस्थापन म्हणतात. हे कचरा व्यवस्थापनाचे महत्त्व पूर्ण कार्य स्थानिक स्वराज्य संस्थांना करावे लागते. ग्रामीण भागापासून लहान, मध्यम आकाराची शहरे आणि महानगरांमध्ये ही समस्या दिवसेंदिवस अधिकच व्यापक बनत चालली आहे. तसेच या समस्येचे निराकारण करण्याची मोठी जबाबदारी देखील या संस्थांवर येउन पडली आहे. अलीकडील काळात ही समस्या गंभीर किंवा उग्र होउ नये म्हणून नगरपालिका, राज्य सरकार आणि केंद्र सरकार कार्यक्षमपणे व संवेदनशीलपणे या प्रश्नावर लक्ष केंद्रित करुन, निधी देउन तसेच वेगवेगळया योजना कायदे राबवून कचरा व्यवस्थापन व विल्हेवाट कार्य करताना दिसतात. कचऱ्याची विल्हेवाट लावताना घर, दुकाने, कारखाने, व्यापारी पेटया, दवाखाने यातून निर्माण होणारा कचरा संकलन करतानाच स्वतंत्रपणे वर्गीकरण करुन उचलला जातो. नगरपालिक वेगवेगळया वाहनांतून आणि वेगवेगळ्या रंगाच्या पिशव्यांमधून ते संकलित करते. पिवळया, लाल, निळया, काळया रंगाच्या पिशव्या वापरल्या जातात. तो स्वातंत्रपणे साठवला जातो. ओला कचरा काही दिवस कुजवून त्यापासून सेंद्रिय,गांडूळ खते तयार केली जातात. सुक्या किंवा कोरडया कचऱ्याच्या प्रकारानुसार त्याचे वेगवेगळया पध्दतीने साठवण केली जाते. प्लास्टिक, लोखंड, पत्रा व रबर यासारख्या

वस्तूंचा पुनर्वापर केला जातो. त्यावर प्रक्रिया करुन पुन्हा तो निरनिराळया उत्पादनासाठी पाठवला जातो. वैद्यकिय घातक कचऱ्याचे स्वच्छता उत्पादनासाठी पाठवला जातो. त्यावर प्रक्रिया करुन पुन्हा तो निरनिराळया उत्पादनासाठी पाठवला जातो. वैद्यकिय घातक कचऱ्याचे स्वच्छता व निर्जंतूकीकरण करुन उच्च तापमानावर जाळणे, पूरणे किंवा रासायनिक प्रक्रिया करुन त्याचा नाश केला जातो. संसर्गजन्य पदार्थ आणि मनुष्य व प्राण्यांचा अवयवांचे देखील ज्वलन करतात किंवा पुरुन टाकतात. ते जाळून त्यांच्यापासून इंधन, विज निर्माण केली जाते. कारखान्यातील घातक कचरा देखील वरीलप्रमाणे वेगवेगळया प्रक्रिया करुन नष्ट केले जाते. या सर्व प्रक्रियेला कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी अनेक यांत्रिक, शास्त्रीय पध्दती विकसित झाल्या आहेत. सर्व नगरपालिका त्यांचा पुरेपूर वापर करताना दिसतात.

**कचरा व्यवस्थापन योजन/ प्रकल्प/ कार्यक्रम / अभियान**

**१) स्थानिक स्वराज्य संस्थांचे उपक्रम**

स्वच्छता हा विषय राज्यसुचीतील असल्याने त्याची जबाबदारी आपोआपच राज्यसरकार आणि स्थनिक स्वराज्य संस्थांवर येते. त्यामुळे प्रत्येक ग्रामपंचायत, नगरपालिका, महानगरपालिकांनी स्थानिक पातळीवर परिसर स्वच्छ आणि सुंदर बनवण्यासाठी भरपूर प्रयत्न केले आहेत. सुरुवातीला कचऱ्याची समस्या एवढी गंभीर नव्हती. परंतु अलीकडील काळात या समस्येने उग्र रुप धारण केले आहे. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्था राज्य सरकारच्या मदतीने कचऱ्याचे व्यवस्थापन करण्याच्या अनेक योजना स्थानिक पातळीवर राबवत आहेत. उदा. स्वच्छ मुंबई योजना, कचरामुक्त पुणे तसेच स्वच्छ शहर सुंदर शहरश या घोषणेमध्ये शहर या शब्दाच्या ऐवजी त्या शहराचे नाव टाकले जाते व योजना / कार्यक्रम तयार केला जातो. उदा. स्वच्छ कराड सुंदर कराड या उपक्रमामध्ये नगरपालिका कचऱ्याचे वर्गीकरण करुन त्याची विल्हेवाट लावतात. हा उपक्रम अनेक वर्षापासून चालू आहे व त्यासाठी मोठी मानवी यंत्रणा आणि मोठा निधी वापरला जात आहे.

**२) स्वच्छ भारत अभियान** (Swachh Bharat Abhiyan)

२०१४ साली भारत सरकारने राष्ट्रव्यापी, विशाल स्वच्छ भारत अभियान सुरू केले. ही भारत सरकारची अतिशय विशाल आणि महत्वकांक्षी योजना आहे. ग्रामीण आणि शहरी अशा दोन्ही भागांकरिता हे अभियान आहे. कचऱ्याचे संकलन करणे, वर्गीकरण करणे, विघटन करणे, संशोधन करणे आणि विल्हेवाट लावणे याकरिता मोठया प्रमाणात निधी केंद्र सरकारकडून निर्धारित केला जातो. कचऱ्याच्या पुनर्वापर, प्रक्रिया उच्चाटन इत्यादी गोष्टींचा यामध्ये समावेश आहे. त्याचबरोबर या संपूर्ण कामासाठी आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधांची निर्मिती देखील सरकारकडून केली जात आहे. स्वच्छतेच्या बाबतीत देश पातळीवर जनजागृती करणे व कचरामुक्त भारत बनविणे. त्याकरिता लोकांचा सहभाग घेणे हा या योजनेचा उद्देश आहे.

### ३) **स्वच्छ सर्वेक्षण** (Swachh Sarvekshan)

शहरे फक्त योजना चालू असे पर्यंतच स्वच्छ राहता कामा नये तर ती कायमस्वरुपी, शाश्वतपणे स्वच्छ राहीला पाहिजेत यासाठी प्रत्येक शहराची दरवर्षी तपासणी आणि सर्वेक्षण केले जाते. त्या शहराने स्वच्छतेसाठी राबवलेली उपक्रम आणि स्वच्छतेचा दर्जा तपासून शहरांचे मुल्यमापन केले जाते व उत्कृष्ट कामगिरी करणा-या शहरांतील नगरपालिकांना बक्षीस दिले जाते.

### ४) **राष्ट्रीय कचरा व्यवस्थापन धोरण** (National Waste Management Policy)

हे भारत सरकारचे राष्ट्रव्यापी धोरण आहे. या धोरणातून स्वच्छ भारताच्या निर्मितीसाठी केंद्रसरकारने नियम आणि मार्गदर्शक तत्वे निर्माण केली आहेत. कचरा संकलन करणे, वहन करणे आणि वर्गीकरण करणे त्याची सुरक्षितपणे विल्हेवाट लावणे या विषयाचे धोरण आहे. यामध्ये '3R' म्हणजे कचऱ्याचे प्रमाण कमी करणे (Reduce) कचऱ्याचा पुनर्वापर करणे (Reuse) आणि कचऱ्याचे पुनर्चक्रण करणे (Recycle) या धोरणाचा समावेश करण्यात आला आहे व हे धोरण भारतात यशस्वीपणे कार्य करीत आहे.

### ५) **महाराष्ट्र नियंत्रण मंडळ** (Maharashtra Polution Control Board)

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाची स्थापना ७ सप्टेंबर १९७० रोजी करण्यात आली. या मंडळामार्फत सुदधा हवा, पाणी यांचे प्रदूषणास कारणीभूत ठरणाऱ्या कचऱ्याच्या व्यवस्थापनासाठी मार्गदर्शन केलेले आहे. हे मंडळ महाराष्ट्र राज्यव्यापी स्वरुपाचे आहे. या मंडळाचे कार्य ग्रामीण आणि शहरी अशा दोन्ही विभागासाठी चालते.

### ६) **प्लास्टिक कचरा व्यवस्थापना** (Plastic Waste Management)

महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण विभागाकडून २३ मार्च २०१८ रोजी जाहिर केलेल्या अधिनियमानुसार प्लास्टिक वस्तू, प्लास्टिक पिशव्या आणि थर्माकोल यांचे उत्पादन वापर, विक्रिकरण, वाहतूक, हताळणी, साठवणूक व विल्हेवाट लावण्याच्या संदर्भात अधिसूचना जाहीर करण्यात आली व त्यानुसार महाराष्ट्रातील प्लास्टिक कच-याचे व्यवस्थापन करण्याचे नियमावली जाहिर करण्यात आली. या अधिनियमानुसार महाराष्ट्रात सध्या प्लास्टिक आणि थर्माकोलच्या कचऱ्यावर प्रभावी नियंत्रण निर्माण झाल्याचे दिसून येते.

### ७) **कचऱ्यापासून उर्जा आणि इंधन निर्मिती**

जगामध्ये आजपर्यत उर्जा आणि इंधनाच्या निर्मितीचे मर्यादित पारंपारिक स्त्रोत उपलब्ध होते. परंतु आधुनिक संशोधनानुसार कचऱ्यापासून वीज निर्मिती देखील करता येते. असे अनेक प्रकल्प दिल्ली, बेंगलोर या शहरांमध्ये कार्यान्वयीत करण्यात आली आहेत. यातून कचऱ्याची विल्हेवाट तर लागतेच परंतु या टाकाउ कचऱ्यापासून विज निर्मिती करता येते व विजेचे संकट दूर करता येते. या प्रकल्पाबरोबरच काही शहरांमध्ये घन कचऱ्यापासून इंधन निर्मितीचे प्रकल्प राबविले आहेत. यामध्ये बायोगॅस, बायोडिझेल आणि इथेनॉल यासारख्या इंधनाची निर्मिती करता येते. हे इंधन, वाहने व उद्योग धंदयामध्ये वापरता येते. यामुळे इंधनाचे

परावलंबीत्व दूर होते. तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांना मोठया प्रमाणात आर्थिक उत्पन्नाचे स्त्रोत मिळते. असे क्रांतिकारक प्रकल्प पुणे, मुंबई, नागपूर इत्यादी शहरांमध्ये यशस्वीपणे कार्यरत आहेत.

**समारोप**

ग्रामीण भागापासून महानगरांपर्यंत सर्व ठिकाणी निर्माण होणारा कचरा ही महत्त्वाची समस्या असली तरी त्याच्याकडे समस्या म्हणून नव्हे तर संधी म्हणून पाहिले किंवा कच्च्या मालाचे गोदाम म्हणून पाहिले पाहिजे किंवा कच्या मालाचे गोदाम म्हणून त्याच्याकडे पाहिले पाहिजे व त्यावर अत्यंत आधुनिक व शास्त्रीय पध्दतीने, संशोधन व प्रक्रिया करुन त्याच्या शंभर टक्के पुनर्वापर करण्यासाठी व्यक्तीगत आणि शासकिय पातळीवर प्रयत्न झाले पाहिजेत. कचऱ्यापासून मुक्ती ही फक्त शासकीय जबाबदारी न राहता त्यामध्ये नागरिकांचा मनापासून सक्रीय सहभाग असला पाहिजे. स्वच्छता आणि कचऱ्याचे जाणीवपूर्वक व्यवस्थापन, विल्हेवाट ही आपली जीवनशैली बनली पाहीजे. तरच शंभर टक्के कचऱ्यापासून मुक्ती मिळेल. व्यक्तीगत पातळीवर प्रयत्न करुन तसेच सरकारी योजनांना पुरेपूर पाठींबा देउन, सरकारच्या सूचना व आदेशांचे तंतोतंत अनुपालन केल्यास कचऱ्याची सध्या भेडसावणारी समस्या संपुष्ठात येउ शकते.

### **२.२.३ झोपडपट्टी विकास कार्यक्रम** (Zopadpatti Vikas Programme)

**प्रस्तावना**

झोपडपट्टया या भारतीय समाजातील इष्टापत्ती ठरत आहेत. भारतातील सर्व राज्यात दिसून येणाऱ्या झोपडपट्टया या भारताच्या असंतुनित सामाजिक, आर्थिक आणि भौतिक विकासाचे परिणाम आहेत. औद्योगिक क्रांतिनंतर आद्योगीकरण विशेषत: विविध शहरांच्या आसपास सुरू झाले. ग्रामीण भागातील बेरोजगार, भूमीहीन लोक, रोजगार आणि अर्थाजनासाठी शहरांकडे स्थलांतरीत होणे स्वाभाविक होते. त्यातून खेडी ओसाड दिसू लागली आणि शहरांमध्ये, महानगरांमध्ये राहण्याच्या बिकट अडचणींमूळे झोपडपट्टया फोफावू लागल्या. शहरातील महागडया घरांमध्ये राहणे रोजगार करणाऱ्यांसाठी अशक्य झाले. कारखाने, कार्यालयांमध्ये काम करणारे, लहान-सहान व्यापार करणारे, रिक्षा, टॅक्सी चालविणारे, फेरीवाले, सेवा करणारे, हमाली मोजमजूरी करणारे अश्या अनेक लोकांना शहरातील महागडी घरे घेवून रहाणे हे स्वप्नात होते. त्यामुळे साहजिक सरकारी भुखंड, रेल्वेलाईनच्या शेजारील जागा, फुटपाथ, उड्डाणपुले, नद्या, नाले ओढे समुद्र किनारे या ठिकाणी लोकांनी झोपडया उभ्या केल्या. त्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत गेली आणि त्यातूनच झोपडपट्टयांचा जन्म झाला.

मानवतावादाच्या दृष्टीने अशा झोपडपट्टयांकडे सरकार आणि प्रशासकीय अधिकारी, स्थानिक स्वराज्य संस्था दुर्लक्ष करत गेला. परिणामी झोपडपट्टयांचे आकार-विक्राळ होत गेले. झोपडपट्टयांनी महानगर आणि छोट्या शहरांमध्ये हळूहळू विस्तार केला. परंतु सुरुवातीला ही छोटी आणि दुर्लक्षित करण्यासारखी बाब भविष्यकाळात एक मोठी समस्या बनेल आणि ती सोडविणे महाकठीण होवून बसेल अशी शंका कुणालाही आली नाही. झोपडापट्टयांमध्ये फक्त ग्रामीण भागातील नव्हे तर पर जिल्ह्यातून, परराज्यातूनच नव्हे तर अवैद्यरित्या शेजारचा देशातून देखील अनेक स्थलांतरित झाले या सर्व प्रक्रियेमध्ये

झोपडपट्टयांमध्ये मात्र सामाजिक, अर्थिक राजकिय आरोग्य विषयक, शांतता, कायदा व सुव्यवस्था, नागरी सुविधा यांची परिस्थिती गंभीर बनत गेली. मानवी जीवनमान आणि आरोग्यमान, वैद्यकिय सुविधा इ. यंत्रणा कोलमडत गेल्या. त्यातच झोपडपट्ट्यांचा निराधार, निरश्रीत लोकांचे राहण्याचे ठिकाण एवढीच झोपडपट्ट्यांची ओळख राहिली नाही तर या झोपडपट्ट्यांमध्ये अनेक बेकायदेशीर, अवैद्य, गुन्हेगारी घडामोडी होत गेल्या. दारु, अंमली पदार्थांचा व्यापार, चोऱ्या, दरोडेखोरी, वेश्याव्यवसाय, खुण, मारामाऱ्या स्थानिक, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय गुन्हे या झोपडपट्ट्यांमध्ये होत गेले. या झोपडपट्ट्या म्हणजे अवैद्य व्यवसाय, गुन्हेगारीचे आश्रयस्थान बनत गेले. यात काही प्रमाणात राजकीय आणि प्रशासकिय दुर्लक्ष हे देखील कारण होते. झोपडपट्ट्या निर्मुलनासाठी सरकारने अनेक कायदे, योजना तयार केल्या. तर याउलट झोपडपट्टयांचे संरक्षण करण्यासाठी अनेक संस्था, संघटना, दबावगट, राजकिय संघटना निर्माण झाल्या. या संघटना झोपडपट्ट्यांच्या रक्षणासाठी किंबहुना त्यांच्या पुनर्वसनासाठी लढे, आंदोलने करु लागली. प्रसंगी सर्वोच्च न्यायालयापर्यंत लढे उभे राहिले. न्यायालयीन प्रक्रियांमध्ये अडकलेली प्रकरणे वर्षानुवर्षे प्रलंबित राहिली. त्यामुळे झोपडपट्ट्या अवैध आणि बेकायदेशीर असूनसुध्दा मानवतावादी दृष्टीकोनातून नगरपालिकांनी त्यांना विज, पाणी, सांडपाण्याच्या सोई, दवाखाने, शाळा, रस्ते इ. सेवा पूरवल्या. त्यामुळे झोपडपट्ट्यांनी अधिकच घट्टपणे आपले पाय रोकले.

झोपडपडपट्ट्यांमध्ये राहणारी प्रचंड लोकसंख्या, जटिल किचकट आणि गुंतागुतीची रचना, दाटीवाटीची वस्ती, लोकसंख्येची प्रचंड घनता यामुळे सरकारला इच्छा असून सुध्दा झोपडपट्ट्यांचा विकास, निर्मुलन करण्याच्या कितीही चांगल्या योजना, कायदे केलेतरी त्यांचा बोजवारा उडतो. परिणामी दिवसेंदिवस झोपडपट्ट्यांचे प्रश्न उग्र स्वरुप धारण करताना दिसतात झोपडपट्ट्यांमधून, नागरी, औद्योगिक वसाहती, कार्यानये, व्यापार, सेवा-संस्थांना मोठया प्रमाणात आवश्यक असलेले मणुष्यबळ स्वस्तात मिळते. ही त्या क्षेत्रासाठी जमेची बाजू असली तरी या झोपडपट्ट्यांमध्ये राहणाऱ्यांचे आयुष्यमान, आरोग्यमान, जीवनमान मात्र हिन दर्जाचे बनले आहे. ती शहरांसाठी नव्हेतर राज्य आणि राष्टांसाठी डोकेदुखी बनली आहे. ती एक स्थानिक नव्हेतर राष्ट्रीय प्रश्न म्हणून देशासमोर उभी ठाकली आहे. या झोपड्यांचा विकास, निर्मुलन पुनर्विकास, व्यवस्थापन करताना स्थानिक, राज्य आणि राष्ट्रीय सरकारची सुध्दा दमछाक होताना दिसते.

झोपडपट्ट्यांना भारतातील विविध राज्यांमध्ये वेगवेगळया भाषेत वेगवेगळया नावांने ओळखतात. झोपडपट्टीतील गलिच्छवस्ती किंवा झुग्गी असेही म्हणतात. बंगालमध्ये वस्ती, तामिळनाडूमध्ये चेरीस तर दिल्ली आणि परिसरात त्यास कटरा म्हणतात. झोपडपट्ट्यांचे निर्मलन, विकास किंवा पुनर्वसन ही राज्य आणि केंद्रसरकारची महत्त्वपूर्ण जबाबदारी बनली आहे. ही समस्या सोडवीण्यासाठी नगरपालिका, महानगरपालिका यांना सोबत घेउन राज्य आणि राष्ट्रिय सरकारांनी अनेक योजना, कायदे, प्रकल्प, अभियान, कार्यक्रम राबवीले आहेत. याची माहिति आणि चर्चा पुढीलप्रमाणे करता येईल.

## १) जवाहलाल नेहरु राष्ट्रीय शहरी पुनरुत्थान अभियान

(Jawaharlal Nehru National Urban Renewal Mission (JNNURM))

३ डिसेंबर २००५ रोजी पंतप्रधान मनमोहनसिंग यांनी जवाहरलाल नेहरु राष्ट्रिय शहरी पुनरुत्यान अभियान केले सुरु केले. केंद्र सरकारने हे विशाल राष्ट्रव्यापी अभियान आहे. शहरांच्या अधुनिकीकरणासाठी उपयुक्त आणि महत्त्वपूर्ण अभियान असल्याचे दिसते. शहरातील गरीबांना पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी, झोपडपट्टयांच्या एकात्मिक विकास योजनेअंतर्गत निवारा (Shelter), मुलभूत सेवा, मिळवून देणे हा उद्देश आहे. केंद्र सरकारच्या या विशाल शहर आधुनिकीकरण योजनेचा कालावधी ७ वर्षांचा म्हणजे मार्च २०११ पर्यंत होता परंतु तो वाढवून मार्च २०१४ पर्यंत करण्यात आला. या विशाल अभियानाचा मुख्य हेतू या अभियानात सामाविष्ठ शहरांमध्ये पायाभूत सुविधांचा एकात्मिक विकास करणे, शाश्वत प्रकल्पाद्वारे मालमत्ता निर्मिती आणि मालमत्ता व्यवस्थापण करणे, नागरी भागातील पायाभूत सेवांमधील कमतरता पूर्ण करण्यासाठी पूरेशा निधी उपलब्ध करणे, नागरी सुविधांचे प्रमाणबध्द वितरण आणि शहरी गरीबांना पायाभूत सुविधा उपलब्ध करणे, शहरी गरिबांना किफायतशीर किमतीत गृहनिर्माण, पाणीपुरवठा, स्वच्छता, शिक्षण, आरोग्य, सामाजिक सुरक्षा इ. सेवांची पुर्तता तसेच मूलभूत सेवांची तरतूद करणे हा आहे. हे अभियान केंद्रसरकारचे व्यापक आणि परिणामकारक ठरले. या अभियानामध्ये केंद्र सरकार बरोबर राज्यसरकार आणि नगरपालिकांनी देखील सक्रिय सहभाग घेतला त्यामुळे शहरातील झोपडपट्टयांमध्ये पूरेशा जीवनावश्यक, पायाभूत सुविधा उपलब्ध झालेल्या दिसतात.

## २) गृहनिर्माण खाते महाराष्ट्र

२०११ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्राची लोकसंख्या ११,२३,७२,९७२ एवढी आहे. आणि जवळजवळ महाराष्ट्रातील ४२% लोक शहरांमध्ये राहतात. शहरांमधील वाढती लोकसंख्या, झोपडपट्टी, गलिच्छ वस्त्या यांच्या विकासाचा विचार करुन गरीब, मध्यमवर्गीय व उच्च उत्पन्न गटातील लोकांना परवडणाऱ्या दरात टिकाउ घरांची निर्मिती करण्यासाठी २३ जुलै २००७ रोजी पहिल्यांदाच महाराष्ट्राच्या गृह निर्माण खात्याने गृहनिर्माण धोरण आखले. त्यानुसार प्रधानमंत्री आवास योजना, शहरी, जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय शहरी पुनरुत्यान अभियान (JNNURM) कार्यक्रम अंतर्गत BSUP, IHSDP धारावी विकास कार्यक्रम इ. उपक्रम राबविण्यात आले. तसेच राजीव आवास योजना, राष्ट्रीय गलिच्छ वस्ती सुधार योजना, विडी कामगारांसाठी गृह निर्माण योजना, आपदाग्रस्तांसाठी घरकुल योजना राबवल्या जातात. या खात्याअंतर्गत महाराष्ट्र गृह निर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (म्हाडा) ही स्वायत्त कार्यरत आहे. तर झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, शिवशाही पुनर्वसन प्राधिकरण मर्यादित. ही प्राधिकरणे कार्यरत आहेत. महाराष्ट्र झोपडपट्टी; सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकासद्ध अधिनियम १९७१ अंतर्गत महाराष्ट्र गलिच्छ वस्ती; सु.नि.व.पु.द्ध न्यायाधिकरणाची स्थापना करुन त्या अंतर्गत झोपडपट्ट्यांच्या संदर्भातील खटले निकाली काढले जातात. महाराष्ट्रातील महानगरांपासुन छोट्या शहरांपर्यंत झालेल्या झोपडपट्ट्यांच्या निर्मुलन, सुधारणा व पुनर्विकासामध्ये या खात्याने मध्यवर्ती आणि मोलाची कामगिरी बजावली आहे.

### ३) झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरण (Slums Rehabilitation Authority (SRA))

हे प्राधिकरण महाराष्ट्र सरकारने १९९५ साली स्थापना केले. शहरातील झोपडपट्टयांचे पुनर्वसन प्रकल्प राबवण्याची जबाबदारी ची आहे. हे प्राधिकरण राज्यसरकारच्या आराखडयातील आहे. याचा मुख्य उद्‌देश शहरातील बकाल झोपडपट्‌ट्यांचे निर्मूलन करुन अथवा पुनर्विकास करुन शहरी गरिबांना हक्काची घरे व आरोग्यदायी जीवन उपलब्ध करुन दिले व आहे. या प्राधिकरणमार्फत शहरी गरिबांना दर्जेदार घरे उपलब्ध करुन दिले जातात. झोपडपट्‌ट्यांचे पुनर्वसन करुन पक्कया सदनिका दिल्या जातात. खाजगी गुंतवणुकदाराच्या सहकार्याने झोपडपट्‌ट्यांचा पुनर्विकास करणे, एस.आर.ए. च्या माध्यमातून खाजगी बिल्डर (विकासक) झोपडपट्‌ट्यांचा पुनर्विकास करुन त्यातील काही भाग बाजारात विकू शकतो. त्यामुळे झोपडपट्टयांचा पुनर्विकास सरकारी गुंतवणुकीशिवाय होतो. SRA ही योजना देखील महाराष्ट्रामध्ये यशस्वीपणे कार्य करतांना दिसते.

### ४) शिवशाही पुनर्विकास प्रकल्प मर्यादित

महाराष्ट्र शासनामार्फत झोपडीधारकांचे पुनर्वसन करण्याच्या उद्‌देशाने १/०४/१९९८ रोजी ही सरकारी कंपनी स्थापना करण्यात आली. ही योजना बृहनमुंबईतील झोपडपट्टयांसाठी लागू करण्यात आली. या योजनेचे कार्य मर्यादित स्वरुपाचे असले तरी महाराष्ट्रातील झोपडपट्टयांच्या पुनर्वसनाच्या मार्गातील महत्त्वपूर्ण टप्पा म्हणून या योजनेकडे पाहिले जाते. या योजनेचा हेतू झोपटपट्टयांच्या पुनर्वसनासाठी समर्पित केलेला होता. झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरणाने मंजूर केलेल्या योजनांची अंमलबजावणी करुन योजना यशस्वीपणे पूर्ण करणे, मोकळ्या आणि रिकाम्या भुखंडांवर नवीन गृह बांधणी योजना राबविणे, झोपडपट्टयांनी व्यापलेल्या जमिनीवर नविन योजना राबविणे इ. उदिष्टे साध्य करण्यासाठी या कंपनीची स्थापना करण्यात आली. सुरुवातीला डिसेंबर १९९९ पर्यंत २ लाख घरांचा उद्देश ठेवण्यात आला परंतु काही अडथळ्यांमुळे पहिल्या टप्प्यात ५०,००० घरे बांधण्याचे उद्‌दिष्ट ठरविण्यात आले. यापैकी २५००० घरे कंपनी बांधेल तर उरलेली २५००० घरे खाजगी विकासामार्फत बांधण्याचे ठरले. परंतू ऑक्टोबर १९९९नंतर महाराष्ट्र शासनाने कंपनीस कोणतेही नविन प्रकल्प हाती न घेण्याचे आदेश दिले आहेत. परंतू त्यावेळी चालू असलेल्या योजना पूर्ण करण्याचे आदेश दिले आहेत.

### ५) एकात्मिक गृहनिर्माण आणि झोपडपट्टी विकास कार्यक्रम (The Integrated Housing and Slums Development Programme (IHSDP))

या योजनेमध्ये पूर्वीच्या वाल्मिकी आंबेडकर विकास योजना (VAMBAY) आणि राष्ट्रीय झोपडपट्टी कार्यक्रम (National Slums Development Programme) (NSDP) मार्फत चालविलेल्या योजना एकत्रित करणे आणि पूरेसा निवारा नसलेल्या आणि जीर्ण परिस्थितीत राहणाऱ्या शहरातील झोपडपट्‌टीवासियांच्या परिस्थितीत सुधारणा करण्यासाठी एकात्मिक दृष्टिकोन निर्माण करण्यासाठी सदर योजना निर्माण केली गेली. या योजनेचा मुख्य उद्‌देश म्हणजे ओळखल्या जाणाऱ्या शहरी भागातील झोपडी धारकांना पुरेसा निवारा आणि मुलभूत पायाभूत सुविधा प्रदान करुन निरोगी आणि सक्षम शहरी वातावरणासह

संपूर्ण झोपडपट्टयांच्या विकासासाठी, संवर्धनासाठी प्रयत्न करणे हा आहे. ही योजना १० लाख लोकसंख्येपेक्षा कमी लोकसंख्येच्या शहरांसाठी लागू आहे जवळपास ८४ शहरांमध्ये ही योजना लागू करण्यात आली. या योजनेतील लाभार्थ्यांने ११% रकमेचा हिस्सा भरावयाचा असतो. केंद्र व राज्य सरकार मिळून ८९% रकमेचा निधी उपलब्ध करुन देतात. या योजनेत झोपडीधारकांना स्वमालकीच्या सदनिक प्राप्त होतात. अत्यंत उपयुक्त आणि व्यवहारिक योजना असून देखील अत्यंत मंदगतीने या योजनेचे कामकाज चालू आहे. लभार्थ्यांच्या अनेक अवाजवी मागण्या, बहुमजली इमारतीस विरोध, समुह पध्दतीच्या घरकुलांना विरोध, जमीनीचा उपलब्धतेस होणारा विलंब, जमीनीचे आरक्षण बदलण्यास होणारा विलंब आणि सर्व दिरंगाईमुळे होणारी बांधकाम खर्चातील भरमसाठ वाढ. यामुळे या योजनेचा म्हणावा तेवढा परिणाम झालेला नाही.

**६) शहरी गरिबांना मूलभूत सुविधा पुरविणे** (Basic Services to the Urban Poor (PSUP)

नागरी भागातील गरीब लोकांना मुलभूत सुविधा पुरविणे तसेच मुलभूत सुविधांसह घराचे बांधकाम करण्यास भरीव मदत करणु हा या योजनेचा मुख्य हेतू आहे. या योजनेकरीता केंद्रसरकारचा ५०% निधी असतो, राज्यसरकारचा ३०% निधी असतो, तसेच स्थानिक संस्थेकडून ९% निधी उपलब्ध करुन दिला जातो. तर लाभार्थ्यांने ११% रकम भरावयाची असते. महाराष्ट्रातील मोजक्या १० शहरांमध्ये ही योजना लागू करण्यात आली. मुंबई, ठाणे, मिरा-भाईंदर, कल्याण-डोंबीवली, कुळगाव-बदलापूर, नांदेड, नागपूर, नाशिक, पिंपरी-चिंचवड व पूणे अशा दहा शहरांसाठी ही योजना लागू करण्यात आली. ही योजना देखील अपेक्षित वेळेत अपेक्षित ध्येय साध्य करु शकलेली नाही. त्यामुळे (IHSDP) व (BSUP) या दोन्ही योजना जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय शहरी पुनरुत्यान अभियान JNNURM मधील उपकार्यक्रम म्हणून समाविष्ठ केलेल्या आहेत. सध्या हे दोन्ही कार्यक्रम JNNURM या योजनेअंतर्गत चालविल्या जातात.

**७) प्रधानमंत्री आवास योजना** (Pradhanmantri Awas Yojana (PMAY))

**सर्वांसाठी घर योजना २०२२**

प्रधानमंत्री आवास योजना हा महत्वकांक्षी कार्यक्रम केंद्रिय गृहनिर्माण आणि नागरी दारिद्र्य निर्मुलन मंत्रालयाच्या अंतर्गत सुरु करण्यात आला. शहरातील सर्वांसाठी घर मिळावे या विचारातून हे अभियान शहरातील गरिबांसाठी तसेच झोपडपट्टीतील लोकांसाठी निर्माण करण्यात आले. या अभियानाचा उद्देश व्यापक आणि परिणामकारक आहे. खाजगी विकासकांच्या सहभागाने झोपडी धारकांचे पुनर्वसन करणे, दुर्बल घटकांसाठी परवडणारी घरे उपलब्ध करणे, सार्वजनिक आणि खाजगी भागिदारीतून स्वस्त व परवडणारी घरे उपलब्ध करणे, लाभार्थ्याच्या सहभागाने करण्यात येणारी खाजगी घरबांधणी किंवा सुधारणा यासाठी अनुदान देणे हा आहे. आर्थिक दुर्बल घटक व अल्प उत्पन्न गट हे या योजनेचे लाभार्थी आहेत. ही योजना सध्या पुर्ण क्षमतेने कार्यरत असून केंद्र सरकार व राज्यसरकार तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून ही योजना अमलात येत आहे.

### ७) **धारावी पुनर्विकास प्रकल्प** (Dharavi Redevelopment Project (DRP))

धारावीची झोपडपट्टी ही आशिया खंडातील सर्वात मोठी झोपडपट्टी आहे. या झोपडपट्टीचा पुनर्विकास करण्यासाठी महाराष्ट्र सरकार अनेक दशकांपासून प्रयत्नशील आहे. परंतू त्यास म्हणावा तेवढा प्रतिसाद मिळत नाही. जवळपास ६०० एकर परिसरात ही झोपडपट्टी विस्तारलेली आहे. साधारण १० लाख लोक या झोपडपट्टीत राहतात. अडाणी ग्रुप आणि महाराष्ट्र सरकार यांच्या संयुक्त गुंतवणूकीतून हा महाकाय आणि महत्वकांक्षी प्रकल्प उदयास येत आहे. २८००० कोटी रुपयांच्या या प्रकल्पामध्ये ८०% रक्कम अडाणी गुंतवणार आहे तर २०% रक्कम महाराष्ट्र सरकार गुंतवणार आहे. प्रत्येक झोपडी धारकाला साधारण ३५० चौ.फुटाची सदनिका मिळणार आहे. या झोपडपट्टी पुनर्विकास प्रकल्पाचा कालावधी ७ वर्षांचा आहे. या झोपडपट्टीचा पुनर्विकास ही एक स्वप्नवत प्रक्रिया आहे. या प्रकल्पाच्या पुर्ततेनंतर भारतातील इतर शहरातील झोपडपट्ट्यांच्या पुनर्विकासाची वाटचाल सुरु होईल.

### झोपडपट्ट्यांमधील समस्या /झोपडपट्ट्यांच्या पुनर्विकासाची कारणे.

झोपडपट्ट्या हा शब्द मोठया शहरांमध्ये आणि महानगरांमध्ये परवलीया झाला आहे. झोपडपट्टी मुक्त एकही शहर भारतामध्ये नसेल. सरकारी जमिनी, नद्या, नाले, समुद्रकिनारे, रेल्वेलाईन इ. ठिकाणी फोफावल्या झोपडपट्ट्या ही राष्ट्रीय समस्या बनली आहे. या झोपडपट्ट्यांच्या आधाराने भारतातील शहरांमध्ये अनेक गंभीर समस्या निर्माण झाल्या आहेत. या समस्या दिवसेंदिवस उग्र स्वरुप धारण करीत आहेत. मानवी समुदायावर विपरीत परिणाम घडविणाऱ्या झोपडपट्ट्यांमधील समस्यांची चर्चा खालीलप्रमाणे करता येईल.

### १) मुलभूत भौतिक सुविधांचा अभाव

झोपडपट्टया या विशेषत: लहान-मोठ्या शहरांमध्ये अतिशय जटिल, अडचणीच्या ठिकाणी, किचकट आणि चिंचोळया जागांमध्ये वसलेल्या असतात. झोपडपट्ट्यांमध्ये नीट चालणे देखील मुश्किल असते. अशा अत्यंत दाटीवाटीच्या वस्त्यांमध्ये विज, पाणी, रस्ते, पूल, सांडपाण्याच्या सुविधा, टेलिफोन, गॅस पाईप लाईन, वाहतूक व दळणवळणाची साधने यासारख्या मुलभूत भौतिक सुविधा सरकारांना इच्छा असूनसुध्दा पूरविणे अशक्यप्राय: बनले आहे. परिणामी तेथे राहणा-या नागरिकांचे जीवनमान, राहणीमान, मागासलेले व निकृष्ठ दर्जाचे असते. या मूलभूत भौतिक सुविधा पूरवून लोकांच जीवन सुसहय करण्यासाठी झोपडपट्टी पुनर्विकास करणे आवश्यक आहे.

### २) शैक्षणिक सुविधांचा अभाव

भारतातील झोपडपट्ट्यांची अवस्था फारच दैयनिय आहे. अगदिच लहान म्हणजे त्या झोपडपट्ट्यांमध्ये जीवनावश्यक शारिरीक गरजा सुध्दा भागवीणे दुरापास्त असते. एवढी जटिल, किचकट आणि दाटीवाटीच्या वस्त्या असतात. अशा वस्त्यांमध्ये लहान मुले, तरुणांच्या शिक्षणसाठी आंगणवाड्या, शाळा, महाविद्यालये, क्रिडांगणे निर्माण करणे केवळ अशक्य असते. परिणामी इच्छा, क्षमता, बुध्दिमत्ता

असून सुध्दा तेथील दर्जेदार शैक्षणिक सुविधा, सेवा पुरविणे अशक्य होते. शैक्षणिक सुविधांच्या अभावामुळे तरुण पीढी अशिक्षित, बेरोजगार, गुन्हेगारी कडे वळताना दिसते. हा राष्ट्र निर्मितीला धोका आहे.

**३) स्वच्छता आणि आरोग्याच्या समस्या**

अस्वच्छता, गलिच्छपणा, व्यसनाधिनता मलमुत्र विसर्जनाचा समस्या, रोगराई ही सर्व वैशिष्टे भारतातील झोपडपट्ट्यांमध्ये सार्वत्रिकपणे दिसून येतात. अस्वच्छता आणि गलिच्छपणामुळे नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होतात. साथीचे आणि संसर्गजन्य रोग, झपाटयाने पसरतात. शुध्द हवा, शुध्द पाणी, सात्वीक जेवणाच्या अभावी लोकांचे वेगवेगळया रोगांना बळी पडण्याचे प्रमाण वाढले आहे. अशा रोगी किंवा आजारी लोकांना जागे अभावी उत्तम दवाखाने, आरोग्याच्या सोई, औषधोपचार, रुग्णांपर्यंत पोहोचवणे अशक्य होते. डॉक्टर्स व अरोग्य सेवक, वैद्यकीय सेवा देणाऱ्या दर्जेदार संस्था अशा ठिकाणी जावून वैद्यकीय सेवा देण्यास तयार होत नाहीत त्यामुळे झोपडपट्टयांमधून आरोग्याच्या समस्या गंभीर स्वरुप धारण करताना दिसतात.

**४) महिला व बालकांसमोरील समस्या**

महिलांवरील अत्याचार, छळ, शोषण आणि लहान कोवळया वयाच्या बालकांवरील अन्याय, शोषण ही गंभीर असणारी बाब झोपडपट्ट्यांमध्ये सामान्य आणि नित्याचीच बनली आहे. स्त्रियांचे हक्क, संरक्षण, आरोग्याच्या सुविधा यांची वाणवा दिसते. स्त्रियांकडून जबरदस्तीने करवून घेतली जाणारी अवैध धंदे, वेश्या व्यवसाय, पिळवणूक सगळीकडे सर्रास दिसते. लहान मुलांना श्रम व कष्टाची कामे, शिक्षणापासून वंचित ठेवणे, अवैध व्यवसायांकडे गुंतवणे अशा अनेक गोष्टी स्त्रिया आणि लहान मुलांच्या बाबतीत चालू असतात. त्यातून सभ्य समाज, सुसंस्कृत समाज, आणि राष्ट्रउभारणीच्या मार्गात अडथळे निर्माण होतात.

**५) दारिद्र्य व बेरोजगारी**

झोपडपट्ट्यांमध्ये मुलभूत भौतिक सुविधा, शैक्षणिक सुविधांचा अभावी तेथील मुलांना आणि तरुणांना दर्जेदार प्राथमिक, माध्यमिक, महाविद्यालयीन, व्यावसायिक शिक्षण, मिळत नाही. गरीबीमुळे शिक्षणांपेक्षा जगण्यासाठी कमाई करण्यात अग्रक्रम दिला जातो. गरीबीमुळे चांगले आणि दर्जेदार शिक्षण घेणे दुरापास्त होते. परिणामी बेरोजगारी तरुणांचे तांडेच्या तांडे झोपडपट्ट्यांमध्ये दिसून येतात. बेरोजगारी, बेकारीमुळे दारीद्र्य येणे स्वाभाविक असते. त्यातून निकृष्ठ दर्जाचे जीवनमान बनते अशा दृष्टचक्रात तरुणाई सापडलेली असते.

**६) गुन्हेगारीची समस्या**

झोपडपट्ट्या सर्व प्रकारचे गुन्हे आणि गुन्हेगारांचे आश्रयस्थान असते. दारिद्रय, बेकारीमुळे तरुण-तरुणी अवैध घड्यांमध्ये ढकलले जातात. चोऱ्या, दरोडे, मारामाऱ्या, खुण, बलात्कार, अपहरण, वेश्या व्यवसाय, अशा अनेक गुन्हेगारी बरोबरच व्यसनाधिनता पण दिसून येते. दारु, गांजा, चरस, अफिम हेरॉइन, कोकेन, मेफेड्रॉन यासारख्या अमली पदार्थांची सरासपणे होणारी विक्री गुन्हेगारीला चालना देते. अनेक गंभीर

गुन्हेगार, अतिरेकी घुसखोरी या झोपड्यांचा आश्रय घेतात. स्थानिक गुन्हेगारांपासून राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय गुन्हे झोपड्यांचा आश्रय होताना दिसतात.

**७) सामाजिक सुरक्षेची समस्या**

सभ्य, आदर्श आणि असंस्कृत समाज हा राष्ट्राचा मुकुटमणी असतो. समाजातील शांतता, कायदा सुव्यवस्था, बंधूत्व, सामंज्यस, धार्मिक सहिष्णुता, शांततामय सहजीवन, सहकार्य, स्त्रिया, बालक व रुग्णांची सुरक्षितता व सेवा यासारख्या नैतिक मुल्यांमुळे आदर्श आणि प्रगत समाज निर्माण होतो. अशी सामाजिक मुल्ये झोपडपट्टयांमध्ये पायदळी तूडवली जातात. त्याचा परिणाम सामाजिक सुरक्षेवर होतो. गुन्हेगारी वाढते, प्रशासन, पोलीस व न्यायालयांवरील ताण वाढतो. कल्याणकारी योजना असफल होतात. परिणामी अशा झोपडपट्ट्यांमध्ये सामाजिक सुरक्षा निर्माण करणे ही आहावनात्मक बाब ठरली आहे.

वरील सर्व बाबींचा अभ्यास केल्यास झोपडपट्ट्या राष्ट्राच्या विकासातील एक अडसर बनलेल्या दिसतात. अनेक गंभीर समस्यांची सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास या गोष्टी अपरिहार्य ठरतात. भारतातील झोपडपट्ट्यांच्या विकासाच्या वाटेत अनेक अडथळे किंवा आव्हाने असल्याचे पहायला मिळते. मुलत: झोपडपट्टीमधील लोकसंख्येची घनता, जटिल आणि जटिल दाटीवाटीच्या वस्त्या, लोकसंख्येच्या प्रमाणात अपूऱ्या सुविधा, साधने, हे आव्हान आहेच. शिवाय या झोपडपट्ट्यांचा सुधार, निर्मुलन, पुनर्विकास होण्यासाठी आवश्यक असणारी राजकिय इच्छाशक्ती महत्वाची आहे. वर उल्लेख केला त्या सर्व योजना कार्यक्रम, अभियान वर्षानुवर्षे चालू आहेत. शासनाचा प्रचंड पैसा, वेळ, श्रम खर्च होत आहे. परंतू झोपडपट्टयांचे १००: निराकरण झालेले नाही. मागील ५० वर्षांत झोपडपट्ट्यांचे अस्तित्व आहे तसेच आहे. किंबहुना अधिक व्यापक आणि गंभीर होताना दिसते या प्रक्रियेतील आणखी एक महत्वाचा अडथळा म्हणजे भारतातील नोकरशाही कारभारात आखडलेली आहे. सरकारने कितीही चांगल्या, परिणामकारक, योजना आखल्या तरी प्रशासकीय परवानग्या, आरक्षणातील बदल, पर्यायवरणीय कायदे अशा अनेक बाबींमुळे वर्षानुवर्षे हे प्रकल्प धूळ खात पडलेले असतात. या गंभीर समस्येचे प्रशासनाला काहीही सोयरसुतक नसते. प्रशासनास हाताशी धरुन बिल्डर, व्यावसायिक, गुन्हेगार, समाजकंटक झोपडपट्ट्यांमध्ये आपली साम्राज्ये उभी करताना दिसतात. यासर्व अडथळे आणि आव्हानांचा विचार करता भारतातील झोपडपट्ट्यांचे निर्मुलन, सुधार किंवा पुनर्वसन येणाऱ्या काळात कशा पध्दतीने होइल हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल.

भारतातील महानगरांमध्ये निर्माण झालेल्या अनियंत्रित, बकाल, गलिच्छ आणि जटिल झोपडपट्टयांची समस्या दिवसेंदिवस उग्र रुप धारण करत आहे. नागरिकरणाची प्रक्रिया, औद्योगिकरण, जागतिकीकरण, व्यापारी अस्थापने, समाजमाध्यमे यामुळे जग दिससेंदिवस लहान होत चालले आहे. रोजगार, पर्यावरण, औषधोपचार, शासकिय कामे, व्यापार, उदिम या उद्देशाने ग्रमीण लोकंचेच नव्हे तर पर राज्यातील आणि विदेशातील लोकांची वाटचाल महानगरांच्या दिशेने होत आहे. त्यामुळे शहरांचा आकार आणि लोकसंख्येची घनता प्रचंड वाढली आहे. एवढया सर्व लोकांना शहरामध्ये समावून घेणे एक मोठे आव्हान आहे. २०११

च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रातील साधारण ४२% लोक शहरांमध्ये राहतात. या प्रचंड लोकसंख्या ताण नागरी सोईसुविधांवर पडली. आरोग्य, सामाजिक स्वास्थ, शांतता यासारख्या राष्ट्राच्या विकासाला चालना देणाऱ्या मूल्यांचा ऱ्हास होताना दिसतो.

झोपडपट्ट्यांची समस्या गंभीर स्वरुपाची आहे. केंद्रसरकार, राज्यसरकार, नगरपालिका, महानगरपालिका, समाजसेवी संस्था, खाजगी विकासक यांच्या सामुहिक प्रयत्नातून या अक्राळविक्राळ झोपडपट्ट्यांची सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास यासारख्या गोष्टी सातत्याने चालू आहेत. परंतू हे प्रयत्न समस्येचे गांभीर्य पाहता पूरेसे नाहीत. झोपडपट्ट्यांमध्ये राहणाऱ्या नागरिकांनी देखील सुधारणेसाठी पुढाकार घेवून सरकारी प्रयत्नांना दिला पाहिजे. तशी इच्छाशक्ती बाळगली पाहिजे. तेव्हा झोपडपट्ट्यांवर कायमस्वरुपी उपाययोजना करणे शक्य आहे.

## २.३ सारांश

शहरी स्थानिक स्वराज्य संस्थामधील योजना या घटकात आपण प्रामुख्याने तीन समस्यांचा अभ्यास केला. यामध्ये लहान, मध्यम आणि महानगरांमध्ये वाढत्या लोकसंख्येमुळे, नागरिकरणाच्या आणि औद्योगिकरणाच्या प्रक्रियेमुळे शहरांमध्ये असणाऱ्या भौतिक पायाभूत सुविधांवर मोठया प्रमाणात ताण पडतो. त्याचे सामाजिक, आर्थिक आणि राजकिय तसेच पर्यावरणावर मोठे परिणाम होतात. त्यातून काही उग्र आणि जटिल स्वरुपाचे प्रश्न निर्माण होतात. प्रसंगी सावधानता आणि पूर्वतयारी नसेल तर मोठी जीवीत आणि वित्त हानी होवू शकते. यासाठी स्थानिक स्वराज्य संस्था राज्यसरकार आणि केंद्र सरकारचा मदतीने तसेच खाजगी संस्था आणि लोकसहभागातून विविध योजना, प्रकल्प, अभियान राबवते व नागरी समस्या सोडवून मानवी जीवन सुसहय करण्याचा प्रयत्न करते. त्या सर्व प्रक्रिया आणि उपाययोजनांचा अभ्यास आपण या घटकामध्ये केला आहे.

अ) पाणी स्वच्छतेच्या योजना

* जलप्रदुषणाची कारणे
* सांडपाण्याचे प्रकार आणि व्यवस्थापन
* सांडपाण्यामुळे होणारे रोग
* पाणी स्वच्छतेचे विविध कार्यक्रम /अभियान
* पाणी स्वच्छतेच्या क्षेत्रात काम करणाऱ्या संस्था /संघटना

ब) कचरा व्यवस्थापन योजना

* कचरा उत्पन्न होण्याची कारणे आणि प्रकार
* कचऱ्याचे व्यवस्थापन आणि विल्हेवाट लावणे.

* कचरा व्यवस्थापनाच्या योजना /प्रकल्प /कार्यक्रम/अभियान

क) झोपडपट्टी विकास कार्यक्रम

* झोपडपट्टया निर्माण होण्याची कारणे आणि स्वरुप
* झोपडपट्टया निर्मुलनासाठी केलेल्या सरकारी योजना, प्रकल्प, अभियान.
* झोपडपट्टयांच्या समस्या /पुनर्विकासाची कारणे.

इ. उपघटकांचा सविस्तर अभ्यास या घटकामध्ये आपण पूर्ण केला आहे. या घटकामधून शहरीकरणाच्या प्रवाहात शहरांमध्ये निर्माण झालेल्या अनेक समस्यापैकी पाणी स्वच्छतेची समस्या, सांडपाणी, व्यवस्थापन, कचऱ्याची समस्या, झोपडपट्टयांची समस्या अशा मर्यादित परंतु गंभीर समस्यांचा आपण अभ्यास केला व त्या समस्या सोडविण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थापासून केंद्र सरकारपर्यंत आणि खाजगी व स्वयंसेवी संस्था तसेच व्यक्तिगत पातळीवर केल्या जाणाऱ्या प्रयत्नांचा अभ्यास केला आहे.

## २.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

१) स्थानिक स्वराज्य संस्था :- स्थानिक पातळीवर समाजाचे नियमन व नियंत्रण करणारी लोकांच्या मार्फत निवडणूकीच्या माध्यमातून तयार केलेली व्यवस्था. उदा. ग्रामपंचायत, नगरपालिका, महानगरपालिका.

२) झोपडपट्टी :- शहरांमध्ये रहाण्यास जागा नसलेले लोक सरकारी जमीनी, नद्या, ओढयांचे काठ, समुद्रकिनारे, रेल्वेलाईनच्या शेजारचा जागा, उड्डाणपूल, खालची जागा इ. ठिकाणी झोपडी बनवतात. या झोपडयांची संख्या वाढली की एक वसाहत तयार होते त्यांना झोपडपट्टी म्हणतात.

३) कार्यशैली :- कार्यपध्दती किंवा कामकाजाची पध्दत सरकारने निर्माण केलेल्या कोणत्याही संस्थेची कामकाज घडनेशी आणि नियमांशी सुसंगत असते. या नियंत्रित आणि अधिक्रम कामकाज करण्याच्या पध्दतीला कार्यशैली म्हणतात.

४) प्राधिकरण :- नागरिकांचा विकास करण्यासाठी सरकारने मंत्रिमंडळ आणि विविध खाती बनवलेली असतात. ज्या-त्या खात्यामार्फत त्या-त्या गोष्टिंचा विकास होत असतो. परंतू एखाद्या खात्यामध्ये अशी एखादी समस्या निर्माण होते की ती सांडविण्यासाठी खात्यातच नियंत्रणाखाली एक मर्यादित स्वातंत्र आणि स्वायत्तता असलेली. फक्त नेमून दिलेल्या विषयावरच काम करणारी यंत्रणा म्हणजे प्राधिकरण होय.

५) अर्थसंकल्प /अंदाजपत्रक :- पुढच्या येणाऱ्या आर्थिक वर्षात करावयाची कामे, जबाबदाऱ्या, कर्तव्ये, योजना, सुविधा यांचा अभ्यासपूर्ण आर्थिक अहवाल तयार करुन सभागृहापुढे मांडतात. त्याला अर्थसंकल्प किंवा अंदाजपत्रक म्हणतात.

## २.५ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

अ) पुढे दिलेल्या वाक्यातील रिकाम्या जागी कंसातील योग्य पर्याय लिहून विधाने पूर्ण करा.

१) माणसाला होणाऱ्या रोगांपैकी बहुतांश रोग .................. पासून होतात.

(व्यसन, प्रदुषित पाणी, पैसा, गरीबी)

२) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण हे ................. साली स्थापन झाले.

(१९४७, १९५०, २०१४, १९७६)

३) ..................ही आशिया खंडातील सर्वात मोठी झोपडपट्टी आहे.

(धारावी, कोकण, कुलबा, दादर)

४) ओल्या कचऱ्यापासून ..................बनवता येते.

(इमारत, गांडूळखत, प्लास्टिक वस्तू, यापैकी नाही)

५) झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरण (SRA) हे ..................राज्याने स्थापन केले आहे.

(महाराष्ट्र, तामिळनाडू, मिझोरम, आसाम)

## २.६ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१) प्रदुषित पाणी २) १९७६ ३) धारावी ४) गांडूळखत

५) महाराष्ट्र

## २.७ सरावासाठी स्वाध्याय

अ) टिपा लिहा

१) सांडपाणी व्यवस्थापन

२) कचरा व्यवस्थापन

३) कचरा उत्पन्न होण्याची कारणे

४) झोपडपट्ट्या निर्माण होण्याची कारणे

५) पाणी प्रदुषित होण्याची कारणे

अ) पुढील प्रश्नांची उत्तरे सविस्तर लिहा.

१) पाणी स्वच्छतेच्या योजनांची माहिती लिहा.

२) कचऱ्याचे प्रकार लिहा.

३) झोपडपट्ट्यांच्या निर्मुलनासाठी केलेल्या योजनांची माहिती लिहा.

४) कचरा व्यवस्थापनाच्या योजना स्पष्ट करा.

## २.८ अधिक वाचनासाठी संदर्भ


१. शिरसाठ श्याम बैनाडे, २०१६, 'भारतातील स्थानिक स्वराज्य संस्था', विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद.

२. भणगे रविंद्र, २०१२, 'भारतातील स्थानिक स्वराज्य संस्था', प्रशांत पब्लिकेशन्स.

३. इनामदार ना. र., १९९७, लोकप्रशासन, दास्ताने ॲण्ड कं., पुणे.

४. बंग के. आर., २००९, महाराष्ट्राचे शासन आणि राजकारण, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद.

५. Mathur Kuldeep, 2013, 'Panchyati Raj' Oxford India Shrot Introductions.

6. Inamdar N. B., Satish N. G., Takalkar, 1992, PanchyatiRaj : An Annotated Resource Guide, South Asia Books.


❑❑❑